म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध.
सं. क्र. 3043



राष्ट्रसंत

वैचारिक क्रांती

REFBK-0024535

डॉ. बाळ पद्मवाड, नागपूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.


सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

19 MAY 1985

26 MAY 1985

26 JUN 1985

(क्र.४
५०


3023
अ. क्र. २४५३५
दिनांक
२०१३/१५

संदर्भ निबंध
३४३
इ.पु.३५.
नागपूर



राष्ट्रसंत : वैचारिक-क्रान्ती

REFBK-0024535

: लेखक :

प्रा. डॉ. बाळ पदवाड

एम्. ए. बी. एड्. पीएच्. डी.

गो. से. अर्थ–वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

प्रकाशक :
सौ. विजया पदवाड
विजया प्रकाशन
C/o काशीनाथजी भोरकर
प्लॉट नं. २३, रेशीमबाग नागपूर.

❀

मुद्रक :
श्री विठ्ठलराव वैरागडे
चंद्रविकास मुद्रण, महाल, नागपूर-२.

❀

मुखपृष्ठ सजावट :
भिसेकर फोटो स्टुडिओ,
वाकर रोड, नागपूर.

❀

मुखपृष्ठ छपाई :
मधुकर आर्टस,
घंतोली, नागपूर.

❀

प्रथम आवृत्ती :

❀

१५ ऑक्टोबर १९८४
वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
१६ वी पुण्यतिथी, अमृत-महोत्सव वर्षात
गुरुकुंज आश्रम

सर्वाधिकार :
प्रकाशकांधिन

❀

पुस्तके मिळण्याचे ठिकाण :
विजया प्रकाशन
C/o श्री काशीनाथजी भोरकर,
प्लॉट. नं. २३, रेशीमबाग, नागपूर.

❀

मूल्य : ३० रुपये

युगप्रवर्तक, जहाल क्रान्तिकारक,

मानवता व समाजवादाचा,

सर्वधर्म समन्वयांचा पुरस्कार

करणारे 'राष्ट्रसंत'

यांचा

'राष्ट्रसंत : वैचारिक क्रान्ती'

हा अभिनव ग्रंथ –

माझी लाडकी लेक कै. चि. प्रणाली

उर्फ अस्मिताच्या गोड स्मृतीस

सादर समर्पित !

पुरस्कार -

डॉ. निर्मलकुमार फडकुले
(सोलापूर)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक कार्य महत्वपूर्ण असून या व्यापक कार्याची अनेक दृष्टीनी मीमांसा होणे आवश्यक आहे. समाजावर संस्कार करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्या क्रांतिकारक सुधारकात त्यांना अलीकडील काळांत विशेष स्थान आहे. त्यांचे साहित्य विपुल आहे. आपल्या अभ्यासिकेत बसून विचार करणारा पुस्तकी विचारवंत व साहित्यिक आणि समाजाच्या बहूविध मिसळलेला, समाजात रमलेला, लोकांच्या सुख-दुःखाशी समरस झालेला विचारवंत यांच्या दृष्टीत कार्यात पुष्कळच अंतर असते. संत तुकडोजी महाराज निष्क्रिय विचारवंत नव्हते. ते क्रियाशील साहित्यिक व जागरूज कवी होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा व विचारांचा फार मोठा प्रभाव लोकमानसावर पडला. संत तुकडोजीच्या काव्य-साहित्यातून प्रगट झालेल्या नानाविध विचारांचे व त्यातील वाङमय गुणाचे रसग्रहण आणि समीक्षण करण्याचा अेक चांगला प्रयत्न प्रा.डॉ.बाळ (सुरेश) पदवाड यांनी प्रस्तूत पुस्तकांतून केला आहे.संत तुकडोजीच्या कतृत्वाचे अनेकांशी समीक्षण करण्यांचा हा पहिला प्रयत्न असावा. अश्या प्रकारच्या चिकित्सेची व रसग्रहणात्मक लेखणाची आवश्यकता होती. प्रस्तुत पुस्तकामुळे तुकडोजी महाराजाची वैचारिक व वाङमयीन प्रतिमा सुस्पष्टपणे मांडण्याचा एक उल्लेखनीय अभ्यासपूर्ण प्रयत्न बहुतांशी सफल झाला असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

पुस्तकाची मांडणी एकुण आठ प्रकरणांत लेखकांने केली आहे. समाजदर्शन या प्रकरणांत समाजातील अधर्म, कौटुंबिक प्रश्न, ग्रामीण भागातील शेतकरी-शेत मजूरांचे प्रश्न, सामाजिक समता, आदर्श समाज इत्यादी विविध प्रश्नांसंबंधी संत तुकडोजी महाराजाची विचारधारा कशी स्पष्ट व प्रतिवादी आहे यांचे दिग्दर्शन लेखकांने घडविले आहे. तिसऱ्या प्रकरणांतून महाराजाचा आर्थिक दृष्टिकोन विशद केला आहे. 'ग्रामराज्य' या प्रकरणांतून तुकडोजीना अभिप्रेत असलेले ग्रामराज्य हे समतेवर, मानवतेवर व प्रामाणिक परिश्रमावर आधारलेले असले पाहिजे. सामुहिक जीवन जगण्यांचा मंत्र अशा ग्रामराज्यातून मिळाला पाहिजे. यांचे अनेक सूक्ष्म तपशील महाराजाच्या साहित्यात कसे सांपडतात यांचे विवरण लेखकाने केले आहे. दलित आणि स्त्री यांच्या संबंधी तुकडोजी महाराजांनी घेतलेला उदार समतावादी, तर्कशुद्ध भूमिकेचा यथायोग्य परामार्श लेखकांने घेतला आहे. शिक्षण व साहित्य यांच्या संदर्भात

महाराजाचे विचार विशद करण्यावरच केन्द्रित झाले आहे. प्रस्तुत प्रकरण या पुस्तकांत महत्वाचे मानले पाहिजे. अेक साहित्यिक म्हणून तुकडोजी महाराजांची गुणवत्ता काय आहे व त्याच्या साहित्यामागील प्रेरणा, भावना; अनुभुती कोणत्या स्वरूपाच्या आहेत याची मीमांसा महाराजाच्या साहित्यातील अनेक उदाहरणे घेऊन लेखकांने बव्हुंशी समाधानकारकपणे केली आहे.

प्रस्तुत पुस्तकांतून लेखकांच्या दीर्घ अभ्यासक्रमाची जाणीव होते. संत तुकडोजींच्या विचाराचे पूर्वग्रहरहित दृष्टिकोनांतून, योग्य त्या संदर्भात लेखकांने आकलन करून घेतले आहे. याची कल्पना येते. महाराजांच्या साहित्यातील भिन्न-भिन्न विचारधारा या अखेर त्यांनी जीवनभर सांगितलेल्या मानवतावादाशी संलग्न आहेत. व जातिधर्मातील, समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी त्या कशा प्रेरणा देऊ शकतात यांचे साधार स्पष्टीकरण लेखकांने केले आहे. ग्रामीण पुर्नरचना करून समाजवादी तत्वाकडे जाणाऱ्या युगाला तुकडोजीचे विचारधन पोषक, उपकारक व पथदर्शक आहे यात शंका नाही आणि ते लेखकांने अत्यंत परिश्रमपूर्वक अभ्यासूपणे; निष्ठेने केले आहे. याबाबत शंका नाही. महाराजाच्या विचारांचे क्रान्तदर्शित्व, मौलिकपण त्यांने योग्यरितीने स्पष्ट केले आहे. महाराजाच्या व्यक्तित्वावर व व्यापक विचार सरणीवर समुचित प्रकाश या पुस्तकामुळे पडला आहे. असे माझे मत आहे. लेखकांच्या चिंतनशिलतेची; अध्ययनाची आनंदकारक जाणीव पुस्तकामुळे होते. त्यातील निष्कर्ष मान्य करावे असेच आहेत.

विजयादशमी, दि. ४-१०-८४ — डॉ. निर्मलकुमार फडकुले

०—०

अभिप्राय व अभिनंदन -

श्री तुकारामदादा, गीताचार्य

श्री गुरुदेव आत्मानुसंधान टेकडी, अडचाळ, (ब्रह्मपुरी)

'राष्ट्रसंत; वैचारिक क्रान्ती' हे डॉ. बाळ पदवाड यांचे पुस्तक वाचायला मिळाले. नागपूर विद्यापीठाने त्यांना त्या विषयावर डॉक्टरेट दिली. ही सन्मानाची गोष्ट आहे. वं. तुकडोजी महाराजांनी जीवनभर जोपासल्या जीवन-निष्ठेला-विचाराला आणि तत्वाला डॉ. पदवाडांनी आपल्या पुस्तकाद्वारे योग्य न्याय मिळवून दिला आहे.

राष्ट्रसंताचे पुरोगामी-समाजवादी विचार प्रत्येक क्षेत्रातून प्रभावी रितीने मांडले आहे. ते काळ-परिस्थितीनुसार आहे व आजच्या समाजवादाकडे वाटचाल करणाऱ्या युगाला कसे पुरक आहे. हे सिद्ध करून दाखविले आहे.

कार्ल मार्क्सचा कॉपिटल व राष्ट्रसंताची ग्रामगीता मानवाच्या उत्कर्षाचे, कष्टकरी–श्रमिकांच्या उद्धाराचे व त्यांची सत्ता निर्माण करून देणारे ग्रंथ आहेत. 'श्रमिक' हीच खरी दौलत आहे म्हणून उत्पादनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांना योग्यतेचा न्याय मिळणे अपरिहार्य आहे. डॉ. पदवाड यांनी राष्ट्रसंताच्या साहित्याचा अचूक व परिपूर्ण असा अभ्यास व चिंतन करून हा अप्रतिम सुंदर ग्रंथ लिहिलेला आहे. जागतिक विचारवंताबरोबर त्यांचे स्थान निश्चित केले आहे. मॅब्ली, क्रोथर, अलबर्ट आईनस्टाईन, रूसो; जॉन गुंथर, बेडेल अशा अनेक विचारवंताबरोबर राष्ट्रसंताचे विचार मांडले आहे.

सामुदायिक प्रार्थना; सामुदायिक जीवन ही ग्रामनिष्ठेची; राष्ट्रनिष्ठेची मूलतत्वे होय ! जो पर्यन्त ग्राम स्वालंबी, स्वयं–शासित; उद्योगी होणार नाही तोपर्यन्त ग्राम विकास ही स्वप्नमय कल्पना राहिल. कच्च्यामालापासून पक्का माल तयार करणे; गोवंश पालन. कुटिर आणि लघु–उद्योगांत वृद्धी, सहकारी तथा सामुदायिक शेती, शेती–उद्योगावर ग्रामीण मालकी, उत्पादित मालाचे कामानुसार व गरजेनुसार वितरण, कष्टीक समाज; उद्योगी–संशोधक वृत्तीचे तरूण, सद्भाविक–सदाचारी लोक; ज्या गावात राहतात व व्यक्तिनिष्ठे पेक्षा जे ग्रामनिष्ठा सांभाळतात, अशा लोकांच ग्राम आदर्श ग्राम होय ! ग्रामविकासांतच व्यक्तिविकास अवलंबून असतो. प्रत्येक व्यक्तीने ग्रामसुधारणेचा संकल्प करावा व तो पूर्ण करावा, संकल्पाच्या पाठीमागची भावना समाजनिष्ठ असावी. 'अपुल्या व्यक्ती–कुटुंबा-करीता । न व्हावी गावाची अव्यवस्था' किंवा ग्राम जीवनांमध्ये 'व्यक्तित्वची नको अमुचे' अशा स्वरूपातील भावना प्रत्येकांच्या अतरी असायला पाहिजे.

डॉ. बाळ पदवाड यांनी सुंदरतेने वरील प्रकारचे विचार 'राष्ट्रसंत : वैचारिक क्रान्ती' या पुस्तकांत मांडले आहे. आजपर्यन्त राष्ट्रसंतांवर जितके पुस्तके लिहिल्या गेली असतील त्यांत हे पुस्तक वेगळं आहे. श्रेष्ठ आहे. महाराष्ट्र संताच्या मालिकेत राष्ट्रसंताना बसविणे फार सोयीचे–सुलभ काम आहे. पण म. फुले, मार्क्स वगैरे विचारवंताबरोबर राष्ट्रसंताची वैचारिक बैठक दाखविण्याचे महत्वपूर्ण कार्य डॉ. बाळ पदवाड यांनी केले आहे.

डॉ. पदवाड मोझरी येथील, आमचे स्नेही श्री. वासुदेवराव पदवाड (जोशी महाराज) यांचे चिरंजिव, लहानपणापासून राष्ट्रसंताजवळ राहिले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जीवनाला सुरवात झाली. अत्यंत होतकरू विद्वान पुरोगामी विचारवंत; सज्जन आणि सात्विक प्रवृत्ती; हे पदवाडाचे वैशिष्ट होय !' त्रिभूवनांत या पुस्तकांचा गौरव होवो ही प्रभू चरणी प्रार्थना !

०—०

पारिजात प्रबंध पुष्प परिमळ

श्री. रा. मो. बेलूरकर, ग्रामगीताचार्य

वाङ्मयी सेवा, सेवाची जाण । जेणे मागी लागती जन ।
जन तितुका जनार्दन । जाणूनी कार्य करावे ।। –ग्रामगीता

वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे समग्र जीवनच क्रांतदर्शित्वाचे दीप पाजळण्यातच गेले. त्यांची पूर्वावस्था, कार्य व शेवट हे सर्व 'परिवर्तनाला पाहिजे' म्हणून " बदलो बदलना चाहिये, जैसा समय आजायगा " या पासून "शांति से क्रान्ति कर दिखलाये ।" ही उत्तंग व निर्भय आकांक्षा ठेवून "मरकर भी जी जांऊ, कहे तुकड्या ऑधी लाऊँ, कुछ क्रांति करू लगता है ।" येथ पर्यन्त आली. एक मृत्यु स्विकारून दुसऱ्या जन्मातही मी क्रांती करताच येईल. मग ती धर्मक्रांती असो, समाजक्रांती असो, राष्ट्रक्रान्ती असो अन्यथा कोणतीही क्रांती असो पण माझे जीवन म्हणजे क्रांती. असे ते नेहमी म्हणायचे तद्वतच तसे ते जीवनभर जगलेही. हे आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे. अशा उत्क्रांतवादी महापुरूषाच्या संपूर्ण साहित्याचा व जीवनाचा सखोल, तौलनिक अभ्यास करून त्यावर त्यांचे वैचारिक क्रान्तिदर्शित्व दर्शविणे म्हणजे वाळू मधून तेल काढण्यासारखे आहे.

माझे मित्र प्रा. डॉ. श्री. बाळासाहेब पदवाड म्हणजे राष्ट्रसंतांच्याच गुरुकुंज–मोझरीचे व माझी जन्म भूमी म्हणजे सद्गुरु श्री आडकुजी महाराजांचे क्षेत्र वरखेड. एकूण आम्ही एका मातीमधली माणसे. डॉ. पदवाडानी गरीबीचे उन्हाळे आणि उपक्षेचे पावसाळे खूप सोसले त्यामुळे विशेष प्रकर्षाने त्यांनी आंधळी भक्ती, बुवाबाजी, चमत्कार, ढोंगीपणा, देव, देवळे आदि परंपरागत संतांचा वैचारिक पंथ न स्वीकारता त्यांना संतांचेही क्रान्तदर्शित्वच दिसायला लागले व ते शोधू लागले. आणि तेच योग्य आहे. श्री सद्गुरु आडकुजी महाराज, पूज्य श्री मंजुळा माता व वं. राष्ट्रसंतावर या पदवाड घराण्याची फार मोठी निष्ठां व प्रेम. या घरण्याला या संत सेवेचा लाभ फार जवळून मिळाला आहे. डॉ. पदवाडांचा हा प्रबंध मी बारकाईने वाचला. त्यामधली प्रकरणे बघितली. विचारांची संगती पाहिली आणि आम्ही अनेकांनी वं. राष्ट्रसंतावर जे काही लिहिलं त्या पेक्षा हे वेगळं आहे आगळ आहे, असे वाटायला लागले पोरात्य आणि पाश्चिमात्य देशांतील समाज वादी, समाज कार्यकर्ते, थोर क्रांतिकारी, तत्ववेत्ते, पुढारी यांचे वैचारिक संमेलन वं. राष्ट्रसंताना अग्रस्थानी ठेवून पानोपानी दिसते आहे. एकुण पदवाडांनी या प्रबंधाद्वारे वं.राष्ट्रसंतांच्या विचाराचा परीघ व्यापक केला आहे.भाषा व लेखनशैली मनाची पक्कड घेणारी आहे. स्वप्नात देखील वाटत नव्हते की, वरखेड-गुरूकुंजाच्या परिसरातील हे एक उपेक्षित रानपुष्प आपला सुंगंध इतका व्यापकतेने दरवळील म्हणून !

वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या साहित्यातिल वैचारिक क्रान्तदर्शित्व या प्रबंधा करिता,जागतिक क्रांन्तदर्शी महापुरूषाचे व वं.राष्ट्रसंतांचे साहित्य संभारा मध्ये डॉ. पदवाडांनी कसून कसरत केली आहे. हे स्वाध्यायाअंती वाचकास कळते. हा प्रबंध एका राष्ट्र व भाषे पुरता मर्यादित नसून जागतिक झाला आहे. तो आसेतु गीरी, सागरांच्या सीमा, विचार साम्यतेच्या व विशालतेच्या पखाने पार करील यात शंका नाही. या अमृत-महोत्सवी वर्षात डॉ. पदवाडांनी खरोखरच हा अमृत कलश, जागतिक क्रातदर्शित्वाचे विचार सागरामधून मंथन करून समाज पुरुषास समर्पित केला आहे. या पुरूषार्थीचे मी स्वागत करतो आणि डॉ. बाळासाहेब पदवाडांचा हा प्रबन्ध-पुष्प पारिजात आपला परिमळ दिकप्रांती पसरवो ही सादिच्छा बाळगतो आणि प्रार्थना करतो !

क्रांतदर्शी गुरुदेवा ! तुज, अमुचे कोटी प्रणाम ।
प्रबंध-परिमळ विश्वी पसरो, प्रार्थूं तुज निष्काम ॥

नागपूर, विजयादशमी, दि. ४-१०-८४

卐卐卐

प्रा. अरविंद खांडेकर
कार्यकारिणीचे सदस्य, नागपूर विद्यापीठ.
मराठी विभाग प्रमुख, गो. से. अर्थ-वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

'या भारतात बंधुभाव नित्य वसुदे' या तळमळीने व्याकुळ झालेले मन आणि 'मंगलमय नाम तुझे सतत गाऊ दे' असल्या अनेक संस्कारक्षम गाण्याचा निर्माता एक अशिक्षित होता. पण 'तुका बोले वाणी' वेदांन्त वाहे पाणी" या प्रकारचे सामर्थ्य ज्यांच्या वाणीला प्राप्त झाले होते. अशी वंदनीय श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची अजानबाहु मूर्ती डोळ्यासमोर उभी राहताच मन श्रद्धेने भरून येते. वंदनीय तुकडोजी महाराजांनी खंजिरीच्या तालावर समाजाचे मनोरंजन करता करता जे भव्य दिव्य उद्‌बोधन केले त्याची गणती कशी करायची ? ती होऊ शकेल काय ? माझ्या दृष्टीने हे अशक्य आहे. पण आज अशक्यतेचा काळ मागे पडत चालला आहे आणि शक्यतेची प्रभात उगवायला लागली आहे.

वं. महाराजांच्या या कार्याचा, त्यांच्यां सर्वव्यापी, सर्वस्पर्शी विचारांचा ओझरता कां होईना पण परिचय लोकांना घडवावा आणि या रचनात्मक कार्यासाठी तळमळणाऱ्या साधकाची; विचारांची गरूड झेप कीती भव्य होती यांची जाणीव उत्पन्न व्हावी या भूमिकेतून डॉ. बाळ पद्‌वाड यांनी या पुस्तकाची निर्मिती केली असावी. व महाराजांचे हे अमृत महोत्सवाचे वर्ष आहे. आणि अश्या शुभप्रसंगी हे महाराजांचे विचार-धन आपल्याला मिळत आहे हा दुग्धशर्करा योग्यच होय. डॉ. पद्‌वाड यांनी या निमित्ताने केलेले प्रयास निश्चितच स्पृहणीय आहेत. नव्हे; हे विचार धन आमच्या स्वाधीन करीत असतांना ते समाजाचे आदरणीय झाले आहेत.

अभिप्राय –

श्री. सुदामदादा सावरकर

साहित्यरत्न, माजी संपादक श्री. गुरूदेव मासिक

डॉ. बाळ पदवाड यांनी थोड्याशा वयातच वं. राष्ट्रसंतांच्या साहित्यसागराचं अवगाहन करून "राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील वैचारिक क्रांतदर्शित्व" या विषयावर प्रबंध सादर केला आणि नागपूर विद्यापीठाची 'आचार्य' पदवी पटकावली. तोच प्रबंध संक्षेपानं प्रस्तुत पुस्तकात प्रसिद्ध केला जात आहे. या संक्षेपातून सुद्धा त्यांच्या अभ्यासू बुद्धीची चमक नि प्रामाणिक परिश्रमशीलता नजरेस भरल्याखेरीज राहात नाही !

वं. राष्ट्रसंतांचं 'समाज–दर्शन' त्यांचा 'साहित्यविषयक दृष्टीकोन', त्यांचे 'शैक्षणिक विचार', त्यांचं 'ग्रामीण अर्थशास्त्र' नि 'ग्रामराज्य' शीर्षकांखाली या चिमुकल्या ग्रंथात जे असंख्य उपयुक्त विषय राष्ट्रसंतांच्याच वचनाधारे मांडले गेले आहेत. त्यावरून राष्ट्रसंतांच्या जीवनदृष्टीची मौलिकता नि निरीक्षण शक्तीची मार्मिकता, त्यांच्या विश्वज्ञानाची खोली नि व्याप्ती, त्यांची अपार करुणा नि तत्वनिष्ठ योजकता आदींचं मनोज्ञ दर्शन घडते आणि त्याबरोबरच हे सुद्धा निदर्शनास येते की, डॉ. पदवाडांनी राष्ट्रसंतांच्या साहित्यसागरात खोल बुडी देऊन पाणीदार मोती वर काढले आहेत; शिवाय ते तौलनिक अभ्यासाच्या मखमलीवर असे काही मांडून ठेवले आहेत की त्यांचं आगळ तेज अधिक खुलून दिसावं !

राष्ट्रसंत महर्षी होते. म्हणूनच डॉ. पदवाड लिहितात– "लोक समुदायाच्या सार्वभौम शिक्षणाचा प्रश्न त्यांनी हाती घेतल्यामुळे मनुष्यजीवनाशी संबंधित असलेल्या सर्वच विषयांवर त्यांनी जे लिहिले ते समाजाच्या प्रगतीला नवी दिशा दर्शविण्यास उपयुक्त ठरले आहे". (पृष्ठ १०४) राष्ट्रसंतांचं हे वैशिष्ठ्य लक्षून त्यांचं क्रांतदर्शीत्व विशद करण्याचं मोलाचं कार्य या संक्षिप्त प्रबंधाद्वारे डॉ. पदवाड यांनी यथाशक्य करून जी साहित्यसेवा नि राष्ट्रसंत सेवा केली त्याबद्दल ते हार्दिक अभिनंदनास पात्र आहेत !

अमरावती, दि. ११–१०–८४

(सुदाम सावरकर)

श्री मधुकरराव चौधरी
एम्. कॉम्.
(माजी शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य.)

डॉ. बाळ पदवाड आपण 'राष्ट्रसंत : वैचारिक क्रान्ती' हा आपला प्रबंध पुस्तक रूपाने दि. १५ ऑक्टोबरला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अमृत – महोत्सवात व १६ व्या पुण्यतिथीत प्रकाशन करीत आहात. हे अतिशय औचित्यपूर्ण आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे मानवतेच्या प्रेमाने ओथंबलेले आणि क्रान्तिदर्शी व कृतीशील व्यक्तिमत्व होते. त्यांच्या गीतातून व भाषणातून प्रगट होणारे विचार व त्यांच्या कृतीतून दिसणारी कर्ममय प्रार्थना आजही समाजाला दिशा दिग्दर्शक आहे. त्यांच्या सर्व कल्याणकारी व सर्व मंगल विचारांचा मागोवा आपल्या या प्रबंधातून प्रगट होतो तो निश्चित आजच्या काळाला देखील उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

(मधुकरराव चौधरी)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
302.3
रा. क. ४०५७५
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

लेखकाचे मनोगत –

आज; व. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अमृतमहोत्सव वर्षात आणि १६ व्या पुण्यतिथीत; माझे 'राष्ट्रसंत : वैचारिक क्रान्ती' हे पुस्तक वाचकांच्या हाती देतांना मला अत्यानंद होतो.

राष्ट्रसंताचे स्थान जागतिक विचारवंताच्या मालिकेतील आहे. हे सिद्ध करण्यांचा प्रयत्न या प्रस्तुत पुस्तकात केला आहे. त्यांचे विचार समाजवादी युगाला प्रेरक आहे. पथदर्शक आहे. मार्क्स प्रमाणे त्यांनी वर्ग–वर्ण भेदावर; भांडवली प्रवृतींवर, जातिभेदावर मांडलेले प्रखर विचार पाहून मन अधिक चिंतनशील झाले. श्रमिक व गरीबांचे शोषण, त्याची कारणमिमांसा; अतिरिक्त मूल्यांचा सिद्धान्त; श्रम सिद्धान्त, श्रमाचे व संपत्तीचे वर्गीकरण; सामुदायिक जीवनाची कल्पना; ग्रामराज्याची निर्मिती; ग्रामीण शिक्षण पद्धती; सात्विक-शुद्ध सामाजिक तथा राजकीय विचार शेती व उद्योगांचे ग्रामीणीकरण व परिपक्व राष्ट्रनिष्ठां आदी त्यांचे विचार ग्राम तथा राष्ट्रजीवनांत नवी वैचारिक क्रांन्ती घडवून आणणारे आहेत. असे मला दिसून आले.

लहानपणापासून राष्ट्रसंताच्या साहित्यांच मला वेड लागलं होत. अत्यंत सुरवाती पासून माझे वडिल श्री वासुदेवराव व आई सौ. नलिनीबाई राष्ट्रसंताचे सेवक तथा श्री गुरूदेवाचे पाईक होते. माझी जननी व जन्मभूमी संपत्तीने नसली तरी संस्काराने श्रीमंत होती. त्यामुळे वं– राष्ट्रसंताच्या साहित्यावर संशोधन करून 'राष्ट्रसंत : वैचारिक क्रांन्ती' संक्षिप्त स्वरूपातील हा प्रबंध पुस्तकांच्या रूपाने आपणांस सादर करीत आहे.

अनेकांचे सहकार्य मला लाभले. त्यांचा उल्लेख करणे माझे कर्तव्य आहे. डॉ. निर्मलकुमार फडकुले (सोलापूर) पुस्तकाला लिहलेल्या पुरस्काराबद्दल मी त्यांचा आभारी आहे तसेच. सर्वस्वी सुदामदादा सावरकर श्री. जी. डी. निकम, श्री. तुकारामदादा गोताचार्य, श्री. कपरेदादा, डॉ. ठोसर, डॉ. राजेन्द्रसिंह चुंगडे, डॉ.जयस्वाल व श्री.रामकृष्ण दादा वेलुरकर आदी श्रीगुरूदेव परिवारातील मंडळीनी जे सहकार्य केले, ते मला विसरता येणे शक्य नाही.याशिवाय माझे मराठी विभाग प्रमुख प्रा. अरविन्द खांडेकर; प्राचार्य ए. एस. उखळकर हिस्लॉप कॉलेजचे डॉ. वसंतराव वऱ्हाडपान्डे, माझे मित्र व राष्ट्रसंताच्या साहित्याचे संशोधक प्रा डॉ. राम घोडे; डॉ. रू. पा. पांजणकर यांनी पदो–पदी मला प्रबंध लेखनांत व पुस्तक प्रकाशनांत जे सहकार्य केले ते निश्चित त्यांच्या मोठेपणाला शोभणारे आहेत.

(दहा)

अनेक कठीण प्रसंगी माझ्या मदतीला धाऊन येणारे माझे मित्र डॉ. उत्तम कांडलकर प्रा. जहागीरदार; प्रा. श्री धानोरकर, श्री. महेन्द्र लोढा यांचा उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजतो. दै. लोकमतचे सह-संपादक, श्री. आबासाहेब डोंगरे व श्री. श्याम लोहबरे व माझे घर मालक श्री. काशीनाथजी भोरकर यांनी केलेल्या उचित मार्गदर्शनाबदल मी त्यांचा आभारी आहे.

शेवटी हे पुस्तक आपल्या हाती यावेळी मला देता येईल काय ? हा प्रश्न होता. माझ्या ज्येष्ठ गुणवान मुलीच्या (कै. चि. प्रणाली) निधनामुळे आम्ही उभयता हतबल झालो होतो. कर्तव्य हे श्रेष्ठ आहे. यांची उचित प्रसंगी आठवण करून देऊन सर्वोतोपरी मदतीचा हात देणारी माझी सुयोग्य पत्नी सौ. विजया, तिच्या त्यागाचा, उदात्त विचाराचा इथे उल्लेख करणे माझे कर्तव्य समजतो.

अल्प काळात चंद्रविकास मुद्रणालयांचे मालक श्री वैरागडे यांनी पुस्तक तयार करून दिले. श्री सखारामजी वाणी यांनी पुस्तक तपासण्याच्या कार्यात मदत केली तसेच तेथील सर्व कर्मचारी वर्गाचे आभार मानतो. मुखपृष्ठा करीता श्री. भिसेकर व मधुकरराव वैद्य यांच्या उल्लेख करणे माझे कर्तव्य आहे.

वाचक हो ! आपण पुस्तकांतील उणीवा बाजूला सारून पुस्तकांचे सहर्ष स्वागत कराल, ही आशा बाळगतो. व गुरूदेवचरणी प्रार्थना करतो.

डॉ. बाळ पदवाड

– अनुक्रमणिका –

१) पुरस्कार
२) अभिप्राय व अभिनंदन
३) लेखकाचे मनोगत
४) अनुक्रमणिका

पृष्ठ एक ते बारा

१) पार्श्वभूमी – १ ते ४

२) समाजदर्शन – ५ ते ४४

अज्ञानी समाज, अंधश्रद्धा व रूढी–परंपरा, धर्म विषयक विचार; धर्माचे तत्व, खरी ईश्वर सेवा, जातियवाद, ग्रामीण शेतकरी, शेत मजूराचे वर्णन, उत्पादित वस्तुला भाव नाही, धनिकांची वृत्ती, कौटुंबिक प्रश्न, गृहधर्म, बहू पती–पत्नीस विरोध, निपुत्रिकांस उपदेश, संतती विषयी विचार, नवी-परंपरा, व्यसनाधिन समाज, समाजातील वाईट प्रवृत्ती, हुंडा प्रवृत्तीस विरोध, आदर्श विवाह, मिश्र–विवाह, धनिक–श्रीमंतास उपदेश, भांडवलदारांना इशारा, व्यापारी वृत्ती, क्रान्तीचा इशारा, आदर्श समाज; संघटनेचे महत्व–संघटनेचे कार्य, खरा सेवक, मानवतावादी विचार, समानतेचा विचार–समानतेची योजना, आदर्श समाज.

३) ग्रामीण अर्थशास्त्र – ४५ ते ६०

ग्रामीण अर्थशास्त्राची व्याख्या; 'शेती' ग्रामीण अर्थशास्त्राचा पाया, श्रम-प्रतिष्ठेचे महत्व; उत्पादन व ग्रामजीवन, सहकारी तथा सामुदायिक शेती; श्रमाचे माप, जोडधंदा (गो–रक्षण, कुक्कुट पालन आदी) ग्रामीण उद्योगधंद्याचे ग्रामीणी-करण (सामुदायिक तत्वावर) व्यापार आणि बाजारपेठ, बाजार – पेठेचे प्रकार, वितरण आणि स्वायंता, वेतन आदी.

४) ग्रामराज्य – ६१ ते ८०

ग्रामराज्याचे विचार; ग्रामाची स्थिती, 'ग्राम' मानवमात्राचे माहेर; सामु-दायिक जीवन, ग्रामोन्नत्तीचे कार्य; (ग्रामसफाई) ग्रामजीवनाची बांधिलकी, ग्राम-जीवनांत समानता, कुटुंब व्यवस्था, सामुदायिक प्रार्थना, ग्राम–उत्सवावरील विचार, न्यायपद्धती, ग्रामसेवाधिकारी व पंचमंडळ, कार्यकर्त्याची जबाबदारी व आचार-संहिता; ग्रामसंस्कृती, सामुहिक लग्नपद्धती, शेती विकास, भू–दान चळवळ, सहकारी–सामुदायिक शेती, कृषि शिक्षणावर भर, उद्योग–धंदे, ग्रामपंचायतीचे कार्य, गावीच यंत्रागार, भांडवल निर्मिती.

५) शैक्षणिक विचार – ८१ ते १००

शैक्षणिक विचारासंबंधी तज्ञांचे मत, सर्वांगीण विकास, व्यक्तिनिष्ठतेपेक्षा समाजनिष्ठा, जीवन – शिक्षण, महात्मा गांधी व राष्ट्रसंतांचे शैक्षणिक विचार, राष्ट्रसंताची ग्रामीण शिक्षण पद्धती, शैक्षणिक तत्वाचा उपयोग, जीवन कलेला महत्व, औद्योगिक शिक्षण, शिक्षका विषयी विचार – शिक्षकांची भूमिका, पालक आणि विद्यार्थी, विद्यार्थ्यांविषयी विचार व अपेक्षा; शाळा व समाज, आजचे शिक्षण विषयक विचार.

६) साहित्य विषयक दृष्टिकोन –

साहित्य म्हणजे काय ? साहित्यातून अपेक्षा, साहित्य आणि समाज; वाद नको – समन्वय पाहिजे, खरा कलावंत व त्यांचे कर्तव्य; राष्ट्रसताच्या जीवनदायी साहित्याचा प्रभाव, साहित्य, प्रचारक व समाज, काव्य विषयक विचार, शब्द शक्तीचे महत्व –

७) दलितोन्नती – ११३ ते १२१

'दलित समाज'; उन्नत्तीची आवश्यकता, समाजाचा घटक, दलितांची विटंबना, दलितोन्नतीचा इतिहास, राष्ट्रसंतांचे कार्य, दीन–दलितांची सेवा, 'मानवता व समता' आदी.

८) महिलोन्नती – १२२ ते १३५

महिलोन्नतीची आवश्यकता; स्त्री – मुक्ती आंदोलनाचा इतिहास, अकबर कालीन सुधारणा, मिशनऱ्यांचे–कार्य, महिला संघटन, महिला शक्ती, स्त्रियांची विटंबना; स्त्री व तिचे महत्व आदर्श महिला व विशेष, स्त्री निषेधाचे कारण व खंडन, स्त्रीचे विशेष गुण व महत्व, स्त्री शिक्षणांची आवश्यकता, विधवेचा प्रश्न, स्त्री संघटन व महत्व, राष्ट्रांची मूलभूत शक्ती व केन्द्रवर्ती मूर्ती 'स्त्री'.

९) राजकीय विचार – १३५–

पारतंत्र्यातील विचार, पराधिनतेच दुःख, परमेश्वराला प्रार्थना, स्वातंत्र्यासाठी लोकांची मने जागविणारा; लोकशाहीचा पुरस्कार; लोकशाहीचा नवा मंत्र स्वातंत्र्याचा अर्थ, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी, देशसेवा, भांडवली–शक्तीला विरोध, जनसेवक व नेता; पक्षिय राजकारणास विरोध, राजकारण, ग्रामाकडून देशाकडे, ग्रामराज्याचा दृष्टिकोन (सामुदायीकतेतून समाजवादाकडे) पंचायत राज्या-विषयीचे विचार –

१०) समारोप व निष्कर्ष –

पार्श्वभूमी

वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची कर्मभूमी 'मोझरी' ही माझी जन्मभूमी असल्याने अगदी लहानपणापासून मला राष्ट्रसंतांना बघता आले. त्यांचे गीते त्यांच्याच आवाजात ऐकायला मिळाली. मोझरीच्या 'गुरुदेव विद्यामंदिर' मध्ये शिकत असतांना ध्यान–प्रार्थना व इतर कार्यक्रमांत मला भाग घेता येत होता. माझे वडील श्री वासुदेवराव पद्वाड हे राष्ट्रसंताचे अगदी सुरूवातीपासूनचे सेवक होते. त्यामुळे घरातील वातावरणाला एक वेगळे वळण लाभले होते. राष्ट्रसंताचे वाङमय सहजतेने घरी उपलब्ध असायचं, त्या वाङमयाचा विचार करतांना मला राष्ट्रसंत मराठी संत मालिकेतील सर्व संताच्या कार्यदृष्टीने विशेष वाटायला लागले.

'बुडती हे जन न देखवे डोळा । म्हणूनी येतो कळवळा अनुपम' किंवा 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती' त्याचा प्रत्यय मला राष्ट्रसंतांच्या कार्यातून, वाङमयातून सतत घडत होता. दिशाभूल झालेल्या समाजाला योग्य मार्गाला लावण्याचं सामर्थ्य त्यांच्यात होतं. समाजातील वाईट प्रवृत्तीवर प्रखरतेने टीका करून त्याजागी नवीन आदर्श पद्धती निर्माण केली. खंजेरीच्या तालावर; पाहाडी आवाजात स्वतःचे गीत गात फिरणारे व समाजाला सुधरविण्याचे कार्य प्राणप्रतिष्ठेने करणारे ते महाभाग होते.

समाजातील अंधश्रद्धा, कनिष्ठ देवतेची होणारी आराधना; बुवाबाजी आदि भ्रामक कल्पना लोकांच्या अंतःकरणातून काढून टाकून किंवा यज्ञ–यागादिक कर्मकांडातील खऱ्या स्वरूपांतील सत्यता उकलून दाखवून; खरा धर्म–जो मानवी जीवनाला उपकारक होईल, पोषक होईल, परस्परांत प्रेमभावना, सहकार्याची भावना वृद्धिगत करील, 'मानवे, मानवाचा वाढवावा, गौरव' अशा स्वरूपांतील शिकवण त्यांच्या साहित्यांत मला दिसायला लागली. त्यांच्या धर्मातील देव समाजांत राहणारा, समाजासाठी कार्य करणारा आहे. **'अमुचा देव समाजी राहतो । समाजासाठी कार्य करतो'** असा आहे. समाजकार्य केल्याने तो लाभतो असे विचार मांडून त्यांनी प्रत्येकाला समाजाभिमुखतेकडे नेले आहे. व्यक्ती सुखापेक्षा समाज सुख श्रेष्ठ आहे, व सामाजिक दृष्टीने सर्व सारखे व समान आहे. तेथे श्रेष्ठ, कनिष्ठ, उच्च, नीच, स्त्री, पुरुष असे भेद नाही.

राष्ट्रसंतांनी केवळ समाजाचा विचार केला नाही तर **'समाजापुढे ग्राम आहे। ग्रामापुढे देश आहे'** शेवटी देशाचा विचार त्यांनी मांडला आहे. 'देश सुखी जणू माझे शरीर' अशी शिकवण देऊन प्रत्येक व्यक्तीला देशनिष्ठ, राष्ट्रनिष्ठ बनविण्याचा त्यांचा प्रयत्न अत्यंत उपयुक्त स्वरूपांतील आहे. तो प्रयत्न यशस्वी होण्यासाठी त्यांनी भारताचा विचार केलेला दिसून येतो. भारत हा खेडचांत वसलेला देश आहे. 'ग्राम हा देशाचा नकाशा' असल्याने ग्रामोन्नतीचा प्रश्न त्यांनी हाती घेतला. त्या प्रश्नाचा सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय आदि अनेक दृष्टीने सर्वतोपरी योग्यतेचा बिचार करून आपली 'ग्रामगीता' ग्रामनाथाला अर्पण केली आहे. आदर्श; स्वयंपूर्ण ग्राम ह्यातून कसे निर्माण होईल त्यासाठी त्यांनी व्यक्ती-कुटुंब-समाज आणि ग्राम असा प्रवास सुरू केला.

व्यक्ती विकासासाठी; त्यांच्यात वैचारिक परिवर्तन होणे आवश्यक आहे. त्यांच्यातील रूढ असलेल्या कल्पना-परंपरा नष्ट होऊन काळाच्या परिवर्तनानुसार; गरजेनुसार आवश्यक ती विचारधारा त्यांच्यात अचूकतेने निर्माण होणे आवश्यक असते. ते निर्माण करण्याचं सामर्थ्य कुठल्यातरी एका व्यक्तीत आढळते, समाजातील प्रचलित रूढी-परंपरेला किंवा समाजकंटकाच्या त्रासाला न जुमानता अमुलाग्र बदल घडविण्याचा अहोरात्र ते प्रयत्न करीत असतात. परिवर्तनाची आवश्यकता व्यक्तीला पटल्याशिवाय तो स्वतःत परिवर्तन घडवित नाही. 'परिवर्तनाची आवश्यकता' निर्माण व्हायला आवश्यकतेचे महत्व त्याला कळायला पाहिजे. ते कळणे ही खऱ्या स्वरूपातील वैचारिक क्रान्ती होय ! मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत ती घडविण्याचे महान कार्य राष्ट्रसंतांनी साधले व त्यासाठी आवश्यक ती साधने, उपाय गाव-कुटुंबात त्यांनी निर्माण केले. विचार शुद्धता, आचार शुद्धता व कार्य शुद्धता यावर त्यानी ग्राम-कुटुंब समाजाची बांधणी केली. सामुदायिक प्रार्थनेतून सामुदायिक जीवनाकडे ते ग्राम कुटुंबाला घेऊन जातात. 'संतती आणि संपत्ती। ही गावाची ठेव निश्चिती किंवा आमुच्या गावचे जे धन। ते ग्रामवासियांचे सुख स्थान' असे विचार मांडून; भांडवली प्रवृत्ती नष्ट करून ग्रामात कष्टकरी जनतेचे नेतृत्व निर्माण करण्याकडे ते वळलेले आहे. 'दुनिया आहे कष्टिकांची' असे सांगून त्यांनी ज्या श्रमातून उत्पादन वाढविता येईल अशाच श्रमाला महत्वपूर्ण ठरविले आहे.

आजचे युग समाजवादी विचाराचे युग आहे. श्रमणाऱ्या लोकांचे युग आहे व या युगाला पोषक असलेले विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या साहित्यातून मांडलेले आहेत. एका अविद्यापीठीय असलेल्या, केवळ चार वर्ग शिकलेल्या व्यक्तीने आजच्या समाजवादी युगाला पोषक होईल - उपकारक होईल अशा स्वरुपातील शास्त्रशुद्ध विचार मांडावेत, ही त्यांच्यातील महानता लक्षात

घेऊन 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील वैचारिक क्रान्तदर्शित्व' हा विषय प्रबंधासाठी निवडला आणि सर्व क्षेत्रातील त्यांचे क्रान्तिकारक विचार मांडण्यासाठी मी प्रवृत्त झालो. नागपूर विद्यापीठाने 'आचार्य' उपाधिसाठी मान्य केला व 'आचार्य' ही उपाधि मला नागपूर विद्यापीठाने १९८१ ला बहाल केली. आज तोच प्रबंध संक्षिप्त स्वरुपांत आपल्या हाती देतांना मला अत्यानंद होतो आहे.

मला असे वाटते; माझ्या पूर्वी असा प्रयत्न राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या संदर्भात कोणी केला नसावा. तो अशा स्वरुपातून पहिल्यांदाच माझ्याकडून होत आहे. अत्यंत प्रामाणिकतेने, आत्मविश्वासाने, अत्यंत परिश्रमाने; अभ्यासाने केलेला हा प्रयत्न आहे. त्यांच्या वाङमयातील समाज, आदर्श समाज, ग्रामीण अर्थशास्त्र, ग्रामराज्य, शिक्षण, स्त्री–दलित आणि राजकारण याच बरोबर त्यांचे भावी युगाला उपयुक्त क्रान्तिकारक विचार प्रामुख्याने त्यांच्याच साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

अमरावती जिल्ह्यातील यावली सारख्या चिमुकल्या गावात ते जन्मास आलेत व अठरा विश्व दारिद्र्यात त्यांचे बालपण गेले. गरीबीचे चटके त्यांना भोगावे लागले. समाजातील विषमतेमुळे त्यांना असह्य अन्याय सहन करावे लागले समाजातील दुःख, वेदना नष्ट व्हाव्यात म्हणून परमेश्वराच्या आराधनेत आपले लक्ष वळविले. परमेश्वराच्या शोधार्थ रान–माळ तुडवली. जंगलाची वाट धरली पण देव हा दगडात नाही, आसमंतात नाही. तो प्रत्येकाच्या अंतःकरणात वास करतो. तो देव जागविण्याचे कार्य त्यानी स्वीकारले. त्यातून नवा समाज, नवा धर्म निर्माण करून त्या प्रकारची शिकवण सामुदायिक प्रार्थनेतून देत समाजाला समाजवादाकडे घेऊन जातांना ते दिसून येतात. त्या सर्वांचा विस्तृततेने विचार या प्रस्तूत पुस्तकात केला आहे.

राष्ट्रसंतांचा जन्म विदर्भात अमरावती तालुक्यातील 'यावली' या चिमुकल्या गावी गुरुवार दिनांक ३०–४–१९०९ रोजी 'ब्रह्मभटाच्या' कुळात झाला त्यांच्या वडीलांचे नांव पांडूरंग उर्फ बंडोजी व आईचे नांव मंजूळा. वडील बंडोजी ठाकूर ब्रह्मभट शिवणकाम करीत तर आई मंजूळा दळण–कांडण––मोल–मजूरी करी. दोघांचाही स्वभाव त्यांच्या नावाप्रमाणेच होता. बाल माणिकाचे ठायी हुडपणा-बरोबरच उपजतच ईश्वर दर्शनाची तळमळ होती. लोकासमोर कीर्तन करणे, एकतारी किंवा खंजिरीवर भजने म्हणणे हा त्यांचा बालछंद होता. संत आडकोजी महाराजांची कृपा त्यांच्यावर झाली होती.

मंदिरमे क्या कर रहा । आँखी लगाकर देखता
घंटी हलाकर देखता, मुंडी झुकाकर देखता
क्या है वाँहा पानी-पत्थर । भगवान उसमे है नही
वही दीन के घर रब रहा [१]

पुजाऱ्यांनी कोणते कार्य करावे या विषयी सांगतांना 'न पूजा, परि गरिबाघरी राबा, देवाचि तो म्हणवोनी । अन्न मिळे ते ज्ञान तया द्या, घ्या जवळीच करोनी ॥ समाजाला सुधरविण्याचं कार्य पुजाऱ्यांनी करावं. असा उपदेश राष्ट्रसंत करतात. लोकांच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन बुवाबाज लोकांना लुबाडतात. सत्याचा शोध घेण्यापेक्षा आपलं दु:ख, दारिद्र्य, दैन्य व मनातील पुत्र-संततीच्या अपेक्षेने बुवाबाजीच्या पाठीमागे लोक लागलेले दिसून येतात.

लोकांनी आपल्या पाठीमागे रहावे म्हणून बुवाबाज चमत्कार करुन दाखवितात. स्वत: कष्ट करीत नाहीत पण कष्ट करणाऱ्या जनतेला कष्टापासून वंचित करतात. त्यांच्याकडून स्वत:ची थोरवी गाऊन घेतात व आपला स्वार्थ साधतात. चमत्काराला नमस्कार करणे मूर्खपणाचे आहे पण आजही समाजात त्याप्रकारची मंडळी आहे. धन प्राप्तीसाठी किंवा इतर अनेक कारणासाठी त्यांच्या पाठीमागे ती धावतांना पाहून राष्ट्रसंत म्हणतात -

नका भूलू हो : चमत्कारा, जगी ही थापची सारी
भोंदू हे आपणा लुटती । दावुनी थोरवी भारी
संत जरि पुत्र हे देते, न मरते लोक पृथ्वीचे
निकामी स्वार्थीजन भलत्या, रडोनी सांगती थोरी
कावरे लोभी जे असती, भ्रष्ट होती तयाच्याने
न सुचते ज्ञानही त्यांना, मिरवती भोंदूची थोरी
केवळ चमत्काराने संत परीक्षा होत असेल तर गारोडी विधाता झाला असता
संत तेची जगी जाणा, जयाचे विषय हरि झाले
म्हणे तुकड्या निजज्ञाने, बोधुनीया जना तारी । [२]

आज या देशाला स्वतंत्र होऊन ३५ वर्षे पूर्ण झाली असली तरी लोकांच्या अज्ञानाचं साम्राज्य संपल नाही. 'अंध दुबळा भाविकपणा' या देशांत वास करतो आहे. अज्ञानामुळे, स्वार्थासाठी किंवा संपत्ती प्राप्तीसाठी 'बळी' देण्याची प्रथा आहे.

---

१. समाज संजीवनी पृ. क्र. ३० २. समाज संजीवनी पृ. ४१

देवाचिया नावाखाली । कांही देतात जीव बळी
बंद करावी प्रथा असली । भावना सुधारोनि लोकांची
कोणी धुमारे लुबाडिती । बुवा लोकास फसविती
भ्रमिष्ट मते, व्रते शिकविती । सावध करावे त्याठायी [१]

स्वत:च्या नवसासाठी, इच्छा प्राप्तीसाठी दुसऱ्या प्राण्यांचा जीव घेण्याची प्रथा समाजातील कांही स्तरात आपणास दिसून येते.

दुजियांचा जीव गेला तरी चाले । सुखी आम्हा केले पाहिजे देवे

यातूनच नरबळी प्रकरण पुढे आले. 'मानवत खून खटला' याच प्रवृत्तीतून गाजला. या प्रवृती विषयी कठोर शब्द वापरतांना राष्ट्रसंत म्हणतात -

याद ठेवा, कधी बळी द्याल जीवा । कुळामध्ये दिवा न राहील [२]

आजही समाजात कनिष्ठ देवतांना प्रसन्न करण्यांसाठी बळी देण्यांची प्रथा आहे. देवी, मलेरिया, कॉलरा किंवा प्लेग आदी रोग मरिमायचा कोप किंवा खंडोबाची अवकृपा म्हणून समजल्या जाते. खंडोबाचा किंवा देवीचा भगत अंगात धुमारा आणून लोकांना लुबाडत असतो, खोटे बोलत असतो व त्यामुळे औषधोपचाराशिवाय रोगी मरतो परंतु भगत त्याच भांडवलावर आपलं जीवन चांगल्या रितीने जगतो.

राष्ट्रसंतानी समाजाचे अगदी जवळून दर्शन घतले होते. माणूस हा किती खालच्या पातळीवर उतरू शकतो. यांची त्यांना कल्पना होती. कनिष्ठ देवतांना कोंबडी; बकरी दिली की त्या नवसाला पावतात. संतती-संपत्ती पदरांत टाकतात अशी आजही खालच्या समाजाची; बहिष्कृत समाजाची विचार धारा आहे. ही सर्व त्या समाजाची धारणा लोभी लबाडांनी तयार केली आहे. असे स्पष्ट मत महाराज मांडताना दिसून येतात.

देवी म्हसाई, खाई, मराई नवसाला पावती
तरी कां वांझ जगी राहती
उगीच देती बळी-बिचाऱ्या बकऱ्या, मेंढ्यांना किती
हे कोण सांगतो लोभी- लबाडाविणा [३]

---

१. ग्रा. गी. अ. ११ ओ. ९५-९६ २. समाज संजीवनी पृ क्र. ४०.
३. राष्ट्रीय भजनावली पृ. १९

असे म्हणून महाराज सर्वांना व्यवहार वादाकडे घेऊन जातांना दिसून येतात. कारण जशी वेळ असेल त्याप्रमाणे वागणे उचित असते. जन्या विचाराला धरून आपणांस जगता येणार नाही. मग तो विचार अंत्यसंस्काराचा असो की श्राद्धाचा असो, काळ वेळ व परिस्थिती पाहूनच तो करावा असे महाराज म्हणतात.

जीर्ण ज्या चालीरिती, डोळे मिटवूनी ना करा
वेळ ही पाहूनी कर्तव्य शोधा सायसे
आचरा सु-विचार वृत्ती-अनुभवाला घेऊनी
अंधश्रद्धा सोडूनी व्यवहार साधा धाडसे [१]

अंध श्रद्धेने अधर्माला जन्माला घातले आहे आणि म्हणून ते सर्वांना खऱ्या धर्माकडे घेऊन जातात –

– धर्माविषयी राष्ट्रसंताचे विचार –

'धर्म म्हणजे चांगल्या विचाराचा समुदाय' असे थोडक्यांत म्हणता येईल. चांगले विचार जे व्यक्तिच्या व समाजाच्या उन्नतीसाठी-विकासासाठी उपयुक्त होऊ शकतील. त्या सर्व विचारांचा समुदाय म्हणजे धर्म होय !

धर्म म्हणजे काय ? या विषयी राष्ट्रसंत म्हणतात –

'आपुली साधावी उन्नती । सौख्य द्यावे इतराप्रति
या उद्देशे जी-जी संस्कृति । धर्म म्हणावे तिजलागी
परस्परांशी वागणूक । ज्यांत न्याय-नीति सम्यक
प्रत्येकांचे कर्तव्य चोख । धर्म असे त्या नांव [३]

मग तेथे हिंदू, मुसलमान किंवा ख्रिश्चन किंवा शिख-जैन असे भेद नाही तेथे सर्व मानव सारखे आहेत. आचार; विचारांची शुद्धता व स्वाधिनता ज्यांत सांगितली जाते-तो धर्म होय !

माणसाने आपले संबंध मानवाबरोबर कशा स्वरूपांत ठेवावे. ही सांगणारी नीती-नियमाची बांधीलकी म्हणजे धर्म होय !

धर्माची आखणी मानवता । मानवतेसाठी करावी व्यवस्था
कोठेहि होता अव्यवस्था । धावोनिया जावे [४]

समाज सं. पृ. ४५
३. ग्रा. गी. अ. २ ओ. ५-६
४. ग्रा. गी. अ. २८/४५

मानवतेच्या आधारावर धर्म स्थापना केली जाते प्रत्येक मानवाला, त्यांच्या विकासाला उचित अशी परिस्थिती निर्माण व्हावी. ती निर्माण करून त्यांचा उत्कर्ष साधणे म्हणजे धर्माचे पालन करणे होय ! समाजाला धर्म नेहमी पोषक असतो. समाजाचा उत्कर्ष समाजातील मानवाच्या श्रमप्रवृत्तीत आहे. समाजनिष्ठा व श्रमनिष्ठा समाजाला व राष्ट्राला आधार देत असते.

'दुःखाने पीडला, द्रव्याने नाडला । कष्टाविण झाला पंगु जैसा
तैसिया आधार देऊनि चालवा । हातभार द्यावा साधे तैसा
उद्योगांचे अंग दाखवावे तया । व्यर्थ पोसुनिया ठेऊ नये
तुकड्या म्हणे कष्टाचा संसार । कष्टाविण नर सुखी नोहे' १

असे झाल्यास प्रत्येक व्यक्ती स्वतःबरोबर कुटुंबाला; समाज धर्माला त्यानंतर गावधर्माला व राष्ट्रधर्माला जागवित राहिल. 'धर्म म्हणजे मानवा-मानवांत मानवतेची शिकवण देणारी व त्याचबरोबर राष्ट्रीय भावना जागविणारी एक प्रबल शक्ती होय ! धर्माचे लक्षण सांगतांना राष्ट्रसंत आधुनिक प्रगत समाजाला प्रेरक व उपकारक ठरेल असे विचार सोप्या व सरळ शब्दांत सांगतांना दिसून येतात.

'मुख्य धर्माचे लक्षण । त्याग, अहिंसा, सत्यपूर्ण
अपरिग्रह. ब्रह्मचर्य जाण । तारतम्य युक्त
निर्भयता, शरीरश्रम, परस्पराशी अभेद प्रेम
पूरक व्हावया विद्या सत्कर्म । सकलांसाठी २

राष्ट्रसंतांनी धर्माचे लक्षण सांगतांना त्याग, अहिंसा, सत्यता, अपरिग्रहता, शरीरश्रम, परस्पराशी अभेद प्रेम, सत्कर्म आदि सांगितले आहे. या सर्व गुणांचा समावेश ज्यांत आहे. तो खरा धर्म होय ! विश्व आपले आहे ही भावना निर्माण झाल्यावर अन्याय प्रवृत्ती विरुद्ध लढा देण्याचं बळ सहजतेने अंगी येते. 'गीता' ही खऱ्या मानवतेची शिकवण देणारी आई आहे सत्य-न्याय-नीतीच्या आसनावर आरुढ झाली आहे. अन्यायाच्या विरोधांत दंड थोपटून उभी आहे. गीतेच्या तत्वज्ञानाचा उकल करुन दाखवितांना राष्ट्रसंत म्हणतात -

दीनावर हल्ला करणे, हे पाप घोर थोराने । वर्णिले
दुष्टाची दंडण देणे, हे पुण्यमयाचे लेणे । वर्णिले
हेच ज्ञान सांगते गीता, मग कां ऐसे भीता ? तरुण हो ३

---

१. समाज संजीवणी पृ. क्र. ४५ २. ग्रा. गी. अ. २ ओ. १८-१९.
३. अनुभव सागर पृ. क्र. ३३

दुष्टांस दंडण करणे व गरीबांचा उद्धार करणे ही खऱ्या अर्थाने दुहेरी भूमिका जबाबदारीने सांभाळणारा खरा धार्मिक होय. कर्तेपणाचा अभिमान किंवा उपभोग प्रवृत्तीची लालसा त्यांच्या उरी नको. निर्भयतेचा अंगिकार करुन नीती, न्याय-बुद्धी लोककार्यासाठी खर्ची घालत असतो. खऱ्या कार्यकर्त्यांना उपदेश करतांना राष्ट्रसंत म्हणतात –

वाढवू नका ही वृत्ती, मी कर्ता अथवा भोक्ता
आलीया प्रसंगे व्हावे, सावधान कार्यासाठी
भिऊ नये तिळमात्र, इच्छितो हेची जगजेठी
नीति, न्याय, बुद्धी अपुली लावावी कार्यासाठी
अन्याय न पहावा डोळा
गमवू नये ती वेळा
फिरु नये भिऊनी काळा
हेचि ज्ञान देते गीता आणि धर्म सांगे चित्ता [1]

वरील प्रकारचा धर्म प्रत्येकाने पाळावा. भौतिक व पारमार्थिक क्षेत्रांत मानवाचा विकास व्हावा. प्रत्येकांच्या ज्ञानाचा, बुद्धिचा, शरीराचा, मनाचा व इंद्रियाचा विकास ज्यातून घडून येतो. तो खरा धर्म होय!

खऱ्या मानवतेची प्रार्थना करतांना राष्ट्रसंत म्हणतात -

'जगाचा भेद लया जावो । शांति अखंडित राहो
खळ निंदक हे निर्मळ होऊनि । द्वेषपणाचा लेश न राहूनि
सकळ प्रेम गुण गावो.
मानव धर्म मनाने लाभो, निसर्गमय वृत्ती, हरि
अखिल जगा सुख होवो
पंथ–मतांतर शीघ्र हरावे, तत्वज्ञान सर्वांतरी व्हावे
देव हा एकचि राहो
तुकड्या म्हणे ही आशा, पुरवी अमुची जगदिशा
म्हणि उदयाला येवो [2]

राष्ट्रसंताचा धर्म मानवतावादी आहे. प्रत्येक मानवाला त्या धर्मात प्रवेश आहे पण मानवतावादी ध्येय–धोरणाने तो वागणारा असेल तर :

---

१. अनुभव सागर अभंग २५० २. अनुभव सागर पृ. क्र. ३९

खऱ्या भक्तांबद्दल बोलतांना राष्ट्रसंत म्हणतात -

भाविकांच्या भक्तिचा नच पंथ कोणी पाहिला
प्रेम हा निरपेक्ष त्याचा, सर्व देशी राहिला
विश्व व्यापक देव त्यांचा बाहेरी आणि अंतरी
पूजना हे कार्य त्यांचे देह त्यासचि वाहिला.

राष्ट्रसंताचा धर्म मानवतेबरोबर विश्वव्यापक आहे. म्हणूनच परधर्माबद्दलही त्यांना प्रेम आहे. दुसऱ्या धर्माचा छळ त्यांना उघड्या डोळ्यांनी बघवत नाही. 'कां छळता दुसऱ्या धर्मा ? कां यात मिळे प्रभू प्रेमा' ? असा प्रश्न ते विचारतात कारण परमेश्वर जर जगाचा दाता आहे तर त्यांच्या भक्ताने धर्माच्या नावाखाली परस्परांत वैरभाव का निर्माण करावे ? अशा त्यांच्या वर्तणूकीने परमेश्वराच्या खऱ्या तत्वाचा त्यांना उकल करून घेता येईल काय ? जे अंतरी निर्मळ, पवित्र व ज्यांचा भाव सात्विक व प्रेमळ आहे. अशा भक्तांना परमेश्वर पावतो आणि भेटतोही.

प्रभु सर्व जगाचा दाता
होतो सर्वांचा त्राता
पावतो विमलशा भक्ता
तुकड्या म्हणे सोडूनी धर्मा – कां यांत मिळे प्रभू प्रेमा ? [१]

धर्मांतराचा राष्ट्रसंतानी विरोध केला आहे. धर्मांतर म्हणजे शुद्ध अज्ञान आहे. धर्मांतर केल्याने मानवी चारित्र्यांत, आचार-विचारांत, प्रेमात कांही फरक पडत नाही. मानवी प्रवृत्ती बदलविणे खऱ्या स्वरुपांत आवश्यक आहे.

खरी ईश्वर सेवा

भक्तीतील अवडंबर राष्ट्रसंतांना आवडत नव्हते. ज्ञानापेक्षा विचार, विचारापेक्षा आचाराला ते श्रेष्ठत्व देत होते म्हणूनच त्यांनी 'पाखंडी लोकांना धारेवर धरले आहे. पुजारी ज्यांचा भाव देवाजवळ नाही अशा पोथीनिष्ठ लोकांवर त्यांनी टीका केली आहे. ज्यांच मन चंचल आहे अशा पोथीनिष्ठ लोकांना उपदेश करतांना राष्ट्रसंत म्हणतात –

'काहे को हरदम बाचत पोथी । क्या सीखा पोथी माँ ही ?
काम क्रोधमे फँसा दिवाने । तन उमर सारी खोई

---

१. अनुभव सागर अभंग ११९

चँचल मन तो निसदिन भटके । स्थीर जरा कीन्हा नाही
कर्मकांड मे उमर गुजारी । पत्थर हो बैठा ताही
नही किसे प्रेमसे पुकारा, लोभ किया खुब मन माँही
विषय वासना खूप बढायी । घुमता है जंगल दाही' १

दीन दुबळ्यांच्या सेवेत खरी परमेश्वर भक्ती आहे. खरे प्रेम आहे. प्रत्येकाने प्रत्येकावर प्रामाणिकतेने प्रेम करावे ही खरी भक्ती आहे. तोच खरा धर्मशील होय असे राष्ट्रसंत म्हणतात –

अंध, पंगू, मूक, बधीर
अशक्त, अपंग, निराधार
या ईश्वरी चित्रा रंगविती सुंदर । ते ते थोर धर्मशील २

जगातील सर्व मानवांना समान समजून त्यांना उन्नत करणे आवश्यक आहे. द्वेष-भावना न ठेवता कार्य करणे म्हणजे धर्म सेवा होय :

कोणाचा द्रोह न करता
करावा ऐहिक उत्कर्षपूर्ण
साधावे आत्म समाधान । हा बाणा धर्माचा

खरी धार्मिकता समाजाला व राष्ट्राला उपकारक ठरुन शेवटी त्याला विश्वापर्यंत घेऊन जाते.

'धर्म हा श्रेष्ठ सर्वांसी' असे राष्ट्रसंत जेव्हा म्हणतात तेव्हा समानतेची नांदी समाजात वाजवितात. समानता निर्माण करुन समाजातील विषमता नष्ट करणे क्रमप्राप्त आहे. यज्ञ-यागादिक कर्मकांड त्यांनी त्याज्य ठरवली असून, त्याविषयी बोलतांना ते म्हणतात –

'श्रमिकांस जेणे लाभेल अन्न । ते कर्म श्रेष्ठ यज्ञाहून
एरव्ही गीतेचे नाव सांगून । भलतेच समर्थन करु नये २

सामाजिक कार्य हे धर्म कार्यापेक्षा किंवा तीर्थयात्रेपेक्षाही श्रेष्ठ आहे. व्यक्तिगत सुखापेक्षा सामाजिक सुख महत्वाचे आहे.

---

१. समाज संजीवनी पृ. २५ २. ग्रा. गी. अ. २९/८२
१. ग्रा. गी. अ. २ ओ. ७ २. ग्रा. गी. अ. १८. ओ. २१

मंदिरी बसून नाक दाबावे । त्यापेक्षा मार्गीचे काटे का न उचलावे
दुःखीतास पाणी पाजावे । हे श्रेष्ठ तीर्थाहुनि पूजन [१]

जातियवाद

धर्मशास्त्रात 'आपण सर्व परमेश्वरांची लेकरे आहोत' असे सांगितल्या जाते पण प्रत्यक्ष व्यवहारात जातियवादाचे भेद पाळून श्रेष्ठ–कनिष्ठता निर्माण केली जाते. त्याच आधारावर समाजाची आजची अवस्था आहे. ती मोडावी, गुण, कर्मानुसार श्रेष्ठ–कनिष्ठता राहून सर्व भेद लयाला जावे, हा विचार राष्ट्रसंतांनी अत्यंत प्रभावी रीतीने मांडला आहे.

देव सर्वांचा सखा, आम्ही तयाची लेकरे
भेद मग कां कोरडा ? जाळा जशी जळते चिता ॥ [२]

चार्तूवर्ण्य व्यवस्था समाजाच्या सुव्यवस्थेसाठी तयार करण्यात आली होती. समाजाच्या दृष्टीने सर्वांचे कार्य समान समजल्या जात होते व गुण–कर्मानुसार वर्ण बदलविता येत होता. पुढे वर्ण बदलविण्याचा अधिकार नष्ट करून जो ज्या वर्णात जन्माला येईल तो त्या वर्णाचा असे समजण्यात येऊ लागले. धंद्यावरून जात ओळखल्या जाऊ लागली व त्यातून श्रेष्ठ–कनिष्ठता जन्मास आली.

वास्तविक कामाकरीता वर्ण झाले । समाजासि सर्वचि लागले
म्हणोनि सर्वांनाचि महत्व भले । ब्राह्मणापासोनि महारावरि
प्रत्येक धंदयाचे गम्य भिन्न । वेगळी खुराक, वेगळे वळण
यासाठी होते वेगळेपण । रोटी–बेटी व्यवहाराचे
तेथे अज्ञाने भेद पाडले । हाती सत्ता ते मोठे ठरले
समाजाची स्वच्छता करीत मेले । ते ते बोलिले नीच ऐसे
वास्तविक नीचता दुराचारे होते । खरी उच्चता तपाने लाभते
जातीमातीवरि कैसी ठरते । उच्च नीचता ? [३]

वरील प्रश्न उपस्थित करून त्यांनी जातियवादाचे खंडन केले आहे. अस्पृश्यता ही क्रियेवर मानावी. मानव ही एक जात समजावी, कर्मानुसार ओळख देण्याची नवी प्रथा निर्माण व्हावी.

म्हणोनि अस्पृश्यता क्रियेवरि मानावी जाति सर्व एक जाणाची
अपुल्या परीने उचलावी । कामे सकळांनी

---

१. ग्रा. गी. अ. १८ ओ. १९. २. अनुभव सागर भाग २ पृ. ७६,
३. ग्रामगीता अ. ५ ओ. ५८–६२.

जाति सर्वांची एक आहे । परि धंदा कर्मासम राहे
आपल्या उद्योगाच्या प्रवाहे । ओळख द्यावी [१]

आज जाती-वर्णाप्रमाणे कोणाचेही कर्म राहिलेले दिसत नाही. जात आणि धंदा यांत फारकत व्हायला लागली आहे.

ब्राम्हण जोडे शिवण्यासि लागला । चांभार तो पुजारी बनला
क्षत्रिये नोकरीपेशा धरिला । वैश्याघरी
वैश्य लढे सैन्यात जाऊन । शुद्र करितो कथा कीर्तन
यासि वर्णसंकर म्हणती जन । करिती मात्र सर्वचि [२]

आज समाजात वरील प्रकारची जात-वर्ण व्यवस्था असलेली पाहून 'गुण श्रेष्ठ मानावे व गुणांचा आदर समाजांत व्हावा असा विचार राष्ट्रसंतांनी मांडला आहे. त्यातूनच आचार-विचाराला श्रेष्ठत्व दिले आहे.

'म्हणोनि गुणावरचि लक्ष द्यावे । जो ज्या गुणी तो त्या वर्णी म्हणावे
सर्व गुणांचा आदर स्वभावे । सर्वाकरिता असावा [३]

जन्मजात श्रेष्ठत्वाऐवजी गुण कर्मानुसार मानवाला श्रेष्ठत्व प्राप्त व्हावे. हा राष्ट्रसंतांनी मांडलेला विचार स्वीकारण्यासारखा आहे. त्याचबरोबर ग्रामातील शेतकरी व शेतमजूरांच्या आर्थिक स्थितीकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही.

ग्रामीण विभागातील शेतकरी व शेतमजूरांचे वर्णन

अठरा विश्व दारिद्रय ज्यांच्या घरी वसत राहते. त्या गरीबांच्या गरीबीचं दर्शन राष्ट्रसंतांना अगदी लहानपणापासून घेता आलं. भोगता आलं. गरीबीत जन्मास आलेल्या राष्ट्रसंतांना गरीबी काय असते व तिचे मानवी जीवनावर कसे परिणाम उद्भवतात, त्याचे चटके कसे बसतात. हे राष्ट्रसंतांनी पूर्णतः अनुभवले होते. म्हणूनच गरीबीचे जिवंत वर्णन ते करू शकले.

दिवसभर कबाडकष्ट करून पोटभर अन्न ज्यांना मिळू शकत नाही. तेथे दोन पैसे शिल्लक पडण्याचा प्रश्नच उरत नाही. अर्धपोटी उपाशी राहून संपूर्ण जीवन त्याला जगावे लागते. त्यातून कांही कारणामुळे, आजारी पडल्यामुळे किंवा मजूरी न मिळाल्यामुळे रिकामे राहावे लागले की, भूकेपायी त्याची मुले व बायको तडफडायला लागतात. काम करावे व पोटाची खळगी भरावी. याशिवाय दुसरा

---

१. ग्रा. गी. अ. ५ ओवी ५०-५१
२. ग्रा गी. अ. ५ ओ. ७९.
३. ग्रामगीता अ. ५ ओ. ६६-६७.

विचार त्याला करता येण्यासारखा नसतो. गरीबांच्या गरीबीचं वर्णन राष्ट्रसंतांनी अत्यंत मार्मिकतेने केलेले आहे.

'गरीबोंकी जिन्दगी है भारी सजा कहता है कौन उसमे आती मजा
निकला जो दिन; लगा कंधे बलम सारी जवानी मे चलता कदम
भूखे बदनसे सारा खोया जनम झंझटके मारे ले थोडी रजा
तो जोरू लडको मे बाजा बजा [1]

खेड्यातील शेतकरी–शेतमजूर या सर्वांचीच स्थिती अत्यंत बिकट, हलाकीची आहे. भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाचा लहरीपणा हे भारतीय शेतकरी–शेतमजूरांना शापच ठरले आहे. मधून होणारे भूकंप; वादळ–अतिवृष्टी किंवा पावसाचं न होणारं दर्शन आदींमुळे देशाची स्थिती अत्यंत हलाकीची झाली आहे. परंपरेनुसार करण्यांत येणारा शेतीचा व्यवसाय; कुटिर व ग्रामीण उद्योगाचा झालेला नाश, आदीमुळे शेतकरी अत्यंत हवालदिल झाला आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीतील उत्पादन, उत्पादनासाठी करण्यांत येणाऱ्या खर्चा ऐवढे देखील होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यावर उपासमारीची पाळी येते.

'प्रभु हा कोपला ऐसा ? जरा ना सौख्य आम्हासी
उडाली भूमिची सिमा : पिकेना तीळभरी शेती
खर्च न निघे कांही । राहती लोक उपवासी [2]

त्यांनी उत्पादित केलेल्या कच्च्या मालाला खेड्यांत बाजारपेठ लाभणे अशक्य. त्यामुळे त्या बिचाऱ्याला आपला माल शहरांत विकावयांस नेल्याशिवाय गत्यंतर उरत नाही. तिथे गेल्यावर आधीच नापिकीमुळे हताश झालेल्या, गलितगात्र झालेल्या या शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळणे दूरच राहते पण दलालाच्या अमानूष अत्याचाराला बळी पडावे लागते. शेतकऱ्यांच्या गरजेचा, अज्ञानाचा फायदा घेऊन त्याला नाडविल्या जाते. नाईलाजाने येईल ती किंमत हातात घेतल्याशिवाय दुसरा उपाय राहत नाही. ही शेतकऱ्यांची दलालाकडून होणारी फसवणूक राष्ट्रसंतानी अत्यंत उघडपणे वर्णन केली आहे.

'कपास आता बाजारमे जब, अंधाधुंद लुटा जावे
रोता है बस किसान परभी, दया न थोडीसी आवे
जो आता वह हाथ मार दे, चुंगडी भर लेता अपनी
दलालको कमी नही । किसान को देता कफनी

---

१. क्रान्तीदिप पृ. २. २. अनुभवसागर भाग २ गीत ७४.

कमानेवाले मरे कष्टसे । मजा करें शहरोंवासी
भाव टालकर कपास मांगे, अनाज की भी गत ऐसी [१]

हे केवळ 'कापसाबद्दल' नाही तर शेतकऱ्यांच्या सर्वच शेतमालाबाबत असे च घडते. दिवसरात्र एकसारखी अंग मेहनत करून शेवटी दलालाच्या पिळवणूकीला त्याला बळी पडावं लागतं. आधीच फाटक्या असलेल्या त्याच्या संसाराला दलाल पुन्हा फाडण्याचा प्रयत्न करतात तसेच धनिक वर्गही. (सावकार) कापूस एकाधिकारातील अनुभव तसाच आहे.

ग्रामीण विभागात शेतकरी अत्यंत हीन दीन अवस्थेत जीवन जगतो. त्यांच्या अडी–अडचणीचा फायदा घेऊन धनिक किंवा सावकार अडका की दिडका करुन त्या शेतकऱ्याला लुबाडण्याचा प्रयत्न करतात. कर्ज वसुलीसाठी त्याच्या घरावर कुडकी नेतात. त्यांच्या घरावरून नांगरही फिरविण्यांस ते कमी करत नाही.

धनिकास जरा नच ज्ञान असे । अपुले म्हणूनि पिळतात जसे
देताति प्रसंगी दंड महा । करिताती पुढे घरदार रिते [२]

भारत हा शेतीप्रधान देश आहे. इंग्रजांच्या काळांत शेतकऱ्यांच्या जीवनाकडे; त्यांच्या प्रगतीकडें दुर्लक्ष झाले. शासनाकडूनही त्यांची पिळवणूक होत होती. त्यांत समाजकंटकांचा वाटा खूप मोठ्या प्रमाणांत होता. सावकाराचे कर्ज म्हणजे त्यांच्या डोक्यावर टांगती तलवार असायची. विचारा साधा भोळा शेतकरी अर्धपोटी उपाशी व अर्धनग्न राहून जीवन जगत होता. कर्जाचा बोझा त्याच्या डोक्यावरून उतरत नव्हता. भारतीय शेतकऱ्यांच्या बाबतीत एक विधान रूढ झाले होते. कर्जात जन्मणारा व कर्जातच मरणारा भारतीय शेतकरी आहे.

'स्वातंत्र्य' प्राप्तीनंतर शेतकऱ्यांची ही अवस्था बदलून त्याला योग्य सन्मानाचे जीवन लाभेल असे वाटत होते पण आशेची निराशा झाली. भारताने लोकशाहीचा स्वीकार केला पण शेतकऱ्यांच्या परिस्थितीत कोणतेही परिवर्तन घडले नाही. तेव्हा जनभावनेला 'दीनबंधूस्यांनी' लेखून राष्ट्रसंत म्हणतात –

'ऐ दिनबंधो ! सुनो हमारी; किसान का कब भला करोंगे'.

असा स्पष्टतेचा सवाल करून शेतकऱ्याच्या परिस्थितीचं, त्याच्या फाटक्या संसाराचं अत्यंक मार्मिकतेने ते वर्णन करते झाले. ते कोणत्याही सहृदयी माणसांच्या डोळ्यांत अश्रू आणणारे आहे. राष्ट्रसंतांची शेतकऱ्याविषयीची कळकळ त्यातून आपणाला सहजतेने दिसून येते.

---

१. क्रान्तीदिप पृष्ठ ३. २. जीवन जागृती पृ. क्र. ३८

'गुलामिमे था वतन हमारा । तभीसे रोता किसान सारा
अभितो हालत बडी बुरी है । कभी इधर भी चला करोंगे
न बाल बच्चों को सुख है उनको, बिमारिया रहत घेरी उनकी
न धोती साडी बदनपे अच्छी । कभी तो उनकी सल्ला करोंगे
टुटा छप्पर-दिवार खिडकी । सदाकी ठंडी धूप घरमे
नही ओढनेको, नही बिछाने जरा, कभी तो मिला करोंगे [१]

स्वत: हीन-दीन अवस्थेत राहून संपूर्ण दुनियेला अन्न पुरविणारा शेतकरी; त्यांच्या जीवनात परिवर्तन व्हाव, सुख-समाधानाचे दिवस त्याला लाभावे. उज्वल असं त्याचं भवितव्य निर्माण व्हावं. यासाठी राष्ट्रसंतांनी ग्रामगीता लिहून खेड्यातील या ग्रामनाथालाच शेवटी अर्पण केली. शेतकरी; शेतमजूराच्या दु:खाचं; त्यांच्या हीन-दीन स्थितीचं मूळ कारण त्यांच्या अज्ञानांत आहे. ते अज्ञान त्यातून बाजूला सारल्या गेले की त्याला त्याची उन्नतीसहजतेने करता येईल. हे राष्ट्रसंत ओळखून होते म्हणूनच प्रत्येक खेड्या-खेड्यांत जाऊन या ग्रामनाथाच्या अंतरी असलेले अज्ञान काढून टाकण्याचा त्यांनी जन्मभर यशस्वी प्रयत्न केला. शेतकऱ्यातील अज्ञान बाजूला सारल्या गेले की त्यांची प्रगती-उन्नती सहज घडून येईल. श्रमप्रतिष्ठेचे महत्व त्याला कळले व उद्योगशीलता त्यांच्यात निर्माण झाली की विकासाचा मार्ग त्याला सहजतेने चोखाळता येईल. हा त्यांचा प्रयत्न होता. हीच त्यांच्या कार्याची सर्वातमोठी सिद्धता होती आणि म्हणूनच ते म्हणतात --

'जब किसानकी देखू भलाई । हो, मैने खुशिया मनाई
क्योंकि दुनियाका पोशिदा वो है [२]

समाजातील कौटुंबिक प्रश्न

शेतकऱ्यांच जीवन अत्यंत हलाकीचे असले तरी 'मूले परमेश्वरांची देण आहे' ही त्यांची समजूत असल्याने त्यांच्या कुटुंबांचा प्रश्न अत्यंत बिकट होता. इकडे मुलांना खायला अन्न मिळत नाही व दुसऱ्या बाजूने घरांतील वाढता प्रपंच; दरवर्षी घरात हालणारा पाळणा आदि पाहून राष्ट्रसंतांना त्याची कीव येते. मूले पैदा करण्यापेक्षा त्यांचे पालन पोषण करण्या चा प्रश्न महत्वाचा आहे. मुलांच्या भावी जीवनाचा प्रश्न महत्वाचा आहे. उघड्या-नागड्या अंगाने ती मूले भटकत असतात, अन्नासाठी; भाकरीच्या तुकड्यासाठी भांडतांना दिसून येतात. दरवर्षी होत असलेल्या बाळंतपणामुळे व योग्य औषधोपचार मिळत नसल्यामुळे जन्मदात्री अत्यंत कमजोर व्हायला लागते. आपल्या मुलांचा सांभाळ ती करू शकत नाही. म्हणून राष्ट्रसंत या अज्ञानी बांधवाकडे पाहून म्हणतात –

---

१. क्रान्तीदीप पृ. २. २. ज्ञानदिप पृ. क्र. ९.

'बच्चों पे बच्चे हरसाल होते, गलगई बच्चों की माता
खाने–पीनेका ठोर नही है, रोता भाग्य विधाता रे भाई [१]

मुलांची संख्या वाढवून त्यांच जीवन बर्बाद करण्याचा अधिकारच कुणालाही प्राप्त होत नाही. मुलांच पालन पोषण करता येत नसेल, त्यांचं भवितव्य उज्वल करता येत नसेल तर मुलांना जन्म देण्यात काही अर्थ नाही. असा रास्त समज देतांना राष्ट्रसंत दिसून येतात.

'लडके बच्चे खूब बढाता, सबकी करता माती
कौन करेंगे पालन उनका । मत सिर बोझा ढोल [२]

त्याचबरोबर मर्यादित कुटुंबाचा उपदेश राष्ट्रसंतांनी केला आहे. 'कुटुंब लहान–सुख महान–' हा मंत्र त्यात आहे.

'पुत्र शिकून मोठा झाला । एक होता दुसरा झाला
तिसरा होता संसार संपला । तोचि धन्य गृहधर्म [३]

जिथे पोटाचा प्रश्न भयावह आहे तेथे मुलांना किंवा रोग्यांना औषध तरी कसे मिळेल. अशा परिस्थितीत औषधाशिवाय त्यांना जीवन जगाव लागतं.

'ना औषधी मिळती कुणा, तैसेचि कंठिती जीवना' व अशाप्रकारे अनेक रोगी औषधी न मिळाल्यामुळे मरतांना दिसून येतात.

गृहधर्म

राष्ट्रसंतांनी समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केल्यावर त्यांना दिसून आले की व्यक्तींची धारणा स्वतःपूरती मर्यादित आहे. मर्यादित विचार धारणेत विशालता व व्यापकता निर्माण केल्यास समाज आदर्शवादी होऊ शकेल. समाज गृहस्थाश्रमावर उभा आहे. खरा गृहस्थी कसा असावा ? हा विचार मांडतांना राष्ट्रसंत म्हणतात –

'आपुल्या पुत्राकारणे । कोणावरी अन्याय न करणे
आपुल्या ऐसीच समजणे मुले सर्वांची [४]

आपल्या मुलांवर जितक्या जिव्हाळ्याने; आपुलकीने प्रेम करावे तितक्याच उंच पातळीवरुन दुसऱ्यांच्या मुलांवर प्रेम करणारा खरा गृहस्थी होय.

समाजाचं बळ व विकास हा उगवत्या पिढीवरच असतो. त्यांना उचित योग्य वळण लावण्याची जबाबदारी ही आजच्या पिढीवर आहे. चांगले आदर्श हे नेहमी चांगले जीवन घडवित असते.

---

१. राष्ट्रनौका पृ. क्र. ३.
२. राष्ट्रनौका पृ. क्र. ४.
३. ग्रामगीता अ. ३ ओ. ५७.
४. ग्रामगीता अ. ३ ओवी. ५४

सर्वांकरितांच झटावे । असे व्यापकपण साधावे
हेच गृहस्थाश्रमी शिकावे । लागे तत्व [१]

असे व्यापकपण निर्माण झाले की समता; न्याय - स्वातंत्र्य आणि बंधुत्व सहजतेने समाजात निर्माण होईल. ज्या समाजांत वरील गोष्टीचा विकास झाला आहे तो समाज आदर्शकिडे वळणारा व आदर्शवादी समाज होय : पुढे ते म्हणतात-

नेटका करोनि प्रपंच आपुला । दुजा साहय्य झाला बोधरुपे
आसक्तीचे अंग सदासर्वकाळ । निष्काम निर्मळ कार्य करी
तुकडयादास म्हणे धन्य तो संसारी । सदा परोपकारी न्यायनिष्ठ [२]

बहूपत्नी - पतीस विरोध

बहूपत्नीला व समाजाच्या त्याप्रवृत्तीला त्यांनी कडवा विरोध केला आहे. एकीचे जीवन जर तुम्हाला सुव्यवस्थित करता येत नाही तिथे अनेक पत्नी करुन त्यांच जीवन बरबाद करण्याचा अधिकार नाही. दुसरे. असे की बहूपत्नी घरात असल्यावर मत्सर, द्वेष आदी विकसित होऊन आपसांत कलह निर्माण होतात. सौख्य; आनंद, समाधान नष्ट व्हायला लागते. त्यासाठी विकारी मनाला आळा घालावा असे राष्ट्रसंत म्हणतात -

कांही दोन चार स्त्रिया करिती । आयुष्य सर्वांचे नागविती
ही तो आहे पशुवृत्ति । गृहस्थाश्रम म्हणो नये [३]

एकदा एक पत्नी केली । पुढे पत्नीची भाषाचि संपली
तरीच दोघांनाहि लाभली । शांति संसारी [४]

पुरुषाला राष्ट्रसंतांनी जसा उपदेश केला आहे तसाच बहूपती करणाऱ्या स्त्रियांनाही विरोध केला आहे. अजून कांही जमातीत एकापेक्षा जास्त पती करण्याची प्रथा आहे. त्या विषयी बोलतांना राष्ट्रसत म्हणतात -

एका स्त्रियेसि दहा पति । अजूनहि कोठे असे ही रीति
त्या माऊलीची कोण गति । देव जाणे [५]

समाजातील हे अज्ञान नष्ट व्हायला हवे. पती आणि पत्नी यांनी आपसांत तडतोड करुन संसाराकडे पाहावे कारण संसार हा अपूर्ण आहे. पूर्ण समाधान सर्वांनाच प्राप्त होईल असे नाही. कुठे तरी उणीव राहते. तसे विकारी मनाला

---

१. ग्रामगीता ३. ओवी ५५
२. समाज संजीवनी पृ. क्र. ४४
३. ग्रामगीत अ. ३/६२-६३
४. ग्रामगीत अ. ३ ओ. ६६-६७
५. ग्रामगीत अ. ३/६५

समाधान लाभणेच शक्य नसते. तेव्हा दोघांनी एकमत करुन जीवन जगावे. असे राष्ट्रसंत म्हणतात.

'संसार सदाचाच अपूर्ण । विकारी नसे समाधान
ऐसी गाठी बांधोनि खूण । विचारे सुख साधावे
दोघांचे व्हावे एक मन । तेथेचि नांदे स्वर्ग पूर्ण
होता आदर्श एक संतान । पांग फेडील देशाचा [१]

पण बरेच लोक संततीसाठी अनेक विवाह करतांना दिसून येतात. स्त्री असो की पुरुष असो प्रत्येकाला आपणांस संतती व्हावी असे वाटते कारण 'निपुत्रिकांस अधोगती' असे पुराणांत वर्णन केले आहे. त्यावर भाष्य करतांना राष्ट्रसंत म्हणतात-

निपुत्रिकास अधोगति । ऐसे जे ग्रंथवे-ते म्हणती
त्यांच्या म्हणण्याची निष्पति । दुसरी होती
भारती ऐसा काळ आला । संन्यास देती ज्याला त्याला
महत्व न द्यावे लग्न कार्याला । ऐसे झाले [२]

असे असल्यामुळे त्यावेळी संसाराचे-संततीचे महत्व वरील प्रकारे सांगण्यात आले होते.

परंतु आज संतती विषयी उद्‌गार काढतांना राष्ट्रसंत म्हणतात –

पुत्र व्हावा कुल उद्धारी । येरव्ही ती वांझचि बरी
एसेहि बोलिले निर्धारी । ग्रथामाजी
यातून निघे सार । समाज धारणेसाठी संसार
पुत्र नसताहि होती उद्धार । प्रयत्नशील गृहस्थाचा
समाजाच्या उन्नतीचे सूत्र । खंड न द्यावे सर्वत्र
यासि पूरक तोच योग्य पुत्र । बाधक तारि ती अधोगति [३]

राष्ट्रसंतानी मांडलेले विचार आजच्या समाजाला पटणारे नसले तरी उद्याच्या आदर्श समाजासाठी, समाज जीवनासाठी आवश्यक आहे.

आदर्श समाज करायचा असेल तर दुसरे परिवर्तन त्यांनी रुढी आणि परंपरेत देखील सांगितले आहे. ज्या रुढी-परंपरा समाजाला उपकारक आहेत; पोषक आहेत त्यांचा स्वीकार राष्ट्रसंतानी केला असला तरी नवे परिवर्तनशील विचार त्यांनी मांडले आहे.

---

१. ग्रामगीत अ. ३ ओ. ६८-६९.
३. ग्रामगीता अ. ३ ओ. ७६ ते ८०

राष्ट्रसंतांनी हुंडा पद्धतीवर जसा हल्ला चढविला तसाच 'दत्तक विधानावर' देखील हल्ला चढविला आहे. पुत्र नसल्यामुळे वंशवेल खुंटेल व असे झाले की नर्कवास भोगावा लागेल म्हणून दत्तक घेतात. संपत्ती दत्तकाने जमवली नसल्याने तो उधळपट्टी करायला लागतो. त्यापेक्षा सत्कीर्ती मिळवावी, समाजाचे कार्य करावे.

'कोणी घरी धनाढ्य असती । परि पुत्राअभावी नर्काची भीती
म्हणोनि मरतेवेळी दत्तक घेती । होय फजीती राहिल्यांची
दत्तक करी उधळेपणा । किंवा पूर येई भांडणा
अपव्ययाची वाट लागे धना । तंगे नर्क चुके कैसा [1]

यापेक्षा, सद्गती मिळवायची असेल तर राष्ट्रसंत म्हणतात –

यासाठी धन असल्या मालकांचे । करावे कार्य गाव सोयीचे
विहीर, शाळा, छात्रालयादी कोणचे । सत्कार्य भावे [2]

ग्रामसेवेचे, समाजसेवेचे किंवा नातलगाच्या उज्वल भवितव्याचे कार्य करावे, असे केल्यास स्वर्गप्राप्ती होईल असे विद्वानाचे मत पुढे करुन राष्ट्रसंत बोलते झाले आहेत.

तयायोगे जी होईल कीर्ति । तिलाच सज्जन स्वर्ग म्हणती
लोक हृदये गुण वाखाणती । याविण स्वर्ग असेना [3]

तसेच रुढी बंधनांत पडून परिस्थिती नसतांना सण, उत्सव किंवा मरणादिक कर्म करण्याविषयी राष्ट्रसंतांनी आपले विरोधी मत मांडले आहे. परिस्थितीला पाहून सर्व करावे, योग्य परिस्थिती नसल्यास कर्ज काढून कोणतेही कर्म करु नये !

घरातील व्यक्ती मरण पावल्यावर सुतक पाळून घरी बसण्यापेक्षा सतत श्रम करीत रहावे. लोकांना जेवण देण्यापेक्षा –

'मृत्यू पावे त्यांचे नाव रहावे । म्हणोनि समाज सेवेत कांही द्यावे
त्याच्या सद्गुणाचे गोडवेगावे । आपणहि तैसे व्हावया
खरा पिंड आपणचि उचलावा । कर्तव्य करोनि जीव भूपवावा
त्यानेच पावेल कीर्ती जीवा । उज्वल साची
नाहीतरी मेला की रडावे । जिवंतपणी लक्ष न द्यावे
ऐसे ढोंग कासायासि करावे । समाजाने ?
जिवंत असता रोटी न दे । मेलिया वरि वाजवी वाद्ये
कावळ्यासि पिंड, इतरा दक्षणा दे । म्हणोनि साधे काय त्याने ?

---

१. ग्रामगीता अ. २२ ओ. ५२–५३ २. ग्रामगीता अ. १२ ओ. ५६
३. ग्रामगीता अ. २२ ओवी ५९.

राष्ट्रसंतानी मांडलेले विचार अत्यंत परखड असले तरी समाजाला अत्यंत उपयुक्त आहे. समाजाला नवी दिशा दाखविणारे आहेत. ज्या रूढी-परंपरा समाजाला घातक आहेत. त्यांचा राष्ट्रसंतांनी विरोध केला आहे. समाजाच्या बदलत्या अवस्थेनुसार, परिवर्तनानुसार रूढी-परंपरा निर्माण व्हाव्यात. व तसे होण ही काळाची गरज आहे.

'हर आदमी होता पुराना, यही दुनिया कहे
जो आजकी पोथी-किताबे, वे भी कल ना रहे
रचना समाजोकी बदलती, मूल्य भी है बदलता
जो आजका है पाप पुनः वे भी न कलके सर्वथा

आदर्श समाजाची कल्पना मांडतांना राष्ट्रसंतानी व्यसनाधिन लोकांचा चांगला समाचार घेतला आहे.

व्यसनाधिन समाज

एकीकडे लोकांना खायला अन्न मिळत नाही. औषध मिळत नाही तर दुसरीकडे रोजच्या जीवनातून सुटका मिळण्यासाठी, दुःख विसरण्यासाठी नशेच्या आधिन गेलेला समाज पाहायला मिळतो. दारू-गांजाच्या नशेत राहून स्वतःभोवती असलेल्या दुःखापासून मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांनी स्वतःच्या जीवनाची विल्हेवाट तर लावलीच आहे पण त्याचबरोबर कुटुंबाची दुर्दशा केली आहे. स्वतःच्या दुःखापासून सुटका मिळविण्याचं 'नशा' हे साधन नाही तर संकटावर मात करणे; संकटावर विजय मिळविणे हाच खऱ्या अर्थाने पुरूषार्थ आहे. जीवनाला जो घाबरतो व व्यसनाच्या आधिन जातो तो खरा मानव नव्हे तर सतत प्रामाणिकपणे प्रयत्न, परिश्रम करणे हेच खरे मानवी कर्तव्य ठरते. व्यसनाधिन समाजाला समजावितांना राष्ट्रसंत म्हणतात –

ऐ मानव ! सुनले बात, व्यसन को छोड दे सारे
तेरा और बढेगा नाम । प्यारे ! कर नेकीसे काम
व्यसन को छोड दे सारे
शराब, गांजा पीकर कितने, जीवन सफल बनाया
खाक किया तन को-धनको, आखिर दुर्गति पाया रे

तर पुढे ते म्हणतात –

जुआ, सट्टा, चाय और चुट्टा सब है बट्टा भाई ।
इसके मारे कोई न सुखियाँ, लाखो देत गवाही रे १

---

१. ज्ञानदीप पृ. क्र. ५

अनेक लोकांची व्यसनामुळे दूर्गती झाली आहे. त्यांचीच नाही तर त्यांच्या कुटुंबाची, मुलाबाळांची दीन अवस्था होऊन भीकेची पाळी त्यांच्यावर आली असे कितीतरी उदाहरणें आपणांस दिसून येतात म्हणूनच राष्ट्रसंत अत्यंत कळकळीने विनंती करतांना म्हणतात.

'दुर्व्यसनांना दूर करा रे । सोडा गांजा दारू
अपुल्या पोटासाठी कोणी, नका जिवांना मारू [२]

व्यसनाधिनतेमुळें बुद्धिवतांची बुद्धी, मजुरांची कष्ट करण्याची वृत्ती, धनवानाची संपत्ती, उद्योगवादी लोकांची उद्योगशीलता, शेतकऱ्यांची शेती व्यवसायातील कुशलता नष्ट झाली आहे. सर्वामध्ये निष्क्रियता वाढत चालली आहे. त्यामुळे मानवी जीवनाला व देशाला अवदसा निर्माण झाली आहे श्रमाची प्रतिष्ठा लयास गेली. श्रमप्रतिष्ठा नष्ट झाल्याने संपत्तीचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे आर्थिक गुलामगिरी देशासमोर निर्माण झाली आहे. या देशाचं काय होईल ? मानव समाजाचं काय होईल ? हा जसा सज्जनासमोर प्रश्न आहे तसाच राष्ट्रसंतासमोर असणे अत्यंत स्वाभाविक आहे म्हणून राष्ट्रसंत म्हणतात –

'वाहवा रे दारूची नशा । आलि अवदशा, हुशारी गेली
कंगाल जाहला देश, गुलामी आली.
धनवान किती बलवान । कुलवान थोर आणि सान
बुद्धिमान किती गुणवान । उद्योगी मजूर किसान
दारूच्या पायि गांजले, भीके लागले, मान्यता नुरली [३]

व्यसनाधिनतेतून मानवाने मुक्त व्हावे, यासाठी राष्ट्रसंत परोपरीने लोकांना वळवितांना आपणांस दिसून येतात.

'कसं चळलं दारू न मन–हरपलं भान' 'दारूची दारूणता' 'मरणाचा प्याला' 'ग्रामराज्याची दुर्दशा' अशा अनेक गीतांतून व्यसनामुळे उद्भवणारे मानवी जीवनावरील वाईट परिणाम त्यांनी समजावून सांगितले आहे.

समाजाला व्यसनप्रवृत्तीकडे नेऊन व्यभिचारी वृत्ती निर्माण करणारे अनेक समाज कंटक या देशात आहेत. दारूच्या नशेत लोकांना चव्हाट्यावर शिवीगाळ करणे, इतकेच नव्हे तर स्त्रियांची बेअब्रू करणे आदि गोष्टी खूप मोठ्या प्रमाणांत समाजात पहायला मिळतात पण त्याला अटकाव किंवा प्रतिकार करायला समाजातील तरूण वर्ग पुढे येत नाही. समाजाचं जीवन अमंगळ करणाऱ्या समाज–कंटकांना त्यांच्या शक्तिसह पायाखाली तुडविल्याशिवाय दूसरा कोणताही उपाय नाही.

---

२. जीवन जागृति पृ. क्र. ३७ ३. समाज संजीवनी पृ. क्र. ३३

'इस देश के कई आदमी, पीकर नशा गाली बके
है वीर भी ऐसे यहाँ, प्रतिकार करना ना सिखें
ये वीर नहि नादान है, जिनकी जबाँ फुटती नही
बहु बेटी पर हमला करे, पर आँख भी उठती नही '

समाजातील वाईट प्रवृत्ती

समाजाचा सर्वांगिण विकास हा त्याच्या सद्गुणावर; सदाचारावर अवलंबून असतो. चारित्र्यसंपन्नता हा समाजाच्या उत्कर्षाचा मुख्यबिन्दू आहे. याशिवाय असलेला समाज विकासाच्या टप्प्याकडे न जाता अधोगतीकडे जात असतो.

ज्या समाजाचे अध:पतन झाले आहे. त्या समाजात चोरी-चपाटी लुच्चेगिरी, दगाबाजी, अत्याचार, खून आणि बलात्कार हे सतत घडत असतात.

भर दिवसा लहान-सहान कारणासाठी होणारे खून; आज रोज दिसून येतात. शहरी विभागाप्रमाणे ग्रामीण विभागातही आपणांस दिसून येतात. शेतीच्या कारणावरून, अनैतिक संबंधातून-मारामारीचे, खूणाचे प्रकार घडतांना दिसून येतात.

'दुष्टासी दंडण देणे । हे पुण्यमयाचे लेणे' असे सांगून समाज कंटकांच्या विरोधात उभे राहण्याचे आव्हान महाराज करते झाले.

दरोडेखोरी-लूटमार यांचा सर्रास सुकाळ या देशांत होत असतांना आपणांस दिसून येतो. प्रत्येक दिवशी वृत्तपत्रांत एक ना एक दरोडा पडल्याची बातमी पाहायला मिळते. चोरीचा तर प्रश्नच नाही. हे पाहून राष्ट्रसंतानी चिंता व्यक्त केली आहे.

'बहु चोरांची दाटी डावेमारी, जनता ही जर्जर सारी'

समाजात स्त्रियांवर अत्याचार-बलात्कार सतत कुठे ना कुठे चालू असतात. समाज कंटकापासून तर पोलीसापर्यंत सर्वांच्या काम-वासनेला स्त्री बळी पडत आहे. समाज दुर्बल झाला आहे. स्त्रियांवरील होणारे अत्याचार पाहून समाज मूग गिळून बसतो आहे.

'कोणाचा धाक नसे कोणाला, छळतातो पापी अबलांना'

'कां छेडता अबलांना' असा प्रश्न करून राष्ट्रसंत गुंडांना समज शिकविण्यासाठी युवकांनी पुढे यावे अशी विनंती नम्रतेने करतांना दिसून येतात.

---

१. लहरकी बरखा २ ओवी १७६.

रोजच्या वृतपत्रात बलात्काराच्या बातम्या व त्या अनुषंगाने खून आदि नित्य होत असतात. याला शासनाचा आंधळेपणा जितका कारणीभूत आहे तितक्याच प्रमाणांत समाजाची जागरूकता देखील कारणीभूत आहे. तरूण मुलींना पळविण्याचा व त्यांना विकण्याचा किंवा वेश्या व्यवसायात लावण्याचा गैरप्रकार खूप मोठ्या प्रमाणांत वाढत चालला आहे.

– हुंडा पद्धतीस विरोध –

'हुंडा पद्धती' समाजात खूप मोठ्या प्रमाणात रूढ झाली आहे. स्त्रियांच्या जीवनावर हा खूप मोठा आघात आहे. मुलींचा पैसा घेणे किंवा मुलीच्या लग्नासाठी हुंडा देणे या दोन्ही पद्धती समाजात रूढ आहेत. समाज प्रतिष्ठेचा विषय होऊन बसला आहे.

कांही समाजात मुलींचा पैसा घेण्यांत येतो. पैशासाठी वाटेल त्या व्यसनाधिन गुंड्यांच्या किंवा सुकुमार; नाजूक मुलीला मध्यम वयाच्या पुरुषाला देण्याला कमी करीत नाही. मुलींच्या जीवनाचा प्रश्न वडिलांसमोर महत्वाचा नसतो. मुलींचा पैसा घेऊन मुलीचे लग्न करणाऱ्या बापाला राष्ट्रसंत बाप म्हणायला तयार नाही. अशाप्रकारे लग्न झाल्यावर नवऱ्याच्या किंवा घरातील इतर लोकांच्या त्रासाला कंटाळून कितीतरी मुलींनी आपली आत्महत्या केली आहे.

'मुली बाळीचा घेऊनि पैसा, लग्न लाविता तिचे
म्हणावे वडील तुम्हा कोणाचे' [१]

मुलीचा पैसा घेणे राष्ट्रसंतांना मान्य नाही तसेंच श्रीमंती पाहून मुली देणे राष्ट्रसंतांना मान्य नाही. श्रीमंताच्या घरी मुली दिल्यावर त्यांना कसा त्रास भोगावा लागतो याची जाणीव राष्ट्रसंताना दिसून येते. बहूतेक श्रीमंताची मुले निकृष्टिक; व्यसनाधिन व निष्क्रीय असतात. अशा मुलांना मुली देण्यापेक्षा सद्गुणी, होतकरू आणि कष्टीक मुलांना मुली देण्याचा विचार त्यांनी मांडला आहे.

पैसा पाहुनी देता मुलगी, जन्म गमाविता तिचे
ज्ञान हे कुणी दिले कोठचे [२]

किंवा

नाहीतरि हुंड्यापांड्यासाठी जीवन होईल मसणवटी
अनेक मुले–मुली करीती शेवटी आत्मघात। [३]

१–२. राष्ट्रीय भजनावली पान ३३, ३. ग्रामगीता अ. २१ ओ. ५३-५४

मुलीचा पैसा घेणारा किंवा मुलीच्या लग्नासाठी हुंडा देणाऱ्याला समाजाने वाळीत टाकावे. त्यांचा निषेध करावा; तरच ही पद्धती नष्ट होईल.

ज्या मुला-मुलीचे पैसे घेतले । त्यासि समाजाने पाहिजे निषेधिले

– आदर्श विवाह –

राष्ट्रसंतांचा हुंडा प्रवृत्तीला विरोध होता. मुलाचा हुंडा घेणे मूला-मुलीचा पैसा घेणे ह्यावर राष्ट्रसंतांनी प्रखर टीका केली आहे.

'बन्धन है धन गिननेका । विवाह में यह है धोखा
दिल मिलते सहकार हुआ । लगा शादि का वहाँ दिखा १

आणि म्हणूनच आदर्श विवाह पद्धतीबद्दल बोलतांना ते म्हणतात–

'वेळ, पैसा आणि श्रम । वाचवावेत करोनि नेम
गुणांस द्यावे महत्वपरम् । जाति, धन; भ्रम सोडोनि
सुंदर करावे सभास्थान । बसवावे साजेसे जन
वर-वधूंना समोर बसवून । सूचना द्यावी सूचके
द्यावा वर-वधूचा परिचय । प्रगट करावा सत्कार्य निश्चिय
मग साधावे कार्य मंगलमय । मंगलाष्टके म्हणोनिया
मंगलाष्टकी विवाह उद्देश । सज्जनानी करावा उचित उपदेश
येऊ न द्यावी नाटकी अंश । अपवित्र त्यांत
सभा असावी आदरपूर्ण । देऊ नये धुम्रपान
धर्म संस्कार वाटावे लग्न । अग्निदेवते स्मरोनिया
वडील जनाचे आशीया । सर्वांचे प्रेमादरे वागावे
गोड बोलोनि उरकावावे । लग्न प्रसंगा
वर – वधूंना ग्रामीण खादी । असो जूनी वा नवी साधी
ऐशा वस्त्रीच लग्नाक्षदी । पडाव्या शिरी उभयतांच्या २

पुढे ते म्हणतात–

विवाहाचे संस्कार । त्याचे महत्व सर्वात थोर
त्या पायावरीच समाज मंदिर । म्हणोनि सुंदर कीर्ती गावाची ⊠

विवाहाच्या संस्कारावरच समाजमंदिर उभे आहे हे लक्षात घेऊन कमीत कमी खर्चात लग्न सोहळा पार पाडावा असा उपदेश महाराज करतात.

---

१. सद्विचार प्रवाह पृ. क्र. ३५ २. ग्रामगीता अ. २१/९०-९६
⊠ ग्रामगीता अ. २१ ओ. ९९-१००

कम खर्च में शादी हो। नाहक नही बर्बादी हो ※

त्यासाठी त्यांनी मुला-मुलींच्या गुणांचा विचार विवाहाच्या दृष्टीने रण्यात यावा असा विचार मांडला आहे.

वधू-वरांचे उत्तम गुण। हेचि परस्पराचे महाभूषण
त्यावाचोनि विवाह केला वैभवपूर्ण। तरि तो असंगल १

लग्न हा प्रतिष्ठेचा विषय बनविणारे महाभाग या देशात खूप मोठचा प्रमाणात कर्ज काढून वाटेल तसा खर्च करतात. शेवटी त्यांना कर्ज फेडणे अत्यंत कठीण होते. अशा लोकांना राष्ट्रसंतांनी चांगले धारेवर धरले आहे.

लग्नाकरिता कर्ज करावे। जन्मभरि व्याज भरीत जावे
लग्नासाठी कफल्लक व्हावें। कोण्या देवें सांगितले ? २

त्यापेक्षा अत्यंत साध्या परिस्थितीत काळ-वेळ ओळखून अत्यंत साध्या पद्धतीने लग्न सोहळा पार पाडावा असा सल्ला ते देतांना दिसून येतात.

सारांश, लग्नाचा प्रसंग। विचाराने करावा यथासांग
समजोनि परिस्थिती, वेळ प्रसंग सर्व काही ३

त्याचबरोबर त्यांनी मिश्र विवाहाच्या प्रश्नाला उचलून धरले आहे.

– मिश्र विवाह –

समता ही केवळ आर्थिक नसते. आर्थिक समता म्हणजे 'क्लासलेस सोसायटी' (वर्गाविहिन समाज रचना) होय. पण क्लासलेस निर्माण होऊन मानव ही एकच जात समाजात रहावी. जातियवाद नष्ट करायचा असेल तर मिश्र विवाह समाजात होणे अत्यावश्यक आहे. त्यांना 'गुणाः सर्वत्र पुजन्ते' हा न्याय मान्य असल्यामुळे त्यांनी जाती बधने तोडण्याचे विचार मांडले आहेत म्हणूनच ते म्हणतात-

'विवाहमे कोई बात नही। प्रीत मिले फिर जात नही' ※

किंवा

दोघे प्राणी उपवर असती। भिन्न जाति लग्न करू म्हणती
विचारे करिती, त्यासि संमति। अवश्य व्हावी
गुण गुणाकडे धाव घेतो। आपण शास्त्री पुराणी ऐकतो
मिश्र विवाहाने बिघाड होतो। म्हणणे व्यर्थ ४

※ सद्विचार प्रवाह पृ. ३५
१. ग्रामगीता अ. २१ ओ. ८०
२. ग्रामगीता अ. २१ ओ. ८४
३. ग्रामगीता अ. २१ ओ. ९९
※ सद्विचार प्रवाह पान नं. ३५
४. ग्रामगीता अ. २१/३१-३२

मिश्र विवाह समाजाला घातक नाही. हे राष्ट्रसंतांनी श्रीकृष्णाचे व अर्जुनाचे विविध जातीतील झालेल्या विवाहातून, त्यांच्या पराक्रमी संततीतून पटवून दाखविले आहे.

गुण साम्याचे विवाह । वरि श्रीच्या कसोटीचे विवाह
राष्ट्रातील भेद मिटविण्याचे विवाह । नाना जमाती मधूनि १

विवाहाच्या प्रश्नानंतर समाजाचे शोषण करणाऱ्या धनिक; भांडवलदारांना उचित उपदेश करतांना राष्ट्रसंत दिसून येतात.

– धनिक श्रीमंतांना उपदेश –

आज समाजात गरीब–श्रीमंत; कामगार व भांडवलदार असे भेद दिसून येतात. श्रीमंताची श्रीमंती कष्टकरी जनतेच्या रक्तावर एकसारखी वाढत चालली आहे. गरीबांच्या जीवनाकडे, त्यांच्या आवश्यक गरजांकडे लक्ष न देता आपली श्रीमंती कशी वाढेल; या त्यांच्या प्रवृत्तीचा निषेध राष्ट्रसंतांनी केला. बदलत्या काळानुसार 'श्रीमंत असावे पण गरीबांना पोसणारे असावे' असे राष्ट्रसंतांना वाटते पण श्रीमंत तसे वागत नाहीत. उलट मजूरांना श्रमाचा मोबदला योग्यतेने न देतांना दिसून येतात.

ज्या कष्टविती त्यांचे रक्तचि पीती मोबदला पूर्ण न देती
या सर्व जगी अशीच दिसते रीती नच कळे कशी ही नीती २

ही जर धनिक व श्रीमंताची नीती राहिली तर, ती वर्ग कलहाला आव्हान देईल असे राष्ट्रसंतांना वाटते. म्हणून श्रीमंताना समजावितांना ते खालील गीतात दिसून येतात.

'जभी आसमाँ एक होने लगा है' गरीब अमिरीका नाता जगा है
अभितक यार न कुछ समझा है तुने; धनमे ही तू डोलता है ३

'धन पर मत रख अपनी जान, एक दिन होगा दानादान' ४

धन हे गरीबांचे रक्त । समजोनि वागोत श्रीमंत
श्रम ही गावाची दौलत । म्हणोनि व्हावा मान तिचा ५

कारण आज गरीबांच्या अंतःकरणात श्रीमंताविषयीचा द्वेष भरलेला आहे. आज श्रीमंत धनिक; गरीबांना व नोकरांना अत्यंत कमी लेखतात. नोकराकडे घृणास्पद पाहणाऱ्यांचा राष्ट्रसंतांनी योग्य समाचार घेतला आहे.

---

१. ग्रामगीता अ. २१ / ३६. २. जीवन जागृति पृ. क्र. ६,
३. ज्ञानदीप पृ. १० ५. ग्रा. गी. अ. १७ ओ. ५४ ३. लहरकोब रखा २ पृ. १३
४. लहरकी बरखा २ पृ. क्र. १४

ऐ चढ मिजाओ । नौकरों को, क्यों घृणासे देखते ?
धन हे तुम्हारे पास करके, नीच उसको लेखते
ना याद तुमको है यही, धन; रक्तपर किसके बढा ?
अजि पेटपर ये खून देते, करके सरपर छत चढा [३].

गरीबाला किंवा नोकरांना योग्यतेची मजूरी किंवा सहयोग न देता धार्मिक कार्यात पैसा उडविणाऱ्या श्रीमंताच्या प्रवृत्तीवर राष्ट्रसंतांनी टीका केली आहे.

'दीपक जलाते घी अत्तरके, देवता के धाम मे
मजदूर को देते नही, भरपेट भी कुछ काम मे
भूखा, दरिद्री द्वारपर, मुख फाडकर रोता खडा
भगवान क्या है बेवकुफ, देगा तुम्हे मुक्ती धडा [४]

गावातील लोक भूकेने मरत असले तरी जे श्रीमंत त्यांच्याकडे लक्ष देत नाही त्यांच्या वृत्तीचं योग्य दर्शन राष्ट्रसंत घडवितांना दिसून येतात.

गावातील लोक उपाशी मरे । म्हणती मरती ते मरोत बिचारे
आयुष्य सरल्या कोण तारे ? पैसा, दवा सब झूट [३]

अशा श्रीमंतांना राष्ट्रसंतांनी 'चोर म्हटले आहे.

ऐसे अधिक धन जमविले । समाजी कामी नाही आले
ते चोरचि म्हणावे ठरले । एकलकोंडे आपगर्जी [३]

असे लोक गरीबांच्या सहकार्याला, अडीचणीला धाऊन आले नाही तर गरीबांचे रक्त खवळल्यावर काय होईल ते सांगतांना राष्ट्रसंत क्रान्तिकारक वाटतात.

मेरे अजगर दोस्त तू तो चोर है इस ग्राम का
साराहि संग्रह कर लिया, कुछ काम का बेकाम का
अगर दिक्तोंमे कभी तू काम मे नहि आयेगा
नाहक तू मर जायेगा, पता भी न लग जायेगा [३]

– भांडवलदारांना इशारा –

आजच्या भांडवलदारी अर्थव्यवस्थेत श्रमिकांना योग्य ती मजूरी; श्रमाचे योग्य माप मिळत नाही. श्रम ही संपत्ती असे अर्थशास्त्र जरी सांगत असले तरी श्रमिक वर्गाला कनिष्ठतेची वागणूक भांडवलदाराकडून एकसारखी मिळत असते.

---

[३] अनुभवप्रकाश पृ. ८ ४. लहरकी बरखा २ पृ. क्र. १४
[३] ग्रा. गी. अ. १७ ओ. २८–२९ [३] मेरी जीवन यात्रा पृ. क्र.

त्यांच्या न्याय्य मागण्या फेटाळून लावण्यांत येतात. भांडवलदारांच्या अशा प्रवृत्तीचा राष्ट्रसंतांना राग येत होता. ज्या श्रमिकांच्या रक्तावर भांडवलदाराची संपत्ती खूप-मोठ्या प्रमाणांत वाढत जाते. त्या श्रमिकांना नीच प्रकारची वागणूक भांडवलदाराकडून मिळते. भांडवलदाराचे श्रमिकांना ठुकरावून लावणे, बेकदरतेने बोलणे हे पाहून राष्ट्रसंत म्हणतात –

'अखत्यार हे जीवन तुम्हारा, जिन श्रमिकोंके उपर
उनकोहि ठुकराते सदा, और बोलते हो बेकदर
है आह उनकी आगही, तुमको वही जलवायगी
एक दिन यही होगा कि तुमसे वही बदला पायगी १

अर्थात श्रमिकांच्या अंत.करणांत घुमसत असलेली आग व भांडवलदाराचा कडवा विरोध ही वर्ग संघर्षाची पार्श्वभूमी होय ! आज श्रमिक संघटित झाला आहे. 'श्रम ही संपत्ती' यांची श्रमिकांना झालेली जाणीव पाहून राष्ट्रसंत भांडवलदारांना म्हणतात –

'मजदूर ना कहना उसे । है मददगर सहकार का
अच्छी जबाँसे बोल तू. मूंह खोलकर प्यार का
अजि ! काम भी भरपूर लो, और दाम भी भरपूर दो
भरपूरही इज्जत रखो, तब धन छनाछन ले चलो २

– व्यापारी वृत्ती –

श्रीमंत-धनिक आणि भांडवलदार यांच्या बरोबर समाजाचे शोषण करणारा, पिळवणूक करणारा व्यापारी महाराजाच्या नजरेतून सुटला नाही. आज व्यापारी लोकांची वृत्ती समाजाला अत्यंत घातक झाली आहे. वस्तूंचे भाव वाढविणे ही नित्याची बाब असली तरी वस्तुत भेसळ करून विकण्याची पद्धती व्यापारी लोकांनी स्वीकारली आहे.

क्या तुमको भीक लगी तो । कंकर डाल चना बेचे
चावल मे रेती का चुरा । घी मे चर्बी घुलाता है
दुध मे पानी, कॉफी मे भुसा, गरम मसाला लीद भरा
मनमाने पैसा भी लुटे । किस पाप जमाता है । ३

---

१. ल. बरखा २ पृ. १३ २. ल. बरखा पृ. क्र. १३
३. ज्ञानदीप पृ. २३

व्यापारी लोकांजवळ इज्जतीचा, पाप-पुण्याचा हिशोब नसतो. फक्त पैसा मिळविणे हेच त्यांचे उद्दिष्ट असते. अशा व्यापाऱ्यांची दुकाने केवळ मानवाच्या मरणासाठी निर्माण केलेली असतात.

ऐसी दुकाने खास मरनेकोही मानो थाटते [1]

व्यापाऱ्यांच्या भेसळी बरोबर लाच लुचपतीचे प्रमाण समाजात खूप मोठ्या प्रमाणात दिसून येते. त्या विषयीची लोक भावना बोलून दाखवितांना राष्ट्रसंत म्हणतात–

जो लाच लेगा, घुस लेगा, भाग उसके जग गये
पकडा गया तो क्या हुआ ? इज्जत तो बेचे ही गये
लाखो कमाओ, जेल जाओ, एक या दो बारही
दिलपर असर कुछ भी नही, अजि फांसी तो मिलती नही [2]

वरील प्रकारची वृत्ती सरकारी नोकरात दिसून येते. सरकारी नोकर अल्प भुधारक शेतकऱ्यासारख्या गरीबाला लुबाडल्याशिवाय त्यांचे काम करीत नाहीत. सरकारी नोकराच्या हातात दक्षिणा ठेवल्याशिवाय ते प्रसन्न होत नाही. पगार मिळत असतांना त्यांची ही वृत्ती पाहून राष्ट्रसंत म्हणतात–

सरकारी नोकर हो कर भी, चाय पानी की भीख मांगे
किसान ने क्या करना है । फिर, वह कैसे जी जाता है ⊠

आजचा समाज अत्यंत विस्कळीत झाला आहे. गरीब; मजूरांना खायला अन्न मिळत नाही. श्रीमंताची श्रीमंती भर वेगाने वृद्धिगत होत आहे. श्रीमंत आणि गरीब हा वाद खूप मोठ्या प्रमाणांत उफाळत आहे.

श्रीमंत गरीबांचा वाद । गावास करील बरबाद
म्हणोनि ही दूर करावी ब्याद । जाणत्यांनी [3]

हा वाद जितक्या अधिक प्रमाणांत वाढत जाईल तितक्या जवळच्या काळात तो 'क्रान्ती' ला आव्हान देईल. असे निश्चित स्वरुपात राष्ट्रसंतांना वाटते.

हाँ–हाँ नतीजा हमसे पूछो; क्या हो जायेगा
आपस मे कट मरना है, कोई न सून पायेगा
मजदुर; गरीबोंका बुरा है हाल देहात में
बिगडे हुअे उनके दिल, क्रान्ती करेंगे बाद में [1]

---

१. मेरी जीवन यात्रा पृ. ११८, २२
२. लहरकी बरखा पृ. ५७
⊠ ज्ञानदीप पृष्ठ २३
३. ग्रामगीता अ. १७ ओ. ६
१. मेरी जीवन यात्रा पृ. क्र. १२४

– आदर्श समाज –

राष्ट्रसंताचा मुख्य उद्देश ग्रामोन्नती असल्यामुळे ग्राम सुधारणा व ग्राम शुद्धी घडवून आणणे त्यांना अत्यावश्यक होते. ग्रामातील वाईट प्रवृत्तीवर हल्ला चढवून राष्ट्रसंत थांबले नाही. त्यासाठी गावातील कणखर शक्तिमान, विवेकी लोकांची संघटना निर्माण करून, त्याद्वारे ग्रामसमाजाकडे ते वळलेले आहेत.

– संघटनेचे महत्व –

'ग्राम' सुधारणा हे राष्ट्रसंतांचे मुख्य उद्दिष्ट आहे. जाति-धर्म निरपेक्ष ग्राम निर्माण करायचे असेल, उद्योगी करायचे असेल तर ग्राम संघटना असणे आवश्यक आहे. गावच्या लोकांची संघटना असेल तर सुधारणेचा प्रवाह अखंड वाहत राहतो.

जन संघटना म्हणजे एखाद्या कुठल्यातरी निश्चित उद्दिष्टपूर्तीसाठी. जन हितासाठी, जन स्वातंत्र्यासाठी; जागृतीसाठी व अन्यायाच्या प्रतिकारासाठी निर्माण केलेली, जनमान्य पावलेली, लोकसमुदायाचा एक निश्चित संघ होय.

समाजात सत्प्रवृत्तीचे व कुप्रवृत्तीचे लोक एकाच वेळी जन्मास येतात व आपला प्रभाव गाजवित असतात. समाजातील सत्प्रवृत्तीच्या लोकांनी एकत्रित येऊन कुकर्मी लोकांच्या दहशतवादी शक्तीचे बळ नष्ट करून, समाजोन्नतीची कास त्यांनी धरावी, असा हितोपदेश राष्ट्रसंत करतांना दिसून येतात.

'लोकांच्या मनी दहशत । तरी तुमच्या सारिखेचि कांही त्यांत
असतील हृदयी तळमळ । चांगले व्हावे म्हणोनि' [१]

समाजाचे भलेपण कशांत आहे. हे समाजाला पटवून सांगण्याचे व त्यांना जागृत; चैतन्यमय करून समाजकंटकावर तीव्रतेने हल्ला चढविणे आवश्यक असते. असे करतांना विरोधकांची शक्ती उफाळते. ती जितक्या वेगाने उफाळते तितक्या वेगाने तिला समाज बाह्य करणे, हे समाज सुधारकांच्या बळकटीचे लक्षण आहे. त्यासाठी जनतेची साथ मिळविणे क्रमप्राप्त आहे सुधारणेची आवश्यकता लोकांच्या मनांत तीव्रतेने निर्माण झाली की परिवर्तन निश्चित घडते. कारण हा काळ जनतंत्राचा काळ आहे जनशक्ती जागृत झाली की; अशक्य अशी कोणतीती गोष्ट उरत नाही हे इतिहासाने सिद्ध करून दाखविले आहे. १ मे १९७५ चा दक्षिण व्हिएतनामचा विजय हा जनशक्तीचा विजय होता. अमेरिकेसारख्या साम्राज्यवादी देशाला त्यांच्यासमोर माघार घ्यावी लागली.

---

१. ग्रामगीता अ. ११ / १९

'जनतंत्राचा काळ । शक्ति लोका अंगी सकळ
जनतेच्या निश्चयाचे बळ । साम्राज्यासहि नमवू शके' [१]

संघटनेचे महत्व राष्ट्रसंतांनी निसर्गातील उदाहरणे देऊन अधिक स्पष्ट करून दाखविले आहे.

हत्तीस आवरी गवती दोर । मुंग्याहि सर्पासि करीती जर्जर
व्याघ्र; सिंहासि फाडिती हुशार । रानकुत्रे संघटनि [२]

वरील दृष्टांताद्वारे राष्ट्रसंतांनी संघटनेचे महत्व विशद केले आहे. ग्राम संघटना गावात निर्माण झाल्यास –

संघटनेने काय नोहे ? बिंदू मिळता सिंधू पण ये
गावाचा बाग बहरोनि जाय । फुलाफळांनी संघटनेच्या
गाव करी ते राव न करी । ऐसे सांगून ठेवले चतुरी
जरी दाद न घेतील अधिकारी । तरी गाव त्या सुधारू शके
ग्राम सुधारणेचा मुलमंत्र । सज्जनानी व्हावे एकत्र
सघटना हेचि शक्तीने सूत्र । ग्रामराज्य निर्माण करी [३]

– संघटनेचे कार्य –

ग्रामराज्य निर्माण करायचे असेल तर ग्रामसंघटनेने आपली जबाबदारी ओळखून कार्य करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर ते सशक्त असायला पाहिजे. मजबूत असायला पाहिजे. गावातील प्रत्येक व्यक्तीने स्वत:वर होणारा अन्याय संघटनेला सांगावा व होणारा व्यक्तिवरील अन्याय बाजूला सारण्याचे कार्य संघटनेने करावे. त्याचबरोबर अन्याय निर्मूलनाचे कार्य करावे. संघटनेत त्यागी–निर्भय, चारित्रवान लोकांची निवड व्हावी

'संघटन गावी मजबूत असावे । आपापले दुःख त्यासि सांगावे
कोणावरि अन्याय होऊ न द्यावे । कार्य संघटनेचे
त्यासाठी मिळोनि लोक नेमावे । जे असतील इमानी बरवे
त्यागी, निर्भय, चरित्र असावे । उज्वल ज्यांचे
गावाचे जे पवित्र सेवक । तेचि प्रसंगी होती सैनिक
ज्या गावी ऐसे सावध पाईक । तेथे विघ्न न ठाके [४]

---

१. ग्रामगीता अ. ११ ओ. १४ २. ग्रामगीता अ. ११/१५
३. ग्रामगीता अ. ११ ओ. १४ ते १७ ४. ग्रामगीता अ. ११ ओ २० ते २२.

अन्याय कर्त्यावर, अपराधी लोकांवर सुरवातीला बहिष्कार टाकावा. असहकार दर्शवावा पण एवढे करून त्यांची वृत्ती बदलत नसेल तर 'मुक्त करावा गावातूनि' असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. वाईटाचा वृक्ष गावात वाढू देऊ नये. त्यासाठी प्राणाचे बलिदान करावे लागले तरी ते करण्यासाठी सर्वांनी सिद्ध व्हावे.

उत्तमांचा संग्रह असावा । वाईटाचा निषेध करावा
जराहि पनपू न द्यावा । वृक्ष वाईटाचा
सर्वांनी झटावे याचसाठी । करावी लागेल ती आटाआटी
प्राण गेला तरी संकष्टी । सहन करावे सेवेस्तव [१]

अशा प्रकारचा परिपक्वपणा राहिला नाही तर काय होईल हे सांगतांना राष्ट्रसंत म्हणतात –

ऐसे बळकटपण जव नाही । तव आदर्श गाव तमाशा राही
त्यांत स्थिरताच येणार नाही । कांही केल्या [२]

'दंडशक्ती' चा अवलंब करणे ग्रामहिताचे दृष्टीने यथायोग्य आहे. नाहीतर गुंड प्रवृत्तीचा उद्य होईल. गुंडावर दया दाखविणे किंवा समाजकंटकावर दया दाखविणे म्हणजे सज्जनांचा अंत घडविणे होय ! दया हे धर्म लक्षण असले तरी ते सतपात्री असावे लागते.

दया हे मुख्य धर्म लक्षण । परि प्राण्यांचे पालन
आणि कंटकाचे निर्दालन । बोलिले संती [३]

वरील प्रकारची न्याययोजना संघटनेत राहिल्यास गाव आदर्श व शिस्त-प्रिय होईल. शांतता व सुव्यवस्था एकसारखी खेळत राहिल. सहकार्य व उत्साह श्रमप्रतिष्ठा, कार्यनिष्ठा, निर्भयता व चारित्र्यता राहिल्यामुळे गाव वैभवशाली होईल.

ऐसे संघटनानी गाव । भोगू लागेल दिव्य वैभव
ग्रामराज्याची सुखाची ठेव । तुकड्या म्हणे [४]

पण खरे सेवक संघटनेत असावेत. त्यांच्याविषयी राष्ट्रसंतांनी आपले निश्चित विचार मांडले आहेत.

---

१. ग्रामगीता अ. ११ ओ. ३०–३१
२. ग्रामगीता अ. ३९ ओ. ८२
३. ग्रामगीता अ. ११ ओ. ५८
४. ग्रामगीता अ. ११ ओ. १०८.

– खरा सेवक –

खरा सेवक स्वत:चा स्वार्थ जनतेत पाहतो. दुसऱ्यांच्या सुखात स्वत:चे सुख पाहून आनंदी होत असतो.

जो दुसऱ्यासि उत्तम करतो । त्यातचि आनंद मानतो
तोचि सेवक मी समजतो । येत्या युगाचा
प्रत्येक जीवाचा हाचि विकास । सर्वांभूती समजावे आपणांस
तैसेचि साधावे व्यवहारांस । आपणासि नमवोनिया
सर्वांचा भार आपणावरि । तीच समजावी सेवा खरी
हे कठीणव्रत न साधे जरी । आपले आशे तरी नसावे [१]

खऱ्या सेवकांनी ग्रामराज्यात राहतांना सज्जनांचे संघटन उभारून ग्रामोन्नतीचे कार्य करावे. सत्य व न्यायाची त्यांनी समाज मंदिरात पूजा बांधावी. स्वत: ग्रामराज्याच्या कार्यात न राहता ग्रामजीवनाविषयी ज्यांच्या अंतरी जिव्हाळा आहे, तळमळ आहे अशा थोरांकडे ग्रामराज्याचे कार्य द्यावे.

असो नसो साथ सत्तेचा । सहयोग मिळवावा सज्जनांचा
जन सेवकांनी ग्रामराज्याचा । पाया रचावा सत्यावरि
ज्यांना ज्यांना न्यायाची चाड । गाव सेवेची आवड
त्यांचीच संघटना व्हावी दृढ । करावी वाढ दिसंदिस
जाणता दिसेल तो निवडावा । जिव्हाळांचा पुरूष वेचावा
थोराचिये नेतृत्वे चालवावा । कारभार ग्रामोन्नतीचा [२]

ग्रामोन्नतीसाठी त्यांनी मानवतावादी विचार सांगितले आहेत –

– मानवतावादी विचार –

राष्ट्रसंतांची संपूर्ण शिकवण समतेची, बंधूभावाची, विश्वकुटूंबाची होती. त्यात कुठल्याही जातीला–पंथाला किंवा धर्माला थारा नाही. संपूर्ण समाजातील व्यक्ती समान आहे-तेथे देव; धर्माच्या खोट्या कल्पनेला, अंधश्रद्धेला थारा नाही. कारण सर्व भेदभाव मानव निर्मित आहे-त्यामुळे मूठभर स्वार्थी लोकांचा स्वार्थ साधतो ते सामान्य जनतेत निष्कारण भेदाभेद निर्माण करतात. विषमता; राग द्वेष निर्माण करतात. यापासून कोणताही देश–धर्म मुक्त नाही म्हणूनच त्यांनी मानवतेची, मानवी समानतेची, विश्वकुटुंबाची प्राणप्रतिष्ठा केली आहे.

---

१. ग्रामगीता अ. ९ ओ. १०७-१०९ २. ग्रामगीता अ. १० ओ. ४३ ते ४५

'गुणः सर्वत्र पुज्यन्ते' हाच न्याय त्यांना मान्य आहे. जो गुणात्मक श्रेष्ठ असेल. ज्याचं प्रेम विश्वव्यापक असेल–विश्वव्यापक विचार ज्यांच्या जवळ असेल व ते आचार विचाराशी प्रामाणिक असतील, मग तो कोणत्याही धर्माचा, जातीचा असो, राष्ट्रसंतांना प्रिय आहे. अशा उच्चत्तम जीवन मूल्यांच्या सिद्धान्तावरून बघतांना त्यांनी खऱ्या मानवतेचा व मानवधर्माचाच विचार केला आहे.

मानव हेचि आपुले नाम । मग स्वधर्म म्हणजे मानव धर्म
हे तरी ध्यानी घ्या सत्‌वर्म । साध्या बोली [१]

मानवाचा मानवधर्म हा सर्व धर्माचा सार आहे मानवाने मानवाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी, उत्थानासाठी सतत कार्य करीत राहणे म्हणजे मानव धर्माला जागविणे होय !

आपण सर्व धर्माचा; पंथाचा किंवा धर्म प्रवर्तकांच्या कार्याचा परिपक्वतेने अभ्यास केला तर आपणांस आढळून येईल की मानवाचा उत्कर्ष व त्यांचे सुख हाच त्यांचा प्रमुख दृष्टिकोन आहे. उद्देश आहे.

सर्वांचे धर्म, पंथाचे देव । धर्मप्रवर्तक महामानव
यांचा ऐसाचि असे भाव । व्हावे मानव सर्व सुखी
जगी नांदावी सुख–शांति । सर्वांनी आचरावी बंधू प्रीति
यासाठी झटले असती । महापुरूष अभेदत्वे [२]

म्हणूनच मानवतेला कलंक लागणार नाही अशा प्रकारची धर्म न्याय–नीती आपण उरी बाळगली पाहिजे व त्याचबरोबर प्रेमाची भावना वृध्दिंगत केली पाहिजे. सगळ्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन समानतेचा असावा कारण तोच खरा सत्य धर्म होय !

सर्वाविषयी समभाव । सर्वाभूती वासुदेव
हे जाणे तोचि खरा मानव । सत्य धर्म हाचि त्याचा [३]

व्यक्ती व्यक्तीमध्ये समानता माणूसकीच्या तत्वावर, न्यायावर आधारित असावी. माणसांनी माणसांबरोबर कसे वागावे हे शिकवणारा धर्म म्हणजे माणूसकी. ती न्यायप्रियतेवर अवलंबून असते. न्याय हा प्रत्येकांसाठी सारखाच राहतो.

धर्म माणूसकीसि म्हणती । माणुसकी न्यायावरि शोधती
न्याय कोणाच्याहि प्रती । एकचि राहतो सर्वदा [४]

---

१. ग्राममीता अ. २९ ओ. २८
२. ग्रामगीता अ २८/७५
३. ग्रामगीता अ. २९/३७
४. ग्रामगीता अ. २९ ओ. २२

वरील तत्वाप्रमाणे वागणारा मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा असो राष्ट्रसंतांना प्रिय आहे. राष्ट्रसंतांनी आपल्या मानवतावादात स्वातंत्र, समता, न्याय आणि बंधूत्व बहाल करून मानवाने मानवाच्या विकासाला, उत्थानाला बांधून घ्यावे मग तेथे स्त्री-शुद्र किंवा अतिशुद्राचा विचार करू नये. मानव धर्मात सर्व सारखे आहेत.

पक्ष नाही-पंथ नाही, जातिभेद विरोध कांही
एका कुटुंबापरी राही । गाव आपुले आनंदे [१]

वरील ओवीतून राष्ट्रसंतांनी सामुहिक जीवनांची सुरवात केली आहे.

– समानतेचा विचार –

सामाजिक समानतेचा विचार सामाजिक लोकशाहीतील प्रमुख अंगात्मक दृष्टीने महत्वाचा ठरतो. आजच्या विसाव्या शतकांतील विचार समानतेच्या तत्वावर आधारित आहेत. व्यक्ती समाजदृष्टीने समान आहे. असे बोलल्या जाते पण प्रत्यक्ष समाजात असमानता-विषमता जी दिसून येते. त्याचे मूळ कारण मानवांतील अज्ञान आहे. समाजातील लोकांनी ममता; न्याय आणि मानवता यावर आधारित समाज रचना करून आत्यंतिक व्यक्तीवाद व आंधळा समूहवादातील धोके बाजूला सारून स्वातंत्र आणि सामाजिक जबाबदारी यांची बांधीलकी अंतरी सदैव जागृत ठेऊन आचरण केल्यास समाजाचं सत्य दर्शन घडणे सहज शक्य होते.

सामाजिक दृष्टीने सर्व समान आहे. ही भावना प्रत्येकांत रूजायला पाहिजे. सर्व एका देवाची लेकरे आहोत असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा परस्परांत भिन्नत्व कां ? परमेश्वर अनंत रूपे धारण करणारा असला तरी शेवटी तो एकच आहे. तशाच स्वरूपांतील भावना मानव समाजात निर्माण होणे अत्यावश्यक आहे.

देव एक असोनि अनंत झाला । नाना रूपे धरोनि नटला
परि तो पाहता एकचि दिसला । तैसे व्हावे जनामाजी [२]

(देव सर्वांचा सखा । आम्ही तयाची लेकरे
भेद कां मग कोरडा । जाळा जशी जळते चिता)

सर्व मानव समाजाचा अभ्यास केल्यावर तो अनेक गुणांनी भरलेला आहे. समाजाच्या प्रगतीसाठी, उन्नतीसाठी ते सर्व गुण-धर्म उपकारक ठरत असतात. जेव्हा प्रत्येकात असलेले गुणधर्म परस्परांना पोषक व उपकारक ठरतात तेव्हा

---

१. ग्रामगीता अ. ३९ ओ. ३ २. ग्रामगीता अ. ३८ ओ. ४६

संसाराचं चक्र सुव्यवस्थित सतत चालू राहते. मानवी जीवनांचा विकास त्याच माध्यमातून सतत होत राहतो.

मुळांत सर्वाचे एकसम आहे । परि अनंत गुणे व्यापले राहे
गुण गुणास पोषक होय । यासीच संसार बोलती १

गुणाची सर्वत्र पूजा व्हायला लागली की समाजाची सामाजिक पातळी वृध्दिंगत होऊन कुठल्याही भेदाला, अनिष्ठतेला वाव मिळत नाही. चैतन्यमय वातावरण समाजात निर्माण होते. आचार शुध्दतेच्या प्रक्रिया देखील समाजात वेगाने घडायला लागतात. सर्व मानव समाज परस्परांना पुरक व उपकारक होऊन खरा मानवी धर्म समाजात स्थिर व्हायला लागतो. कामावरुन किंवा करीत असलेल्या धंद्यावरुन श्रेष्ठ – कनिष्ठता न राहता, जगाच्या व्यवहारांत उत्तमात्तमता निर्माण करणे हे मानवी कर्तव्य राहते व सतत काम करण्याचे प्रामाणिक धोरण अंतःकरण्याच्या गाभाऱ्यात राहते.

जेथे सर्वासीच काम करणे । कोणीच उत्तम – कनिष्ठ न म्हणे
सर्व मिळोनि जग साजबिणे । आपुल्यापरी २

मनुस्मृती व त्या पूर्वीचा किंवा चार्तुवर्ण्य समाज व्यवस्थेचा इतिहास पाहिल्यावर समाज चार वर्णात विभाजित झाला होता. परंतु गुणत्वे वर्ण बदलविण्याचा अधिकार समाजाने मांन्य केला होता. गुणधर्मावरुन व्यक्तीचा वर्ण ओळखणे सहज शक्य होते. तसेच समाजाच्या दृष्टीने सर्व वर्णाची कामे सारखया महत्वाची होती पण पुढे–पुढे कर्मानुसार उच्च–नीचतेच्या भावनांचे अवडंबर माजविल्याने चार्तुवर्ण्य समाज व्यवस्था मोडकळीस येऊन त्यामुळे समाजाचे पतन झाले. विषमता समाजात स्थिरावली. सततवृद्धिगत झाली.

समाजातील विषमता नष्ट व्हावी व पुन्हा समाज तत्वतः आपल्या वैदिक पध्दतीवर यावा, हा राष्ट्रसंतांचा दृष्टिकोन असल्याचे दिसून येते. स्वतःच्या अंगभूत गुणाने स्वतःच्या जीवनाला उत्तम वळण लागावे व त्याच आधारावर समाजाचे पोषण घडावे, गुणांच्या आधारावर पुन्हा समाज व्यवस्था योग्यतेने घडून यावी ही राष्ट्रसंतांची अपेक्षा आहे.

ज्यापाशी उत्तम गुण । त्यानेच त्याचे चालावे जीवन
व्हावे समाजाचे धारण, पोषण । हीच योजना चार्तुवर्णी ३

---

१. ग्रामगीता अ. १५ ओ. १५ २. ग्रा. गी. अ. ४ ओ. १११
३. ग्रा. गी. अ. ५ ओ. २०

म्हणोनि गुणावरचि लक्ष द्यावे । जो ज्या गुणी तो म्हणावे त्या वर्णी
सर्व गुणांचा आदर स्वभावे । सर्वांकरिता असावा [१]

गुणाचा आदर व्हायला लागला आणि व्यक्तीने समाजविषयीचे आपले कर्तव्य व जबाबदारी नीट पार पाळली तर समाज उन्नतीच्या उंच शिखरावर जाऊन पोहचेल. समाजातच व्यक्तिविकास होणार असल्याने समुदायापासून तथा समाजापासून स्वत:ला वेगळे करणे उचित ठरणार नाही. तसे केल्यास समाज पराङ्मुखता ठरेल.

मानवाने आपला उध्दार करुन समाजाला सुधरविण्याचे कार्य आत्मियतेने करायला पाहिजे कारण देवाने मानवाला जी बुध्दी अर्पित केली त्याचा उद्देश त्याने स्वत:च्या संसाराबरोबर समाजाचा संसार सत्य, शिव – सुंदर आणि सुखी करावा,

सत्य, शिव, सुखी, सुंदर । ऐसा व्हावा हा संसार
हे सोपविले कर्तव्य थोर । देवे मानवाप्रती [२]

अर्थात सत्य आणि न्यायावर आधारित नवी समाज रचना असावी, हेच खरे राष्ट्रसंताचे उद्दिष्ट आहे. सत्य ते मानवी जीवनाला समाजाला दीर्घकाळ उपयुक्त व श्रेयस्कर ठरत असते. त्याच बरोबर योग्यतेचे नाते जोडल्यास जीवनाचा अर्थ सहजतेने कळायला लागतो.

ज्याने सत्यासी नाते जोडले । त्यांचे अंगी गुरुत्वाकर्षन आले
सांगण्याहूनिहि सामर्थ्य चाले । त्याच्या शुध्द जीवनाचे [३]

मग सहज त्यांच्याकडे समाज सुधारणेची धुरा सांभाळण्याचे कार्य येते. ते कार्य उपदेशाच्याव्दारे न करता आपल्या आचरणातून अनेकाना प्रभावित करीत राहणे उपयुक्त ठरते. त्याव्दारे समाजही प्रभावित होतो. पण असे करतांना अनेकवेळा निराशा पदरात पडण्याची शक्यता टाळता येत नाही. पण खऱ्या कार्यकर्त्याने निराश न होता सत्याचा अंगिकार करुन आत्मविश्वासाने सतत कार्य करीत राहिल्यास 'यशश्री' प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. कारण–

सत्याचे प्रभावी सर्वाहून । ही अमोल खूण विसरु नये [४]

सत्याच्या मार्गाने चालतांना न्यायनीतीला जवळ बाळगणे अत्यावश्यक असते. प्राणीमात्राप्रती दया-भाव मानवाने अंतरी बाळगावा तेच धर्माचे खरे लक्षण होय:- संतवचनाचा पाठपुरवठा करतांना राष्ट्रसंत दिसून येतात.

---

१. ग्रा. गी. अ. ५ ओ. ७८ २. ग्रा. गी. अ. ६ ओ ७
३. ग्रा. गी. अ. ७. ओ. १९ ४. ग्रा. गी. अ. ७ ओ. २८

दया हे मुख धर्म लक्षण । परि दया म्हणजे प्राण्याचे पालन
आणि कंटकांचे निर्दालन । बोलीले संती
सज्जनांचे संरक्षण । आणि दुर्जनाचे दमन
हेचि अवतारांहि कार्य लक्षण । न्याय संगत
म्हणोनि गावी कोणी अन्याय केला । दुःख दिले कोण्या गरिबाला
त्याचा प्रतिकारच पाहिले झाला । गावामाजी [१]

गावात किंवा समाजात कुठेही अन्याय होणार नाही; दुराचार होणार नाही. याची दक्षता घेणे समाजाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. असे झाल्यास समाज समानतेच्या सामाजिक पातळीवर येऊ शकेल पण ही समानता एकाकी राहील. खरे म्हणजे श्रमाचे विभाजन समतेच्या तत्वावर होणे हे खरे आदर्श समाजाच्या मजबूतीचे प्रमुख वैशिष्ट्य होय ! त्यासाठी राष्ट्रसंतांनी समानतेची योजना श्रम विभाजनाच्या व अर्थशास्त्राच्या तत्वावर सांगितली आहे.

– समानतेची योजना –

राष्ट्रसंतांची ग्रामीण समाजाच्या समानतेची योजना श्रम विभागणी व आर्थिक समानता यावर आधारित आहे. त्यांचे मुख्य तत्व 'उणा-अधिक गुणापाशी । नको जाति वा धनापाशी । अधिकार समानचि सर्वांसि । जीवनाचा [ग्रा]

जात, पंथ, धर्म तसेच वर्गविरहित समाज निर्माण करणे हा राष्ट्रसंतांचा दृष्टिकोन आहे गांव कल्पनेतून संपत्ती आणि संततीचा विचार त्यांनी 'गावाची ठेव' यांत केला आहे. व्यक्तिगत सुखसोयी व संपत्तीचा अधिकार कुणालाही राहणार नाही. श्रीमंत किंवा भांडवलदार राहणार नाही. सर्व समान राहतील.

कोणत्याही प्रकारचे वर्ग व संपत्तीचे अधिकार न राहिल्याने गावातील सर्व संपत्तीवर गावाची सत्ता राहिल. 'आपल्या गावीचे सर्व धन । ग्रामवासियांचे सुखस्थान' असे झाल्याने अनायसे सर्वहारावर्गाची, मेहनत करणाऱ्या वर्गाची सत्ता गाव समाजात निर्माण होईल.

राष्ट्रसंतांचा वरील उद्देश साम्यवादी संघाच्या किती जवळ जातो हे पाहायला मिळतो. सन १८४७ ला ग्रीष्मांत न्यायसंघाची प्रथम काँग्रेस बैठक लंडनमध्ये झाली. त्यांत न्यायसंघाचे नांव बदलून साम्यवादी संघ ठेवण्यांत आले. त्यांचा उद्देश खालील प्रमाणे होता.

---

१. ग्रा. गी. अ. ११ ओ. ५८-५९-६० ग्रा ग्रामगीता अ. ३९ ओ. १३

संघाचे लक्ष भांडवलधारी वर्गाचा विनाश, सर्वहारा शासनाच्या स्थापनेला विरोध कायम ठेवणारी भांडवलदारी सामाजिक व्यवस्थेला नष्ट करून एक नवीन सामाजिक व्यवस्था निर्माण करणे की ज्यांत वर्ग राहणार नाहीत व व्यक्तिगत संपत्ती राहणार नाही.

श्रमिकांच्या श्रमाचा फायदा घेऊन अमाप धन–संपत्ती भांडवलदार जमा करीत असतात. उत्पादनांत प्रामुख्याने वाटा श्रमिकांचा पण भांडवलदार श्रमिकांची श्रमशक्ती विकत घेतात. त्यांच्या पदरी मोजके माप टाकून बाकी सर्व नफा स्वत:च्या पदरी पाडून घेतात. मार्क्सचा अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत खालील ओवीत दिसून येतो.

श्रमणारापदरी मोजके माप । उरला गल्ला आपोआप
तो स्वये उपभोगणे हे महापाप । परि ठरला न्याय हक्क [१]

मागणी आणि पुरवठा यांच्या मधील संबंधानुसार वेतनामध्ये चढउतार होतात तसेच श्रमशक्ती विकणारे कामगार व श्रमशक्ती विकत घेणारे भांडवलदार यांच्यात स्पर्धा व्हायला लागते. क्रयवस्तुंच्या किंमतीमधील बदलानुसार वेतनामधील बदल सर्वसाधारण सुसंगत असतात. परंतु या बदलामध्ये श्रमाची किंमत उत्पादन खर्च व ती क्रयवस्तु निर्माण करण्यासाठी खर्ची पडलेला श्रमकाल म्हणजे श्रमशक्ती यांच्या वरुन निर्धारित होते.

श्रमशक्तीचा उत्पादन खर्च म्हणजे काय ? तर कामगाराला कामगार म्हणून ठेवायला आणि कामगार म्हणून त्यांचा विकास घडवायला लागणारी किंमत होय.

पण ही किंमत सर्वच कामगारांना – मजूरांना मिळत नाही. श्रमिकांच्या; कामगारांच्या अडचणींचा फायदा घेऊन त्यांची लूट करण्यात येते. श्रीमकांना तुट–पूंजी मजूरी देऊन त्याला भांडवलदार बाजूला सारतात व सर्व अतिरिक्त नफा आपल्या गळी उतरवितात. त्यांच्या समोर श्रमिकांचा, त्यांच्या जीवनाचा प्रश्न नसतो. सहानुभूतीचा विचार नसतो

'पाहती आपुल्या पुरते, लाभ इच्छितो आईते
इतर मेलियांची तेथें । पर्वा नाही कोणासि [२]

काहीनी खूप बुध्दि लढविली । संपत्ति अतोनात वाढविली
काढोनि कवडीहि नाही दिली । प्राण जाता श्रमिकांचा [३]

वरील प्रकारची बुध्दिनिष्ठ भांडवलदाराची नीती असल्याने, त्यापेक्षा वेगळी

---

१. ग्रामगीता अ. १७ ओ. २१ २. ग्रा. गी. अ ३८ अ. ६४
३. ग्रा. गी. अ. १७ ओ. २५

ग्रामीण समाज अर्थव्यवस्था निर्माण करुन भांडवली अर्थ व्यवस्थेला तिलांजली दिली आहे त्यासाठी ते म्हणतात.

गावी जेवढी शक्ती, बुध्दी । तो सर्व गावाचाच निधी
ऐसे होता आधि--व्याधि । नष्ट होतील सर्वचि [१]

गावाची ही सर्व संपत्ती झाल्यावर तेथे न्युनतम्, अधिकतम् असे कांही उरणार नाही. प्रत्येकाच्या विकासाचा मार्ग परिपक्व करता येईल. श्रमिकांना उचित प्रशिक्षण देऊन सर्व स्थरातील उत्पादन क्षमता वाढविता येईल व त्याच आधारावर ग्रामीण लोकांचे जीवन समृध्द बनविता येईल.

संपत्ती आणि संतती । सगळी गावाची ठेव निश्चिती
वाढवोनि साधावी उन्नती । याग्य मार्गे गावाची

पण याचबरोबर राष्ट्रसंतांनी निकष्टीकाला समाजाच्या बाहेर काढून दिले आहे मग तो समाजातील श्रेष्ठ म्हणून ठरलेला पुजारी असो; साहित्यक किंवा विद्वान पंडित असो. त्यांना उचित कामे करावी लागतील. 'कष्टाविण कोणाला पोसावे असे नाही' असा स्पष्टतेचा उल्लेख त्यांच्या वाड्मयात आपणांस दिसून येतो स्वत: काम करायचे नाही काम करणाऱ्यांना निष्क्रीय बनविण्याचा प्रयत्न करावा व उलट उत्पादन न वाढविता ग्रामसंपत्तीवर अधिकार गाजवावा म्हणजे उत्पादन करणाऱ्या लोकांवरील हा अन्याय ठरेल. तसेच व्यसनाधिन, गाव व समाज बुडव्या लोकांनाही आश्रय देण्याला तीव्र नकार दर्शविला आहे. समाज द्रोही मग तो कोणीही असो, तो गावात राहणार नाही असे सांगून प्रत्येकाने उद्योगी असावे असा उपदेश त्यांनी केला आहे. आंधळचा – पांगळ्यांना समाजाने मदत करावी पण समाजाच्या भरवशावर व्यर्थ पोसून ठेवण्यापेक्षा त्यांच्या जीवनाला उद्योगाचे वळण लावावे.

उद्योगशीलता व श्रमाचे महत्व हे समाजात सतत वाढविल्या जावेत. श्रम तेच जे उत्पादन वाढविण्यास सहकार्य देतील.

'एरव्ही कामाविण कोणी नाही । हे मजसीही कळे नि:संशयी
परि त्यासि काम आज म्हणो नाही । जे न उत्पादन वाढवी [२]

वरील तत्व समाजात निर्माण करण्यासाठी सर्वात महत्वाचे तत्व म्हणजे सहकार्याची प्रबळ भावना समाजात सर्वत्र असायला पाहिजे व त्यांची शिक्षणातून जाणीव निर्माण करुन देणे समाजाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. तसे अत्यंत आग्रही प्रतिपादन राष्ट्रसंतानी केले आहे.

---

१. ग्रा गी. अ. ३८ ओ. ६७ २. ग्रा. गी. अ. १८ ओ. १६

'सहकार्याची प्रबळ भावना । हेचि शिक्षणाचे मुख्य सुत्र जाणा
सहकार्याविनाचूनि शिक्षणा । महत्व नाही [१]

सहकार्याची भावना निर्माण झाली की समाजोन्नती सहज घडून येते, परस्पराविषयी आत्मियता; प्रेम निर्माण होऊन सुख:दुखाच्या भावनेत सर्व एकत्रित येतील.

आपल्या गावाचे सुख दु:ख । सकळांसिच कळावे नि:शंक
येता परस्परांची हाक । धावोनि जावे जिव्हाळ्याने [२]

सहकार्याची भावना ठेऊन 'श्रम हा ग्रामीण समाज व्यवस्थेचा आत्मा मानला आहे. ग्रामोन्नती हे राष्ट्रसंताचे उद्दिष्ट आहे. सामाजिक जीवन उन्नत करायचे असेल तर सर्वांनी कार्यात मग्न रहावे व त्याचबरोबर ग्रामीण उद्योगाचे, ग्रामीणीकरण व्हायला पाहिजे. उद्योगांत संशोधन केल्यास उत्पादन खर्च कमी येईल तसेच अधिक उत्पादन निर्माण करण्याचे कार्य घडविणे अत्यावश्यक ठरते. आपल्या ग्रामाला आवश्यक असलेल्या वस्तु गावात निर्माण करण्यात याव्यांत. भीक मागण्याची जरुरत निर्माण होणार नाही. अशी व्यवस्था असावी, आपल्या गावी निर्माण होणाऱ्या वस्तुचा आपण उपभोग घ्यावा. ग्राम उपभोगाशिवाय जे उरणारे उत्पादन आहे ते भिन्न गावी विक्रीस पाठवावे. सुयोग्य ग्रामीण अर्थव्यवस्था कशी निर्माण करावी ते विचार खालील ओवीत दिसून येतात.

जे जे गावी भिन्न उद्योग । त्याचा जुळवावा संयोग
ठराविक जागी नाना प्रयोग । चालवावे गावात [३]

गाव जीवनाशी जे आवश्यक । त्याची मागावी नलगे भीक [४]

जे जे आपुल्या गावी होते । आपणचि वापरावे समान ते [५]

कारण आमुच्या गावीचे सर्व धन । ग्रामवासियांचे सुखस्थान' हा त्याचा विचार महत्वाचा तसाच अर्थवादात्मक आहे. ग्रामात सर्व समानता दिसेल. वेगळा नफा, वेगळी सपत्ती आणि वेगळे वैभव कुणालाच राहणार नाही, त्याच बरोबर-

एकचिवस्त्र , एकचि अलंकार । एकचि आदर, एकचि शृंगार
एकचि भोजन, एकचि अधिकार । आपुल्याला कामाचा [६]

वरील प्रकारची समानतेची योजना राष्ट्रसंतानी सांगितली आहे. पुढील प्रकरणांत याचे सविस्तर वर्णन येत आहे. राष्ट्रसंतांची समाजवादी रचनेची

---

१. ग्रामगीता अ. ३९ ओ. ४१
२. ग्रामगीता अ. १९ ओ ३४
३. ग्रामगीता अ ३८ ओ ९८
४. ग्रामगीता अ ३८ ओ. १०४
५. ग्रामगीता अ. ३८/१०९
६. ग्रामगीता अ. ३९ ओवी १८

सामाजिक अर्थव्यवस्था मजबूत करायची असेल तर माणूस – माणूसकीचें नातं समाजात जागविणे अत्यावश्यक आहे.

राष्ट्रसंतांची आदर्श समाजाची कल्पना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजांचं सूक्ष्म निरीक्षण केल्यावर समाजाला योग्य दिशा दाखविण्यासाठी, समाजाच्या शुध्दतेचे विचार त्यांनी मांडले आहेत.

'समाज' म्हणजे केवळ लोकांचा समूह नव्हे. समाजाच्या कांही मर्यादा नीती नियम - असतात. त्याला धरुन वागणे हेच समाजशीलतेचे खरे लक्षण होय ! कारण मानव हा सामाजिक प्राणी आहे. सामाजिक व सांस्कृतिक जीवन हे मानवाच्या व्यवच्छेदक वैशिष्ट होय ! मानवाच्या जीवनाचे अनेक अंग असले तरी समाजशास्त्र सर्व अंगाचा विचार करीत नाही तर केवळ मानवाच्या सामाजिक संबंधाचा विचार करते. व्यक्ती – व्यक्ती मधील परस्पर संबंध, विविध प्रकारची नीती, मनुष्याचे समाजातील वर्तन, त्याची कारण मिमांसा व त्यांच्या सामाजिक संबंधातून निर्माण होणाऱ्या समस्या आदींचा त्यांत समावेश होतो. यातील शुध्दता व पवित्रता जितक्या उच्चत्तम रीतीने पाळल्या जाईल तो आदर्श समाज होय :

आदर्श समाजाबद्दल राष्ट्रसंतानी काढलेले उद्‌गार ग्रामगीतेतील 'भू-वैकुंठ' या अध्यायात पाहायला मिळतात ते अत्यंत मोलांचे आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीला समाधान प्राप्त होईल. राग-व्देषाची भावना व्यक्ती-व्यक्तीच्या ठिकाणी दिसणार नाही, परस्परांत बंधुत्वाचे नाते सहजतेने निर्माण होईल असा समाज स्वर्गीय आनंद उपभोगू शकतो. त्याचबरोबर गरीब–श्रीमंत, उच्च–नीचता, श्रेष्ठ–कनिष्ठता, स्त्री–पुरूषातील भेद ज्या समाजात राहणार नाही तसेच प्रत्येक व्यक्ती परस्पराचे हितसंबंध लक्षात घेऊन परस्पराच्या उत्थानाकरीता स्वतःला बांधून घेईल, तो समाज खऱ्या अर्थाने आदर्श समाज होय :



ग्रामीण अर्थशास्त्र

ग्रामीण व्यक्तीच्या सर्वसाधारण जीवनातील होत असलेल्या क्रियांचे अध्ययन ज्यात केले जाते त्याला ग्रामीण अर्थशास्त्र असे म्हणता येईल, भारत हा खेड्यामध्ये वसलेला देश आहे. त्यामुळे अर्थशास्त्र केवळ ग्रामीण जीवनाचा अभ्यास करीत नाही, अवलोकन करून नाही तर ग्रामीण जीवन (जन-जीवन) उंचावणे, त्याचा स्तर उंचावणे आदि सर्व बाबतीत योग्य त्या उपाय-योजनेसहित मार्गदर्शन करून त्या कशाप्रकारे उपलब्ध होऊ शकतील व ग्रामजीवनाला समृद्ध अवस्था कशी प्राप्त होऊ शकेल यांचे विवेचनही हे शास्त्र करू शकते.

भारतीय ग्रामीण अर्थशास्त्राचा पाया शेती हा समजल्या जातो. भारतातील ७०% जनता शेतीवर आपली उपजिविका भागविते. आणि म्हणूनच ग्रामीण अर्थशास्त्राचा विचार सिद्धांतिक दृष्टीने जितका महत्वपूर्ण आहे तितकाच व्यावहारिक दृष्टीने महत्वाचा आहे.

भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गावंर आधारित असलेल्या शेतीवर संपूर्ण भारताचे (भवितव्य) जीवन अवलंबून आहे. वर्षभर दिवस नि रात्र कष्ट करणाऱ्या ग्रामशेतकऱ्याला; त्याने उत्पादित केलेल्या शेत मालातून उत्पादन खर्च वजा जाता जे तुटपुंजे माप हाती पडते त्यातून तो आपले पोटभरू शकत नाही तर अधिक उत्पादन शेतीतून घेऊ शकत नाही. ग्रामीण जीवनांत काम करणारे शेतमजूर व इतरांची अवस्था देखील हीन-दीन स्वरुपांची झाली आहे. इंग्रजाच्या प्रशासकीय काळांत ग्रामीण विभागात चालणारे कुटिर व लघू उद्योग पूर्णत: विस्कळीत झालेत. शेती सुधारणेकडे-विकासाकडे दुर्लक्ष करून ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्ण नष्ट केली.

स्वातंत्र्याच्या काळानंतर ग्रामीण अर्थव्यवस्थेला सदृढ करण्याचे प्रयत्न झालेत पण ते सर्व प्रयत्न राष्ट्रीय स्तरावरून करण्यांत आलेत. त्यांचा परिणाम आज भारत स्वातंत्र्याचे ३५ वर्ष ओलांडूनही मागासलेला आणि निर्धन आहे. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेने ग्रामीण अर्थव्यवस्थेची उपेक्षा केली. 'आधी कळस मग पाया' या स्वरुपांतील राष्ट्रीय अर्थव्यवस्थेमुळे ग्राम स्वायत्तापूर्ण होऊ शकले नाही. भारत हा ग्रामीणतेने व्यापलेला देश असल्यामुळे ग्रामीण अर्थशास्त्राच्या परिपक्वतेकडे लक्ष पुरविणे, गावातील समस्या (वर्तमान व भविष्य काळातील)

व्यावहारिक व युक्तीपूर्ण रीतीने कशा सोडविता येतील. यांचे मार्गदर्शन ग्रामीण अर्थशास्त्र देऊ शकते. त्याशिवाय कुटिर उद्योग, लघु उद्योगाचा विकास, सहकारी आंदोलनाची प्रगती, सामुदायिक विकास योजना, ग्रामपंचायतीचे कार्य, नागरिक अर्थव्यवस्थेला सदृढ बनविण्याचे उपाय, राष्ट्रीय भावना, श्रमप्रतिष्ठा, उत्पादनातील गतीशिलता आदी अनेक बाबतीत ग्रामीण अर्थशास्त्राचे महत्व अधिक आहे. त्यासाठी अनेक ग्रामीण अर्थशास्त्रज्ञ या मतावर निश्चित झाले आहे की' राष्ट्राच्या समृद्धिसाठी समस्त योजना मूळांत ग्रामापासून सुरु करण्यांत याव्यात.

राष्ट्रसंतानी नेमका हाच विचार ग्रामीण अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून मांडला आहे. प्रत्येक गावातील व्यक्ती त्यांच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेतील मुख्य घटक आहे. या मुख्य घटकांच्या भोवती संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था फिरत राहते. ग्रामीण अर्थ-व्यवस्था संपूर्णतः मजबूत सुयोग्य व मानवी जीवनाला उपकारक करायची असेल तर–

मनुष्याचे सर्वस्व ग्राम आहे । त्याविण त्याला अस्तित्व नोहे
ग्राम सर्वांगपूर्ण राहे । तरीच वैभव । मानवाचे[1]

यावर राष्ट्रसंताचे ग्रामीण अर्थशास्त्र उभारले आहे. मनुष्य हाच ग्राम विकास घडवून आणणारा आंहे. ग्रामनिष्ठा त्याच्यांत निर्माण करून ग्रामोन्नतीचा पाया त्यांच्याच बळावर मजबूत करायला पाहिजे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट व उन्नत करण्यासाठी त्यांनी ग्राम कुटुंब योजनेचा विचार मांडला आहे. समाजवादी अर्थव्यवस्था टिकवायची असेल तर ग्रामीण जीवनांत भांडवलदारी अर्थव्यवस्था व त्यावर आधारित समाजरचना मोड ल्याशिवाय, बदलविल्याशिवाय दुसरा कुठलाही आधार; उपाय उरत नाही. आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत समाजवादी अर्थव्यवस्थाच सर्व लोकांना शांतता, श्रम, स्वातंत्र, समता, बंधुभाव व सुख मिळाले पाहिजे म्हणून जाहीरपणे सांगते.

पण भांडवलशाहीच्या जागी समाजवाद कांही आपोआप उत्स्फूर्तपणे येत नाही तेव्हा भांडवलशाहीचा शेवट होणेच आवश्यक असते. त्यासाठी संपूर्ण जनतेला निकराचा लढा देणे आवश्यक आहे. कामगार व शेतमजूराच्या क्रान्तिशिवाय भांडवलदारी प्रवृत्ती पूर्णत: नष्ट होणे शक्य नाही. भांडवलदार किंवा त्यांचे हस्तक यांची सत्ता आणि जनतेची पिळवणूक, गांजवणूक संपुष्टात येत नाही. मार्क्स म्हणतो क्रान्तीशिवाय समाजवाद शक्य नाही. तिला जुन्याचा संपूर्ण नाश व संहार करावयाचा असतो आणि म्हणूनच तिला राजकीय कृतीची

---

१ ग्र. गी. अ. ३८ ओ. ५२

आवश्यकता असते. हे राष्ट्रसंतांना मान्य असले तरी आजची भारतीय समाजरचना व अर्थव्यवस्था क्रान्तीला व तिच्या यशस्वीतेला उपकारक ठरु शकणार नाही. केवळ बंदूकीच्या गोळीतून क्रान्ती घडून येते असे राष्ट्रसंतांना वाटत नाही. कोणताही बदल, आमुलाग्र बदल, किंवा परिवर्तन हे जनभावनेतून होऊ शकते व ते दीर्घकाळपर्यंत टिकते असा त्यांना विश्वास आहे. म्हणूनच त्यांनी वैचारिक क्रान्ती जनशक्तीतून; संघटनेतून घडविण्याचे ठरविले आहे.

जनतंत्राचा हा काळ । शक्ति लोकांअगीच सकळ
जनतेच्या निश्चयाचे बळ । साम्राज्यासहि नमवू शके [१]

मानवता व मानवी धर्म याचा आधार घेऊन समाजाला परिवर्तीत करण्याकडे राष्ट्रसंतांनी आपले लक्ष वळविले आहे. समाजात खोलवर रूजलेल्या भांडवली अर्थव्यवस्थेला कायमचा सुरुंग लावावयाचा असेल तर सर्वहारा वर्गात एकी होणे आवश्यक आहे. त्यांचे संघटन होणे आवश्यक आहे. त्या संघटनेबरोबर आर्थिक बाजू मजबूत होणे आवश्यक आहे. त्याशिवाय परिवर्तन होणे शक्य नाही.

भांडवलदारी अर्थव्यवस्थेला सुरुंग लावण्यासाठी व स्वयंम-पूर्ण ग्रामराज्य निर्माण करण्यासाठी राष्ट्रसंतानी 'ग्रामगीता' लिहिलेली आहे. त्यांची ग्राम कुटुंब योजना संपूर्णतः सहकारी तत्वावर असली तरी व्यक्तिनिष्ठेपेक्षा ग्रामनिष्ठा व व्यक्तिहितापेक्षा ग्रामहिताकडे वळणारी आहे.

ग्रामीण आर्थिक घडण पक्की करावयांची असेल तर ग्रामातील जातिय व आर्थिक भेद संपुष्टांत आणण्याचे कार्य मानवधर्माच्या सहाय्याने करणे हे मानवी कर्तव्य आहे. मानव ही जात. ती सर्वासाठी एक आहे. समाजाच्या उन्नतीसाठी सर्वांचे कर्म सारखेच महत्वाचे आहे. गुणकर्म समानता दाखवून त्यांनी जातियतेच्या जटिल भावनेवर हल्ला चढविला. सर्वोतोपरी मानव एकत्रित झाल्याशिवाय आर्थिकतेची पकड मजबूत करणे अशक्य असते.

ग्रामीण अर्थव्यवस्था सदृढ होण्यासाठी सर्वांनी कष्ट करणे आवश्यक आहे. श्रम तेच जे उत्पादन निर्माण करतात. गावातील प्रत्येक व्यक्तिने उत्पादन निर्मितीचा वाटा समानतेने व ग्रामीण जीवनाच्या गरजेतून, तो पूर्ण करण्याच्या दृष्टीने, स्वयंस्फूर्त रीतीने उचलावा.

'श्रम' समानतेने करावे. श्रमासाठी सर्व सारखे आहे. तेथे श्रीमंत किंवा गरीब असा भेद नाही. राष्ट्रसंतांनी त्यांच्या ग्रामकुटुंब योजनेत श्रमाची सारखीच वाटणी केली आहे. जातीय श्रेष्ठतेलाही त्यांनी बाजूला सारले आहे.

---

१. ग्रा. गी. अ. ११ ओवी १४

'परि सर्वांना सर्वांचा आदर । ऐसा असावा जगाचा व्यवहार
कोण ब्राम्हण, कोण महार ? कामामाजी सारखे
येथे कामात उच्च नीचता । कोणे ठरवावी व्यवहारात : [१]
प्रत्येक काम महत्त्वपूर्णतः अपुल्या स्थानी ठेवितसे [३]

याच बरोबर त्यांनी निकष्टीकाला किंवा ग्राम नासविणाऱ्या लोकांना त्यांच्या ग्रामकुटुंब – योजनेत राहण्याचा अधिकार नाही. अशा व्यक्तिची सर्व संपत्ती हिसकावून घ्यावी व त्यांना गावाबाहेर करावेत. असे त्यांचे स्पष्ट मत आहे हा त्यांचा विचार अर्थ-वादात्मक आहे.

मग त्यास न मिळे सामान । अथवा त्यांचे असलेले धन
त्यांने पळावे जीव घेवोन । आपुला कोठे
ऐसे बळकट पण जव नाही । तव आदर्श ग्राम तमाशा राही
त्यात स्थिरताम येणार नाही । कांही केल्या [४]

राष्ट्रसंतांनी ग्राम दृष्टिकोनातून गावातील संपत्तीचा विचार गावाची ठेव म्हणून केला आहे.

'संपत्ती आणि संतती । सगळी गावाची ठेव निश्चिती
वाढवोनि साधावी उन्नती । योग्य मार्गे गावाची [१]

राष्ट्रसंतांनी सामुदायिक जीवनाचा मार्ग ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी व उत्पादनाच्या वाढीव पध्दतीसाठी वर्णन केला आहे.

एरव्ही सामुदायिक जीवन । हेचि प्रार्थना असे महान
गावासाठी कष्टावे पूर्ण । सेवा भावाने [२]

ग्रामोन्नती – आर्थिक घडामोडीसाठी ग्रामोन्नतीचा पाया असलेल्या शेतीला सहकारी तथा सामुदायिकतेचे स्वरूप ग्रामीण अर्थशास्त्रातून राष्ट्रसंत देतात. विकासाच्या पातळीकडे वळवितात. सहकारी तथा सामुदायिक शेतीला ग्रामाकडून राष्ट्राकडे ते वळवितांना दिसून येतात.

उत्पादन व ग्राम जीवन

सुधारणावादी देशाच्या अर्थव्यवस्थेचा व भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केल्यावर ग्राम स्वायता निर्माण करणे हे राष्ट्रसंतांना अत्यावश्यक वाटल्याने त्यांनी आपली गावकुटुंब योजना समाजवादी तत्वावर आधारित सांगितली आहे.

---

३. ग्रामगीता अ. १७ ओवी १०६-१०७, ४. ग्रामगीता अ. ३९ ओवी ८१ ८२
१. ग्रामगीता अ ३९ ओवी ४० २. ग्रामगीता अ. श. ३८ ओवी १०२

ग्राम अर्थव्यवस्थेतील मुख्य व्यवसाय शेती आहे. शेती हाच पाया असल्याने ग्रामातील शेतीची सहकारी तथा सामुदायिक मालकी त्यांनी सांगितली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करायचा असेल तर सहकारी तथा सामुदायिक शेती हा एकमेव पर्याय आहे. आज रशिया व जपानचा विचार केल्यावर सहजतेने लक्षात येते. सोवियत खेडे व जपानी खेड्यांचा विकास हा सामुदायिक शेतीतून झाला आहे.

राष्ट्रसंतांच्या ग्रामीण अर्थशास्त्रांचे स्वरूप सहकारी तथा सामुदायिक शेती व तिलाच पुरक असलेला दुग्ध व्यवसाय – कुक्कुट पालन, शेतीच्या कच्च्या मालावर आधारित असलेल्या उद्योगांवर तसेच ग्रामदृष्टीने उपयुक्त सर्व उद्योग धंद्यावर व त्याच्या ग्रामीणीकरणावर अवलंबून आहे. सहकारी शेतीविषयी अत्यंत सुंदर उद्‌गार त्यांनी मांडले आहेत.

अपना परका भेद ये तोडो । सबके श्रम खेतीमे जोडों
उपजावो सब नाज पहाडों । भूमि जरा खाली नहिं छोडो
सब मिल बाँट के खाओ । अब तो भय्या । सहकारी खेती बनाओ [१]

वरील ओवीतून सहकारी शेती पद्धतीतून सामुदायिक पद्धतीकडे त्यांची पुढील वाटचाल असावी कारण ग्रामीण जीवनाची मांडणी त्यांनी सामुदायिकतेच्या तत्वावर केली आहे. शेतीच्या अर्थव्यवस्थेचा व्यवहार हा सभासदाच्या सामुदायिक श्रमांवर अधिष्ठित आहे. हे श्रम नियोजनबद्ध असतात व एकूण गावकुटुंबातील एकत्रित श्रमांचा तो एक अंगभूत हिस्सा असतो. हे प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे सूचित केले आहे.

'मुळी जीवनाची तैसीच रचना । एकास हात लागती नाना
सर्वा मिळोनीच हा आपुल्या स्थाना । बनतो सन्मान घ्यावया [२]

किंवा

म्हणती 'या रे सगळ्यांनो । या । एकेक काम हाती घ्या
गावाची सुधारणा करू या । आपल्यापरी [३]

सहकारी व सामुदायिक शेती उत्पादनाचे आकारमान, पृथक शेतांच्या उत्पादनाचे आकारमान आणि सभासदाची स्थिती हे सर्व सहकारी–सामुदायिक शेतकऱ्यांच्या श्रमांच्या आकारमानावर अवलंबून असते. त्याचबरोबर काम किती कार्यक्षमतेने संघटित स्वरुपांत केले जाते यावर देखील अवलंबून असते. अशा शेती उत्पादनाचे दोन भाग दिसून येतात १) शेतमाल व २) पैसा.

---

१. राष्ट्रनौका भजन १९, २. ग्रा. गी. अ. १७ ओ. ४०,
३. ग्रा. गी. अ. ३० ओ. ८८,

3023

वस्तुमधील उत्पन्न सहकारी तथा-सामुदायिक शेतीतून येणारे पिक, सामुदायिक पशुसंवर्धन आणि कुक्कुट पालनातील पशु व कुक्कुट धन यांचा अंतर्भाव होतो. कापणी केलेल्या पिकामधून व पशुधन निर्मित वस्तुमधून व ग्रामीण उद्योगधंद्याच्या ग्रामीणी करणातून-सहकारी तथा सामुदायिक शेतीतील उत्पन्न 'ग्राम कुटुंबातीत' पंचायतीत आणून नंतर ते श्रमाच्या व शेतीच्या आकारमानानुसार वितरीत होते.

कोणी महिनोगणती शेती करी । हंगाम होता आणी दरबारी
प्रत्येक ऋतूची तुरी-बाजरी । तांदूळ आदि सामुग्री
धान्य उपजावे सर्वांतोपरी । जे जे लागे गावी, धरी
दुसरीकडोनि न ध्यावी माधुकरी । हेचि उत्तम [१]

गाव कुटुंबाला लागणारे धान्य सामुदायिक तथा सहकारी शेतीतून उत्पन्न करावे, त्यायोगे सहकारी तथा सामुदायिक शेताने गाव कुटुंबाला दिलेली अभिवचने (प्रत्येक वेळी) पूर्ण करावी. त्यामुळे शेतीचे हितसंबंध आणि एकूण गाव कुटुंब पर्यायाने राष्ट्र समाजाचे संबंध याची योग्य सांगड घालण्याची उत्तम संधी मिळू शकेल.

गाव कुटुंबाला दिलेली अभिवचने पूर्ण केल्यावर सहकारी शेते आपल्या सामुदायिक शेतीचे निधी गोळा करतील. या निधीमध्ये १) बी-बियाणे २) पशूसाठी लागणारा चारा ३) पिक विमा ४) नापिकीत अन्यसामुग्री ५) अपंगासाठी-शिशुगृहे, बालोद्यान, वसतीगृहे, शाळा, कॉलेजसाठी; बोर्डींगला लागणारा खर्च यांचा समावेश राहिल व त्याशिवाय उरलेले उत्पन्न (मालरुपी) सभासदात वाटले जाईल.

सहकारी तथा सामुदायिक शेतांना त्यांचे रोख उत्पन्न सहकारी संस्थांना व सरकारला विकलेल्या मालाच्या किंमतीतून मिळू शकेल. सरकारी भरणा करावयाची रक्कम भरल्यानंतर सहकारी तथा सामुदायिक शेते व त्यांच्याजवळील पैशातून एक रक्कम सहकारी तथा सामुदायिक गरजासाठी बाजूला करण्यांत यावी व त्यात शेतांच्या अवितरणीय मालमत्तेसाठी मंजूर केलेली रक्कम, उत्पादणाच्या चालू गरजासाठी अर्थात रासायनिक खते, औषध, यंत्रे व त्यांचे सुटे भाग, [४] इंधन, पशुरोगावरील तसेच पिक यांच्या रसायनासाठी मंजूर केलेली रक्कम, कारभाराचा खर्च चालविण्यासाठी बाजूला काढलेली रक्कम,

---

१. ग्रा. गी. अ. ३८ ओवी १०७-१०८.

४. उद्योग यंत्रे निर्माण करावी, परदेशा भीक न मागावी
आपणाचे करोनि भोगावी, वैभवे सारी (ग्रा. गी. अ. १८/५८)

सांस्कृतिक व सामाजिक कार्यासाठी मंजुर केलेली रक्कम आदींचा त्यांत समावेश होतो

'सर्वांगीण असावी ग्रामरचना । मनोरंजनासहित पुरवाव्यांत भावना
जेणे करून ग्राम वासीयांना । आठव ना ये शहराचा [१]

सरकार ग्रामकुटुंब आणि सहकारी तथा सामुदायिक शेत या दोघाच्याही हितसंबंधाची योग्य सांगड घातल्या जाईल अशा रीतीने विकावयाच्या शेतमांलाची लक्ष्ये नक्की करणे हीच सहकारी तथा सामूदायिक शेतीची मिळकत वाढविण्यांचा एक महत्वाचा मार्ग आहे याभध्ये शेतकऱ्यांना विश्वास निर्माण होतो. शेतीमाल व पशुधनात भर घालण्याची इर्षाही निर्माण होते. त्यासाठी प्रत्येक वर्षाचे प्रमाणबद्ध बजेट तयार करण्यांत यावे.

वर्षाचे बजेट ठरवावे । माणसी लागेल ते योजावे
अन्न-वस्त्र अलंकार बरवे । सर्वालागी घरदार [२]

– श्रमाचे माप –

सरकारी उपक्रमाप्रमाणे व गावकुटूंबाच्या योजनेप्रमाणे सहकारी श्रमासाठी दिलेली रक्कम ही प्रत्येक सहकारी शेतकऱ्याने केलेल्या श्रमाच्या आकारमानावर आणि गुणवत्तेवर अवलंबून असते. सहकारी श्रमानुरुप वितरण करण्यांचा आर्थिक नियम अंमलात आणला जाईल.

सर्वानी सारखे काम करावे । अपुल्या कलेने बरवे
कष्टाविण कुणाला पोसावे । ऐसे नाही [३]

वरील ओवीवरून श्रमाचे माप सर्वाच्या पदरात पाडण्यांत येईल तेव्हा श्रमाचा मोबदला श्रमाच्या योग्यतेवर, गरजेवर ठरविण्यांत येईल.

सर्वांनी करावे शक्तिभर काम । अधिकारपरत्वे उपक्रम
सर्वासि मिळावे सौख्य सम । गरजाप्रमाणे जरुर त्या [४]

यासाठी श्रमदिन मापाची आणि रोख मोबदल्यांची पध्दत स्वीकारण्यात येईल. श्रमदिनाचे माप यांचा अर्थ सामुदायिक अर्थव्यवस्थेला सहकारी तथा सामुदायिक शेतकऱ्याने दिलेले माप । त्याच बरोबर शेती उत्पादनातील प्रत्येक सभासदाला किती उत्पादन मिळावे हे ठरविल्या जाते त्याशिवाय काम किती महत्काचे आहे. किती गुंतागुंतीचे आहे, ह्यावर शेतीकाम करणाऱ्या मजूरांचे मूल्यही ठरविण्यांत येते.

---

१. ग्रा. गी. अ. १३ ओवी ९५ ग्रा. गी. अ. ३९/८७.
२.–३. ग्रा गी. अ. ३९/१६ व
४. ग्राम गीता अ. ३९ ओवी १४

जोड धंदा

शेती उत्पादनाच्या सहकारी तथा सामुदायिक प्रक्रियेबरोबर शेतीवर अवलंबून असलेल्या दुग्ध व्यवसाय; कुक्कुट पालन, मधमाशी पालन आदिचा विचार ग्रामीण अर्थव्यवस्थेत केला आहे. 'ग्रामगीते' तील 'गो-वंश-सुधार' या पंधराव्या अध्यायात गोपालनाचे महत्व विशद केले आहे. भूमी आणि जनावराबद्दल आपले विचार मांडतांना –

भूमि आणि जनावरे । हीच उत्पत्तीची कोठारे
एकाची अनेक होती खिल्लारे । जोड धंदा हा घरोघरी [१]

भारतीय शेतीचा व्यवसाय यांत्रिक पध्दतीनें करण्यात येत नाही. आज भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केल्यावर कांही कालपर्यंत तरी यांत्रिकतेने शेती करणे भारताला परवडणारे नाही. मानवी शक्ती, पशु शक्तीचा उपयोग त्याना यांत्रिकतेच्या अभावामुळे, त्याचबरोबर भांडवली शक्ती आणि प्रशिक्षणाच्या अभावामुळे शक्य नाही. वाढत्या उत्पादनाच्या प्रमाणावर पुढे करणे शक्य होईल. तोपर्यंत बैलाची जमात निर्माण करण्यासाठी तसेच शेणखतासाठी 'गो – वंश – सुधार' उपयुक्त आहे. शेणखताचे महत्व शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहे. नव्याने सांगण्यांची जरूरत नाही. दुग्ध व्यवसायासाठी गाय – म्हैशी, शेळी, मेंढचा पाळणे व त्यांची योग्य निगा राखणे अत्यावश्यक आहे. यापासून मिळणाऱ्या संपूर्ण उत्पादनाचा समावेश 'शेती' या सदरांत करण्यात येतो. पशुधनात राष्ट्रसंत हिन्दुधर्माप्रमाणे गाईला श्रेष्ठत्व देत असले तरी बाकी प्राण्यांना त्याचा विरोध नाही. पशु संवर्धनासाठी योग्य शास्त्रीय माहिती उपलब्ध करून शास्त्रीय पध्दतीने गोरक्षण स्थापन करावे असे ते सूचवितात.

गौरक्षणाचा व्हावा अभ्यास । नाना प्रयोग सावकाश
कैसे पुढे गेले देश । ती माहिती द्यावी सर्वा [२]

भारतात पशुसंवर्धन करतांना सर्वात मोठा प्रश्न चाऱ्याचा असल्याने तो प्रश्न निश्चित स्वरुपात ग्रामकुटुंबाने खालील प्रकारे सोडवावा.

गायीस नसे चराऊ जमीन । तरि मोकळी पाडावी सरकार कडून
अथवा गावी करावी अर्पण । जमीनदारानी [३]

उत्तम चांगल्या प्रकारच्या दुधाळ गाई पाळण्यांत, गोरक्षणांची उत्तम प्रकारे शास्त्र शुध्दतेने व्यवस्था करावी व 'जेणे वाढेल गावचे उत्पन्न' अशीच विचारधारा

---

१. ग्रामगीता अ. १५ ओवी ११ २. ग्राम गीता अ. १५ ओवी ५१
३. ग्रामगीता अ. १५ ओवी ५०

असावी. थोडक्यात सांगायचे झाल्यास राष्ट्रसंतांनी शेती बरोबर दुग्ध व्यवसाय तोही शास्त्रशुध्द पध्दतीने सांगितला आहे. याच व्यवसायाबरोबर कुक्कुटपालन व मधमाशीपालन आजचे शास्त्रशुध्द व्यवसायही जोडण्यात यावे.

ग्रामीण उद्योग धंद्याचे ग्रामीणीकरण – ग्रामजीवन

उत्पादन शक्तीच्या विकासाने कोणती पातळी गाठली आहे. त्यावर समाजाचा भैतिक व तांत्रिक पाया अवलंबून असतो आणि समाजातील प्रमुख उत्पादनाचे जे स्वरुप असेल त्यांच्याशी तो मिळता – जुळता राहतो. त्याच आधारावर समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधणे सहज शक्य होते. 'श्रम' ही संपत्ती असल्यामुळे खरी कष्टकरी जनता हीच समाजाची मुख्य उत्पादन शक्ती होय ! 'श्रम' हा ग्रामीण उद्योग धंद्याच्या प्रगतीचा व ग्रामीणीकरणाचा पाया आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्यातील सर्व कसब उपयोगात आणून अत्यंत प्रमाणिकपणे आपल्या उद्योगांत तल्लीन राहून कष्ट करायला पाहिजे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अर्थ विज्ञान व तंत्र विषयक ज्ञानात वाढ आणि सुधारणा, उत्पादन विषयक सुधारणा व संघटना व सामाजिक उत्पादन क्षमतेत वाढ असाच असायला पाहिजे.

श्रम करितील सर्व मिळून । तरि पिकू लागे बरड जमीन
मार्ग काढतील बुद्धिमान । नव्या नव्या शोधानी
सामुदायिक प्रयत्नांनी । सामर्थ्य वाढेल कणी–कणी
जेथे नसेल घोटभर पाणी । तेथें सरिता वाहू लागे [१]

राष्ट्रसंतांच्या ग्रामीण अर्थशास्त्रात अर्थात उद्योगांच्या ग्रामीणीकरणाच्या प्रकल्पात व्यक्तित्वाला मुळीच किंमत नाही. तेथे संपूर्ण समाजाचे हित महत्वाचे आहे. लोकामध्ये परस्परांना सहाय्य व स्नेहपूर्ण सहकार्य, कामाप्रमाणे त्याचा मोबदला व सगळ्यामध्ये समानता, या न्यायानेच उत्पादित मालाची कामगार वर्गाच्या हिताला प्राध्यान्य देणारी वाटणी हे हया नवीन संबंधाचे दोन वैशिष्ट्यपूर्ण नमुने होय :

जे एकास तेचि सकळांस । हेचि सत्य जीवनांचे रहस्य
सर्वाच्या सुखी–दुःखी समरस । भावना राहती सकळांच्या
उणा–अधिक गुणापाशी । नको जाति वा धनापाशी
अधिकार समानचि सर्वासि । जीवनाचा [२]

'श्रम करणाऱ्या लोकांचे जीवन शक्य तितके सुकर, संपन्न व सुखी करावयाचे आहे.' हा हेतू डोळ्यापुढे ठेवून सामाजिक उत्पादन व उत्पादित मालाचे वाटप सर्वस्वी जनतेचे हित व गरजा भागविण्यासाठी शास्त्रीय कारणे लक्षांत घेऊन

---

१. ग्रामगीता अ. ३८ ओवी ६८–७० २. ग्रामगीता अ. ३८ ओवी १२, १३, १४

राबविण्याची कामगिरी फक्त समाजवादामध्येच होऊ शकेल हा विचार लेनिनने वारंवार आग्राहाने मांडला आहे. राष्ट्रसंताचेही तसेच विचार दिसून येतात.

ग्रामोन्नतीसाठी गावातील संतती आणि संपत्तीचा पूर्णत्वाने विचार केला आहे [१] त्याशिवाय –

बुध्दी – काम, देह – परिश्रम । कला-काम, कौशल्य उद्यम
ज्यांचे असे जे जे कर्म । ते ते वाहावे समाजा [२]

वरील प्रकारे विचार करतांना राष्ट्रसंतांनी ग्राम हे सर्वांचे आहे, तेथील धन व उद्योगही सर्वांच्या मालकीचे आहे. असे सूचविले आहे.

सर्वांचे धन सर्वांचे । हे उद्योगहि सकळिकांचे
हे भूवन प्रत्येकांचे । ग्रामचि आहे.
म्हणोनि सर्व एकत्र करावे : ज्यांचे काम त्याला द्यावे
उणे असता अधिक मागावे । जास्त द्यावे खजिन्यामाजी [३]

या अर्थव्यवस्थेत नियोजितच; प्रमाणशीर विकासांत उत्पादनाचे व उत्पादन शक्तीचे प्रमाणशीर वाटप गृहित धरण्यांत येते. त्यात सामाजिक श्रमांची उत्पादन क्षमता वाढविली जाते. लोकांच्या सुखसोयित वाढ होते. आर्थिक व संरक्षण विषयक सामर्थ्य वाढविण्यात येते.

समाजवादाप्रमाणे राष्ट्रसंतांनी कारखान्यांच्या जागेचा, वेळेचा व नियमितपणाचा विचार अगदी योग्यतेने केला आहे.

जे जे गावी भिन्न उद्योग । त्याचा जुळवावा संयोग
ठराविक जागी नाना प्रयोग । चालवावे गावात
आपल्या कामाचा ठरला वेळ । सर्वांनी झटावे लावोनि बळ
चिंता करू नये वेळगळ । भलतियाचि
जो जो असे आपुला धंदा । तल्लीन रहावे कामातचि सदा
ठरल्या वेळी व्यवसाया सोडूनि द्यावे सर्वांनी [४]

उद्योगाची जागा, कच्चा माल आणि विजपुरवठा तसेच तयार मालाचा वापर करण्याचे क्षेत्र शक्य तितक्या जवळ असावेत. त्याचबरोबर. उद्योगाच्या विकासासाठी; उत्पादनाच्या वाढीसाठी नूतनीकरण व व्यवसायात संशोधन होणे अत्यावश्यक आहे. गावच्या शिक्षित तरूणांना त्याकरिता उत्तेजित करावे.

---

१. ग्रामगीता अ. ३९ ओवी ४० २. ग्रामगीता अ. ३८ ओवी ११४
३. ग्रामगीता अ. ३८ ओवी १११–११२
४ ग्रामगीता अ ३८ ओवी ९८, ९९, १००

अन्य देशीच्या तरूणासि वेड । नित्य नवे संशोधन प्रचंड
तैसी धुंद चढ़ावी अखंड । गावच्या शिक्षित तरुणा
गावचे कलावंत निपुण । त्यांना द्यावे उत्तेजन
नव्या नव्या वस्तु कराव्या निर्माण : उपयोगाच्या जीवनासि १

नियोजित अर्थव्यवस्थेमुळे, अव्वल दर्जाचें वैज्ञानिक व तांत्रिक उदभवणारे प्रश्न सोडवतील. श्रमशक्ती, भौतीक व आर्थिक साधनांची जरुर तेवढी जुळणी करणे शक्य होईल. बेकारी दिसणार नाही. याच अर्थव्यवस्थेत कामावरील लोकांची संख्या क्रमवार प्रमाणबध्दतेत सतत वाढत असते. कसबी कामगारांना प्रशिक्षण आणि अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या शाखेत त्यांची वाटणी अगदी योजनापूर्वक सतत चालू असते. श्रमिकांची भौतिक व सांस्कृतिक पातळी उंचावत जाते. हेच भांडवली अर्थव्यवस्थेत कधीच शक्य नसते. म्हणूनच 'गाव कुटुंब' कल्पनेत समाज-वादाप्रमाणे अगदी सुरवातीला राष्ट्रसंतानी भांडवलदारांना विरोध केला नाही. सहकार्य प्रवृत्ती असल्यास जवळ केले आहे. त्यांना समजावण्यांचा राष्ट्रसंतांनी प्रयत्न केला आहे.

तुमचा पैसा, आमचे श्रम । तुमची बुद्धि, आमुचा उद्यम
एकाचा घोडा, एकाचा सरंजाम । असावा जैसा २

पण वरील न्यायाने; प्रेमाने श्रीमंत ऐकणार नसेल तर कायद्याचा आधार ३ घेऊन समानतेने रचना करावी. तो कायदा-तो नियम सांगतांना राष्ट्रसंत म्हणतात

दुनिया आहे कष्टीकांची । जो जो कसेल शेती त्यांची
जो काम करेल लक्ष्मी त्यांची । दासी व्हावी नियमाने ४

गावातील सर्व उद्योगधंदे, जोडधंदे व हस्तव्यवसाय; शेतीसाठी आवश्यक अवजारे, कुटिर उद्योग गावागावात व घरोघरी वृद्धिगत व्हावे. प्रत्येकांचा मुख्य उद्योग व त्याचबरोबर एक जोडधंदा असावा. 'त्यासि उपाय हाचि प्रथम । कामगार करिती जे श्रम । त्यांची शक्ति वाचे तिला काम । द्यावे सहायक दुसरेहि ।। मिळणारा प्रत्येक रिक्त वेळ उद्योगाला लावावा.

समाजवादी जीवनाची सुरवात राष्ट्रसंतांनी 'गाव कुटुंब' योजनेत सामुदायिक जीवनातून केली आहे. त्यामुळे गाव जीवनाला जे-जे आवश्यक असेल ते ते गावी निर्माण करण्यावरच त्यांचा अधिक भर आहे.

---

१. ग्रामगीता अ १८ ओवी ५६ ते ५८ २ ग्रामगीता अ. १७ ओवी ९२
३. नसतील ऐकत जे कोणी । त्यांना कायद्याने घ्यावे आटपोनि मग रचना करावी समाज गुणी । इमान जागी ठेवोनिया (ग्रामगीता अ. १७ ओवी ५९)
४. ग्रामगीता अ. १८ ओवी ५१-५२

गावीच केले हातोडे खिळे । ऐरणी कुऱ्हाडी सापळे विळे
पावडे–कुदळचा, शिके आदि सगळे । सामान जीवनाचे
दगड फोडोनि फाडी केली । सरळ चिरेदार दापोनि छाटली
इमारतीस बसविता दिसली । सुंदर सगळी
फडे, झाडणी, चटई, नेवार । पलंग, पायपूस, मोट, संदोर
सुंदर केले डवरे, वखर । नव्या धर्तीचे
कापूस पिंजोनि सूत कातले । सुंदर वस्त्र, स्वेटर विणले
बेरड्या, मूसके, दोर बनविले । जाळे उतारी सहित[१]

वरील प्रकारचे सर्व उद्योग गावी निर्माण व्हावे व उद्योग समितीने उद्योगाकडे व तिच्या उन्नतीकडे एकसारखे लक्ष पुरवावे.

'गावी असावी उद्योग समिती । जी सतत करील उद्योग उन्नती
गावाचे आर्थिक जीवन हाती । घेवोनि लावील सोय जी[२]

उद्योग समितीने आपले कार्य चोख पार पाडल्यावर खरेदी–विक्री समितीच्या पंचानी माल विकण्याचे व उद्योगाला लागणारे सामान विकत घेण्याचे कार्य सांभाळावे.

'सर्वानी आपापले काम करावे । विकणे घेणे पंचाती पाहावे
आणि उद्योगासि सामान पुरवावे । पंचानीच [३]

परंतु गावातील उत्पादित माल वस्तु भांडार मध्ये आणावा.

'कोणी गावास्तव जोडे शिवी । कोणी कपड़े शिवोनि पाठची
कोणी लोखंडी कामे करोनि बरवी । पाठवी वस्तु भांडारी [४]

तसेच कपडा, लोखंडी साहित्य, धान्य आदी सर्वच वस्तुभांडारी आणावेत व त्यांची विक्री सहकारी तत्वावर करावी. ग्रामोद्योगाला राष्ट्रसंतानी गावकुटुंबात अत्यंत महत्वाचे स्थान दिले आहे. गावात उत्पादित होणाऱ्या कापसापासून गावातच कापड तयार करण्यांत यावे.

कापडा बरोबर त्यांनी तेलघानीलाही महत्व दिलेले आहे.

गावी आवश्यक तेलघानी । शुध्द तेलादिकांची निशानी
गावची कामे सर्व मिळोनि । गावीच करावी उपयुक्तशी [५]

तसेच त्यांनी क्रान्तीदीप मध्ये 'ग्राम तेलघानी के जरिये सुन्दर तेल निकाले' असे म्हटले आहे. सहकारी दुकानावर सर्व गावाची मालकी असावी. आलेला नफा सर्व गावाच्या मालकीचा असावा.

---

१. ग्रा. गी. अ. १३ ओवी ३५ ते ४०.
२. ग्रा. गी. अ. १८ ओवी ८७
३. ग्रा. गी. अ. ३९ ओ. ९०,
४. ग्रा. गी. अ. ३८ ओवी १०५
५. ग्रामगीता अ. १८ ओवी ९७

सर्व गावाचे एक दुकान । सर्वाच्या सहकार्याचे प्रदर्शन
फायदा झालीया धन । सर्वाच्याचि मालकीचे

पण गावी निर्माण झालेला माल व त्याचा उपभोग गावकऱ्यांनी प्रथम घ्यावा.

जे जे आपुल्या गावी होते । आपणाचि वापरावे सामान ते
उरलेले विकावे भोवती । भिन्न गावी [१]

याचे कारण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा दृष्टिकोन गावसुखी करण्याचा आहे.

आधी ग्राम असावे सुखी । कोणी न व्हावा कोणास पारखी
सर्वच कामे गावीच निकी । करू आम्ही [२]

पण यांच बरोबर राष्ट्रीय अर्थव्यवस्था व जागतिक अर्थव्यवस्थेचाही विचार व अभ्यास होणे आवश्यक आहे.

समाजापुढे ग्राम आहे । ग्रामापुढे देश राहे
देश मिळोनि ब्रह्मांड होय । गती गतीने [३]

वरील सर्व ग्रामीण उद्योगधंद्याच्या दृष्टिकोनातून राष्ट्रसंतांचे विचार पाहिल्यावर ते ग्रामीण जीवनाला किती उपयुक्त व व्यावहारिक आहेत हे सहजतेने लक्षांत यायला वेळ लागत नाही. गावाला आवश्यक असलेले सर्व उद्योग ग्रामांत निर्माण करण्याचे राष्ट्रसंताने सांगितले असले तरी गांधीजीच्या रामराज्यातील कल्पनेला विस्तृत, व्यापक व व्यावहारिक रूप दिल्याचे दिसून येते. राष्ट्रसंतांनी गांधीजीप्रमाणे यंत्राला विरोध दर्शविला नाही तरी त्यांच्या ग्रामराज्यांत मोठ्या स्वरुपांतील उद्योगांना किंवा मोठ्या यंत्रांना देखील वाव नाही. लहान-लहान उद्योग घराघरातून चालावे परंतु वेळ आणि परिश्रम वाचविण्याचे दृष्टीने व अधिक उत्पादन निर्माण करण्याच्या दृष्टीने यंत्राचा व त्याच्या प्रशिक्षणाचा विचार त्यांनी केला आहे. उद्योग यंत्रे जे ग्रामीण उद्योगाच्या दृष्टीने उपयुक्त होईल ते गावातच निर्माण करावे. त्यांच्या संशोधनाचे कार्य ग्रामराज्यातच व्हावे हे त्यांचे विचार अर्थवादात्मक वाटतात. ग्रामीण अर्थशास्त्रांत भांडवलदारांना किंवा श्रीमंतांना संपत्तीचे विश्वस्त न ठरविता श्रमाच्या प्रतिष्ठेला सर्वांत श्रेष्ठतेचे स्थान दिलेले आहे.

'धन ही गावाची संपत्ती' असे सुधारणावादी, समाजवादाच्या जवळील विचार त्यांनी आपल्या ग्राम कुटंब किंवा ग्रामराज्यांच्या कल्पनेत मांडले आहे. प्रत्येकाला उद्योग मिळेल व बेकारी राहणार नाही अशी व्यवस्था मांडली असून ग्रामासमोर

---

१. ग्रा. गी. अ. ३८ ओवी १०९ २. ग्रा. गी. अ. ३८ ओळी ११७
३. ग्रा. गी. अ. १ ओवी ४६

व्यक्तीच्या व्यक्तीत्वाला महत्व नाही. अत्यंत प्रामाणिकपणे समानतेच्या; गुणत्वाच्या तत्वावर त्यांनी आपल्या ग्रामीण अर्थशास्त्राची मांडणी केली आहे.

– केन्द्रीयकरण –

ग्रामीण उद्योगाच्या केन्द्रीयकरणाला लोकशाही केन्द्रीय–करणाच्या आधारे लोकशाहीतील समाजवादी सरकारने मार्गदर्शन करावे. अर्थव्यवस्थेबाबत केंद्रीत व नियोजित असे नेतृत्व आणि समाजवादी लोकशाही यांचा समन्वय साधणे हे आर्थिक क्षेत्रातील लोकशाहीचे केंद्रीयकरणाचे मूलतत्व असते. त्यासाठी त्यांची कामगारशीलतेवर व कार्यप्रवणतेवर मदार असते.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला केन्द्रीय सरकारकडून मुख्य प्रश्नाबाबत विचारपूर्वक मार्गदर्शन व्हावे व स्थानिक उपक्रमशीलता व कामगाराची कार्यवृत्ती यांचा व केन्द्रीय शासनाचा संबंध ग्रामीण शासनाच्या माध्यमातून साधण्यांत यावा व घटनात्मकदृष्टीने परिपक्व व्हावा.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचे संरक्षण सरकारला करावयाचे असते तेव्हा सरकारची बांधिलकी ग्रामकुटूंब योजनेला सांभाळणे आवश्यक ठरते. असे झाल्यास लोकशाही केंद्रीकरणाने आवश्यक मूलभूत व सारभूत एकात्मतेला कोणताही बिघाड निर्माण होत नाही. उलट स्थानिक वैशिष्टचे; काम करण्याच्या तऱ्हा, नियंत्रण साधनाची पध्दती यातील विविधतेमुळे आर्थिक वैचित्र्य साध्य होऊन एकात्मता बळकट होते व उत्पादनाचे प्रमाण सतत वाढत जाते.

व्यापार आणि बाजारपेठ

श्रमातून निर्माण होणारा माल क्रयवस्तु असल्यामुळे उत्पादन आणि ग्रहण यांच्यातील किंवा याच्या मधील दुवा म्हणून क्रयवस्तूचे अभिसरण होणे अटळ असते व त्याने धारण केलेले रुप म्हणजे व्यापार होय !

ग्राम कुटुंब व्यापार सामाजिक मालकीवर आधारित आहे. व्यापारी उलाढालीमुळे व्यक्तिमान निश्चित करता येते. त्याचबरोबर किंमती, अभिसारणाच्या किंमती इ. बाबतीतही खरी ठरत असते. व्यापार हे उत्पादनाच्या विकासामध्ये फार मोठी भूमिका पार पाडत असते. अंतर्गत बाजारपेठेचा विस्तार करण्यामध्ये क्रयवस्तुच्या गुणवत्तेची सुधारणा करण्याला उत्तेजन मिळते.

श्रमांच्या अनुरूप वितरण करण्याच्या कामात व्यापार हे मोठे साधन आहे. ग्रामीण कुटुंब योजनेत कामकरी जनता स्वत:ला उपयुक्त असलेला ग्राहकोपयोगी माल यांची देवघेव व्यापारामार्फत करते.

सरकारी व्यापार; सहकारी व्यापार व सहकारी तथा सामुदायिक शेती व्यापार असे तीन रुप व्यापाराचे दिसून येतात.

सरकारी व्यापार क्रयवस्तुच्या अभिसरणाच्या सामाजिक करणाची उच्चत्तम अवस्था होय. हा व्यापार ज्या व्यापारी संस्थांकडून चालविला जातो त्यांची भौतिक सामुग्री व पैसा सरकारी मालकीचा असतो.

सहकारी तथा सामुदायिक शेती व्यापार, सहकारी तथा सामुदायिक शेती क्षेत्रे आणि शेतीचे पृथक सदस्य चालवितात. ते आपल्या वरकड उत्पन्न जनतेला विकतात. ह्यांच्या किंमती मागणी पुरवठ्यावर ठरतात परंतु किंमतीकर सहकारी व सरकारी व्यापाराचा आर्थिकदृष्ट्या प्रभाव असतो.

– बाजारपेठ व प्रकार–वितरण आणि स्वायता –

राष्ट्रसंतांच्या ग्रामीण अर्थशास्त्राचा अभ्यास केल्यावर संघटित बाजारी किंमत म्हणजे उद्योग धंद्यातील व व्यापारी संघटित बाजारी किंमत म्हणजे उद्योग धंद्यातील व व्यापारी संघटनातील धाऊक किंमती, सरकारी व सहकारी उपक्रमातील किरकोळ किंमती आणि सहकारी तथा सामुदायिक शेती क्षेत्रे व त्यांचे सभासद सरकारला विकलेल्या मालाला सरकारने दिलेल्या किंमती होय. संघटित बाजारपेठेतील मालाच्या किंमतीत आपोआप बदल होत नाही. ग्रामीण व्यवस्था व राष्ट्रीय अर्थव्यवस्था लक्षांत घेऊन निकडीची गरज भासल्यास त्यावेळी सरकार किंमतीत फेरबदल करू शकेल.

अभिसारणाच्या खर्चाशिवाय व्यापार होऊ शकत नाही. अभिसारणाच्या खर्चात वस्तु कारखान्यापासून ग्राहकापर्यंत पोहचविण्याचा खर्च. गोदामाचा खर्च व्यापारी संस्था चालवितांना पॅकिंगचा, कार्यालयाचा, काम करणाऱ्याचे वेतन, कर्जाच्या पैशावरील व्याज आदीचा त्यांत समावेश होतो.

एक गोष्ट निश्चित लक्षांत ठेवण्यासारखी आहे की हे सरकार ग्रामीण अर्थ-व्यवस्थेचा विचार करूनच ते ठरविण्याचा प्रयत्न करील.

ग्रामीण अर्थव्यवस्थेत वरील सर्व तत्वाला धरुन ग्रामीण बाजार समिती असते.

मुख्य आपुली असावी समिती । जी सुंदर ठेवील बाजाराप्रति
वजने, मापे, माल, जागा, पद्धति । सर्व चोख करावया [1]

बाजारपेठेतून मिळणारा नफा हा ग्रामीण आर्थिक समिती अंतर्गत असलेल्या मुख्य बँकेत गावाच्या नावे जमा होईल.

वरील तत्त्वावर ग्रामीण अर्थशास्त्र उभे आहे. श्रमानुसार वेतन हा नियम राष्ट्रसंतांच्या ग्रामकुटुंब योजनेत आहे. निकष्टीकाला खाण्याचा अधिकार त्यांच्या

---

१. ग्रा. ओ. अ. १३ ओ. ९३

अर्थशास्त्रात नाही. यातच त्याच्या ग्राम कुटुंब योजनेचा विजय आहे. हीच यशस्विता आहे.

कामानुरूप वितरणाचा नियम म्हणजे वैयक्तिक भक्षणासाठी उपलब्ध असलेला क्रयवस्तुचा साठा, दिलेल्या श्रमाच्या व्याप्ती मानानुसार वाटला जाईल व तोही गुणवत्तेनुसार, व गरजेनुसार, ! श्रमकालाचा सर्वात कार्यक्षम रीतीने सर्वस्वी वापर करण्यांत येत असल्याने श्रमिकांना व्यवहारात सुख समाधान वाटते २) कसबी श्रम करणाऱ्यांना अधिक उत्पादन लाभत असल्याने आपण कसबी श्रमिक व्हावे ही भावना वाढून उत्पादनांत वाढ होईल ३) अधिक कष्टाच्या क्षेत्रात त्याच्या समकक्ष क्षेत्रापेक्षा अधिक वेतन किंवा दाम लाभतील. औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनाचे वितरण वरील प्रमाणे करण्यांत येते, उद्योगधंदे स्वायत्तापूर्ण असलेली आढळून येत असली तरी त्यांच्या उत्पादनावर ग्रामीण अर्थव्यवस्थेचे व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे नियंत्रण आढळते.



ग्रामराज्य

'ग्राम' हा शब्द भारतीयांच्या अगदी जिव्हाळ्याचा आणि आपुलकीचा शब्द आहे. जगविख्यात हिन्दू संस्कृतीचे कट्टर अभिमानी स्वामी विवेकानंद म्हणतात 'हातच्या बोटावर मोजण्याइतपत सुशिक्षित लोकावरून देशाची कल्पना करू नका. झोपड्या-झोपड्यातून राष्ट्र वसले आहे. ह्याचे विस्मरण होऊ देवू नका.' अर्थात 'खेड्याकडे वळा' असा मंत्र आजपर्यन्त स्वामी विवेकानंदापासून तर महात्मा गांधीपर्यंत सर्वांनी दिलेला आहे.

मग मूळ प्रश्न उपस्थित होतो हा देश कुणाचा ? मूठभर सुशिक्षित पांढर-पेशांचा की; जे खेड्यातील ग्रामीण जनतेची पिळवणूक करतात त्यांचा, की भारतात राहणाऱ्या ७०% जनतेचा (ज्यांची पिळवणूक होते) ज्यात शुद्र, अतिशुद्र शेतकरी-शेतमजूर आहेत. अरे ! हा देश कुणाचा, गोरगरीबांचा, उघड्या, नागड्या लंगोटी वाल्यांचा, असंस्कृत, अक्षरशत्रू अर्धपोटी उपाशी राहणाऱ्या लोकांचा ? केवढा मोठा प्रश्न आहे हा !

ग्रामीण जनतेची केविलवाणी हीन-दीन अवस्था पाहून महात्मा गांधीजी कळवळले, त्यांनी गुडघाभर पंचा नेसून भारतीय ग्रामीण जनतेच प्रतिनिधीत्व केलं व रामराज्याचं अर्थात ग्रामराज्याचे स्वप्न बाळगल. महात्मा गांधींच्या जवळ जवळ ६०-७० वर्ष अगोदर महाराष्ट्राच्या भूमिवर महात्मा ज्योतिरावांनी ग्रामीण जनतेला जवळ केले. त्यांचे दु:ख आपलेसे केले, अर्ध उघड्या-नागड्या भारतीय लोकांचे सत्य स्वरुप दर्शन इंग्लंडच्या महाराणीच्या पुत्रासमोर दिल्लीला सादर केले. फुल्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि उघड्या-नागड्या, अर्धपोटी शेतकऱ्यांचे त्यांनी घडविलेले दर्शन हे खरे भारतीय जनतेचे पहिले राष्ट्रीय दर्शन होय ! वर्गीय चळवळ, किसान सभा, शेतमजूर संघ, भूमिहिन आंदोलन हे सर्व आजचे आहे.

वरील सर्व स्वातंत्र्यपूर्व काळातील, पण स्वातंत्र्यानंतर कमी झाला नाही. आज स्वातंत्र्याचे जवळ जवळ ३५ वर्ष होऊन गाव कुठल्या दृष्टीने संपूर्णत: स्वयंपूर्ण झाले नाही. आजही ग्रामात शेत मजूर; स्त्री; अतिशुद्राची विटंबना व पिळवणूक थांबली नाही. आज सर्वच गोष्टीचे शहरीकरण झाल्यामुळे व गावातील ग्रामोद्योग पूर्णत: मोडकळीस आल्यामुळे केवळ शेती हाच एकमेव उद्योग आजच्या

वैज्ञानिक युगात परंपरेने चालविण्यांत येतो आहे. त्यांत निर्सगाचा लहरीपणा आदीमुळे–उत्पादनाचे प्रमाण दिवसें–दिवस कमी होत आहे. उत्पादन खर्च उत्पादनातून निघत नाही तिथे मजूराच्या मजूरीचा प्रश्न वेगळाच आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळत नाही. शेतमालाला भाव मिळावा म्हणून त्यांचे आंदोलन चालू आहे पण याशिवाय त्याला काळाबाजार, चोरी–चपाटी, व्यभिचारी, बेईमानी हयाला बळी पडावं लागतं. त्यासाठी राष्ट्रसंतानी ग्रामाचा विचार अत्यंत जिव्हाळ्याने केला आहे. गावावरून राष्ट्राचे माप त्यांनी हाती घेतले आहे.

राष्ट्रसंतानी ग्रामराज्यांची कल्पना मांडली आहे. ग्राम स्वयंःपूर्ण, उद्योगी व आदर्श झाले तर देश आदर्श होईल. देशाबरोबर संपूर्ण विश्वही आदर्शाकडे वाटचाल करेल.

– 'ग्राम' मानव मात्राचे प्रथम माहेर –

'ग्राम' मानव मात्राचे प्रथम माहेर या दृष्टीने राष्ट्रसंत ग्रामाकडे बघतात. माहेर म्हटले की माहेर विषयी वाईटाचा विचार येत नाही. माहेरचा विकास व्हावा, त्याचा गुणगौरव त्रिभूवनात गाजावा, माहेरच्या लोकांत एकमेकाविषयी प्रेमाची, जिव्हाळ्याची, सहानुभूतीची, आपुलकीची भावना राहावी. प्रत्येकजण सुखी असावा अशा कितीतरी गोड कल्पना व विचार स्त्रियांच्या अंतरी असतात तसेच विचार व कल्पना प्रत्येक ग्रामवासियांच्या अंतःकरणात गावाबद्दल असायला पाहिजे. मुलगी सासरी गेल्यावर आपल्या माहेरविषयीचं स्वप्न प्रत्यक्षांत उतरवू शकत नाही. गावातील व्यक्ती गावाबाहेर जाणार नसल्याने ते स्वप्न त्याने गावात प्रत्यक्षांत निर्माण करायला पाहिजे. अरे गाव हा विश्वाचा नकाशा ! गावावरून देशाची परीक्षा असे घडत असल्याने गाव धर्माचे पालन त्यानी करावे.

राष्ट्रसंतांनी मानवतेचा धर्म जो सांगितला आहे. त्याप्रमाणे वागून जी–जी सामुदायाची जबाबदारी अंगावर येईल ती प्रामाणिकपणे करणारा, स्वतःबरोबर प्रामाणिक राहून इतराबरोबर प्रामाणिक राहणारा खरा ग्रामनिष्ठ होय !

'करावे सर्वांच्या हिताचे । तेथे व्यक्तित्व नको आपुले १

त्यांचे ग्रामराज्य मानवतेवर, मानव धर्मावर, सतत परिश्रमावर आधारित आहे. तेथे जातियता नाही, भेदभाव नाही, उच्च–निचता नाही, सर्वांसम समान भाव' आहे. परिश्रमाविषयी व कष्टाविषयी समानतेचे बोल महाराजांनी आपल्या ग्रामगीतेत काढले आहे.

---

१. ग्रा. अ. ३९ ओवी ११५

सर्वांनी सारखे काम करावे । आपुल्या कलेने बरवे
कष्टाविण कोणाला पोसावे । ऐसे नाही [१]

ही वृत्ती जर मानवाची राहिली तर ग्रामोन्नतीला वेळ लागणार नाही. गावाबरोबर देश व देशाबरोबर विश्व उन्नतीच्या उंच शिखरावर पोहचल्याचे आढळून येईल. तेथे कुठल्याही भेदभावाला थारा राहणार नाही.

गावा गावाशी जागवा । भेद भाव समूळ मिटवा
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्यादास म्हणे [२]

शेवटी विश्वचालक परमेश्वराला प्रार्थना करतांना राष्टसंत म्हणतात.

खरे नाम निष्काम ग्रामसेवा । झटू सर्वभावे करू स्वर्ग–गावा
कळो हे वळो देह कार्यी पडू दे । घडू दे प्रभो । एवढे घडू दे [३]

यातच त्यांनी सामुदायिक जीवनाची अपेक्षा केली आहे.

– सामुदायिक जीवन –

कोणत्याही व्यक्तीच्या एका दिवसांच्या व्यवहाराकडे किंवा जीवनाकडे सूक्ष्मतेने लक्ष दिले तरी समाजाच्या सहकार्याशिवाय त्याला करण्यासारखे कोणते कार्य त्याच्याजवळ उरलेले नाही. व्यक्तिगत एकटचाच्या बळावर त्याला जगता येत नाही. मग असे असतांना स्वतःच्या जीवनाबरोबर व्यक्तिने समाजाचा विचार करायला हवा. समाज सुखी झाला तर देश सुखी होईल. आजचे युग समतावादाचे युग आहे. आजच्या जागतिक घडामोडीकडे लक्ष दिल्यावर प्रत्येक व्यक्ती आपल्या अधिकाराला, न्याय हक्कांना योग्य रितीने समजावून घ्यायला तयार झाली आहे.आता समाजातील कोणताही वर्ग एक-दुसऱ्याचे शोषणकरू शकणार नाही कारण प्रत्येक वर्गातील संघटन मजबूत होत आहे. मजूर, गरीब आणि श्रमिकांची अस्मिता आता जागरूक झाली आहे. आंता स्वतःपुरते आकुंचित भावनेते पाहून त्याला आपले जीवन यापुढे जगता येणार नाही. धनिक वर्गाने सर्व सामान्य जनतेच्या हिताकडे समानभावनेने पाहावे व आपल्या बरोबर त्यांना घेऊन समानतेचा दर्जा द्यावा. असे झाले नाही तर वर्ग कलहाचे रूपांतर रक्तक्रांतीत झाल्याशिवाय राहणार नाही. उद्याची रक्तक्रान्ती टाळायची असेल तर ग्रामराज्याच्या कल्पनेतून समाजाला सामुदायिकतेची शिकवण द्यावी. त्या संदर्भात बोलतांना राष्ट्रसंत म्हणतात.

परस्परांचा विचार घ्यावा । आपला समतोल हिस्सा ठेवावा
कोणासहि राग न उद्भवावा । ऐसे करावे गावाने [४]

---

१. ग्रा. गी. अ. ३८ ओवी ८७; २. ग्रा. गी. अ. १७ ओवी ११५
३. ग्रा. गी. प्रार्थना ४. ग्रा. गी. अ. १७ ओवी ३८

आपल्या ग्रामराज्याच्या कल्पनेत त्यांनी सामुदायिक जीवनाचा पुरस्कार केला आहे. त्याला 'जीवन कला' हे नांव ते देतांना दिसून येतात. जगाचा इतिहास समुदायावर आधारित आहे. त्यांची जाणीव करून देतांना राष्ट्रसंत म्हणतात–

सामुदायिक वृत्तीविण । जगी टिकले प्राणी कोण
जगावे, जगवावे जीव, जन । हीच खरी जीवन कला [१]

मानवी जीवनांची कला तिच की जी दुर्बलास उन्नत करू शकेल, सर्वांची ही वृत्ती ग्रामराज्यात रहावी. जीवन कलेबद्दल, तिच्या अर्थाबद्दल आपले विचार व्यक्त करतांना, राष्ट्रसंत म्हणतात–

'या सकळांमाजी जीवन कला । सात्विकतेचा प्रवाह भरला
मोहवूनि प्रेमाने सकळा । किर्ती मार्ग दावी लौकी [२]

यामुळे सामुदायिक जीवन सुखी आणि समृद्ध राहते. प्रेमभावनेने दृढ होते व संपूर्ण विश्वसुखाची भावना वाढायला लागते. दूरदृष्टी, कार्यकारणभाव जाणून घेण्याची वृत्ती, निरनिराळे कष्ट करण्याचे बळ प्रत्येक मानवाने आत्मसात करायला पाहिजे कारण–

आज वर्गभेदाविषयी बोलल्या जाते. 'गरीबी हटाओ' अशा घोषणा नित्य होतात. स्वत:चा स्वार्थ किंवा व्यवहार समाजाच्या उद्धारासाठी उपयुक्त झाला पाहिजे. हे सर्व सत्य असले तरी प्रत्यक्षांत ते जीवनात उतरायला पाहिजे. ते शब्दांत रहायला नको.

हा अभ्यास नको शाब्दिक । बौद्धिक अथवा केवळ तात्विक
जीवनची करा सामुदायिक । ग्राम जन हो [३]

स्वत:पुरते मर्यादित असलेली दृष्टी प्रत्येक व्यक्तीने आपल्या अंतकरणातून काढून टाकायला पाहिजे. नि:स्वार्थबुद्धिचे व्यापक स्वरूप निर्माण करावे 'ग्रामाचा स्वार्थ', 'ग्रामाचा लाभ' ही दृष्टी व श्रेष्ठ वृत्ती यांची जोपासना प्रत्येकाने आपल्या अंतरी करावी.

'म्हणोनि स्वरूप द्यावे सामुदायिक । सर्व गावचि कुटूंब एक
श्रमती, खाती सर्वचि लोक । ऐसे दृश्य दिसावें [४]

श्रम ही गावाची संपत्ती त्यात शारीरिकेतेबरोबरच बौध्दिक श्रमाचाही विचार सारख्यांच प्रमणांत राष्ट्रसंतांनी केला आहे.

---

१. ग्रा. गी. अ. ३६/५३
२. ग्रा. गी. अ. ३६/४९
३. ग्रा. गी. अ. ३८/५९
४. ग्रा. गी. अ. ओवी ३८/६६

सामुदायिक प्रयत्नाने ग्रामराज्याचे सामर्थ्य वाढविता येईल. अशक्य असे कांही ग्रामजनतेसमोर असणार नाही पण त्यासाठी धनिकांनी धनाचा, जमीनदाराने जमिनीचा. श्रमिकांनी श्रमाचा त्याग ग्राम-विकासासाठी करायला सिध्द झाले पाहिजे. आदर्श सामुहिक जीवन ग्रामराज्यात निर्माण होण्यासाठी आपले सर्व कर्म समाजाठायी अर्पण करावे.

– ग्रामोन्नतीचे कार्य : ग्रामसफाई –

गावातील संपत्ती मग ती व्यक्तिगत असो वा संस्थेची असो ती सर्व ग्रामराज्यांच्या ठिकाणी एकत्रित करावी. समयदानातून गरीबांचे घरे, रस्ते बांधून ग्रामोन्नतीचे कार्य करावे. रोज ग्रामसफाई करावी. गावाची स्वच्छता करावी.

आपण तेवढे स्वच्छ रहावे । भोवती गलिच्छ वातावरण पाहावे
याने सुमंगलता कधी न पावे । तन, मन होत दूषित
म्हणोनि स्वच्छ ठेवावे दुकान-घर । नाल्या, मोऱ्या सडका चौफेर
मग रामधूनची फेरी सुंदर । काढावी अबालवृद्धांनी [१]

रामधून ही पूर्वापार चालत आलेली भारतीय संस्कृतिची देण आहे. रामधून ग्राम प्रदक्षिणा होय । प्रदक्षिणा घालणे म्हणजे गाव स्वच्छ आहे की नाही हयांची पाहणी करणे होय ! ग्रामाच्या शुद्धीसाठी, उन्नतीसाठी; विकासासाठी रामधून काढण्यांत आली आहे. गावातील केर-कचऱ्यापासून कंपोज खत तयार करावे व सांडपाण्याचा उपयोग शेतीसाठी करण्यांत यावा.

ग्राम सफाईमुळे ग्राम-आरोग्य उत्तम राहील. श्रमदानांतून गावातील रस्ते; सार्वजनिक वास्तुचे बांधकाम; चर संडास, गोबर गॅस आदी अनेक सार्वजनिक जीवनाला उपयुक्त कामे करण्यांत यावी.

– ग्राम जीवनाची बांधिलकी –

सामुदायिक-जीवन सुंदर करायचे असेल किंवा प्रकल्प यशस्वी करायचे असतील तर समाज निष्क्रीय व निकष्टीक राहून चालत नाही. तो कष्टीक तथा उद्योगी असायला पाहिजे. सामुदायिक जीवनांत श्रमाला महत्व आहे. तिच खरी दौलत आहे. प्रत्येक व्यक्तीला ग्राम जीवनांत काम करावेच लागणार आहे. श्रमप्रतिष्ठेच्या आधारावरच प्रत्येक व्यक्तिला ग्राम-राज्यात जीवन जगता येईल. ग्रामपुढारी, पंडित-पुजारी किंवा सामान्य व्यक्ती असो पण त्यांना ग्रामजीवनाची जबाबदारी सांभाळतांना ग्रामीण जनतेसाठी नियोजित जे कर्म ठरलेली असतील ती करावीच लागणार आहे. जे काम करणार नाही, जे गाव बुडवे असतील,

---

१. ग्रा गी. अ. १२/४७-५०

व्यसनाधिन, निष्क्रीय असतील अशा लोकांना ग्रामराज्यात राहता येणार नाही. अशा व्यक्तीचें अपराध ग्राम–समाजा समोर सिद्ध करावे आणि त्यांना गावातून त्यांचे साहित्य न देता हाकलून लावावे. निकष्टीक, दुर्जनावर दया दाखविणे ग्रामदृष्टीने योग्य नाही. काम करणे हे जसे गावातील लोकांना अनिवार्य आहे. तसेच त्यांना काम पुरविणे हेही ग्रामपंचायतीला आवश्यक आहे. जनतेला काम पुरविणे ग्रामपंचायतचे कार्य आहे. ग्रामपंचायतला काम मागणे हे जनतेचे कर्तव्य आहे. ही खरी ग्राम जीवनाची बांधिलकी आहे. गावातील सर्व उद्योग, सर्वभूमी व सर्व संपत्ती ग्रामजनतेची राहील. ही सामुदायिक जीवनाची बैठक 'सामुदायिक प्रार्थनेतून' केली आहे. प्रत्येक दिवसाची सुरुवात सामुदायिक ध्यानातून होते व शेवट राष्ट्र वंदनेतून होतो, ग्रामातून राष्ट्राकडे प्रवास आपणांस करावयाचा आहे. हे स्पष्ट होते. प्रत्येक व्यक्तिचा आध्यात्मिक व भौतिक विकास हे ग्रामराज्याचे उद्दिष्ट आहे.

– आदर्श ग्राम –

आदर्श ग्रामाची राष्ट्रसंतांनी जी कल्पना केली आहे. ती समाजसत्तावादी असलेल्या सोविएत ग्रामासारखी आहे. आदर्श ग्राम म्हणजे सामुदायिक जीवनाची उच्चभू होय !

राष्ट्रसंतांनी आदर्श ग्रामाची कल्पना स्वप्नमय नाही किंवा काल्पनिक स्वरुपांची नाही. आज रशियात भेद-भाव, गरीब–श्रीमंत, भांडवलदार कामगार विरहित समाज एकमुखाने; एकदिलाने राहतो आहे. जिथे सर्वांचे सुख; समाधान सारख्याच मोलाचे-महत्वाचे ठरविण्यांत येते व प्रत्येकांच्या जीवनाचे प्रश्न सोडवून त्यांच्या आरोग्यांची काळजी अत्यंत बंधूभावाने घेतली जाते; श्रमाच्या योग्यते-नुसार उत्पादनाचे माप प्रत्येकांच्या पदरात पडते इतके नव्हे तर प्रत्येकांच्या हितार्थ झटतांना; कार्य करतांना दिसून येतात. समाजात स्वातंत्र्य–समता आणि बंधूत्व यांची समानतेच्या भावनेने पूजा केली जाते. त्याचे शुध्दत्व राखल्या जाते. गावातील संपत्ती आणि संतती ही संपूर्णतः ग्रामाची समजून तिच्या विकासासाठी तन, मन, धनाने कार्य केल्या जाते. उद्योगाचे अंग वाढवून उद्योगांचा विकास घडवून उद्योग व शेतीचे शुध्दत्वाने ग्रामीणीकरण झालेले असते तेच ग्राम आदर्शग्राम होय ! राष्ट्रसंतांनी भूवैकुंठ या ३९ ग्रामगीतेतील अध्यायांत तसे वर्णन केले आहे.

– ग्राम जीवनांत समानता –

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामीण जीवनांत समानता निर्माण करण्याच्या दृष्टीने जातियवादावर प्रथम हल्ला चढवून जातियवादाचे खंडन केले आहे.

मानव आणि मानवता याच धर्माचा त्यांनी अंगिकार केला. मानवांना उन्नत करून मानवाचा सर्वबाजूने विकास करण्याची जवाबदारी त्यांनी ग्रामजनतेवर टाकली आहे.

मानवता एक जात बने। उसके लिये सब हाथ मने
जातियता एक शराब है। विशालता की शत्रु रहे [१]

समाज जीवनातील हक्क व कर्तव्ये सर्वांना समानतेने देण्याचे सूचित करून

जे एकास तेचि सकळांस। हेचि सत्य जिवनाचे रहस्य
सर्वांच्या सुखी-दुःखी समरस। भावना राहती सकळांच्या
उणा अधिक गुणांपाशी। नको जाती व धनापासी
अधिकार समानची सर्वांशी। जीवनाचा [२]

राष्ट्रसंतांनी समानतेचा पुरस्कार करून श्रमाचे महत्व वर्णन केले आहे. सर्वांनी आपल्या योग्यतेनुसार व अधिकार परत्वे काम करुन सर्वांना सुख लाभेल व सर्वांच्या गरजा पूर्ण होतील असे वागावे.

जेथे सर्वांनीच काम करणे। कोणी उत्तम, कनिष्ठ न म्हणे
सर्व मिळोनि जग साजविणे। आपुल्यापरी [३]

कमीत कमी जिवनावश्यक गरजा तरी पूर्ण व्हायला पाहिजे. ही अपेक्षा त्यांनी आदर्श ग्रामातील नागरिकांकडून बाळगली आहे. ग्रामपंचायत, उद्योग समिती आणि ग्रामसुधार समिती आदीने नागरीकांना विश्वासांत घेऊन पूर्ण एक वर्षाचे बजेट तयार करावे. त्यातच अन्न, वस्त्र, घर व धंद्याचे दृष्टीने उचित व योग्य उपाय योजना आखावी.

ऐसीच सर्वांची योजना करावी। पूर्ण वर्ष चिंताचि नसावी
अन्न-वस्त्र, धंद्याची बरवी। योजना व्हावी सर्वमिळोनि
वर्षाचे बजेट ठरवावे। माणसी लागेल ते योजावे
अन्नवस्त्र-अलंकार बरवे। सर्वांलागी घरदार [४]

सामाजिक जीवन हे सामुदायिक स्वरुपांतील राहत असल्याने ग्रामीण जीवनात व्यक्तिगत किंवा वैयक्तिक असे काही राहणार नाही. ग्रामातील संपत्ती ही गावाची झाल्यावर कुठल्याही उद्योगपतीला आपला वेगळा नफा किंवा वेगळी संपत्ती वैभव असे स्वतंत्रपणे दर्शविता येणार नाही.

---

१. सद्विचार ओवी ४१०--४११
२. ग्रामगीता अ. ३५ ओवी १२-१३
३. ग्रामगीता अ. ४ ओवी १११
४. ग्रा. गी. अ. ३९ ओवी १५-१६

वेगळा नफा, वेगळी संपत्ती । वेगळे वैभव, वेगळी महत्ती,
वेगळे चोचले कोणाप्रती । उरोचि न द्यावे.
एकचि वस्त्र, एकचि अलंकार । एकचि आदर एकचि शृंगार
एकचि भोजन, एकचि अधिकार । आपुल्याला कामाचा [१]

सांस्कृतिक जिवनापासून तर ग्रामजीवनापर्यन्त

प्रत्येकाला सारखा अधिकार असून प्रत्येकाचे राहणीमान देखील सारखेच ठेवण्यांत येईल. त्यांचे सणवार व उत्सवही सारखे राहिल. दैनंदिन जीवनात सगळ्यांच्या क्रिया सामुदायिक स्वरूपाच्या होण्यासाठी योग्य वेळी सकाळी एकाच वेळी उठावे, अंत:करण शुद्ध राहण्यासाठी ध्यान – प्रार्थनेच्या कार्यक्रमाचे जरी राष्ट्रसंत वर्णन करीत असले तरी त्यातून सामुदायिक जीवन दृढ व्हावे हा त्यांचा एकमेव उद्देश आहे.

सर्वांची उठण्याची एक वेळा । घरकाम करण्या हुरुप आगळा
सफाई, ध्यान, प्रार्थना सगळा । कार्यक्रम सामुदायिक [२]

ग्राम आरोग्य शुद्ध राखण्यासाठी ग्राम सफाई होणे आवश्यक आहे. तेणे करुन रोगोत्पादन होणार नाही. आरोग्यांसाठी सर्वांसाठी एक उपाय योजना अर्थात दवाखाना असावा जेणे करून प्रत्येकाला आपले स्वास्थ्य तपासून योग्य उपाय योजना करता येईल.

समान व्यवस्था आरोग्याची । सारखीच उन्नती स्त्री-पुरुषाची
एकाची ती सर्वंचि गावाची । जबाबदारी [३]

कुटुंब व्यवस्था

ग्रामराज्यांत कुठल्याही प्रकारचा भेदभाव राहू नयें, स्त्री पुरुष या दोघांच्या उन्नतीचा प्रयत्न व्हावा कारण ही संसाराची दोन चाके आहेत. जिथे समानतेच्या तत्वावर स्त्री-पुरुषाना विकास करण्याचे कार्य साध्य करून दिल्या जाते. तोच समाज आदर्श जीवनासाठी, प्रत्येकाला सहकार्य–उत्तेजन देत राहतो. मुलांच्या भवितव्याविषयी ते जागरूक राहतात. आपल्या मुलांना त्यांच्या लहानपणी योग्य वळण लावणे हे आई वडिलांचे प्रथम कर्तव्य असते. पण त्याचबरोबर श्रमाची प्रतिष्ठा आणि सामाजिक जीवनाची जाणीव–जबाबदारी त्यांच्यात निर्माण करावी.

राष्ट्रसंतांनी कुटुंब नियोजनाचा व कुटुंबाच्या योग्यतेचाही विचार केलेला आपणांस दिसून येतो.

---

१. ग्रामगीता अ. ३९ ओवी १७–१८ २. ग्रामगीता अ. ३९ ओवी २१
३. ग्रामगीता अ. ३९ ओवी २४

जरी सर्वांनी संसारी असावे । तरी संततिनियमन सांभाळावे
तीन पुत्रावर पुत्र व्हावे । ऐसे इच्छू नये कोणी
पुत्र तान्हेपणी वाढला । दुसऱ्या दुधावरी लागला
की आई पासोनी सोडला । पाहिजेचि तो १

त्यानंतर त्यांच्या योग्य संगोपणाची, त्यांच भवितव्य घडविण्याची जबाबदारी ही आई-वडीलांची न राहता ती ग्रामाची राहील कारण –

संपत्ती आणि संतती । सगळी गावाची ठेव निश्चिती
वाढवोनि साधावी उन्नति । योग्य मार्गे गावाची २

मुलांसाठी शिशुपालन केन्द्रापासून तर विश्वविद्यालयापर्यंत सर्व सोयी गावात असाव्यात व त्याची जबाबदारी, काळजीपूर्वक गावाने सांभाळावी. आज रशियांत हीच पद्धत दिसून येते. ज्या ठिकाणी आई-वडिल काम करीत असेल तिथेच जवळच्या शिशुपालन केन्द्रात मुले राहतात. मधल्या सुटीत आईची उब मुलांना सहजतेने मिळते.

प्रत्येक मुलांना त्याच्या वाढत्या वयाबरोबर व बुद्धिमतेच्या विकासाबरोबर गावच्या गरजेनुसार कोणते उद्योग व शिक्षण शिकवावे हे ग्रामपंचायतीने, त्या संबंधीत मंडळाने ठरवावे.

त्यापेक्षा उच्च ज्ञानांची विद्यालये । गावीच आणावी निश्चये
जी ग्रामजीवन सजवितील चातुर्ये । शिकवोनि जना
मुलांना शिकवाव्या नाना कला । चापल्य, ध्नेयनिष्ठादि सकला
गावचि सांभाळू शकेल आपुला । ऐसे द्यावे शिक्षण
गावासि कैसे आदर्श करावे । याचेचि शिक्षण प्रामुख्याने द्यावे
सक्रियतेने करावयासि लावावे । विद्यार्जनी ३

याचबरोबर संगीत, नृत्य, अभिनय, नाटक इत्यादीचा अविष्कार त्यांच्यात निर्माण करण्यांत यावा पण कुठल्याही कलेचा विपर्यास किंवा विडंबना राष्ट्रसंतांना मान्य नाही. कले करता कला हे राष्ट्रसंतांना मान्य नाही तर जीवनाकरता कला हे मान्य असल्याने; जी कला उच्चत्तम जीवनाचा आदर्श निर्माण करून चांगले जीवन जगण्याला मानसाला उत्तेजनात्मक शिक्षण देत असेल ती कला राष्ट्रसंतांनी स्वीकृत केली आहे.

---

१. ग्रामगीता अ. ३९ ओवी ३७–३८ २. ग्रामगीता अ. ३९ ओवी ४०
३. ग्रामगीता अ. १९ ओवी २९, ३० ३१

– सामुदायिक प्रार्थना व ग्राम उत्सवावरील विचार --

ग्रामाची सांस्कृतिक व सामाजिक उंची वाढविण्यासाठी सामुदायिक प्रार्थनेचा व मंदिराचा विचार महाराज पुढे करतात.

सर्वांचे आपण बंधुजन । हा भाव वाढ घे मनोमन
गावाची स्वर्गीयता असे अवलंबून । याचवरि
सकळांस कळाया ही संस्कृति । उपदेश द्यावा प्रार्थना अंती
ही नित्य ठेवावी चालीरिती । गावी आपुल्या
ही प्रार्थना गावी राही जागती । तरि जिवंत राहिल गाव संस्कृति
सामुदायिकतेची दीपज्योति । प्रकाशेल सर्व काळ [1]

सामुदायिक प्रार्थनेच्या साह्याने सर्व विश्वात शांतता निर्माण होऊ शकेल असा विश्वास त्यांना आहे.

विश्वी होई शकेल शांतता । तेथे गावाची कोण कथा ?
सामुदायिक प्रार्थना करील एकता । नित्यासाठी तुकड्या म्हणे [2]

सामुदायिक प्रार्थना मानवशिक्षणाची शाळा आहे. ग्रामसंस्कृतीच्या जिव्हाळ्यांचा तो विषय आहे. मानवातील भेदभाव, जातियता नष्ट करण्याचं व सर्वांग उन्नतीचं एक केन्द्र आहे.

गावातील सर्व लोक एकाठिकाणी येत असल्याने आचार विचाराची देवाण घेवाण होऊन सर्वांच्या कल्याणाचा मार्ग साधण्याचे महत् कार्य होणे शक्य होते. असा विश्वास राष्ट्रसंतांनी अनुभवातून व्यक्त केला आहे.

आज समाजवादी देशाला धर्म, सामु. प्रार्थनेचे महत्व पटल्यासारखे वाटते आहे कारण रशियांत धर्म ही बाब गौण होती. परंतु मानवी जीवनाच्या शांततेसाठी, मानसिक विकासासाठी धर्म व सामुदायिक प्रार्थना अत्यंत आवश्यक झाली आहे.

सोविएत राज्य घटनेत सर्व धार्मिक संस्थाना शासनाच्या दृष्टीने स्वातंत्र्याची हमी दिली आहे. रशियन ऑर्थोडॉस चर्चसह सर्व धार्मिक संस्था शासनाच्या दृष्टीने समान आहे.

राष्ट्रसंताने प्रार्थना मंदिरात थोर विचारवंताची जयंति व पुण्यतिथी साजरी करावी, कारण त्यामुळे बौध्दिक दृष्टीने सामुदायिक वृत्ती तेवत राहील.

याच मंदिरी थोरांची जयंति । उत्सव आणि संत पुण्यतिथी
जागती राहे सामुदायिक वृत्ति । बौद्धिक बळे [3]

---

१. ग्रामगीता अ. ७ ओवी ९६ २. ग्रामगीता अ. ३९/६५
३. ग्रामगीता अ. २७ ओवी १८०.

त्याच बरोबर सर्वाचे मन पवित्र असेल, उत्सवाचे बाबतीत एकमत असेल तरच उत्सव करावेत अन्यथा करू नये. त्यामुळे उगीच सांप्रदायिकता, जातियता, व्यक्तिनिष्ठता वाढल्या जाईल. जेणे करून कुठलाही भेद निर्माण होणार नाही अशी सर्वांच्या विचारांची ठेवण असावी.

नाहीतरी वाढे सांप्रदायिकता । जातीयता, व्यक्तीनिष्ठता
तेणे गावाचे होता । वेळ न लागे
म्हणोनि भेदचि नको कांही । सर्वांमनी उत्साह राही
एक कुटुंब ऐसे सर्वहि । ग्राम आमुचे प्रेमळ [१]

प्रेमाची वृद्धी परस्परांत होईल. गाव एक कुटुंब आहे असे समजून व प्रत्येकात श्रमाची प्रतिष्ठा वाढेल, सहकार्याची भावना वृद्धिगत होईल अशी शिकवणच ग्रांम जनतेला देण्यांत यावी व घराघरातून शांती, सुखाचे वारे सतत वाहावे.

आपुले प्रेमाचि अमोल संपत । आपुले श्रमाची महान दौलत
आपुले सहकार्याची खरी इज्जत । समजावोनी द्यावे सर्वांसि [२]
गावी तेचि सर्वांनी करावे । कीर्ति-स्फुर्तीने गाव भरावे
घराघरांत शांती, सुख पावे । जनता जेणे

गावात मतभेद निर्माण झाल्यास त्यांचा निकालही गावातच लावावा व तो सर्व जनतेने मान्य करावा इतकेच नव्हे तर निवडणुकीचाही प्रश्न गावी निर्माण होवू नये. सुंदर ग्राम तेच राहू शकेल जिथे सुख-शांती आहे, भांडणे नाही, जिथे सर्व ग्रामहित पाहणारे व ग्रामाशी प्रामाणिक आहे. तेच आदर्शग्राम होय !

गावचा झगडा गावीच मिटे । निवडणूकीचे काम नव्हे खोटे
लंदफंद गावात नाही कोठे । ऐसे ग्राम सुंदर हे
ऐसे सांगाया वाटावा अभिमान । तेचि खरे गावाचे भूषण
गावातील सर्व लोक सज्जन । परस्परावरी अति मोहे

गावाचे अहित करणारा किंवा गावात धिंगाणा घालणारा कोणीही असो त्याला गावात राहू देता कामा नये. त्याबाबतीतील सर्वानुमते ठराव घ्यावा व त्याला गावाबाहेर करावे. निर्धन करुन पाठवावे. तिथे दया दाखवू नये.

ग्रामपंचायतीची निर्मिती व कार्य

ग्रामपंचायतची निवडणूक ही लोकशाही पद्धतीने होईल. लोकशाही म्हणजे काय ? या विषयीच राष्ट्रसंतांनी मांडलेले विचार महत्वाचे आहे.

---

१. ग्रामगीता अ. ओवी ६९–७० २. ग्रामगीता अ. ३९ ओवी ७१

लोकशाही म्हणजे लोकाचे हित । लोकांकडून व्हावे हातोहात
सर्व मालक म्हणोनि सत्य । जबाबदारी ओळखावी
तीच म्हणावी लोकशाही । जेथे कोणी कामकुचर नाही
सेवातत्पर सर्व उत्साही । न्यायी जन [1]

सर्वांचा संसार सुखी व्हावा हे लोकशाहीचे ब्रीद आहे. लोक कल्याणाची भावना कष्टांशिवाय सफल होणार नाही. सर्वांचे कल्याण जर साधायचे असेल तर सर्वांनी उद्योगप्रिय राहणे आवश्यक आहे. कारण 'कष्टाविण संसार सुखी नोहे'. लोकशाही ही लोकांच्या भवितव्याच्या उज्वलतेसाठी असते. लोकशाहीत सत्ताधिकाऱ्याने स्वत:ला मालक न समजता सर्व लोकांचा सेवक समजावे.

ग्रामसेवाधिकारी व पंचमंडळ

इतरांपेक्षा धुरंधर, निस्वार्थ, अधिक कामकर्ता, आचारशीलता, विचार-शीलता, दूरदृष्टी, कल्पकता ज्यात आहे तो ग्रामपुढारी किंवा ग्रामसेवाधिकारी होय.

सर्व लोक कार्यतत्पर । त्याहूनी विशेष धुरंधर
तोचि ग्रामधिकारी खरोखर । पंच वा नेता [2]

ग्राम हा त्याचा देव व ग्रामसेवा हा त्याचा मंत्र असावा.

येथे महत्व सद्गुणांचे । धाडसाचे, स्वार्थ त्यागाचे
तोचि पुढारी गावाचे । जे गावास देव मानती
ज्याने गावचि देव मानिला । सेवा कार्यांचा मंत्र जपला
त्याचाचि असावा बोलबाला । गावामाजी आपुल्या [3]

अशाच लोकांचे पंचमंडळ असावे. त्याच पंचमंडळाने ग्रामाचा कारभार पाहावा असे विचार राष्ट्रसंतांनी मांडले आहेत. वरील कार्यकर्त्यांना, राष्ट्रसंतांनी केलेला उपदेश अत्यंत मार्मिक आहे.

आपुल्या व्यक्ति-कुटुंबाकरता । न व्हावी गावची अवस्था
ऐसी दृष्टि असावी समस्था । कार्यकर्त्यांसि [4]

– कार्यकर्त्यांची जबाबदारी व आचारसंहिता –

ग्रामातील जे कार्यकर्ते पंचायत मध्ये किंवा विविध समितीवर असतील त्यांची सेवाभावी वृत्ती असावी. लोकहित साध्य करण्याकडे ज्यांचे लक्ष असेल त्यांची नेता म्हणून निवड करावी.

---

१. ग्रामगीता अ. ३९ ओवी १०३–१०४ २. ग्रामगीता अ. ३९ ओवी १०६
३. ग्रामगीता अ. ३९ ओवी १०१–११० ४. ग्रामगीता अ. ३९ ओवी ११८

करावे सर्वांच्या हिताचे । तेथे व्यक्तित्व नको आमुचे
जो करि सर्वांच्या हिताचे । तोचि नेता मानावा [१]

ग्राम प्रमुखाने गावाविषयी अत्यंत दक्ष असावे. कुणावरही अन्याय होणार नाही. कुठल्याही प्रकारचा त्रास कुणालाही होणार नाही. याची खबरदारी घ्यावी.

'अन्याय पीडा न होवो कोणास । न व्हावा मुंगीलाहि त्रास
यांची जाणीव प्रमुखांस । सर्वकाळ [२]

त्याच बरोबर बहूमताचा आदर पुढारी लोकांनी, प्रमुखांनी करावा त्याविषयी राष्ट्रसंत म्हणतात.

आपुला दुराग्रह दूर सारावा । बहूजनांचा मागोवा घ्यावा
शक्य तो कारभार चालवावा । एकमताने गावाचा
पाचामुखी परमेश्वर । परि नको सत्तेचा अहंकार
नियम पाळता वाटावे सुखकर । ठरल्यावरी [३]

ग्राम दृष्टीने पंच सर्व श्रेष्ठ समजण्यांत यावे. त्यांचा अधिकार व आदेश सर्वांनी प्राणप्रतिष्ठेने पाळावे असे राष्ट्रसंतांना वाटते.

तयांनी सर्व काळजी घ्यावी । गावाची जनता सुखी ठेवावी
निर्णय देताची ऐकावी । हाक जनतेने पंचांची
ग्रामी जनता असेल मोठी । परि ती पंचापुढे धाकटी
पंच बोलेल ते देवपण । ही गावधर्माची खूण
यातचि ग्रामाचे आदर्शपण । आमुच्या मते [४]

पण याच बरोबर पंचांनी ग्राम जनतेत ग्रामनिष्ठा निर्माण करावी व तेही आपल्या आचरणातून–

पंच मंडळे निष्ठेने राही । ते ते गाव भू-वैकुंठ होई
त्यांच्या प्रभावे पवित्र मही । आपोआप होतसे
ऐसे जव गाव साधले । तव ते प्रांतात प्रमुख झाले
ऐसे प्रांत प्रमुख ठरते । तरीच भूषण देशासि [५]

– गाव संस्कृति विषयी –

गावात सांस्कृतिक कार्यक्रम नित्य घडावे. त्याच बरोबर ज्ञानासाठी वाचनालय असावे. नभोवाणी केन्द्र असावेत.

---

१. अ. ३९/११५ २. ग्रा. गी. अ. ३९ ओवी ११९
३. ग्रा. गी. अ. ३९ ओवी १२१–१२२ ४. ग्रा. गी. अ. ३९ ओवी ९६–९८.
१. ग्रा. गी. अ. ३९ ओवी १२८–१२९

सुंदर असावे वाचनालय । नाना ग्रंथ ज्ञानमय
करावया सुबुद्धीचा उद्य । गावलोकी
काय चालते जगामाजी । कळावे गावी सहजा सहजी
म्हणोनि वृत्तपत्रे असावी ताजी । आकाशवाणी त्या ठायी [१]

गावाच्या प्रमुख ठिकाणी वार्ताफलक असून त्यावर देशातील व आंतरराष्ट्रीय प्रमुख हालचालीची माहिती असावी.

सहज कळावे विचार आणि वृत्त । म्हणोनि फळा असावा चौकात
ती जणू ज्ञानेश्वरांची भित । ज्ञान देई सर्वांसि [२]

गावात सभागृह असावेत. त्याचा उपयोग शेती व उद्योगधंद्याचे संशोधन समजावून देण्यासाठी तसेच प्रौढ शिक्षणासाठी आणि सामुहिक लग्न कार्यासाठी व्हावा. नाट्यगृह, क्रीडांगणे, विश्रामगृहे यांचाही समावेश ग्राम संस्कृतीत केला आहे.

– सामुहिक लग्न पद्धती –

गावातील मुलामुलींचे लग्न सामुहिक पद्धतीने करण्यांत यावे त्यासाठी ग्रामीण विवाह स्थळ असावे.

तैसेचि लग्नादि उत्सव । त्यांसि झटावे गावाने सर्व
परंतु नेहमीच धावाधाव । न व्हावी तीहि
गावच्या मुलांमुलीचे लग्न । सामुदायिक पद्धतिच प्रमाण
तेथे तिथि मुहुर्ताचे कारण । कांहीच नाही
असोत लग्ने दहा पन्नास । गावची शंभरहि त्या वर्षास
एकाच वेळी सावकाश । उरकवावी एके जागी
गावी असावे विवाह स्थान । भांडीकुंडी, विछायत पूर्ण
सर्वासाठी ठेवावी जमवोन । गावातर्फे [३]

अत्यंत लहान सहान बाबींचा राष्ट्रसंतांनी विचार करून ग्राम समृद्ध कसे होईल हाच विचार नागरिकांनी करावा ही इच्छा प्रगट केली आहे.

त्यासाठी त्यांनी आर्थिक विकासाची सामुदायिक योजना आखली आहे. सहकारी तथा सामुदायिक शेती आणि उद्योगाद्वारे ग्रामीण आर्थिक घडण मजबूत केली आहे. शेती हा ग्रामाचा मुख्य धंदा आहे.

---

२. ग्रा. गी. अ. १३ ओवी १०३–१०४ ३. ग्रा. गी. अ. १३ ओवी १०६
१. ग्रा. गी. अ. ३९ ओवी २८–३१

शेतीविकास :- सहकारी शेती–भूमीहिन शेतकरी–भूदान चळवळ

राष्ट्रसंतांनी सामुदायिक जिवनाविषयीची कल्पना व विचार सांगितल्यावर ग्रामराज्यातील शेती या व्यवसायाकडे त्यांनी आपले लक्ष वळविले.

शेतात राबणारा शेतकरी खऱ्या अर्थाने अल्पभूधारक आहे. जमीनदाराच्या हजारो एकर जमीन पडीत पडलेल्या आहेत. योग्यतेच उत्पादन त्यांतून होत नाही.

जमीनदाराने आपली शेती खंडाने कसायला अल्पभूधारक किंवा शेतमजूरांना द्यायची मग शेती पिको वा न पिको खंड मात्र ठरलेला जमीनदाराकडे पोहोचविलाच पाहिजे. वरुन जमीनदाराच्या गुंडाचा त्रास वेगळाच :

१९५१ ला जमीनदाराच्या विरोधात कष्टकरी शेतमजुराने बंड पुकारले. कष्टकरी जनतेने कम्युनिष्टांच्या मदतीने व सहकार्याने जमिनीचा ताबा घ्यायला सुरवात केली. एक ज्वलंत आग, एक ज्वलंत समस्या पसरत गेली. तेलंगणाच्या संघर्षमय क्रांतीचा प्रसार बिहारमध्ये होणार हे पाहून पू. विनोबा भावे तिकडे वळले. जमीनदारांनी परिस्थितीची भयानकता ओळखून ते पू. विनोबाच्या भूदान यज्ञात सामिल झाले. शेतमजूरांना भूदानातील जमीनी मिळाल्या. तात्पुरता का होईना संघर्ष टळला. क्रांतीपुढे ढकल्या गेली पण भूमीहिनाचा प्रश्न काल होता तसा आजही आहे. वातावरण निवळताच जमीनदारांनी शेतमजूराजवळील जमीनी पुन्हा बळकावून घेतल्यात.

आजही भूमिहिनाचे आंदोलन जारी आहे. समाजवादाचे डोझ पाजावयांस नेते–पुढारी जमीनदार बाहेर पडले खरे पण कुठला समाजवाद ? जेथे आर्थिक विकास साधता आला नाही तेथे समाजवादाच्या पोकळ वल्गना राहिल्या. एकंदर २१ कोटी एकर जमीन वाटपाचा हा प्रश्न आहे. ९ कोटी एकर सरकारी बंजार जमीन, ३ कोटी एकर नाममात्र जंगली जमीन, ९ कोटी ही कमाल धारणेची जमीन. १९७० ला संपूर्ण भारतात भूमी मुक्ती आंदोलन घडले याच आंदोलनातून अल्प भूधारक, अर्धशेतकरी-शेतमजूर एकत्रित झाला.

– भूदान चळवळीविषयी राष्ट्रसंताचे विचार –

१९५१ पासून राष्ट्रसंतांनी भूमिहिनाच्या प्रश्नाकडे लक्ष वळविले व तसा प्रचार केला. तो प्रचार करतांना ते म्हणतात–

कसे उसकी जमीन बाबा । करे उसका धंदा [१] तर ग्रामगीतेत

जो काम करेल लक्ष्मी तयाची । दासी व्हावी नियमाने [२]

---

(१) क्रांतीदीप पृ ५ (२) ग्रामगीता अ. १७ ओवी ९२

श्रमप्रतिष्ठेच्या नियमाप्रमाणें कष्ट करणाऱ्यांची संपत्ती व्हायला पाहिजे. मानवतावादी धोरणाप्रमाणे जमीनदारांना समजावितांना ते म्हणतात–

'अब तो भूमि है गरिबनकी, गांव निभाना होगा' [१]

अस म्हणून राष्ट्रसंतांनी पू. विनोबा भावेच्या 'भूदान–यज्ञाला उचलून धरले व गावागावात प्रचार करून जमीनदाराचे मन वळविण्याचा प्रयत्न केला.

'भूदान करो - धनदान करो। यह प्रीय विनोबा बोल रहे' [२]

त्याचा परिणाम कांही धनिकावर व जमीनदारांवर झाला ते पाहून ते म्हणतात –

'भूमि मालकोने भूमीदान छोडा। अमीरोने धनलाभसे मुह मोडा' [३]

परंतु जमीनदार मानवतावादी नाही असे आढळून आल्यावर जमीनदार व धनवानांना इशारा देतांना ते म्हणतात–

'दे-दे अपना भूधन बाटकर, नही तो हकसे ले ले' [४]

असा गंभिरतेचा इशारा देतांना राष्ट्रसंत पू. विनोबाच्या पुढे गेलेले समाजवादी विचारवंताप्रमाणे दिसून येतात. मानवतावादी दृष्टीने देण्याची इच्छा नसेल तर कष्टकरी, कामकरी जनतेने श्रम प्रतिष्ठेच्या न्याय हक्काने भूमी हिसकावून घ्यावी. तोच त्यांचा न्याय अधिकार आहे. हक्क आहे.

सहकारी तथा सामुदायिक शेती

भूमिहिनांच्या प्रश्नासोबत सहकारी-सामूहिक शेती योजनेचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. भारतीय शेतकऱ्यांत जवळ जवळ ७०% शेतकरी अल्पभूधारक आहेत अत्यंत स्वतंत्ररितीने ते शेती करतांना दिसून येतात. जमिनीचे क्षेत्र लहान असल्याने बाह्य व आंतर मशागतीचा खर्च खूप मोठ्या प्रमाणात येतो. त्या प्रमाणात त्याला शेतीतून उत्पादन मिळेल असेही नाही. सावकाराचे देणे, अनेक घरघुती अडचणी किंवा धान्याची योग्य साठवण करण्यासाठी पाहिजे ती साधने व जागा उपलब्ध नसल्याने भारतीय शेती अत्यंत लहान लहान तुकड्यात विभागली आहे. धुऱ्यामध्ये जी जमीन जाते त्यांचा विचार केल्यावर हजारो एकर जमीन त्यांत गुंतल्या गेली आहे असे आपणाला दिसून येईल. त्या धुऱ्यासाठी भांडण्यात; कोर्ट कचेरी-फौजदारी करण्यांत भारतीय शेतकरी पूर्णत: गडलेला आपणास दिसून येतो. शेती सुधारणा करून जास्तीतजास्त उत्पादन घेण्याचे उद्दिष्टे त्याच्या डोळ्यासमोर आपणांस दिसून येत नाही. त्यांची कार्यशक्ती व श्रमशक्ती

---

(३) क्रांतीदीप पृ. ७ (४) क्रांतीदीप पृ. ४७
(५) क्रांतीदीप पृ. १५ (६) क्रांतीदीप पृ. १७

निरोपयोगी करुन ठेवतांना ग्रामीण अल्पभूधारक दिसून येतो. कांही प्रसंगी केवळ अविचारामुळे आपली सारी संपत्ती बरबाद करतांनाही तो दिसून येतो.

शेतात खटा असो नव्वद । परि एका हातासाठी करिती फिर्याद
सारी इस्टेट होवो बरबाद । परि लढती एका शिवीसाठी [१]

अशी भारतीय शेतकऱ्यांचो स्थिती आहे. ती बदलून जाऊन त्यांचे रुपांतर व्हावे हे सांगतांना राष्ट्रसंत म्हणतात–

' शेवटी मनुष्याचा निर्मळ व्यवहार । हाचि ठेवितो हृदयी आदर
जो परस्पराच्या हिताचा विचार । आत्मत्वाने चालवी ' २

परस्पराच्या हिताचा विचार व निर्मळ व्यवहार अर्थात ' एकमेका साहय्य करू । अवघे धरु सुपंथ ' याच न्यायाने सहकारी शेती तत्वाला राष्ट्रसंतांनी उचलून धरले आहे कारण ग्रामराज्याची सफलता तशा प्रकारच्या शेतीवर तिच्या विकासावर, उन्नतीवर व अधिकाधिक उत्पादनावर अवलंबून आहे. ज्या ग्रामनाथासाठी त्यांची ग्रामगीता आहे. त्याच्या श्रमप्रतिष्ठेकडे अखिल जगाचे लक्ष वेधावे व सुखी जीवन त्याला लाभावे हाच त्यांच्या अंतरीचा हेतू आहे.

तुझ्या श्रमांस प्रतिष्ठा मिळो । सकळांचे लक्ष तुजकडे वळो
मानवतेचे तेज झळझळो । विश्वामाजी या योगे [६]

राष्ट्रसंतांनी शेतकऱ्यांच्या परिस्थितीविषयी वरील उद्‌गार काढले, त्यांच जीवन ज्यादिवशी सुखी होईल तो आपल्या आनंदाचा दिवस राहिल असे राष्ट्रसंत म्हणतात. राष्ट्रीय पातळीपेक्षा ग्रामीण पातळीला अधिक महत्व दिले आहे. कारण राष्ट्रपातळीवरून निर्माण होणाऱ्या योजनेबद्दल विकासाच्या सुरुवातीच्या पातळीवर लोकशाहीप्रदान अर्थव्यवस्थेत काम करणाऱ्यांची आत्मियता दृढ होत नाही. मूळांत ठिसूळ असलेल्या जमिनीवर किती सुंदर इमारत बांधली तरी ती जास्त काळ टिकू शकत नाही तसेच इथेही घडते. तेव्हा राष्ट्रसंतांनी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेपेक्षा ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक महत्व दिले आहे.

ग्रामराज्याचा व अर्थव्यवस्थेचा मूळ पाया हा शेतीवर अवलंबून असल्यामुळे गावातील जे अल्पभूधारक आहेत त्यांची शेती एकत्रित करून सहकारितेच्या तत्वानुसार ती करण्यांत यावी. यांत स्वयंसहाय्य आणि परस्पर सहकार्य ही सहकारितेची तत्वे जेव्हा शेती लागवडीखाली प्रत्यक्ष उपयोगांत आणली जातात व छोट्या शेतकऱ्यांचा गट आत्मियतेने कष्ट करायला लागतो तेव्हा त्याला सहकारी शेती असे म्हणतात. यात आपणांस अनेक गोष्टी पहायला मिळतात.

---

१. ग्रामगीता अ. १६ /८० २. ग्रामगीता अ. १६ ओवी ९७
३. ग्रामगीता (अर्पण–पत्रिका)

१. अनेक शेतकऱ्यांचे सहकारी तत्वांनुसार शेतीच्या लागवडीसाठी झालेले संयुक्त एकत्रिकरण, पण हे जरी असले तरी जमिनीची मालकी कायम स्वरुपांत राखण्यांत येते. २. सहकारी शेती योजनेत सहकारी शेतीवर राबणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या योग्य श्रमाचा मोबदला मिळतो, पण व्यवस्थापनाचे कार्य संयुक्तपणे केल्या जात असल्याने खर्च अत्यंत कमी येतो. एकंदर उत्पादन रक्कमेतून राखीव निधी व शेतीच्या प्रमाणावर येणारा लागवडी सुधारणा खर्च वगळता शिल्लकी उत्पन्न शेतीच्या प्रमाणानुसार नफ्यासहित वाटून देण्यांत येते.

व्यक्तिगत मालकी, मोठे शेत, संयुक्त व्यवस्थापन हेच सहकारी शेतीचे प्राथमिक फायदे आहे. अल्पभूधारकांना स्वतंत्रपणे स्वतःच्या जमिनीची लागवड करण्यांत जो खर्च येतो त्यापेक्षा कमी खर्च येऊन उत्पादनाचे प्रमाणे अधिकतम वाढविता येते. संपूर्ण शेती यांत्रिकतेने नांगरणे, ती समान व सारख्या पातळीची करणे, खते, बियाणे, रासायनिक द्रव्यें, फवारणी आदि योग्यतेने व कमी खर्चात घड़न येते, यंत्रसामुग्री, नवी तंत्र, शास्त्रीय ज्ञान, सखोल लागवड, बहुविध पिके, पाणी पुरवठ्याच्या सोयी, उत्पादित माल ठेवण्यासाठी गोदाम, वाहतुकीचे साधने, विक्री व्यवस्था आदीचा विकास मोठ्या प्रमाणांत व आत्मियतेने करता येतो.

स्वतःच्या जमीनीची मालकी राहून शेतकऱ्याला त्यांच्या रोजच्या श्रमाचा मोबदला मिळतो. ग्रामीण मजूराला (जनतेला) भरपूर काम लाभते.

वरील प्रकारची ग्रामीण विकासाची जबाबदारी गाव कुटुंबाला पटवून दिल्यावर राष्ट्रसंत अल्पभूधारकांना, गावातील शेतकऱ्याना आव्हान करतात. प्रथम ते आव्हान त्यांनी सहकारी शेतीतून केले आहे. (सामूहिक शेतीची योजना त्यांनी मांडली नसली तरी सामुहिक जीवनाच्या चळवळीत ती त्यांना मान्य असावी असे वाटते;)

अब तो भंया। सहकारी खेती बनाओ
प्यारो मित्रो सबका भला जानो
सोया किसान जगाओ- जगाओ [१]

कृषि शिक्षणावर भर

कृषिक्षेत्रातील लोकांना किंवा नव्या पिढींना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रसंतांनी कृषि शिक्षणावर व प्रत्यक्ष कार्यावर भर दिला आहे. कृषिमहाविद्यालये, विद्यापीठे व संशोधन केन्द्रे बऱ्याच प्रमाणांत निर्माण झाली आहे. कृषि विकासाचे, शिक्षणाचे कार्य मोठ्या प्रमाणात चालतांना दिसून येते. कृषिविकासासाठी लागणारी मनोवृत्ती व श्रमप्रतिष्ठा मूळांत निर्माण व्हावी व त्यांनी कृषी कार्याला आपलेसे

१. राष्ट्रनौका पान नं. १९

करावे. यासाठी शतीतील सर्वच प्रकारची कामे करायला त्याचं मन उत्सुक व्हावं प्रत्येक ग्रामात शेतकी शाळा असाव्यात व त्या शाळातून शेती शिक्षण देऊन कृषि व्यवसायांचे तज्ञ बनविण्यांत यावेत. पुस्तकी शिक्षणाच्या आधारावर त्यांची परीक्षा न घेता प्रात्याक्षिकतेलाच अधिक महत्व असावे. सहकार्याची प्रबल भावना शिक्षणातूनच त्यांच्यात निर्माण करावी.

सामुहिक जीवन, सामुहिक जबाबदारी खांद्यावर घेऊन कार्यनिष्ठा, जिद्द आणि चिकाटी त्यासोबत अविरत परिश्रम, नवीनतेचा शोध, संशोधनात एकसारखी तल्लीनता व वैज्ञानिक दृष्टिकोन राखणे ही वृत्ती तरूणांत असल्यामुळे आज रशिया, जपान, अमेरिका, चीन आदी राष्ट्र उन्नतीच्या उंच शिखराकडे वाटचाल करीत आहेत. संशोधनाचे वेड त्यांना लागले असल्याने व त्यांच्या त्या वेडेपणामुळे ते राष्ट्र उत्कर्षाच्या उंच शिखरावर पोहचले आहे. ती परदेशी तरूणांची धुंद आपल्या ग्रामीण तरूणांत निर्माण करणे हे ग्राम कुटुंबाचे कर्तव्य आहे.

राष्ट्रसंतांनी मांडलेले विचार रशियाच्या सहकारी तत्वातून निर्माण करण्यात आलेल्या समाजवादी तत्वाचे प्रतिनिधीत्व करणारे ठरतात. रशियन क्रांतीनंतर रशियाने ग्रामोन्नती हे आपले उद्दिष्ट ठेवून ग्रामोन्नतीचा पाया सहकारी शेतीतून निर्माण केला आहे. तो इतिहास अत्यंत मौलिक असा आहे.

उद्योगधंदे – ग्रामपंचायतीचे कार्य

ग्रामराज्याच्या विकासाचा पाया सहकारी तथा सामुदायिक शेतीवर आहे तितकाच तो उद्योगधंद्याच्या ग्रामिणीकरणावरही आहे, शेती व उद्योग यांचे ग्रामिणीकरण उचित व योग्य प्रमाणात करण्यांचे कार्य ग्रामपंचायतीने करावे.

गावातील उद्योगधंदे सर्व एका परिसरात असावी. त्याचबरोबर गावातील मागासलेल्या उद्योगाचा नव्याने विकास व्हावा. हा राष्ट्रसंताचा मुद्दा अर्थवादात्मक आहे.

गावचे उद्योग मागासले । त्यांस शिक्षणाने पुन्हा उजळविले
ऐसे असावे सुधारले । गाव आमूचे [३]

त्याचेसोबत नवे-नवे संशोधन घडवून आणण्याचे कार्य संशोधन केन्द्रातर्फे नित्य चालविल्या जावे. त्यामुळे वस्तूच्या निर्मितीत उत्पादन खर्च, वस्तुचा आकार, वस्तुची सुयोग्य उपयोगिता वाढविण्यांस सहकार्य लाभेल.

सर्वोतोपरी सुसज्ज संशोधन केन्द्र, प्रयोगशाळा तरुणांसाठी उपलब्ध असाव्यात व अखंड संशोधनाचे कार्य त्यातून सतत होत राहावे. नवे-नवे उद्योग निर्माण करून जीवनावश्यक वस्तुची निर्मिती त्यातून घडवून आणावी.

---

३. ग्रामगीता अ. १८ ओवी ७०

– गावीच यंत्रे निर्माण करावी –

उद्योग धंद्यासाठी लागणारी यंत्रे आपल्या गावातच निर्माण करण्यांत यावीत. त्यासाठी परदेशाला भीक मागण्याची पाळी आपल्यावर येऊ नये. ही अपेक्षा ते व्यक्त करतांना दिसून येतात.

आज परदेशाच्या यंत्रसामुग्रीवर भारतातील उद्योग धंदे बऱ्याच प्रमाणांत अवलंबून आहे. ती अवस्था राहू नये. आर्थिक विकास जर घडवून आणायचा असेल तर उत्पादनासाठी लागणारी यंत्र सामुग्री गावात किंवा देशांतच निर्माण व्हायला हवी. त्यात नवीनतेने संशोधन ही व्हायला हवे. तेव्हाच औद्योगिक विकास खऱ्या अर्थाने यशस्वी होऊन संशोधन आणि उत्पादनाच्या भरीव प्रक्रिया वैज्ञानिक दृष्टीने प्रगत होऊन उत्पादन प्रक्रियेचे उद्दिष्ट पूर्ण होण्याचे ध्येय गाठता येते. ग्रामात निर्माण होणाऱ्या लघू व कुटिर उद्योगासाठी जी यंत्र सामुग्री आवश्यक आहे ती गावातच निर्माण व्हावी. (ग्रामराज्यासाठी राष्ट्रसंतांनी मोठ्या यंत्राचा पुरस्कार केला नाही हे स्पष्ट आहे) व तिचे दुरुस्तीकरणही गावातील वर्कशॉप मध्ये पूर्ण व्हावे. त्यासाठी गावातील निपूण कलावंतांना उत्तेजन द्यावे उचित–योग्य प्रशिक्षणासाठी सुयोग्य तरूणांना बाहेर देशी पाठविण्यांत यावे.

उद्योग धंद्याचा सर्वंपरी विकास गावात व्हावा. तो कसा करावा हे ग्राम जीवनातून ठरवावे.

– भांडवल निर्मिती –

सहकारी तत्वाने भांडवलाची निर्मिती व्यवसायासाठी करावी असे मत व्यक्त केले.

अपना अपना 'शेअर' मिलाके । सुख पाओ सब चीज बनाके
सब ही मुनाफा लो बटवाके
प्राप्त करो सब श्रम करवाके । सुन्दर ग्राम बनाओ
सब बेपार बने सहकारी । खाना पीना चीजे सारी
नहि हो एक लुचपत खोरी
तुकड्यादास कहे सूनो मेरी । समाज उँचा उठाओ ?

त्याचबरोबर गावाची बँक असावी. गावात उद्योगप्रियता राहावी यासाठी मरगटलेल्या जुन्या रूढीपरंपरा, व्यसनाधिनता, वाईट चालीरीती, आदीचा शिरकाव ग्रामजीवनांत होवू देता कामा नये. कारण तो आर्थिक विकासाला घातक असतो.

गावातील आदर्श मानवी जीवनाच्या प्रगतीचा, विकास मार्ग, उद्योगप्रियता, प्रयत्नशीलता, श्रमप्रतिष्ठा, सभ्यता, नवनिर्माणता, सामुदायिकता भव्यता आणि दिव्यता आदी गोष्टीवर अवलंबून राहते. आदर्श गाव एक आरसा असावा व सर्वाचे कार्य गावाला जबाबदार असावे.

शैक्षणिक विचार

जगातील अनेक शिक्षणतंज्ञांनी शिक्षणांची विविध उद्दिष्टें सांगून शिक्षण प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट केले आहे. 'व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास' हे प्रमुख उद्दिष्ट प्रत्येकांनी सांगितले आहे.

भारतीय शिक्षण पद्धतीत महात्मा गांधीजींनी मांडलेले विचार अत्यंत महत्वपूर्ण आहे. 'थ्री. एच' ही म. गांधीची शिक्षण विषयक कल्पना होती. म. गांधीजींची विचारसरणी पाश्चात्य विचारवंत शिक्षणतंज्ञ प्लेटोच्या शिक्षण विषयक विचाराशी अत्यंत समरस होणारी आहे. 'मनुष्याच्या जन्मजात निसर्ग-शक्तींना जागृत करून पूर्णत्वाप्रत नेण्याच्या क्रियेलाच त्यांनी शिक्षण असे म्हटले आहे'

प्लेटो व भारतीय शिक्षणतंज्ञ म. गांधीजींनी सर्वांगीण विकास किंवा उन्नती हाच शिक्षणाचा मुख्य पाया मानला आहे. राष्ट्रसंतांना सुद्धा विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास हे उद्दिष्ट मान्य आहे.

द्यावे जीवनाचें शिक्षण । जेणे कार्यकर्ते निघतील पूर्ण
सर्वांगीण उन्नतीचे ज्ञान । द्यावे तया आश्रमस्थानी [1]

शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ व्यक्तिमत्वाचा सर्वांगीणविकास हे राष्ट्रसंतांना मान्य असले तरी राष्ट्रसंताच्या कार्याचे मूळ ग्राम आहे. ग्रामापासून तर विश्वापर्यंत वाटचाल करतांना ते दिसून येतात. ग्राम-विकास हा अत्यंत महत्वपूर्ण भाग आहे. ग्रामाचा विकास झाला नाही तर व्यक्ति-विकासाला कांही अर्थ उरत नाही. ग्राम विकास जर सर्रास होत गेला तर राष्ट्रविकास सहज होतो. असा राष्ट्रसंताचा विश्वास आहे. ग्राम व राष्ट्रविकासाचे धोरण ठरल्यावर, त्यानुसार शिक्षण पद्धती असावयांस पाहिजे. व्यक्तिविकास तोच की जो ग्राम आणि राष्ट्राला उपकारक होईल. अन्य व्यक्तिविकासाला राष्ट्रसंत मान्यता देत नाही.

देशाचा विकास हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. विकसित देशाला त्या देशाची जशी गरज असेल त्याप्रमाणे शिक्षण देणे आवश्यक असते. व्यक्ती ही देशावर अर्थात सरकारवर अवलंबून न राहता ती स्वत:च्या बळावर जीवन जगू

---

१. ग्रामगीता अ. ३ ओवी ९६

शकेल व जीवन जगतांना जी कर्म ती करत असेल ते कर्म 'मी माझ्यासाठी करत नसून माझ्या देशासाठी करतो आहे' ही विचारधारा त्यांच्या अंतःकरणात रुजायला पाहिजे. जपानचा विद्यार्थी किंवा रशियाचा विद्यार्थी जे शिक्षण प्राप्त करतो ते त्याच्या देशासाठी असते. तेथे मी हा शब्द महत्वाचा नसतो. देश विकासाबरोबर व्यक्तिविकास सहज होत असतो. हे त्या राष्ट्रांनी सहजतेने दाखवून दिले आहे.

देश को उचा उठाना है। तो शिक्षण की प्रथा बदलो

आजची शिक्षण पद्धती राष्ट्रसंतांना समाधान प्राप्त करुन देऊ शकत नाही. ज्या शिक्षणामुळे राष्ट्राची पुढील भावी पिढी कष्टिक आणि बलवान व कर्तव्यदक्ष होणार नसेल ती शिक्षण पद्धती त्या देशाच्या विकासाच्या दृष्टीने अयोग्य होय. हे राष्ट्रसंताचे मत आहे. 'देश' हा त्यांना सर्वार्थाने मोठा व अभिमानाचा वाटायला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनात 'माझा देश माझे घर' असे विचार निर्माण व्हायला पाहिजे.

ही राष्ट्रसंतांनी व्यक्त केलेली अपेक्षा आज पाश्चिमात्य देशाकडे पाहिल्यावर सहज लक्षात येते. १९४९ ला स्वतंत्र झालेला चीन देश व त्यांची वैज्ञानिक प्रगती, त्याचे महत्वपूर्ण कारण म्हणजे माओ-त्से-तुंगने चीनच्या जनतेत निर्माण केलेली राष्ट्रनिष्ठा व चीनची शिक्षण पद्धती होय; तसेच रशियाचे शिक्षण पश्चिमेला आव्हाण आहे.

भारताच्या पहिल्या पंतप्रधानांनी (पं. नेहरु) टाईम्सच्या २५-८-५८ च्या अंकात म्हटल्याप्रमाणे सोव्हियत शिक्षण पद्धतीला त्यांनी सर्वात मोठे प्रशस्तिपत्र दिले आहे. ही पद्धती सर्वोत्कृष्ट पद्धती असा तिचा गौरव त्यांनी केला आहे. या पद्धतीत व्यक्तीमत्व किंवा व्यक्तितत्व मुरगळून टाकले जाते हे त्यांना मान्य आहे पण शिक्षणाचा प्रचार व प्रसार ही एक शृंखलाछेदक शक्ती आहे आणि अंती ती व्यक्तितत्वावरची बंधने नष्ट केल्याखेरीज राहणार नाही असा अभिप्राय त्यांनी प्रगट केला आहे. तशाच प्रकारचा अभिप्राय अमेरिकन शिक्षण तंज्ञ 'इनसाईड रशिया टुडे' या पुस्तकांचे लेखक जॉन गुंथूर यांनी देखील व्यक्त केला.

उच्चत्तम संस्कृतीमुळे, उच्च जीवन मूल्यांमुळे मानवाच्या लढाऊ सामर्थ्यात उणीवा निर्माण होतात हे जाणून त्या श्रेष्ठ संस्कृतीतून निर्माण होणारी धर्मनिष्ठा नीतिनिष्ठा, संघविद्या, विवेकबल हे गुण व संस्कृतीतून प्राप्त होणारे शास्त्रज्ञान व औद्योगिक धन व तज्जन्य श्रेष्ठ संहार सामर्थ्य यांची जोपासना केल्यास ते राष्ट्र दण्डसत्तेला आव्हान देण्याला तयार होऊ शकते असा दांडगा विश्वास राष्ट्रसंतांना आहे. याच विचारातून त्यांनी आपली शिक्षण पद्धती मांडली आहे. तरुण हेच वरील विचाराचे पाईक आहे तेव्हा त्यांना त्यांची जबाबदारी सांगतांना म्हणतात-

चाहे बना दे इसे स्वर्ग भूमी
चाहे लगादे नरक की निशानी
तेरी चलन पर है भारत की नैया
तू सोचले सारा काम । सुनले भारत के प्यारे जवान
तुझपे सोपी है जिन्दगी तमाम [१]

तरूणांवर त्यांनी आजच्या स्थितीची संपूर्ण जबाबदारी टाकली आहे. ग्राम हा त्यांच्या विकासाचा पहिला पाया आहे. त्यातूनच त्यांना ते राष्ट्राकडे–मानवतेकडे घेऊन जातात. काय करायचं त्यांची निश्चित दिशा, उद्दिष्ट समोर ठेऊन राष्ट्रसंत म्हणतात–

म्हणे तुकड्या सु-राज्यानें । रमो सौंदर्य या लोका
शिपाई व्हा तरूणांनो । रक्षण्या देश, मानवता [२]

सुराज्य, सौंदर्य लोकांत त्याच वेळेला येऊ शकेल की ज्यावेळी त्यांना उन्नतीच्या दृष्टीने जीवनाला आवश्यक असलेल्या संपूर्ण अंगाचे शिक्षण योग्यतेने दिल्या जाईल.

जीवन– शिक्षण प्रणाली

जीवन जगण्याचे सामर्थ्य शिक्षणाव्दारे लोकांत निर्माण व्हावे. हे शिक्षणाचे पहिले उद्दिष्ट असावे. हे राष्ट्रसंतांना मान्य आहे. सर्वांगीणतेत त्यांचे जीवन उद्योगी व आदर्शवादी होण्यासाठी जीवनावश्यक मूल्यांची जोपासना, मानवी मूल्यांची जोपासना त्यांत होणे श्रेयस्कर ठरते. कारण भूकेलेल्या माणसाला तत्व-ज्ञानाची आवश्यकता नसते. त्यांच्या जीवनाचे प्रश्न अत्यंत महत्वपूर्ण ठरतात. संघर्षमय जीवनांत जीवन जगतांना त्यांच्या पोटाचा प्रश्न बिकट असतो. सुरवातीला त्यांच्या जीवनाला आवश्यक होईल असे शिक्षण निर्माण करून देणे आवश्यक असते.

अमेरिकन शिक्षण तज्ञ जॉन ड्यूई ने शिक्षण विषयक सर्व विचार आपल्या स्वानुभव व प्रयोगशिलतेचा परिपाक यांच्या बळावर मांडले आहे. त्याने पूर्वापार चालत आलेल्या, केवळ आत्मचिंतनातून विचाराच्या विलासातून जन्माला आलेल्या शुद्ध बौध्दिक, वैचारिक पुस्तकी ज्ञानाचा निषेध केला आहे. हे तत्वज्ञान केवळ विचारवंताच्या, शाळा, कॉलेजातील विद्यार्थ्याच्या अभ्यासाचा एक भाग ठरु शकते पण दैनंदिन जीवनांत व्यवहारात उपयुक्त ठरत नाही. जीवनातील समस्या सोडविण्यासाठी, जीवन अधिक सुंदर व प्रगत करण्यासाठी त्या तत्वाची व शिक्षणांची आज गरज आहे.

---

१. क्रांती दिप भजन १८ १. राष्ट्रीय भजनावली भजन ६२ वे

भारतीय संस्कृतिचे कट्टर अभिमानी, प्रज्ञावंत स्वामी विवेकानंद यांनी देखील पुस्तकी ज्ञानाला व पुस्तकी शिक्षणांचा विरोध केला आहे. त्यावर टीका केली आहे. ते म्हणतात 'प्राचीन काळी समृद्ध असलेला आपला देश आज अन्नाला मोताद झाला आहे ज्या शिक्षणांतून जीवन संघर्षाला तोंड देण्याचे सामर्थ्य लोकांमध्ये निर्माण होत नाही, चारित्र्य निर्माण होत नाही, बंधूत्वाची भावना विकसित होत नाही. पराक्रमाची प्रेरणा मिळू शकत नाहीं. ते शिक्षण काय उपयोगाचे–काय कामाचे ? गुरुवर्य टागोर (रविन्द्रनाथ टागोर) शिक्षणाबद्दल बोलतांना शिक्षणांचा प्रत्यक्ष संबंध जीवनाशी, जीवनानुभवांशी जोडला पाहिजे. त्यासाठी शिक्षण हे प्रत्यक्ष जीवनांतून दिले पाहिजे. म. गांधींनी शिक्षणाचे स्वरुप सांगतांना आपल्या मुलोद्योगी शिक्षणाला 'जीवन–शिक्षण किंवा जीवन–विद्या' या नावाने संबोधले आहे. 'मुलांच्या शिक्षणांची सुरवात करतांना त्याला एखाद्या उपयुक्त असा हस्त व्यवसाय शिकविणे व तद्द्वारा उत्पादन निर्माण करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होईल याला मी प्राधान्य देईन, आचार्य विनोबा भावे यांनी अगदी स्पष्ट स्वरूपांत म्हटले आहे की 'उद्योगाशिवाय किंवा जीवनाच्या गरजा भागविण्यांस असमर्थ असलेले ज्ञान निरर्थक आहे'

वं. राष्ट्रसंतांनी अगदी वरील प्रकारचे आपले विचार मांडले आहे. जीवनावश्यक गरजा किंवा प्राथमिक गरजा ज्यातून मिटविता येईल इतकेच नव्हे तर त्यातून स्वतःच्या जीवनाचा; उदरनिर्वाह चालविण्याचे साधन सापडेल तेच शिक्षण उपयुक्त होय.

जीवनाच्या गरजा संपूर्ण । निर्वाहाचे एकेक साधन
संबंधित विषयांचे समग्र ज्ञान । यांचा अंतर्भाव शिक्षणी [१]

धंद्यातील संपूर्ण ज्ञान त्याला अवगत असणे क्रम–प्राप्त आहे. अर्धवट ज्ञान हे नेहमीच धोकादायक असते. अधिक ज्ञान प्राप्त असलेला व्यक्ती त्यांच्या धंद्यावर मात करून जातो व शेवटी त्यांची हीन–दीन अवस्था होते. याला कारण धंद्यातील ज्ञानाची तफावत होय !

म. गांधी व राष्ट्रसंताचे शैक्षणिक विचार –

मूलोद्योग शिक्षण पद्धतीत महात्मा गांधीजींनी वरील प्रकारचे विचार मांडले आहेत. सन् १९३७ ला महात्मा गांधींनी शैक्षणिक विचार शिक्षण तज्ञ, शिक्षणशास्त्रज्ञ व अन्य विचारवंतांसमोर मांडले. त्याप्रसगी आचार्य विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, नरेन्द्र देव, काका कालेलकर; आर्यनायकम् डॉ. झकीर हुसेन व बाळासाहेब खरे आदि उपस्थित होते.

---

१. ग्रा. गी. अ. १९ ओ. २२

महात्मा गांधीजींनी स्वदेशी मालाच्या चळवळीबरोबर मूलोद्योग शिक्षण प्रणालीकडे सर्वांचे लक्ष वेधले. म. गांधीजी शिक्षणाविषयी बोलतांना म्हणतात मुलांना शिक्षण देतांना एक गोष्ट लक्षांत असायला हवी की आध्यात्मिक विकास, हे तर शिक्षणाचे परमोच्च ध्येय आहे परंतु ते जीवनोपयोगी असावे, ज्या शिक्षणांतून आपल्या पायावर उभे राहून पोट भरण्याचे सामर्थ्य विद्यार्थी वर्गात निर्माण होऊ शकत नाही. इतकेच नव्हे तर जीवनातील निरनिराळ्या समस्यांना तोंड देण्याची शक्ती निर्माण होऊ शकत नाही असे शिक्षण सामान्यत: निरूपयोगी आहे. हस्तव्यवसायांचा शिक्षणांत अंतर्भाव करून विद्यार्थ्यामध्ये उत्पादन क्षमता निर्माण करणे हाच त्यांचा दृष्टिकोन होता.

शिक्षणांतची जीवनाचे काम । दोन्ही सांगड व्हावी उत्तम
चिंता नसावी भोजनासाठी दाम । मागण्यांची भीक जैसी [१]

मानवी जीवन सुंदर करण्याकरिता शिक्षण आहे. त्यासाठी निर्धाराने पुढे येऊन कार्यात मग्न राहणे उचित असते.. त्यामुळे दुर्बलता राहत नाही. दुर्बलता मानवी जीवन विद्रुप करुन टाकते. याची जाणीव होती म्हणून ते म्हणतात–

याच साठी शिक्षण घेणे । जीवन जगता यावे सुंदरपणे
दुबळेपण घेतले आंदणे । शिक्षण त्यासी म्हणू नये [२]

आजचे शिक्षण दुर्बलता निर्माण करणारे आहे. कार्यक्षम करणारे नाही. इतकेच नाही तर निराशावादी झाले आहे. विद्यार्थ्यांनी आजपर्यन्त केलेले उठाव, पदवीदानावर टाकण्यात आलेला बहिष्कार, सुशिक्षितांची बेकारी व दरवर्षी त्यात होणारी वाढ, ही सर्व आजच्या शिक्षण पद्धतीची कृपा होय;

आजचे शिक्षण पुस्तकी स्वरूपाचे आहे. भांडवलदारी अर्थव्यवस्था कायम राखण्यासाठी व वृद्धिंगतेसाठी या पद्धतीचा उपयोग अविकसित देशांत केला जातो व दुसऱ्या बाजूने विकासाचे पाये–मुळे खोदून काढल्या जातात. हा सर्वसाधारण सिध्दांत आहे, प्रत्येक व्यक्तिमध्ये निर्भयता, शौर्यतेज व सामर्थ्य यांचा अविष्कार झाला पाहिजे. तसे होत नसेल तर राष्ट्रसंत त्याला शिक्षण म्हणत नाही.

गांधीजींच्या मूलोद्योग शिक्षण पद्धतीला काळानुसार थोड्या प्रमाणात बदलविण्याचा प्रयत्न राष्ट्रसंतांनी केला आहे. राष्ट्रसंतांचा उद्देश 'ग्राम विकास' असल्याने, ग्रामविकासाला योग्य अशा शिक्षण पध्दतीबाबत राष्ट्रसंताने आपले अत्यंत महत्वपूर्ण विचार मांडले आहे. शहरी जीवनापेक्षा राष्ट्रसंतांचे लक्ष ग्रामीण विभागाकडे व जीवनाकडे अधिक आहे. 'ग्राम' हे त्यांचे 'हृदय' असल्यामुळे त्याला उपयुक्त होणारी शिक्षणप्रणाली त्यांनी मांडली आहे. ग्रामीण

---

१. ग्रा. गी. अ. ९ ओवी १०. २. ग्रामगीता अ. १९ ओवी ११

जीवनाला उपयुक्त होईल असे लघू व कुटिर उद्योग हे एकमेव केन्द्र न मानता त्या-त्या प्रदेशातील प्राकृतिक परिसर, सांस्कृतिक व शारीरिक अशा समन्वयाचा उल्लेख त्यांनी अभ्यासक्रमात केला आहे.

वरील प्रकारचा उल्लेख म. गांधींच्या मूलोद्योग शिक्षण पध्दतीत आपणांस दिसून येतो. म. गांधींच्या मते मूलोद्योगी शाळा स्वाश्रयी असाव्यात तसे मत राष्ट्रसंतांनी व्यक्त केले आहे. पण वाढत्या गरजा, आर्थिक घडामोडी इत्यादींचा विचार केल्यावर विद्यार्थ्यांवर येणारा अतिरिक्त भार गावाने आर्थिक मदत करून कमी करावा असा विचार त्यांनी मांडला आहे.

म. गांधींनी सर्वांगीण विकास ह्याबाबत आपले विचार मुक्तकंठाने मांडले आहेत.

म. गांधींचे विचार राष्ट्रसंतांना मान्य असल्याचे आपण अगदी सुरूवातीला पाहिले आहे. सर्वांगीण विकासात गांधीजींनी आध्यात्मिक विषयाला सर्वोच्च स्थान दिले आहे. अध्यात्मिक विकास म्हणजे मोक्ष किंवा मुक्ती हे जसे म. गांधींना मान्य नाही तसेच राष्ट्रसंतांनाही.

क्यों लोभसे मुझे फसाते, मुक्ति और मोक्षके
दोन्हौ भी है बेकार हमको, हम तो सेवा पक्षके
भक्ती हमारा ब्रीद है, देश सेवा मोक्ष है
चाहे जनम लाखो मिले बिघडे नही यह लक्ष है [१]

उलट मानवतेची सेवा, दीनदुबळ्यांची सेवा, दुःखी कष्टीतांची सेवा म्हणजे इश्वर सेवा असे म. गांधीजींचे मत होते तर राष्ट्रसंत दुःखाने पोळला, द्रव्याने नाडला, कष्टाविण झाला पंगु जैसा । तेसियास आधार देऊनि चालवा । हातभार द्यावा होईल तैसा उद्योगाचे अंग दाखवावे तया, व्यर्थ पोसुनिया ठेऊ नये.

शेवटी म. गांधी व राष्ट्रसंतांना ' जनसेवा ही ईश्वर सेवा ' हे तत्व मान्य होते. त्या तत्वाचा समावेश त्यानी आपल्या शिक्षण पद्धतीत केला आहे. हेच त्याचे आध्यात्मिक शिक्षण होय !

– राष्ट्रसंतांची ग्रामीण शिक्षण पद्धती –

भारतासारखा ग्रामिणतेने भरलेला देश, या देशातील खेडी जर स्वयंपूर्ण झाली, उद्योगी झाली तर देश विकास सहज घडू शकेल. आतापर्यंत उपेक्षितांच जीवन जगणाऱ्याना नवजीवन प्राप्त करून द्यायचे असेल तर ग्रामविकासाच्या दृष्टीने उचित असे शिक्षण त्या ग्रामातील विद्यार्थी वर्गाला मिळायला पाहिजे. ग्राम कसे असावे याची शुध्दत्वाची योजना स्पष्ट स्वरूपात डोळ्यासमोर असणे

---

१. मेरी जीवन यात्रा पान १०५/२६

आवश्यक आहे. राष्ट्रसंतांची शिक्षण पध्दती ग्रामनिष्ठेतून राष्ट्रनिष्ठेकडे वाटचाल करतांना दिसून येते. गावातील विकासकार्याला प्रत्येक व्यक्तीचं सहकार्य मिळणे अत्यावश्यक आहे कारण 'नव्हे ते एकट्याचे काम' आज संपूर्णतः सहकार्याची भावना अत्यंत दुर्लभ होत आहे. व्यक्ती-व्यक्तीपासून दूर होत आहे. मानवी सहकार्याची भावना ही सहकार्याच्या तत्वावर अवलंबून आहे. समाजाभिमुखतेची प्रवृत्ती सहकार्यातून निर्माण होते. याची जाणीव राष्ट्रसंतांना होती. व्यक्तीनिष्ठ शिक्षण पध्दती बदलून समाजनिष्ठेकडे तिला वळवायचे असेल तर सहकार्याची भावना प्रत्येकांत निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असावे.

सहकार्याची प्रबळ भावना । हेचि शिक्षणाचे मुख्य सूत्र जाणा
सहकार्याविनाची शिक्षणा । महत्व नाही !

प्रत्येक क्षेत्रात दिसणारी विषमता व तिचे मूळ कारण या देशातील शिक्षण प्रणाली होय ! ती व्यक्तिगत विकासाच्या मूल्याकडे जाणारी असल्यामुळे परस्परात प्रेमाची, सहानुभूतीची व सहकार्याची भावना विकसित न होता ती संपुष्टात येत आहे. ग्रामीण शिक्षण पध्दतीचा पाया सहकार्याच्या तत्वावर आधारित असावा. आज रशियात या पध्दतीचा ग्रामीण व शहरी शिक्षणातून उपयोग केला जात आहे. त्यांच्या विकासाची गती निश्चितच अनेक अविकसित राष्ट्रांना प्रेरणादायक स्वरूपाची आहे.

रशियाची तरूणाकडे बघण्याची विचारधारा लिओनिद ब्रेझनेवच्या मतानुसार (सोवियत समीक्षा ४०/१९७९) 'आम्ही तरूणांच्या पक्षाचे आहोत आणि भवितव्य तरूणाच्या हाती आहे. आमचा पक्ष नाविन्यकाराचा पक्ष आहे आणि तरूणच नेहमी नाविन्यकाराचे अनुकरण करतात. जीर्णशीर्ण व्यवस्थेविरूध्द लढा नेहमीच तरूण लोक अंगिकारत असतात.'

आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाच्या बाबतीत युवकांची भूमिका पूर्वीच्या मानाने आता खूपच वाढली आहे. राज्यकारभार, विज्ञान, संस्कृती आणि सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रामध्ये आज युवक महत्वाची भूमिका पार पाडत आहे. युवकांच्या सहभागाखेरीज देशांतील कोणत्याही प्रकल्पाची उभारणी करता येणार नाही. 'व्यक्तिनिष्ठेने भयानक दुःख; मानव जीवनी' हे राष्ट्रसंत ओळखून होते. विद्यार्थी हा राष्ट्रकार्यापासून वेगळा नाही. ज्यांचे विभाजन होऊ शकत नाही. असा, पण उद्याचा तो शिल्पकार आहे. त्याच्या हातून उद्याची शिल्पकलाकृती उत्तम घडवून आणायची असेल तर रशियन विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांना पुढे आणण्यांत यावे व त्याचप्रमाणे सरकारचे, ग्रामाचे सहकार्यही त्याला भरपूर प्रमाणांत लाभावयांस पाहिजे व समाजाने त्याला उचलून धरावे. शिक्षणांची जबाबदारी आपल्या खांद्यावर घ्यावी. गावाने शिक्षण कार्यासाठी आपली संपत्ती पुरवावी.

गरीब असो वा श्रीमंत असो प्रत्येकाने आपल्या मुलाला शिक्षण देऊन अनेक कला-विद्या शिकविण्याला स्वत:ला बांधून घ्यावे. समाजवादी व साम्यवादी देशांत शिक्षणाची जबाबदारी ही सरकारची असते मुले ही राष्ट्रची संपत्ती असल्याने त्यांना शिकविण्याचे कार्य राष्ट्राचे राहते. 'संपत्ती आणि सतती/सगळी गावाची ठेव निश्चिती' असा विचार 'ग्रामराज्यांत' राष्ट्रसंतांनी मांडला आहे.

रशियांतील पायोनियर युवक संघटना शाळा, कुटुंब आणि समाजाच्या बरोबरीने शाळकरी मुलांना शिक्षण देत आहे. ती बालकांमध्ये सामाजिक दृष्टचा श्रमविषयी प्रेम व ज्ञानपिपासा निर्माण करते. त्यातून मुलांना सामाजिक कार्याची मूलतत्वे ठाऊक होतात. बालकांमध्ये कम्युनिस्ट जाणीव आणि नीतिमत्ता रूजबिण्यांत, येते तसेच सामुदायिकत्वाची आणि बंधूत्वाची भावना; विषयीची भक्ती निर्माण करते. बालकांचे शालेय आणि कौटुंबीक जीवन व्यापावे अशी खबरदारी घेत असते. शाळेच्या वेळानंतर कम्युनिस्ट युवक संघाचे सदस्य बालकांसाठी शैक्षणिक व शिक्षणाला पुरक कार्यक्रम चालवित असतात.

अशाच संस्था भारतात ग्रामीण विभागात असाव्यात असे राष्ट्रसंतांना वाटते. विद्यार्जनाच्या आवडीकडे, त्यांच्या वृत्तीकडे, लक्ष पुरविण्यांत यावे, ज्यात त्यांचे मन रमत असेल, आवड निर्माण झाली असेल त्या क्षेत्रांत त्याला पारंगत करून त्याला नाविण्यपूर्ण संशोधन करण्यांस प्रवृत्त करावे. ही पूर्णत: जबाबदारी ग्रामाची व त्या संस्थेची राहील. शिक्षणातून त्याला पोटाचा प्रश्न सोडविता यावा.

मुलांत असावा एखादा गुण
त्याने पोट भरेल त्यात । निपुण
नये संसारामाजी अडचण । कोणत्यापरी [१]

उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटल्यावर त्याला औद्योगिक प्रगतीच्या दृष्टिने एक अत्यंत महत्वपूर्ण उद्योग शिकविण्यांत यावा. त्याचबरोबर कुठलेही काम करण्याची वृत्ती त्यांच्या अंतरी निर्माण होईल अशी त्याची मनस्थिती निर्माण करावी.

जीवनाचे प्रत्येक अंग । शिकवावा महत्वपूर्ण उद्योग
काम करण्याची चांग । लाज नसावी विद्यार्थी [२]

काम करण्याची लाज नसेल तर कुठल्याही प्रकारचे काम तो सहजतेने करील. प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण होणार नाही, किंवा कुठलेही काम अडून राहणार नाही. प्रत्येक व्यक्ती आपल्या उद्योगांत पारंगत झाली तर उद्योगाचे जग निर्माण होईल.

---

१. ग्रा. गी. अ. १९ ओ. ११ २. ग्रा. गी. अ. १९ ओ. ६६

जो माणूस आपल्या व्यवसायांत पारंगत होतो तो स्तुतीला पात्र आहे पण जो आपल्या शागिर्दाला त्यांच्या व्यवसायांत पारंगत करतो त्याची स्तुती करावी तेवढी थोडोच आहे' अशी एक म्हण लोकप्रिय आहे. आंदोलन करायचे झाल्यास ते प्रकल्पावर, औद्योगिक आणि शेतकी प्रकल्पावर, करावे.

उत्कृष्ट कामगारांनी; तरूण लोकांनी निवडलेल्या व्यवसायाविषयी प्रेमाची व अभिमानाची भावना अंतरी ठेवावी व त्याचबरोबर कामाची समाजाला काय आवश्यकता आहे. हे पटवून देण्यांत त्यांनी यशस्वी व्हावे. अशाप्रकारची भूमिका कम्युनिस्ट राष्ट्रांत प्रामुख्याने पाळली जाते. तिच भूमिका राष्ट्रसंतांना मान्य आहे. आज रशिया, चीन, जर्मन, इस्त्राईल, जपान इत्यादी देशांचे युवक संशोधनाच्या कार्याकडे वळले आहे. आर्थिक व ओद्योगिक कार्यात त्यांच्या संशोधनाने अभूतपूर्व यश संपादन केले आहे. त्याच बरोबर सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत त्याचे महत्वपूर्ण योगदान आहे.

भारतासारख्या अविकसित राष्ट्राचा विकास करायचा असेल तर पुस्तकी शिक्षणपद्धती बदलून प्रत्यक्ष कार्य करावयांस लावणाऱ्या प्रात्यक्षिक अनुभवावर, शास्त्रविज्ञानावर आधारित असणाऱ्या शिक्षण पद्धतीचा प्रचार व विकास करणे अत्यावश्यक आहे.

ग्रामीण शिक्षण प्रणालीतील विषयांच्या संदर्भात बोलतांना राष्ट्रसंत म्हणतात.

विद्यार्थी कार्याने सुरवात करतो । त्यांत शास्त्रादी सारी
नाही तरी वाचन पठणाचे परोपरी । कांही करवेना अंगाने [१]

जीवनावश्यक शिक्षणाचा भार त्यांच्यावर शिक्षणाच्या द्वारे करण्यांत यावा, ती सर्व कामे प्रत्यक्षांत त्यांच्याकडून करून घ्यावी जेणे करून शिक्षण आणि जीवन यांची फारकत होणार नाही.

ऐसे जीवन आणि शिक्षण । यांचे साधावे गठबंधन
प्रथम पासून सर्वांगीण । शिक्षण द्यावे तारतम्ये [२]

अशा स्वरुपांतील ग्रामीण शिक्षणाची योजना त्यांनी आखली आहे, गावातच औद्योगिक यंत्रे तयार करावी. गावच्या आवश्यकतेनुसार उद्योग व त्या उद्योगाचे उचित शिक्षण निर्माण करावे. त्यामुळे बेकारी उद्भवणार नाहीं. उद्योगाची कास धरल्याने उन्नतीचे; जीवनाच्या प्रगतीचे मार्ग साध्य होतील असा त्यांना विश्वास आहे.

---

१. ग्रा गी. अ. १९ ओ. ६२ २. ग्रा. गी. १९ ओ. ६५

– शैक्षणिक तत्वाचा व इतर गोष्टीचा शिक्षणप्रणालीतील उपयोग –

राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामीण शिक्षणांत शैक्षणिक तत्वाचा चांगला उपयोग केला आहे. व्यक्ति-विकासासाठी शिक्षणांचा उपयोग असतो पण व्यक्तिविकास शिक्षण पध्दतीच्या असंविधी पध्दतीवर बराच अवलंबून असतो. हे त्यांना मान्य असले तरी व्यक्तिविकास हा बाह्य वातावरणावर अधिक अवलंबून असतो. हा अनुभव त्यांना प्राप्त आहे. 'शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी' असं नेहमीच, निश्चित स्वरूपात घडेलच असं म्हणता येत नाही. पाश्चिमात्य शिक्षणतज्ञ देखील असेच विचार मांडतांना दिसून येतात. ज्ञानार्जनात अनुवांशिकतेपेक्षा अधिक प्रमाणात वातावरणाचा प्रभाव दिसून येतो. म्हणून राष्ट्रसंत म्हणतात–

कोणी म्हणती जातची मूर्ख । मुले कैसी निघती चलाख
कांही जाती मुळातची चोख । हुशार असती शिक्षणी

वरील मत राष्ट्रसंतांना मान्य नसावे कारण पुढे ते म्हणतात–

भोवती बुद्धीवंताचा मेळावा । चावयांस सत्वशिल मेवा
घरीदारी सहवास बरवा । त्याची उन्नती सहजची [१]

सभोवतालचे व घरातील वातावरण शिक्षणाच्या प्रवृत्तीला पोषक असले की सहज उन्नती व्हायला लागते. राष्ट्रसंताच्या जीवनाचा विचार करता त्याचे हे मत ग्राह्य ठरवावे लागेल.

त्याचबरोबर विद्यार्थ्याला चांगला सहवास लाभेल. त्याच्या जीवनाचा दर्जा सुधारेल अशी सुधारणा करण्यात समाजाने स्वतःला जबाबदार धरावे व ज्ञानवंताचा समाज निर्माण करावा.

त्याला सहवास उत्तम द्यावा । दर्जा जीवनाचा वाढवावा
त्याने समाज होईल नवा । ज्ञानवंताचा निर्माण [२]

समाजातील युवकांची पूर्ण प्रगती व्हायची असेल तर समाजाने त्यांच्या प्रगतीचे मार्ग उघडे करून सर्वोतोपरी उचित सहकार्य करायला तयार असले पाहिजे. रशियातील पायोनियर संस्थेप्रमाणे समाजाने पुढे यावे. जिवन व शिक्षणाचा योग्य मेळ त्यांच्यात निर्माण करावा. शिक्षणातून उचित जीवन त्याला जगता यावे अर्थात जीवन व शिक्षण यांचे योग्य गठबंधन आवश्यक आहे.

'ऐसे जीवन आणि शिक्षण । यांचे साधावे गठबंधन
प्रथम पासूनची सर्वांगिण । शिक्षण द्यावे तारतम्ये [३]

---

१. ग्रामगीता अ. १९ ओवी ९०
२. ग्रामगीता अ. १९ ओवी ९३
३. ग्रामगीता अ. १९ ओवी ६५

समाजाने आपली जबाबदारी सांभाळतांना विद्यार्थ्यांच्या अभिरूचीचा विचार त्यांच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने लक्षांत घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांची अभिरूची ज्यात असेल त्यानुसार योग्यतेच शिक्षण त्याला देण्यांत यावे. अर्थात असे झाल्यास विद्यार्थ्यांचा मानसिक व बौद्धिक विकास सहज साध्य होऊन ते अधिक कार्यक्षम होतात.

जयास जैसी अभ्यास रीती । मावेल तैसी नकार्य पद्धती
देवूनि तेची शिक्षण सुमती । यावे पुढ ती तयांनी [१]

अध्यापन कार्यात विद्यार्थ्यावर सक्ती करणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणे होय; ग्रामाभिमानाला तसेच देशाभिमानाला आव्हान करून स्वयंस्फूर्ततेने व निर्भयतेने त्याला त्याच्या आवडीचा विषय निवडण्यांचे स्वातंत्र्य देण्यात यावे हा राष्ट्रसंताचा अत्यंत प्रामाणिक विचार आहे. ग्रामीण शिक्षणाचा विचार माडतांना राष्ट्रसंत म्हणतात.

सर्व तऱ्हेचा उद्योग धंदा । करायला लागला मुलगा धंदा
वाढला अभिमान गावचा बंदा । तयार झाला म्हणोनिया [२]

सर्व तऱ्हेच्या उद्योगधंद्यांना त्यांनी ग्रामीण शिक्षणांत महत्वाचे स्थान दिले आहे. सर्व प्रकारचे धंदेशिक्षण व व्यवसाय शिक्षण त्यांना ग्रामीण जीवनांत प्राप्त व्हावे व घेतलेल्या शिक्षणांचा सर्वतोपरी उपयोग त्यांनी आपल्या ग्रामसमाजाच्या विकासासाठी करावा हाच त्यांच्या शिक्षणाचा मुख्य भाग होय.

१. यंत्रकुशल कामगार आणि शेतकरी
२. यंत्रतज्ञ
३. इंजिनियर – यांत्रिक तज्ञ
४. डॉक्टर, शिक्षक इत्यादी व्यवसाय तज्ञ

ग्रामीण विभाग स्वयंपूर्ण व्हायचा असेल तर कुशल शेतकरी व यंत्रकुशल कामगार अत्यंत आवश्यक आहे. शेतकी शाळा, फॅक्टरी शाळा, निरनिराळ्या धंदेवाईक शाळा ग्रामीण विभागांत असणे अत्यंत आवश्यक आहे. दुय्यम प्रतिचे यंत्रज्ञ व व्यवसाय–तज्ञ निर्मितीसाठी टेक्निकम नावासारखी संस्था व उच्च प्रतिचे इंजिनियर व व्यवसाय तज्ञांसाठी कॉलेज असावेत त्यासाठी शहरात जाण्याची आवश्यकता नको त्यापेक्षा–

' त्यापेक्षा उच्च ज्ञानाची विद्यालये गावीच आणावी निश्चये
जी ग्रामजीवन सजवतील चातुर्ये । शिकवोनि जना [३]

---

१. ग्रामगीता अ. १७ ओवी १८०
२. ग्रामगीता अ. १९ ओवी ६९
३ ग्रामगीता अ. १९ ओवी २९

ग्रामीण भागात शेती हा महत्वपूर्ण उद्योग असल्याने त्यांचे परिपूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाकडून मिळावे. शेतीतील व त्या उद्योगाला आवश्यक असलेले प्रत्येक काम करण्यास विद्यार्थी उत्सूक राहिल अशी त्यांची मनःस्थिती निर्माण करणे हे शेतकी शाळेचे कार्य आहे.

करिती शेतांचे निंदन । उपणणे, उतारी, नांगरण
शेण काढावयांस उत्सुक मन । दिसे जनचे [१]

शेती विषयक सर्व कामे त्याला करता यावी, गुरांची निगा राखणे, औषधोपचाराचे शिक्षण त्याला लाभावे. निरनिराळ्या संशोधनात्मक गोष्टीची त्याला माहिती उपलब्ध व्हावी. इतकेच नव्हे तर संशोधनात्मक प्रयोग तो करू शकेल ही क्षमता त्यांच्यात निर्माण करावी.

आपल्याला प्राप्त असलेल्या प्रात्यक्षिक ज्ञानाचा अनुभव त्यांनी जनतेला द्यावा. त्याच्या ज्ञानाचा जनतेला लाभ झाला तर तेच त्याच्या शिक्षणाचे खरे प्रमाणपत्र ठरविण्यांत यावे.

जनसेवेचे प्रमाणपत्र । तयास महत्व यावे सर्वत्र
उद्याचे राष्ट्र आजचे कन्यापुत्र । समजोनी त्यांना सुधरावे [२]

अशा प्रकारचे धंदे शिक्षण, यांत्रिक शिक्षण देखील असावे आणि या शिक्षणासाठी लागणारे यंत्र व गावच्या उद्योगाना लागणारे यंत्र, गांवात तयार करावे.

जीवनांत आनंद निर्माण करण्याचं कार्य केलच आहे. मानवी जीवनांत कला नसेल तर ते जीवन नीरस, बेचव व फलहीन होईल कलेतूनच संस्कृतीचा विकास साधत असतो. त्याचाही विचार त्यांनी शिक्षणांत केला आहे. वृक्ष व रटाळ जीवन मानवी मनाला प्रसन्न व उत्साही ठेऊ शकत नाही. त्यामुळे त्यांनी सर्व प्रकारच्या कलेला शिक्षणांत महत्व दिले आहे.

चित्रकला, चर्मकला । रांगोळचांची उत्तम कला
बुरडकाम, कुंभार कामादि सकला । चौसष्ट कला नानापरी
संगीतशास्त्र, पाकशास्त्र । गृहस्थापनाचे सुंदर तंत्र
अश्वपरीक्षा, रत्नपरीक्षादि समग्र । जीवन विद्या शिक्षणी [३]

आज कलेबरोबर गाव सांभाळण्याकरीता लागणारे चापल्य, ध्येय निष्ठा आदी त्याला शिकविण्यांत यावी. प्रत्येक मुलाच्या ठिकाणी कलाप्रवृत्ती जागृत करून त्यांचा सांस्कृतिक विकास साधावा या हेतूने ग्रामीण शिक्षण प्रणालीतून

---

१. ग्रामगीता अ. १९ ओवी ६८ २. ग्रामगीता अ. १९ ओवी ३५
३. ग्रामगीता अ. ३५ ओवी १९/३१, ३२

संगीत, चित्रकला, नृत्य, नाटक तर रांगोळ्या सारख्या हस्तकला तसेच चर्मकला, कुंभारकलेचा व जीवनाला आवश्यक असलेल्या सर्व कलेचा त्यांनी शिक्षणांत उपयोग केला आहे.

रशियांत मात्र मुलांसाठी कलामंदिरे, नाट्यमंदिरे, सिनेमागृह अगदी स्वतंत्र स्वरूपांत आहे. इंग्रज लेखक बेबच्या मते सोविएत शाळेत या संस्कृतिच्या शाखेकडे जितके लक्ष पुरविण्यांत येते तितके अन्यत्र कुठेही पुरविले जात नसेल व ते सत्य आहे. भारतासारख्या मोठ्या देशांतील शिक्षणांत कला व संस्कृतीचा समावेश ज्या प्रमाणित असायलापाहिजे त्याप्रमाणांत झाला नाही हे सत्य विसरता येत नाही.

कला व संस्कृतीच्या बरोबरच राष्ट्रसंतांनी शालेय तथा महाविद्यालयीन शिक्षणांत शारीरिक शिक्षण व व्यायामाला अत्यंत महत्व दिल्याचे दिसून येते. त्याचे संबंध शिक्षणसंस्थेशी जोडले आहेत. स्वसंरक्षणाबरोबर ग्राम संरक्षणाची जबाबदारी त्यांनी त्यांच्यावर टाकली आहे.

'सुंदर असावा आखाडा । मुले बागडती उल्हासे तडातडा
आदर्श मल्ल-खेळाडूचा धडा । गिरवावया
म्हणोनि पाहिजे बलवान मुले । कुस्ती मलखांब खेळणारे भले
धडाडीने प्रतिकारार्थ धजले । तरीच शिक्षण उपयोगी [१]

गावावरी आली गुंडाची धाड । विद्यार्थी दारे लावती धडाधड
वाड-वडीलांच्या अब्रुची पिंड । काय शिक्षण कामाचे [२]

स्वतः बलशाली व्हायचे व अन्यायाच्या प्रतिकारासाठी, ग्रामरक्षणेसाठी त्याचा उपयोग प्राणप्रतिष्ठेने करावा व त्यांचे योग्यतेचे शिक्षण त्यांना मिळावे हा राष्ट्रसंताचा उद्देश आहे. तो प्रामुख्याने शिक्षणाचा एक भाग आहे. ग्रामनिष्ठेबरोबर त्यांची राष्ट्रनिष्ठा मजबूत करण्यांत यावी 'मातृभूमीसाठी, समाजासाठी' बांधवासाठी लढाऊ वृत्ती निर्माण होईल अशी त्यांची शारीरिक शिक्षणासंबंधीची विचारसरणी आहे.

– शिक्षकांविषयी –

शिक्षणांना 'गुरू' हा शब्द भारतीय संस्कृतित अत्यंत प्राचीन काळापासून चालत आला आहे. गुरू शिष्याच्या जीवनांतील अंधःकार नाहीसा करणारा असल्यामुळे गुरू हा आदर्शवादी असावा ही राष्ट्रसंतांची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. आपल्या आदर्शवादी जीवनाच्या प्रत्ययांतून आदर्शाचे धडे त्यांनी विद्यार्थ्यांत उतरविण्याचा आटोकाट प्रयत्न करावा त्यामुळे संपूर्ण राष्ट्र तेजस्वी होऊ शकेल.

---

१. ग्रामगीता अ. १३ ओवी १३/११० २. ग्रा. गी. अ. १९ ओवी २२

गुरूजींनी द्यावे ऐसे धडे । आपुला आदर्श ठेवोनि पुढे
विद्यार्थी तयार होता चहूकडे । राष्ट्र होईल तेजस्वी [१]

राष्ट्रसंतांची शिक्षण प्रणाली मुख्यतः ग्रामीण जीवनासाठी असल्यामुळे ग्रामोन्नती हा त्यांच्या शिक्षणाचा पाया आहे.

ग्रामोन्नतीचा पाया शिक्षण । उद्याचे राष्ट्र आजचे संतान
यासाठी पाहिजे गुरूजन । राष्ट्र निर्माते [२]

वरील ओवीत शिक्षकांच्या कार्याची जबाबदारी स्पष्टतेने सागतली आहे. शिक्षकांने आपला अभ्यासक्रम संपविला म्हणजे आपले कार्य संपले असे समजू नये. शाळेतील काम, मुलांच्या अभ्यासाच्या बाहेरील कार्यक्रम, विकासाचे मार्गदर्शन, स्वत:ची शैक्षणिक प्रगती व पालकांच्या भेटी आदी कामे त्यांच्या वाटचाला येतात. खेड्यांतील शिक्षक हे सांस्कृतिक जीवनाचे केन्द्रस्थान असल्याने त्यांचे कार्य व भूमिका अत्यंत महत्वपूर्ण ठरते. त्याचबरोबर बाहेरच्या जगातून ज्ञान व प्रगतीचे लोण खेड्यातील जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य व जनतेची सांस्कृतिक, बौद्धिक उंची वाढविण्याचे कार्य शिक्षकांचे असते. शालेय वातावरणांत व बाहेरच्या जीवनांत विद्यार्थी शीस्तप्रिय राहिल असे संस्कार करण्यासाठी त्यांनी स्वत:ला वाहून घ्यावे.

पण खेड्यातील शिक्षक राष्ट्रसंतांच्या अपेक्षेप्रमाणे नाही हे दूर्देव आहे. यांचा अनुभव राष्ट्रसंतांना आहे. आज शिक्षक आदर्शवादी नाही. तो व्यसनाधिन आहे. केवळ पैसा मिळतो म्हणून शाळेत जावे, वेळ कसातरी निभवुन त्यांना परत आपल्या खुराट्यांत यावे, असे जीवन जगणाऱ्या व व्यसनाधिन असणाऱ्या शिक्षकांला राष्ट्रसंत शिक्षक म्हणायला तयार नाही.

'शिक्षक वही हो सकता' है । जो अवगुणसे रिक्ता हो । [⊠]

किंवा

म्हणे मी शिक्षण कार्यी लागली । पवित्र गुरूजी मुलांचा झालो.
परि व्यसनाचा अवतार बनलो । म्हणोनि मना धिक्कारीनता [३]
असते शिक्षक मुलांना सद्वर्तनी कसे बनविणार ?

'पहिले केले मग सांगितले' असे समर्थ रामदास म्हणतात. दुसऱ्याला उपदेश करण्यापूर्वी स्वत: त्याप्रमाणे वागा. तुमच्या आचरणाच्या प्रभावाने तुमच्यासारखीच

---

१. ग्रा. गी. अ. २ ओवी ८७
२. ग्रा. गी. अ. २० ओवी १
⊠. सु. वि. प्रणाली पा. १५
३. ग्रा. गी. अ. १९ ओवी ५४

मुलें देखील वागायला लागतात. त्याच वेळी तुम्ही केलेल्या उपदेशाचा सार्थ परिणाम लोकांवर घडून येईल. राष्ट्रसंतांना शिक्षक हा ज्ञानपिपासू व सद्वर्तनी असा अभिप्रेत आहे.

– शिक्षकांची भूमिका –

शिक्षकांच्या भूमिकेवर महाराजांनी आपले विचार मांडतांना म्हटले आहे की 'शिक्षकाने शासक होऊ नये.' तसे झाल्यास त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर खूप मोठ्या प्रमाणांत होतो. पूर्वीच्या शिक्षकांच्या शासकवृत्तीने विद्यार्थी शिक्षणांपासून दूर गेलेत. त्यांनी शिक्षणाला कायमचा रामराम ठोकला प्रत्येक विद्यार्थ्याकिडे जातीय लक्ष त्यांनी पुरवावे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणावा. त्याचवेळी त्यांनी आपली भूमिका 'माते' प्रमाणे ठेवावी. माता जशी आपल्या मुलाला गोंजारते व शिकविते तिच भूमिका शिक्षकांची असावी.

मुरू म्हणोन न गुरगुरावे । आत्मवत सर्वांशी जाणावे
उठण्या-बसण्या पासोन शिकवावे । आईसारखे अज्ञ जना [१]

शिक्षकाने विद्यार्थ्यांना लहान-सहान गोष्टी अत्यंत प्रेमभावाने, ममतेने शिकवायला पाहिजे. विद्यार्थ्यांवर संस्कार घडवितांना विद्यार्थी व शिक्षकांत स्नेहभावाचे वातावरण निर्माण व्हायला हवे. शिक्षकाने विद्यार्थ्यांवर रागावू नये हे जरी मानसशास्त्रीय दृष्टीने योग्य असले तरी धाकवृत्ती त्यांच्यात निर्माण करण्यासाठी प्रासंगिक शिक्षेचा उपयोग करण्यांत यावा. नेहमीच धाक दाखवू नये. कारण–

धाक दडपणाने लोक भिती । तेवढ्यापुरते नीट वागती [२]

पण पूर्णपणे ते संस्कारित होत नाही तेव्हा शिक्षकाने कसे वागावे हे सांगतांना ते म्हणतात.

उपदेश देता रागावू नये । लोभे निर्णय चुकवू नये [३]

– पालक आणि विद्यार्थी –

मुलगा संस्कारित होण्यासाठी केवळ शिक्षकांचे कर्तव्य सार्थकी लागते असे नाही. पालकांची जबाबदारी देखील अत्यंत महत्वाची आहे. 'कुटुंब ही समाज जीवनाची पाठशाळा आहे' तेव्हा आपला मुलगा समाजदृष्टीने चांगला व्हावा, प्रगतिशील व्हावा याकडे त्यांनी लक्ष पुरवायला पाहिजे. आजचे युग शिक्षितांचे विज्ञानाचे युग आहे. तेव्हा प्रत्येक पालकांने आपल्या मुलाला योग्य शिक्षण देणे हे त्यांचे प्रथम कर्तव्य आहे.

---

१. ग्रा. गी. अ. ४ ओवी १०२ २. ग्रा. गी. अ. ५ ओवी ११५
३. ग्रा. गी. अ. ८ ओवी ७

'वडिलाने मुलगा नाही शिकवला । तोहि पापाचा भागीदार झाला
जैसे जन्म देणे कर्तव्य आहे त्याला । तैसेचि शिक्षण देणे जगत्याचे [१]

परंतु आपल्या कर्तव्याला चुकणाऱ्या कुठल्याही पित्यांची हयगय राष्ट्रसंत करतांना दिसून येत नाही. आपण मुलांना आर्थिक परिस्थितीमुळे शिकवू शकलो नाही अशा प्रकारची कुठलीही सबब राष्ट्रसंत ऐकून घ्यायला तयार नाही. त्यावर भाष्य करतांना महाराज म्हणतात–

'जरी आपल्याने व्यवस्था न होये । तरी देशोद्धारक संस्थेशी सोपवावे
परी मुलांस पतित न ठेवावे । अशिक्षितपणे केव्हाही [२]

असे रोखठोक उद्‌गार त्यांनी काढले आहे. पालकांनी आपल्या पाल्याविषयी अत्यंत जागरूक असणे व त्यांच्या उन्नतीसाठी, भवितव्यासाठी स्वतःला जबाबदार धरणे आवश्यक आहे. रशियांतील पायोनियर संस्थेसारख्या भारतात अनेक संस्था आहेत. मुंबईची माटुंग्याची संस्था म्हणून ओळखल्या जाणारी डेव्हिडससून इंडस्ट्रियल स्कूल तसेच चिल्डेन अेड सोसायटी सारख्या संस्था आहेत. जिथे मुलांना (आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या; बालगुन्हेगार) शिक्षण दिल्या जाते. इतरही अनेक संस्था देशात आहेत. अनाथाश्रम वगैरे सारख्या. त्यांचा उपयोग पालकांनी घ्यावा. असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

हे करत असतांना पालकांनी मुलांचे फाजिल लाड पुरवू नये. असा इशारा त्यांनी दिला आहे. मुलांचे फाजिल लाड पुरविल्या गेले की त्यांचा वाईट परिणाम विद्यार्थ्यांच्या जीवनावर उमटतात.

'आईबापांचा प्रेमळ चाळा । पुरवी लहान मुलांचा आळा
मुलगा होतो ठोंब्या-भोपळा । अतिलाडाने निकामी [३]

सुयोग्यरितीने नमूद केले आहे. शिक्षक व पालकांनी योग्य जबाबदारी पाळली की पुढील बदलही राष्ट्रसंतांनी जो सुचविला आहे, तो या देशाचा इतिहास महान बनविणारा निश्चित स्वरूपांत होइलच.

'ऐसे करता होईल प्रगती । मुले उत्तम विद्यार्थी बनती
थोर-थोर उद्योग धंदे ही शिकती । पुढे–पुढे [४]

ते श्रमप्रतिष्ठावादी व्हावेत. देशाच्या इतिहासाकडे पाहिल्यावर राष्ट्रसंताचे मत पटायला लागते, ते अत्यंत रास्त आहे.

---

१. ग्रा. गी. अ. १९ ओवी ४३
२. ग्रा. गी. अ.१९ ओबी ४३
३. ग्रा. गी. अ. १९ ओवी ४६
४. ग्रा. गी. अ. १९ ओवी ६१

– विद्यार्थ्याविषयी राष्ट्रसंताचे उद्‌गार व अपेक्षा –

राष्ट्रसंतानी विद्यार्थ्याना उपदेश केला आहे. विद्यार्थी कसा असावा ? विद्यार्थी विनयशील, सौज्वळ, प्रामाणिक तर असावा परंतु शिक्षकाप्रती व शिक्षणाविषयी अत्यंत आदर बाळगणारा असावा. शिस्तप्रियता, नियमितपणा त्यांने आपल्या अंगी बाळगावा.

पण आजच्या विद्यार्थ्याकडे पाहून राष्ट्रसंत अत्यंत दुःखी झाले. आजचा विद्यार्थी शिक्षणाकडे नोकरीच्या मर्यादित दृष्टीने बघतो. हे उचित नाही. त्यांचे दिखाऊ कपडे, कोरडी ऐट यामुळे स्वतंत्रवृत्ती, निर्भयता या गोष्टी पासून तो दूर गेला आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यात स्वतंत्रता निर्भयता व यशस्वी जीवन जगण्याचे सामर्थ्य निर्माण होणार नसेल, तर ते शिक्षण राष्ट्रसंताना अमान्य आहे.

'दिखाऊ कपडे कोरडी ऐट । नोकरपेशी थाटमाट
हे शिक्षणांचे नव्हे उद्दिष्ट । ध्यानी घ्यावे नीट जगी

मुलांच्या राहणीकडे राष्ट्रसंतानी आपले लक्ष वळविले आहे. विद्यार्थ्यांची राहणी अत्यंत साधी असावी त्याबाबतीत आपले विचार मांडतांना म्हणतात–

शौकीन राहणी वर्जावी । सुगंधी अत्तरे, फुलेही त्यजावी

इतकेच नाही तर–

कोणी न घ्यावे मादक द्रव्य । तोंडी नसावे नाटकी काव्य
समजावून घ्यावे सभ्यासेव्य । उपवासही करावा [१]

दिनचर्येबाबत त्यांनी आपले विचार भारतीय संस्कृतीच्या परंपरेने मांडले आहे. मनःशांती व आरोग्याच्या दृष्टीने त्यांची योजना आहे.

कराया लावावे प्राप्त ध्यान । सायंकाळी प्रार्थना पूर्ण
झोपता जागता चिंतन । आदर्श पुरूषाचे
नित्य नियमे उषः पान । सूर्य नमस्कार आसन
पोहणे आणि निंब सेवन । आरोग्यदायी जे सोपे [२]
अश्लिलता कोठे नसावी । दिनचर्या आदर्श असावी
सकाळी संध्याकाळी ध्यावी । बौद्धिक ब्रम्हचर्चेची [३]

बौद्धिक तेज, आरोग्य चांगले राहते. वृत्ती नेहमी प्रसन्न राहून चांगल्या संस्काराकडे तो सहजतेने जाऊ शकतो हे राष्ट्रसंतांना मान्य आहे.

---

१. ग्रा. गी. अ. १९ ओवी ५ २. ग्रा. गी. अ. ९ ओवी ६२
१. समाज संजीवनी भजन १३ वे

शाळा व समाज

आज ग्रामीण जीवनांत शाळेचा प्रश्न विकट आहे. प्राचीन काळचा विचार केल्यास मंदिरे ही शिक्षणाची केन्द्रे होती तेव्हा आजही मंदिराचा उपयोग शिक्षणासाठी करण्यांत यावा. त्यामुळे शाळेच्या जागेचा प्रश्न मिटेल व मंदिराचे मांगल्य कायम राहिल.

कशाला मठ मंदिरी – आश्रम बांधले
अपार धन खर्चूनी, अधिक लोकी फोफावले
मला गमत सर्वहि असती पूर्वी विद्यालये
जिथे गुरू बसोनिया करिती बोध लोकासवे [१]

पुन्हा सुधरावी मंदिर योजना । सूरु करावी लोकशिक्षणा
गांभीर्य आणावे त्या स्थाना । सद्विचार वाढावया

लोकशिक्षणांच्या प्राथमिक शाळा मंदिरात सुरू कराव्यात, हा विचार प्राचीन काळानुसार त्यांनी मांडला आहे. प्राचीन काळात औषधोपचार देखील मंदिरातून केल्या जात होते. तोही विचार राष्ट्रसंतांनी मांडला आहे.

उघडावी त्यांत वाचनालये । औषधालये, योगविद्यालये
उपासनेची ठेवोनि सोय । सर्वांकरीता [२]

शैक्षणिक दृष्टीने गावात काय काय असावे हा विचार मांडतांना राष्ट्रसंत म्हणतात

असावे गावीच विद्याभूवन । बालोद्यान, शिशुसंगोपन
मुले बाळपणीच त्यांत ठेवोन । वळण यावे साजेसे [३]

ग्राम हे उद्योगाचे केन्द्र असावेत, सामुदायिक शेती, व्यवसाय ग्रामात असावे ग्रामीण विकासाचे सर्वच कार्य, दवाखाने, शाळा, सामाजिक विकास केन्द्रे असावीत व यांत कार्य करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांसाठी शिशुगृहे असावेत. मुले शिशुगृहात ठेऊन निंचित मनाने त्यांनी आपल्या कामात राहावे. शिशुगृहात मुलांना स्नान, दुग्ध, खेळ, बागेतील सहल, सांधिक नाच व गाणी, व्यायाम झोप असे विविध क्रम त्यात असावेत. शिशुगृहे त्यांच्या आया जेथे काम करित असतील, त्याजवळ असावेत म्हणजे फावल्या वेळांत मुलांना त्यांच्या आयाची मायेची पाखरं मिळू शकेल.

विद्यार्थी शिक्षणाकडे वळल्यावर मात्र त्याला सर्व प्रकारचे शिक्षण गावीच मिळावे. शहरातील वैभवस्थानी जाऊन महागडे शिक्षण घेण्याची पाळी त्यांच्यावर येऊ नये.

---

१. ग्रामगीता अ २ ओवी ५७-५८-५९ २. ग्रामगीता अ. २५ ओवी ८२
३. ग्रामगीता अ. १९ ओवी ४९

त्यापेक्षा उच्च ज्ञानाची विद्यालयें । गावीच आणावी निश्चये
जी ग्रामजीवन सजवितील चातुर्यें । शिकवोनि जना [१]

शिक्षणाशिवाय बाहेच्या अवांतर ज्ञानासाठी त्यांनी ग्रामांत वाचनालय असावेत असा विचार मांडला आहे.

सुंदर असावे वाचनालय । नाना ग्रंथ ज्ञानमयं
करावया सुबुद्धिचा उदय । गावलोकी [२]

याचबरोबर जगात काय घडामोडी होतात अर्थात; राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व संशोधनात्मक लोकांना कळाव्यात यासाठी–

काय चालते जगामाजी । कळावे गावी सहजासहजी
म्हणोन वृत्तपत्रे असावी ताजी । आकाशवाणी त्या ठायी [३]

वरील प्रकारचे ग्रामीण शिक्षणपद्धती ग्रामराज्यात निर्माण झाल्यास–

कित्येक निर्मिल यंत्रगार । कित्येक होतील इतिहासकार
कित्येक होतील सल्लाचतुर । गावी अपुल्या

पुढे विद्यार्थी आदर्श होतील असा दृढविश्वास राष्ट्रसंतांना आहे. तो प्रगट करतांना ते म्हणतात–

आदर्श होतील विद्यार्थी गण । गावाचे पालटेल जीवन
कोठेच न उरेल गावंढळपण । टिकाऊ परिवर्तन याच मार्गी [४]

आजचे शिक्षण विषयक विचार

आज शिक्षण विषयक विचार जे खूप मोठ्या प्रमाणात मांडल्या जातात ते राष्ट्रसंताच्या विचारांशी जुळणारे असेच आहेत. प्रबंधकाराने नागपूर विद्यापीठ कार्यकारणीचे सदस्य व गो. से. अर्थ–वाणिज्य महाविद्यालयातील नागपूर मराठी विभाग प्रमुख श्री अरविंद खांडेकर व डॉ राजेन्द्रसिंह चुंगडेची (सचिव गुरुदेव शि.वि. मंडळ) मुलाखत घेतली. शिक्षण विषयक विचार मांडतांना प्रा. खांडेकर म्हणाले की, ' शिक्षणामुळे जीवनमूल्य आणि राष्ट्रीय आदर्श हयांचे संगोपन व्हायला हवे, इतकेच नाही तर ते समाजाभिमुख बनू शकतील असा प्रयत्न शिक्षणातून होणे आवश्यक आहे' हेच विचार मुंबईचे प्रा. बाळ आपटे यांनी लिहिलेल्या 'एज्यूकेशनल चेंज ' या पुस्तकात मांडले आहे. या पुस्तकाचे वैशिष्टय म्हणजे शैक्षणिक बदलांच्या कल्पनेचा प्रा. आपटे यांनी विविधांगी आणि व्यावहारिकतेने केलेला विचार होय;


---

१. ग्रामगीता अ. १९ ओवी ३०
२. ग्रामगीता अ. १३ ओवी १०३
३. ग्रामगीता अ. १३ ओवी १०४
४. ग्रामगीता अ. १९ ओवी १०९

प्रा. आपटे शैक्षणिक विचार व्यक्त करतांना म्हणतात 'शिक्षणामुळे जीवनमूल्य आणि राष्ट्रीय आदर्श अधिकाधिक लोकाभिमुख बनू शकतील आणि केवळ शैक्षणिक संस्कार आणि ज्ञान हेच संपन्न आणि यशस्वी जीवनाचे साधन बनू शकेल.

निखळ व्यावहारिक पातळीवरून केलेला विचार हे या पुस्तकांचे आणखी एक वैशिष्ट्य होय; शिक्षणाने भौतिक उन्नतीचे दरवाजे सामान्यासाठी खुले केले पाहिजे तसेच लोकसंख्या, लोकभेद, बेकारीवर समाधानकारक तोडगा शोधण्याची ताकद शिक्षणामुळे लोक प्रतिनिधीत येऊ शकेल. शिक्षणाच्या उद्दिष्टांची चर्चा करता करता प्रा. आपटे ज्या निष्कर्षावर येतात. तो महत्वाचा आहे.

रोजगारभिमुख शिक्षण हे शिक्षणाचे एकमेव उद्दिष्ट असू नये. स्वतंत्र विचाराची शक्ती आणि निर्णय घेण्याचे सामर्थ्य ह्यांचा विकास हे शिक्षणाचे प्रधान उद्दिष्ट असावेत. वरील प्रकारचे विचार राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त; शिक्षणतज्ञ सी. पी अॅन्ड बेरारचे मुख्याध्यापक (रविनगर नागपूर) श्री बाबुरावजी दिवे यांनी व्यक्त केले. आजचे विचारवंत राष्ट्रसंतांच्या शैक्षणिक विचाराकडे वळलेले आहे.



साहित्य विषयक दृष्टिकोन

वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्यिक आहे की नाही या संबंधी जे विचार मांडले जात आहेत ते अत्यंत वादातीत आहेत पण कधी-कधी डोळ्यासमोर निर्माण होणारा प्रश्न मनाला सतत बोचतो. आम्ही जे लिखाण करतो ते स्वतःच्या आनंदासाठी की समाजोन्नतीसाठी ?

साहित्य म्हणजे काय ? " जे जीवनाच्या सहित चालते ते साहित्य ' ही थोडावेळ आम्ही व्याख्या प्रमाणे मानली तर राष्ट्रसंतांच्या साहित्याला साहित्य म्हणायचे काय ?

' ज्यामुळे जीवनाला जबरदस्त प्रेरणा लाभते. त्याला साहित्य म्हटले जाते ' पण साहित्यालाही प्रेरणा कोठून लाभते. याचा निश्चित व परिपक्वतेने विचार आणि अभ्यास केल्यावर आपणांस आढळून येईल की उत्कृष्ट व धीरोदात्त जीवनाशिवाय भावोत्कट साहित्य निर्माण होऊ शकत नाही हे सत्य आहे '

पराक्रम कुणाचाही असो मग तो स्वतः गाजविलेला असो, दुसऱ्याने गाजविलेला किंवा समाजाने गाजविलेला असो किंवा तो आंतरिक जीवनातला असो, पण तो साहित्याला प्रेरणा देतो. त्याचप्रमाणे व्याकुळेतेने वेदनेतून साहित्य निर्माण होते. ती वेदना म्हणजे पराक्रमाची प्रसव वेदना असते. त्यामुळेच ती साहित्याला प्रेरक ठरते. जे साहित्य पराक्रमाला पारखे झालेले असते ते साहित्य अत्यंत क्षीण असते. असल्या साहित्यावर जागविण्यांत येणारा समाज अत्यंत अल्पसंतोषी, पराक्रम शून्य, अदूरदृष्टीचा, क्षीणवीर्य बनत असतो.

राष्ट्रसंतांची साहित्यदृष्टी वरील प्रकारची आहे. इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान आणि समाजसेवा यांच्या सहवासातून जें साहित्य फुलत राहते ते नेहमी तेजस्वी, गंभीर, प्रसन्न व व्यक्ती आणि समाजाला पोषक होत असते. निरोगीपणाचे गुणधर्म त्यांत एकवटलेले असतात. असे उच्चत्तम साहित्य मनाला भारावून टाकते तर भाव-भावनेचे उत्कृष्ट दर्शन त्या साहित्यांच्या पाऊला-पाऊलावर आपणास दिसून येते. असे साहित्य शब्दसृष्टींची उपासना करत नाहीत तर जीवनामध्ये सतत तारूण्य-चैतन्य जागवित राहते. त्याचबरोबर पराक्रम, श्रध्दा, उत्साह आणि आर्यत्व जागवित राहणे हे खऱ्या साहित्याचे-साहित्यिकाचे प्रथम कर्तव्य होय; पण यासाठी साहित्यिकाला समाजापासून दूर राहता येणार नाही. त्याला समाजातच रहावे लागेल.

वं. राष्ट्रसंतांनी तुमसर येथील विदर्भ साहित्य संघाच्या उद्घाटन प्रसंगी काढलेले उद्‌गार महत्वपूर्ण आहेत.

'मी साहित्य पुस्तकांतून शिकलो नाही. साहित्यांची कल्पना हवा जन-सागरातून मिळाली. [१]

'साहित्याचे स्वतंत्र अनुशीलन करावयांस नको किंवा भाषा कमविण्यासाठी, शुध्द ठेवण्यासाठी आणि तिचे तऱ्हेतऱ्हेचे व्यूह रचनांची आवश्यकता नाही. भाषा आणि साहित्य संस्कृतिची सर्वोच्च नसली तरी प्रधान अंगे आहेत, त्याच्याव्दारा जीवन बोलके होते, एवढेच नव्हे तर स्वत:ला ओळखू शकते पण जीवनातील पराक्रमाची अपेक्षा करुन मात्र साहित्याला परिपुष्ट करणे शक्य नाही [२]

वरील द. बा. कालेलकरांनी मांडलेले विचार राष्ट्रसंताच्या विचाराशी जुळणारे विचार आहेत. भाषा आणि साहित्य ही संस्कृतींची प्रधान अंगे आहेत. त्यापासून जीवन बोलके होते पण परिपुष्ट होत नाही.

होईल जीननाची उन्नती। ज्ञान विज्ञानाची प्रगती
ऐसी असावी ग्रंथ संपत्ति। गावोगावी [३]

ही राष्ट्रसंताची साहित्यदृष्टी होती. साहित्यातून संस्कृतीचं दर्शन घडावं पण मानवी जीवनाच्या पराक्रमाला उत्तेजन मिळून अखिल मानवाची उन्नती करायला प्रेरक, उपकारक ठरेल, ते खरे साहित्य होय;

साहित्य आणि समाजकारण

साहित्य हे स्वतंत्र असावं त्याचा राजकारणाशी, समाजकारणाशी संबंध असू नये. साहित्याचे क्षेत्र हे सर्व प्राकृत गोष्टीहून श्रेष्ठ असले पाहिजे. साहित्याने पक्षोपक्षाची खिदमत करू नये. राजदरबारात साहित्याला सैरन्ध्री करून ठेवायचे नाही पण तसा प्रसंग आला तर साहित्याला आपले सैरन्ध्रीचे तेज दाखविता आले पाहिजे. अशा स्वरूपाची अपेक्षा बाळगणे कांही वाईट नाही. जीवीताची जी जी म्हणून सर्वक्षेत्रे आहेत त्यांचे साहित्याने वाकडे धरु नये. साहित्यांचा मुख्य उद्देश राष्ट्रसंतांच्या मते– 'मनुष्य निरोगी, सात्विक बनवा' व असे झाल्यास राज-कारणही निरोगी व सात्विक स्वरूपांचे निर्माण होते. साहित्याला सोवळे करून चालणार नाही. देशाच्या राजकारणात, समाजकारणात आणि प्रजाहितैशी अर्थकारणात स्वत:ला कुठेही स्थान न मिळाल्यामुळे साहित्याचे सोवळे क्षेत्र तयार करून त्यातून समाजसेवकांना व राजकारणाला दूर ठेवण्यांचा प्रयत्न झाला तर

---

१. श्री गुरूदेव मासिक १९५६ फेब्रुवारी / पृ. क्र. ९
२. साहित्यांची कामगिरी (द. बा. कालेलकर) / पृ. क्र. १०
३. ग्रामगीता अ. ४० ओवी १२२

निश्चित फसणार आहे. साहित्यात जर काही तेज असेल तर ते तेजस्वी लोकांकडे धाव घेईल. साहित्यातील तेजस्विता समाजातील मानवाच्या सर्वांगपूर्ण अभ्यासावर अवलंबून राहिल.

राजकीय लोक साहित्याच्या भानगडीत नसतात. हे खरे असले तरी जे लोक राजकारणाबरोबर राष्ट्रकारण आपलेसे करतात ते व तसेच समाजकारण, धर्मकारण करणारे लोक साहित्यांची किंमत करीत असतात. राजकारण हे समाजकारण व धर्मकारणाशिवाय चालूच शकत नाही. हा जागतिक इतिहास आहे. समाज आणि धर्म यांच्या बदलत्या अवस्थेबरोबर राजकारण बदललेले आपणास दिसून येते. त्या बदलत्या अवस्थेनुसार साहित्य निर्माण झाले आहे.

साहित्याला मर्यादा न घालता ते विस्तृत ठेवावे. त्यातून निरोगी व सात्विकता प्रत्येक क्षेत्रात निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न करावा.

राष्ट्रसंतांचे मुख्य केन्द्र ग्राम आहे. ग्रामावरून ते राष्ट्राकडे वळले आहे. म्हणूनच त्यांनी सर्व प्रकारच्या ग्रंथाचा आदर केला आहे.

गाव व्हाया वैकुंठपूर । काय कामी न येती ग्रंथ इतर
कोणत्या उपाये होतील संस्कार । दृढ गावचे [१]

लोकांचे संस्कार उत्तमात्तम करायचे लोकांबरोबरच समाज संस्कारित होत जाईल. मग राष्ट्र संस्करित व्हायला वेळ लागणार नाही. मानवाचे जीवन सुन्दर करून, सुखाचे अंकुर गावात फुलवायचे असतील तर सर्व अवडंबर बाजूला सारावे. हीच साहित्यकांची जबाबदारी आहे. तिला ठोकरून चालणार नाही. खरे साहित्य तेच की जे सामाजिक पुरुषार्थ, राजकीय चैतन्य, धर्मानुभवाची प्रयोगवीरता, राष्ट्रीय जागृती निर्माण करतात.

साधनांत साधन समाज रचना । मुख्यदृष्टी राष्ट्रीय जाणा
साधावी मानवतेच्या अनुसंधाना । जन लागेल सुमार्गी [२]

साहित्यिकाने आपले साहित्य ध्येय समोर ठेऊन साहित्यनिर्मिती करावी. पौष्टीक साहित्य तेव्हाच निर्माण होईल ज्यावेळी जीवन गंभीर व वेगवान होईल.

समाज निरोगी व सात्विक करण्याचा प्रयत्न म्हणजे समाजातील असलेले भेद नष्ट करणे होय ! जातिभेद, उच्चनिचतेचे खंडन करून लोक कल्याणांच्या दृष्टीने लेखनकार्य करायला हवे. जगांतील अन्याय, अत्याचार; पारतंत्र्य आणि अज्ञान नष्ट करण्यासाठी साहित्यांची कृती घडायला पाहिजे. अशुभतेचा ऱ्हास करून मानवी जीवनाचे खरे सत्य स्वरुप निर्भिडपणे सर्वसामान्य जनतेला सहजतेने

---

१. ग्रामगीता अ. ४० ओवी ३ २. ग्रामगीता अ. ४२ ओवी १८

पटेल या स्वरुपांत मांडणे आवश्यक आहे. असे झाल्यास परिवर्तन निश्चित योग्यतेच्या मार्गाने घडून येईल. यावर राष्ट्रसंतांचा दांडगा विश्वास आहे.

मै शब्द की खैरात हूँ, सब शब्द मेरे पास है
मुर्दे जगा दू शब्दसे । होता अशुभ का ऱ्हास है
मै नही किसे पहिचानता, मुंह देखके नही बोलता
सत्य क्या, असत्य क्या—सोचकर बात अपनी खोलता [१]

समाजात शुभतेचा, सत्भावनाचा उदय घडवून आणणे व असत्याचा नाश करणे म्हणजे सत्यशोधन ! हाच राष्ट्रसंताचा खरा उद्देश आहे. सत्यासत्यावर निर्भिडपणे विचार मांडून समाजोन्नतीला जे विचार पोषक होईल तेच मांडणे हेच साहित्यिकाचे कर्तव्य होय ! त्याला राष्ट्रसंत विसरले नाही. त्यासाठी मनाचा निर्भळपणा, चारित्र्यांतील शुद्धता व विचारातील स्पष्टता साहित्यिकांत असायला पाहिजे. त्यांचा दृष्टिकोन मानवतावादी असेल तरच समाजाचे सूक्ष्म दर्शन त्याला आपल्या साहित्यातून समाजासमोर ठेवता येईल.

लहानपासून देवमार्गी लागलेल्या समाज व राजकारणापासून फारकत घेतलेल्या या व्यक्तीने वरील विचार आपल्या लेखणीतून का लिहावे व समाजात आपल्या लेखणीद्वारे कां मांडावे ? राजकारण, समाजकारण, धर्मकारण व अर्थकारण आदी अनेक कांही असो समाजाला नव्या गोष्टी सत्याच्या व तात्विकेतेच्या आधारावर पटवून दिल्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकत नाही याची जाणीव त्यांना झाली होती. लोक समुदायाच्या सार्वभौम शिक्षणाचा प्रश्न त्यांनी हाती घेतल्यामुळे मनुष्याच्या जीवनाशी संबंधीत असलेल्या सर्वच विषयावर त्यांनी जे लिहिले ते समाजाच्या प्रगतीला नवी दिशा दर्शविण्याला उपयुक्त ठरले आहे. पुढे हळूवारपणे ते समाजाशी बांधल्या गेले. समाजापासून वेगळे स्वतंत्र अस्तित्व त्यांचे राहिल्यामुळे समाजातील सुखदु:खाशी ते समरस झाले. स्वत:ला सुचणारे विचार, स्फूरणाऱ्या कल्पना, येणारे अनुभव आणि निर्माण होणाऱ्या शंका, या दुसऱ्यात संक्रान्त कशा होतील. याच विषयाच्या उत्कट तळमळीतून त्यांची लेखणी सतत लेखन करत गेली. साहित्य सुसंशा, मानवी प्रेम, आत्मसाक्षात्कार, शांती व मानवता हाच त्यांच्या लेखणीचा प्रमुख हेतू दिसून येतो—म्हणूनच दु:खीताना ते आधार होऊ शकले.

'मै कवि नही करूणा हुं, मै उन दु:खीयों की दिल की
मै साधु नही मै साधना हूं प्रेम की सत् नेम की ।
ना शान्ती है मुझे, हुं मै पिछडे जनों की भावना
इन्सान बनने जो चले, मै उनकी हूं शुभ कामना [२]

---

१. मेरी जीवन यात्रा पान ८६ ओवी ५ २. मेरी जीवन यात्रा पृ. ८६ ओ. ७

– वाद नकोत–समन्वय पाहिजे –

राष्ट्रसंत साहित्यातील कुठल्याही वादात प्रत्यक्ष पडलेले नाही. कले करीता कला, जीवनाकरीता कला, उद्‌बोधनाकरीता कला अशा स्वरूपातून कलावाद, जीवनवाद किंवा प्रगतीवाद यावर आपले विचार मांडले नाही.

खरा साहित्यिक कुठल्याही वादावर बसून राहत नाही. जो समाजाशी प्रामाणिक आहे. त्याला समाजाच्या उन्नतीला योग्य साहित्य कोणते व ते कसे निर्माण करता येईल हाच विचार असतो. हे सर्व वाद म्हणजे शरीरांच्या एका एका अंगासारखे आहेत. सर्व अंग मिळून शरीर होत असते. कलेशिवाय आनंद नाही. कला ही मानवाला भूषण आहे. हे जरी खरे असले तरी जीवनाच्या सत्य स्वरूपांचे, नीतिनियमाचे दर्शन त्यातून घडायला पाहिजे.

निरपेक्ष आनंद मानवाला जर प्राप्त करायचा असेल तर प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांत कलेचे महत्व खूप मोठे आहे. जीवनांतील आनंद नष्ट झाला की जीवन रूक्षमय होते. कै. वि. स. खांडेकर म्हणतात 'चेहऱ्यावरील हास्य नष्ट झाले की माणूस म्हातारा झाला असे समजावे'

'अहो । जीवनाची एक तरी कला । असावी लागते मानवाला
तरीच तो 'मानव' शोभला । नाही तरि कला जीवनांचा [१]

पण कला व जीवन यांची फारकत त्यांनी केली नाही. कला जीवनांत आनंद निर्माण करते म्हणून आनंदाची निर्मिती करणे हाच कलाबंताचा धर्म नाही. त्याविषयी विचार मांडतांना. ते म्हणतात की कला ही जीवनांत गुंतागुंती निर्माण करणारी नसावी. सरळ व सात्विकतेचं वरदान ठरून प्रत्येकांच्या अंत:करणांत निर्मळता–पवित्रता निर्माण करणारी असावी. सर्वांत श्रेष्ठ कला म्हणून 'जीवनकलेकडे' बघतांना ते दिसून येतात.

कलेचा आनंद उपभोगतांना ती दुसऱ्यालाही उपकारक व्हायला पाहिजे. स्वत: जीवन जगावे व इतरांनाही जीवन जगण्यांस प्रवृत्त करावे असे सामर्थ्य ज्या कलेत आहे त्याचा राष्ट्रसंत मनमोकळेपणाने स्वीकार करतात. मनुष्य म्हटला की तो सामुदायाशिवाय जीवन जगू शकत नाही. स्वत:च्या जीवनाबरोबर समुदायाचे जीवन उन्नत करणे व परस्परांत सौख्यांची भावना निर्माण करून दुरितांचे तिमार हटविण्याचे कार्य त्यांनी करावे. असे करणारा खरा जीवन कलावादी होय ! कलेचा धर्म परस्परांना सहकार्य करण्यांचा, दुर्बलाना उन्नत करण्याचा आहे. त्याचबरोबर कुणावरही अत्त्याचार, अन्याय होणार नाही याची दक्षता बाळगणे हिच साहित्यिक वृत्ती आहे. सहृयतेचे लक्षण आहे.

---

१. ग्रा. गी. अ. १३ ओवी २८

'आपणासारीखे करीती तात्काळ । नाही काळ वेळ तया लागी' या तुकारामाच्या उक्तीप्रमाणे सर्वांना आपणासारखे करणारा जीवन कलावादी होय !

विवेक-बुद्धिने चालतो । पडलेल्यासि उचलोनि घेतो
दुसऱ्याचिया हितास्तव जातो । बळी प्रसंगी [१]

अर्थात तो जे करील त्यातून दुसऱ्यांना दुःख होणे अशक्य असते. दूरदृष्टीचा विचार व मानवाच्या विकासासाठी कोणते कार्य करावे याचा विश्वसुखाच्या कल्पनेतून तो एकसारखा विचार करीत असतो.

दूरदृष्टीचा विचार घ्यावे । कार्यकारण तयासि ठावे
व्यक्ति ऐसे विश्व सुखी व्हावे । म्हणोनि करी कष्ट नाना [२]

वरील गोष्टीला पायदळी तुडविणारे म्हणजे मानवदेही जन्मासि आले । परि राहिले पशूचि ते, असे म्हणून त्यांनी त्यांचा धिःकार केला आहे.

– खरा कलावंत त्यांचे कर्तव्य व अपेक्षा

खरा कलावंत अत्यंत सहृदयी अंतःकरणाचा, मानवतावादी धर्माचा असतो. दुसऱ्याचे दुःख पाहून जो अंतरी तळमळतो, तो खरा कलावंत ठरतो. हा त्यांच्या जीवन कला वादातील मुख्य भाग आहे. खऱ्या कलावंतांना आपले गांव आपले कुटुंब वाटते. गावाची दूर्दशा तो आपल्या उघड्या डोळ्यांनी कधीही पाहणार नाही. प्रसंगी आपला त्याग करतात. त्यांची दृष्टी अत्यंत विशाल असते.

तो अपुली कला कुसरी । सर्वांचिया जीवनाभरी
शोषन पतन कुणाचे न करी । आपुल्या कलेने
कले करता कला न ठेवी । जीवनासि कला भूषवी
आपण समजोनि दुसऱ्यास दाखवी । मणुष्यपण गोड शबरे [३]

वरीलप्रमाणे असणारा खरा कलावंत होय ! असे राष्ट्रसंत म्हणतात. पण आज स्वार्थतेने खऱ्या कलावंताने आपला धर्म सोडला आहे. ह्याचे त्यांना दुःख आहे कारण त्यामुळे बाजारू साहित्य निर्माण होत आहे. सद्गुणाच्या जोपासनेला गालबोट लागत आहे. त्याविषयी बोलतांना ते म्हणतात–

परि ती कला नव्हे करंटेपण । शृंगार नव्हे ते मरण
मधुर बोलणे जहरा समान वाटे कळता अंतरी [४]

---

१. ग्रा. गी. अ. ३६ ओवी ६२ २. ग्रा. गी. अ. ३६ ओवी ६४-६५
३. ग्रामगीता अ. ३६ ओ. ६७, ६८, ७९ ४. ग्रामगीता अ. ३६ ओ. ७७

कलावंत व कलेचे महत्व

कलेमध्ये काय असावे त्याविषयी राष्ट्रसंत म्हणतात–

मुख्य कलेची सांगता । असावी लागते तारतम्यता
सदा सावध असावा माथा । उन्नतीसाठी सर्वांच्या
मग कलामागे धावती । नकळत्या खुणा कळो येती
जीवन-कला पावावी सुमती । सर्वांगिण उद्धाराची [1]

हे ज्यांना साध्य झाले आहे. त्यांच्या लौकिकाला सुमार राहत नाही. ते जनसमाजात मान्य पावनात. त्यांच साहित्य चिरंजीव राहते. यांत शंका नाही.

ही जीवन कला ज्यांना गवसली । त्याची मानवता विकास पावली
'मानदेव' पदवी लाभली । सात्विक कलावंतासि [2]

समाजाला नवी दृष्टी देणारा; समाजावर उपकार करणारा व आपल्या लेखणाबरोबर प्रामाणिक राहणारा खरा कलावंत होय! असा कलावंत आपल्या कलेने समाजाचे दु:ख निवारण करतो.

राष्ट्रसंताच्या जीवनदायी साहित्याचा प्रभाव

राष्ट्रसंताचे साहित्य खऱ्या मानवाचे जीवन घडविणारे, त्यांच्या दु:खांना; आशा आकांक्षाना वाचा फोडणारे, समतावादी स्वरूपाचे, विश्वाप्रत जाऊन पोहचणारे व प्रत्येकाला आपलेसे करणारे आहे.

ज्याचे साहित्य जीवनदायी, पौष्टिक व प्रगतीशील असते त्यांची शैली कशी असो, त्यांची भाषा कितीही सामान्य असो–अलंकार रहित असो, त्यांचे साहित्य लोकांना वाचावेसे वाटते. त्याशिवाय गत्यंतर नसते. हा अनुभव राष्ट्रसंताच्या साहित्याबाबत आहे. राष्ट्रसंताची भाषाशैली अत्यंत साधी-सरळ व सोपी आहे. त्यांनी साहित्याविषयी व ग्रंथरचने विषयी काढलेले उद्‌गार वरील मताला पुष्टी देणारे आहे.

'ग्रंथ ओवी बद्धचि असावे । हे ही म्हणणे सोडून द्यावे
सहज कळेल तेचि उत्तम समजावे । गद्य-पद्य [3]

याच तत्वाप्रमाणें त्यांची ग्रंथरचना अत्यंत साधी आहे. ती अलंकारप्रचूर नाही की बोजड नाही कारण तशी रचना असली की अर्थाचे अनर्थ व्हायला लागतात. हा दोष टाळता येत नाही.

रूपकात्मक पूर्वीचे ग्रंथ । जनसाधारण भुलले तेथ
काढू लागले उलटा अर्थ । विश्वास सहसा बसेना [4]

---

१. ग्रामगीता अ. ३६ ओ. ८१, ८२.
२. ग्रामगीता अ. ३६ ओवी ८७
३. ग्रामगीता अ. ४० ओवी २०
४. ग्रामगीता अ. २० ओवी २४

वरील प्रकारचा अनर्थ टाळण्यासाठी व सर्वांना सहज कळण्यासाठी राष्ट्र-संतांनी अलंकारप्रचूर बोजड शब्दांचा उपयोग आपल्या साहित्यात केला नाही.

अलंकारयुक्त, नादमधुर व नटवी शैली फक्त लोकांना आकर्षून घेऊ शकते पण लोकांना देण्याचं बळ तिच्यात असते असे नाही. रसिक मनाला रिझविणे हे साहित्याचं मुख्य लक्षण' असे राष्ट्रसंत मानत नाही. जीवन साफल्य हा खरा आनंद आहे व त्याला राष्ट्रसंत चिकटून आहे. तो आनंद त्यांनी आपल्या साहित्या-तून वाचकांना निर्माण करून दिला आहे. साहित्यक्षेत्रात आपल्याला मान्यता मिळावी ही राष्ट्रसंतांना अपेक्षा नाही. जनमान्यता हाच त्यांच्या मान्यतेचा विषय ठरला. त्यांचे पडसाद त्यांच्या साहित्यातून दिसून येतात.

' मेरे उपर आरोप हैं । मैं काव्य नहि हूं जानता
मुझको बडी इसकी खुषी । चाहे न कोई मान्यता
पर लोग सब समझते हैं । मैं जहाँ गाने लगूं
लाखो किताबे जा चुकी । यहि प्रेम मैं पाने लगूं

एक गोष्ट सत्य की दिसायला कमी रूक्ष; आकर्षक व मनाला फाजील उत्तेजित न करणारे, हितकार व पौष्टिक साहित्य समाजात प्रत्येक काळी अधिकांश विव्दान व्यक्तिकडून वाचले जाईल असे नाही. पण ते प्रत्येक काळांत समाजाला प्रेरक व मार्गदर्शक ठरत असते. हा विश्वासही त्यांच्यात असलेला आपणांस दिसून येतो कारण त्यांचे लिखाण साहित्यापर्यंत मर्यादित नसते तर विश्वाचा संसार करणारे असते.

' मेरी फकीरी ऐसी हैं, लिखती भी है, जगती भी है
आसक्ति करती विश्वकी और सद्गुरु भक्ती भी है
सब देश अपने बल रहे, दुश्मन न हो किसीका कोई
हो मित्रता जगमे सदा, यहि भावना मेरी रही

राष्ट्रसंताचं साहित्य सामाजिक पुरुषार्थ, राजकीय चैतन्य, धर्मानुभवाची प्रयोगवीरता, राष्ट्रीय जागृती; विश्वव्यापक भावना आदींची पक्कड घेत असल्या-मुळे व जगाचा प्रवासही त्याच मार्गाने होत असल्यामुळे साहित्यिकांनी त्यांना कितीही नाकारले तरी ते जनमान्य पावले आहे. त्यांच्या साहित्यांची उंची व महानता एक दिवस सर्वांना मान्य करावीच लागेल हे सत्य आहे.

साहित्य प्रचारक व समाज

साहित्यातून समाजाचे पोषण व्हायला पाहिजे. हे एकदा मान्य केल्यावर समाज जीवनाच्या उन्नतीसाठी साहित्यांची भूमिका बलदंड असायला पाहिजे. केवळ पुस्तकांतून किंवा लेखणीतून मांडलेले विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत

पोहोचविण्याचे कार्य, त्यांना समजावून सांगण्याचे कार्य महत्वाचे ठरते कारण मानव अनुकरणीय प्राणी आहे. अज्ञानी मानवाला त्यांचे जीवन समजावून सांगणे आवश्यक आहे तसेच थोरांच्या जीवनांतील आदर्श समजावून सांगावे लागतात. सर्वच गोष्टीत कायद्याचे दडपण पाहून लोक घाबरतील पण त्यांचे घाबरणे दीर्घकाळ टिकत नाही. लोकांना योग्यतेचा विचार व आचार प्रचारक शिकवू शकतात.

'प्रचारक प्रेतात प्राण आणि । दुबळ्यासि करी कार्याभिमानी
बिघडवी आणि सुधारावी दोन्ही । प्रचारक [१]

प्रचारकांत अमाप शक्ती आहे. जगातील प्रत्येक परिवर्तन प्रचारकांच्या भूमिकेवरून निश्चित झाले आहे. समाजाला योग्य दिशा दाखविण्याचं, चैतन्यमय करण्याचं महान कार्य खऱ्या प्रचारकांच्या भूमिकेत असते. हे राष्ट्रसंत ओळखून होते. खरा प्रचारक सत्तेच्या आधिन होत नाही. त्याला संपत्तीचा मोह राहत नाही. सत्तेच्या आधिन गेलेला प्रचारक सत्तेचा भाट होतो. सत्तेचा दुरुपयोग करून समाजावर आघात करायला सुरवात करतो. खऱ्या प्रचारकाचा आत्मा समाज, गाव व राष्ट्र अशा स्वरूपात असायला पाहिजे.

सत्तेवाचून ज्यांचे समाज शुध्दिकरणाचे गाडे आत्मविश्वासाने चालते तेव्हा त्याला समाजाचे; गावाचे सहकार्य सुलभतेने लाभते. 'ज्यांचा भाव शुद्ध नाही। त्यास कोण साह्य करी ?' ही म्हण प्रचलित आहे. स्वतः प्रचारक अंतःकरणाने शुध्द असायला पाहिजे. न्याय, अन्यायाच्या स्पष्टतेवर कोणाचाही मुलाहिजा न करता सद्‌विवेक बुध्दिला जागरूक ठेऊन वाईट मनोवृत्तीला पायदळी तुडवत अहिंसेच्या तत्वाने जीवन जगणारा व आपल्या आचार विचारातून समाजाला आदर्शाचे धडे देणारा; भवितव्याची काळजी वाहणारा, गरजेनुसार समाजात परिवर्तन घडविणारा असायला पाहिजे. अशाप्रकारे राहणाऱ्या प्रचारकांत सात्विकतेचं तेज, बोलण्यांत माधुर्य-ओज, प्रासादिकता, त्याग आणि वैराग्य आदी गुणांचा समुदाय सहजतेनं घडून येतो.

'नेत्री तयाच्या सात्विक तेज । बोलण्यांत भरले असे ओज
राहणीत वैराग्य त्याग सहज । प्रचारकांच्या [२]

वैराग्य व त्यागाची भावना त्याला नेहमी आसक्तीरहित करीत असते. जेथे आसक्ती उरत नाही तेथे स्वार्थभावना कुठली ? विश्वाचा संसार हाच त्याचा संसार उरतो व हा संसार सांभाळतांना केवळ सेवाभावी वृत्ती राहते. समाजाच्या उन्नतीसाठी प्राणाची आहुती देण्यांस तो तयार राहतो. जन-सुखाची भावना; जनतेचं दुःख निवारण्याची तळमळच त्यांच्या अंतरी राहते.

---

१. ग्रामगीता अ. ८ ओवी ४५ २. ग्रा. गी. अ. ८ ओ. ६२

– काव्यबद्दलचे राष्ट्रसंताचे विचार –

राष्ट्रसंतांच्या काव्याचा विचार करतांना राष्ट्रसंताचं काव्य राष्ट्रीय; सामाजिक व धार्मिक क्षेत्रातून प्रवास करणारं काव्य आहे. काव्याविषयी ज्या ओव्या आल्या आहेत त्यातून त्यांची काव्यदृष्टी सहजतेने पाहता येते.

कविराज मै तो हूं नही । साहित्य लेखक भी नही
मै हूं प्रभूका भाट, मेरा ठांट है बस एकही
दिलमे उमंगे जब उठी, चलती है मेरी लेखनी
आया वही गाया, मती गुरू के चरणमें जो बनी [१]

काव्य म्हणजे भावना कल्पना व विकार व्यक्त करणारा भावात्मक वाङमय प्रकार होय. माणसांची भावना तीव्र असली म्हणजे तो जो विषय हाती घेईल त्याला काव्याचे सुंदर रुप देतो मग तो विषय आध्यात्मिक असो, चिंतनाचा, राजकारणाचा किंवा शृंगारिक विलासासंबंधाचा असो. खरे पाहिले तर कवीच्या ठायी भावना इतकी प्रबळ होते की तिचा वेग त्याला असह्य होतो मग ती मनात कोठेतरी स्वैर संचार करीत असते. त्या वेडाच्या भरांत कांही भावना, कांही विचार, कांही लहरी मनाचा क्षणिक ताबा घेतात आणि तशा विकल स्थितीत त्याच्या तोंडून त्रोटक, सुसंबध्द किंवा असंबध्द जे उद्‌गार निघतात त्या उद्‌गाराला भावगीत किंवा गीत असे म्हणतात. भावगीत जरी मुळचे वैयक्तिक भावनांचे चित्र असले तरी साहित्यातील त्यांचे स्थान सार्वत्रिकपणामुळे आहे. हे विसरता येत नाही. मनुष्य स्वभावाला उचित व नैसर्गिक अशी एक कल्पनात्मक उदात्त भावना किंवा सर्व सामान्य असा अनुभव थोडक्यांत पण परिणामकारक, चटकदार रीतीने कवितेत गुंफायचा की ते वाचतांना वाचकाला आपल्या हृदयाचे प्रतिबिंब त्यांत पाहता आले पाहिजे.

एक गोष्ट दिसून येते की ज्या भावना अत्यंत तीव्र होतात त्याच प्रकारचं काव्य निर्माण होतं. मग त्या दुःखाच्या असो की सुखाच्या असोत, राजकीय, सामाजिक, धार्मिक किंवा ब्रह्मानंदात रममाण होणाऱ्या असो तशाच प्रकारचं काव्य निर्माण होतं.

'जब मन गडेगा दुःखमें, कविता भी दुःखकी हो गयी
जब मन रहेगा सौख्य मे; कविता खुशी कर जायेगी
जब मनहि ब्रम्हानंदमे रममाण यह हो जायगा
तब ब्रह्मलीला काही सारा काव्य वह लिख पायेगा' [२]

---

१. मेरी जीवन यात्रा पान ८६/८ २. मेरी जीवन यात्रा पृ. क्र. ८७/१०

कवी कविता लिहितो तो मुख्य रसिक 'सापेक्षतेसाठी नाही. स्वतःसाठी, त्याला जी अनुभूती प्राप्त होते. त्यांचे पडसाद प्रतिभाशक्तीच्या विलासातून बाहेर पडतात. वैयक्तिक आनंदासाठी त्यांची कविता असते. हेच त्यांच्या काव्यात दिसून येते. तरी सर्वसाधारण लोकांच्या अनुभवांची ते दक्षता, जाणीव ठेवतांना दिसून येतात.

'यह मन ही मेरा है कवी, कविताहि रचता हर घडी
लिखता है मेरा हाथ, यह आदतही उसको है पडी
श्रोता है मेरा कान, आँखि नाचती, होती खुशी
मे साक्षि आत्मा हूं सभी का, हूं सदा स्थिति एक सी [१]

ही राष्ट्रसंतांची काव्यदृष्टी आहे पण जे साहित्य किंवा काव्य समाजाला अधोगतीला नेण्यांस प्रवृत्त होते, मानवाला मानवातून उठविण्यांचा प्रयत्न करते, सत्य–प्रेमाचा ज्यांत अविष्कार नसतो असे साहित्य किंवा काव्य कलेच्या दृष्टीने कितीही बहूमोल असले तरी राष्ट्रसंतांना त्याजं आहे. त्यांचा स्वीकार राष्ट्रसंत करीत नाही.

मैं कवि नहीं, करूणा हूं, मैं उन दुःखीयोंकी, दिल की
मैं साधु नहि, मैं साधना हूं–प्रेमकी सत नेम की
ना शांति है मुझमें, हूं मैं पिछडे जनों की भावना
इन्सान बनने जो चले, मैं उनकी हूं शुभ कामना [२]

काव्य हे समाजाची बांधिलकी पाळणारं असावं, कारण कवी कांही समाजाच्या बाहेर जन्मास येत नाही. तसे पाहिले तर प्रत्येक व्यक्ती हा कवी आहे. भावना, विकार व कल्पनांचा त्यांच्यांत समावेश आहे. तेंव्हा त्यांने समाजाशी प्रामाणिक राहून आसक्ती न ठेवता पुढे यावे.

वरीलप्रमाणे राष्ट्रसंत काव्यनिर्मिती करीत असत. साहित्यिकांनी त्यांना साहित्यिक नसल्याचे म्हटले आहे, त्याबद्दल राष्ट्रसंताना खेद नाही कारण त्यांचा काव्य हेतू समाजाच्या; मानवतेच्या रचनेसाठी, उत्थानासाठी; विकासासाठी आहे. राष्ट्रसंताच्या काव्यातील हेतू समजताच लोक त्यांच्याबरोबर एकरूप होतात व त्यांचं काव्य आत्मसात करतात.

'मेरे उपर आरोप है, मैं काव्य नही जानता
मुझको बडी इसकी खुशी, चाहे न कोई मानता
पर लोग तो सब समझते है । मैं जहाँ गाने लगूं
लाखों किताबे जा चूकी, यहि प्रेम मैं पाने लगूं [३]

---

१. मेरी जीवन यात्रा पृ. क्र. ८७/ ११ २.मेरी जीवन यात्रा पृ. क्र. ८६/७
३. मेरी जीवन यात्रा पृ. क्र. ८६/५

राष्ट्रसंत शब्दाचं सामर्थ्य ओळखून होते. संत रामदास 'कवींना शब्द सृष्टीचे 'ईश्वर' म्हणतात तर ड्रायडन इंग्रज कवी म्हणतो की, शब्द सृष्टीचे ईश्वर, सत्यद्रष्टा व 'मेक' हे एकाच अर्थाचे शब्द वाटतात. 'ईश्वर निर्मिती सृष्टीच्या अंर्तभागात खोल प्रवेश करून त्यातले गुढतत्व आणि त्यांचे प्रतिबिंब अंतःकरणरुपी दर्पणावर पाडून स्वतंत्र भासमान सृष्टी निर्माण करायची' इतकां व्यापक अर्थ यांत वाटतो.

संत रामदास व कवी ड्रायडन यांनी जे विचार मांडले त्याप्रकारचे विचार राष्ट्रसंतांनी मांडलेले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शब्दांच सामर्थ्य ओळखून होते. 'वेदाचाही अर्थ आम्हास ठावा' असे म्हणणाऱ्या संत तुकारामाच बळ संत तुकडोजीतही दिसून येते. आणि म्हणूनच ते मोठ्या आत्मविश्वासाने म्हणतात–

'मैं शब्द की खेरात हुं, सब शब्द मेरे पास हैं'

भासमान सृष्टी निर्माण करणारे व क्रान्तिकारक परिवर्तन समाजात घडविणारे ते क्रान्तिकारी, जीवनवादी साहित्यिक होते.

दलितोन्नती

'दलित' हा शब्द मनाला न रूचण्यासारखा आहे. समाजाच्या सर्वांतोपरी उन्नतीसाठी प्रत्येक व्यक्तिचा विकास होणे आवश्यक आहे. दलित व्यक्तिच्या विकासासाठी प्रत्येकाने स्वत:ला बांधून घेणे आवश्यक आहे.

समाजाचा विकास करतांना प्रत्येक व्यक्ती समान आहे. तिथे कोणी श्रेष्ठ नाही व कनिष्ठही नाही. कनिष्ठतेची भावना निर्माण करून एखाद्या घटकांची पिळवणूक करणे व त्यासाठी धर्मशास्त्राचा आधार सांगणे म्हणजे विशिष्ट लोकांच्या स्वार्थी मनोवृत्तीचे ते प्रदर्शन होय.

आमच्या सामाजिक विकासाच्या इतिहासाकडे लक्ष वळविल्यास असे दिसून येईल की स्पृश्य-अस्पृश्य या भेदामुळे परस्पराविषयीची भावना अहितकारक झाली होती. ब्राम्हण काळात ज्यावेळी आयुर्वेदाचा शल्यचिकित्सेवरील महत्वपूर्ण ग्रंथ 'सुश्रुत संहिता' ग्रंथित झाला. त्याच काळापासून ब्राम्हणांचे समाजावर वर्चस्व असल्याचे जाणवते. अस्पृशांना शल्यचिकित्सा शिकविण्यांत येऊ नये पण कांही अपरिहार्य कारणामुळे प्रश्न उद्‌भवला तर त्यांना संस्कृतमंत्र शिकविण्यात येवू नये. या मताचे कांही आचार्य होते. मॅकडोनल या पाश्चिमात्य विव्दानाच्या मते सुश्रुत इ स. पूर्व चौथ्या शताब्दित झाला असावा. सुश्रुत विषयी विव्दानात एकमत नसले तरी अडीच हजार वर्षापूर्वी सुश्रुत होऊन गेला असावा.

भारतीय संस्कृतीच्या वेदकालीन इतिहासावर नजर फिरविल्यास जगातील इतर समाजाप्रमाणे भारतीय समाज देखील अनेक वर्णांनी बनलेला आहे.

सर्वकाली, सर्वदेशी । नैसर्गिक गुणभिन्नता ऐसी
म्हणोनि वर्णाश्रम योजना जगासि । शांतिदायी [1]

भारतीय वर्णाश्रम व्यवस्था चार वर्णातून दिसून येते १) ब्राम्हण किंवा उपाध्याय वर्ग २) क्षत्रिय किंवा सैनिक वर्ग ३) वैश्य किंवा व्यापारी वर्ग ४) शुद्र किंवा शेतकरी–मजूर वर्ग.

तत्‌कालीन परिस्थितीत व्यक्तिनी योग्य ती पात्रता संपादन केल्यावर त्याला वर्ग बदलविण्यांचा अधिकार असे. त्यामुळे वर्गातील व्यक्ती बदलत्या राहत असे.

---

१. सुश्रुत संहिता पान ९ अध्याय २ ओवी ५
१. ग्रामगीता अ. ५ ओवी २२

ब्राम्हण काळात उपाध्याय वर्गाने सामाजिक संबंधाच्या बाबतीत इतर जनतेपासून स्वत:ला वेगळे तोडून घेतले आणि प्रवेश बंदीच्या साहयाने स्वत:चे जातीमध्ये रूपांतर करून घेतले. श्रम विभागाच्या तत्वानुसार बाकीच्याही जनतेची विभागणी झाली. त्यामुळे काही वर्ग खूप मोठे तर कांही अगदी लहान झाले. वैश्य व शुद्रात जातीच्या मूळ स्वरूपात खूप मोठ्या स्वरूपाचा वराच मसाला असल्याने आज उपलब्ध असलेल्या जातीचा हा वर्ग साठा ठरला. क्षत्रिय वर्ग पोटविभागणीला तयार न झाल्याने ह्या वर्गाचे विभाजन दोन भागातच झाले.

१) राज्यकर्ते व दुसरे सैनिक, परिणांमत: वर्ग पद्धतीतील मुक्त प्रवेश पद्धती गमावली आणि ते स्वयंमर्यादित वर्ग बनले. त्यांना 'जाती' हे नाव मिळाले. पुढे व्यवसायावरुन जाती निर्माण झाल्यात. व्यवसाय बदलला. जात तशीच राहिली.

नजरे आड केले कर्मगुण । जन्मावरोनि चालले वर्ण
धंद्यावरून जाती भिन्न । वाढल्या लोकी [१]

खरे पाहिले तर समाज व्यवस्था सुव्यवस्थित राहावी म्हणून वर्ण निर्माण करण्यांत आले होते. तेथे ब्राम्हणापासून दलितापर्यन्त सर्वांना सामाजिक दृष्टीने समान मानण्यात आले होते परंतु जाती–जातीत मानवाला बांधण्यात आल्यामुळे सामाजिक जीवन नष्ट झाले त्याची विशालता नष्ट झाली. त्यांची सर्वात मोठी झळ पोहचली ती शुद्र वर्गाला. आज शुद्र वर्गात ज्या जाती निर्माण झाल्यात त्या अनुकरण व बहिष्काराच्या माध्यमातून निर्माण झाल्या आहेत तरी त्या सर्वांचा समावेश दलितांमध्ये करण्यात येतो. याच दलितावर समाजाने पूर्णत: बहिष्कार टाकून समाजापासून बाजूला ठेवले. समाजातील उच्च वर्गीय ब्राम्हण वर्गाशिवाय जमीनदार व सावकारांनी खऱ्या अर्थाने दलितांची पिळवणूक व अतिरेकी स्वरूपाचे अत्याचार करायला सुरवात केली. पुरूषांना मारझोड करणे, स्त्रियांची इज्जत लुटणे ह्या नित्याच्या गोष्टी होऊन बसल्यात. भारतीय लोकशाहीत प्रत्येकाला स्वातंत्र्य देण्यात आले आहे. ही घटनात्मक बाब असली तरी आजही हरिजनांवरील अन्याय कमी झाले नाही. कायद्याने कोणत्याही व्यक्तीला दलित मानायचे नाही किंवा त्यांच्यावर बहिष्कार टाकायचा नाही असे असतांना हरिजनावर बहिष्कार टाकल्याच्या बातम्या ताज्या स्वरूपात वृत्तपत्रातून झळकतात.

दलित, शुद्र–अतिशुद्र आणि आदिवासी लोकांवर जे अन्याय व अत्याचार झालेत त्याचा बोलका इतिहास आचार्य भिसेच्या 'जीवन छाया', श्रीमती गोदूताई परूळेकरांच्या 'जेंव्हा माणूस जागा होतो' तर 'वडवानर' आणि अनिल बर्वेच्या 'रोखलेल्या बंदूका आणि उठलेली जनता' आदी पुस्तकांत पाहायला मिळतात.

---

१. ग्रामगीता अ. ५ ओवी २४

मानवाचा मानवाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदल्याशिवाय समाजात निश्चित-स्वरुपांत परिवर्तन होणे अशक्य आहे. त्यासाठी राष्ट्रसंतांनी ज्योतिबा फुले व महात्मा गांधीच्या दलितोन्नतीच्या कार्याकडे लोकांचे लक्ष वळविल्याचे दिसून येते

महात्मा गांधी, ज्योतिबा फुले । यांनी मर्म ओळखले
दलितोन्नतीचे कार्य केले । कर्तव्य आपुले तेचि असे [१]

– दलितोन्नतीचा इतिहास –

महाराष्ट्रांत आगरकरानंतर शुद्र-अतिशुद्राचे, अस्पृश्यांचे; अर्धपोटी जनतेचे ज्योतिबा फुले प्रतिनिधी होते. म. फुल्यांचे बंड त्यांच्या समकालीनापेक्षा किंवा पूर्वी झालेल्या सर्वापेक्षा निश्चित स्वरूपांत वेगळे होते. फुल्यांची चार्तुर्वण्याविरूद्ध; ब्राम्हण नेतृत्वाविरूद्ध असलेलेली टीका केवळ तात्विक किंवा अध्यात्मिक स्वरूपांची नाही तर ती व्यावहारिक आहे. उच्चवर्ण आणि नीचवर्ण निर्माण होतात व ते सर्वस्वी अपरिवर्तनिय आहेत. यांचे म. फुले कट्टर विरोधक होते. ब्राह्मणाकडे ज्ञानाची, शिक्षणाची मक्तेदारी दिलेली असून शुद्र अतिशुद्राच्या माथी कायमची गुलामगिरी; हीन-दीन लाचार अवस्था लादलेली आहे. तोच त्याचा धर्म आहे. त्यांतच त्यांनी समाधान मानावे-भाग्य मानावे. या भयानक कल्पनेच्या विरोधात, फुल्यांचे सर्वकष बंड होते. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फुल्यांना अभिप्रेत असलेल्या शुद्र-अतिशुद्राच्या व्यथांना उचलून धरले. चार्तुवर्ण व्यवस्थेवर आधारित असलेल्या मनुस्मृतीला जाळण्याचे कार्य करून चार्तुवर्ण व्यवस्थेवर बहिष्कार टाकला व दलितांना संघटित केले. दलितांचे वर्तनाच्या आंदोलनाबरोबर एका पाठीमागे एक आंदोलन उभारून शुद्र-अतिशुद्रात त्यांच्या अस्तित्वाची-अस्मितेची जाणीव निर्माण करण्यांत आंबेडकर अग्रेसर ठरलेत. त्यांच काळांत राष्ट्रपिता महात्मा गांधी पुढे आलेत, राजकीय पातळीवर आंबेडकराचे व म. गांधीचे विचार ऐक होऊ शकले नाही ती बाब वेगळी पण दलितांच्या अस्तित्वाची-अस्मितेची जाणीव निर्माण करण्यांत आंबेडकर यशस्वी ठरलेत. त्यांच काळांत राष्ट्रपिता महात्मा गांधी पुढे आलेत. राजकीय पातळीवर आंबेडकराचे व म. गांधीचे विचार ऐक होऊ शकले नाही ती बाब वेगळी पण त्यांच्या दलितोन्नतीचे मोल त्यामुळे कमी होऊ शकत नाही. आंबेडकरांचे कार्य दलित चळवळीच्या सर्व क्षेत्रात प्रभावी ठरले. त्याचे कारण दलितांच्या वेदना व्यथा घेऊनच डॉ. आंबेडकर जन्माला आले होते. त्या जन्मजात व्यथाच त्यांच्या जीवनाची प्रेरणा ठरली होती. त्यांच्या व्यथा कोटी-कोटी दलित मानवांची होती. त्यांचा द्वेष वैयक्तिक नव्हता तर जन्मजात विषमतेवर होता. हे जरी सर्व खरे असले तरी म. गांधीच्या

---

१. ग्रामगीता अ. ३९ ओवी ९५ २. युगांतर अंक २० वा

कार्याचे मोठेपण लपविता येत नाही. म. गांधीनी हरिजन सेवक संघ काढला. सर्वोतोपरी हरिजनाच्या मूलभूत प्रश्नाला उचलण्यांचा आटोकाट प्रयत्न केला. त्याचसोबत हरिजन नांवाचे पत्रक देखील चालविले. हरिजनांना समाजात स्थान लाभावे, विहिरी, देऊळ, स्थळे हरिजनासाठी मुक्त असायला पाहिजे. त्यासाठी त्यांनीं चळवळ उभारली उपोषण केले. सत्याग्रह केला. म. ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. गांधीजींच्या प्रयत्नामुळे दलितांना श्वास घेता आला. प्रगतीचा मार्ग सापडला. वंश, धर्म, देश हे मानव निर्मित कृत्रिम भेदभाव आहेत. त्यातून केवळ मूठभर लोकांचा स्वार्थ साधतो. आपल्या स्वार्थ प्रवृत्तीसाठी सामान्य जनतेत भेदभाव, राग-द्वेष ते निर्माण करतात. ह्यापासून कुठलाही समाज मुक्त नाही. त्याहून श्रेष्ठ अशा मानवतेची, मानवी समानतेची, विश्व कुटुंबाची प्राण प्रतिष्ठा केली पाहिजे. ही संपूर्ण शिकवण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाच्या साहित्यातून दिसून येते. त्यांतच त्यांच्या दलितोन्नतीची कळकळ दिसून येते. राष्ट्रसंताना दलितांच्या व्यथा; वेदना चिंतनाने, अनुभवाने, खऱ्या खुऱ्या मानवतेच्या कळकळीने जाणवल्या होत्या. समाजाच्या प्रत्येक स्तरावर संपूर्ण समाजातील उच्चस्तर मानवाप्रमाणे दलितांना, शुद्र; अतिशुद्राना व आदिवासी जमातीना स्थान लाभावे म्हणून त्यांनी आकोकाट प्रयत्न केले.

एक गोष्ट प्रबंधकाराचे आजोबा वेदशास्त्र संपन्न कै. नारायणराव पद्वाड प्रबंधकाराना सांगत होते की; १९४२ ला राष्ट्रसंतांनी म. गांधींना मोझरी आश्रमाला भेट देण्यासाठी निमंत्रित केले होते 'गावात हरिजनांना सार्वजनिक क्षेत्रात स्थान असेल तर मी येईन' असे बापूजी म्हणाले होते. राष्ट्रसंत मोझरीला परत आले. परत आल्यावर त्यांनी जाणत्या कर्त्या कार्यकर्त्याची सभा घेतली. मानवतेचा दृष्टिकोन समोर ठेवला. कार्यावर निष्ठा असेल तर हमखास यश दारांत उभे राहते. या न्यायाप्रमाणे मोझरी ग्रामात घडले. खरी सामाजिक क्रान्ती घडली. सभा आटोपली व लगेच दुसरे दिवशी राष्ट्रसंतांच्या प्रेरणेमुळे ब्राह्मण, अब्राह्मण इतर जातीचे व हरिजन सगळे एकत्रित आले. सगळ्यांनी आणलेली शिदोरी (जेवणाचे डब्बे) एकत्रित करण्यांत आली. नाना मांग यांनी सर्वांना वाढायला सुरवात केली, या सामुहिक भोजनांत भागवत भक्त, वेदशास्त्र संपन्न कै. बाळशास्त्री (काव्यांनी) व श्री वामनराव लोहकरे यांनी भाग घेतला होता. अन् त्यादिवसानंतर हरिजनांना योग्यतेने सन्मान मिळायला लागला. हरिजनांची घरे, त्यांच्या विहिरी सुव्यवस्थित करण्यांत आल्यात. समानतेने हरिजनाच्या मुला-मुलींना शाळेत प्रवेश देण्यांत आला. समाजातील प्रतिष्ठित समजण्यांत येणाऱ्या लोकांच्या घरात हरिजनांना उघडरीतीने, मनमोकळेपणाने प्रवेश देण्यांत आला आणि आजही तो कायम स्वरूपांत आहे. पुढे हे लोण अनेक गावात सतत

पसरत गेलं. एक नवी क्रान्ती; एक नवी दिशा मिळायला लागली. राष्ट्रसंतांनी हे कार्य प्रथम आरती मंडळाच्या व नंतर श्री गुरूदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून केले. बाबा आढावाची 'एक गाव–एक पाणवठा' ही योजना पुढे आली नव्हती इतकेच नव्हे तर स्वराज्य मिळायला ५ वर्षाचा अवधी होता. त्या काळांत राष्ट्रसंतांनी ग्रामीण भागात, रूढी आणि परंपरेने बांधलेल्या समाजात हे परिवर्तन घडवून आणले होते. त्यांच्या कार्याच्या पाठीमागे होती मानव व मानवता धर्माची शक्ती व जबाबदार कार्यकर्त्याची वृत्ती व उत्साह'.

राष्ट्रसंताचं आरती व नंतरचं श्री गुरूदेव सेवा मंडळ म्हणजे मानवतेचं मंदिर ! 'सबके लिये खुला है । मंदिर यह हमारा' असा आवाज त्यांनी काढला. अशा त्यांच्या वृत्तीला विशिष्ट जमातीसाठी देवळांत प्रवेश कसा खपणार ? देवधर्माचे दलात ठरलेल्या ब्राम्हण वर्गावर राष्ट्रसंतांनी प्रहार करायला सुरवात केली. त्याच बरोबर इतर समाजाला हाताशी घेऊन त्यांच्यात परिवर्तन घडविण्यांच महान कार्य; तात्विक दृष्टीने समाजाचा एक घटक म्हणून हाती घेतले. राजकीय लोकशाही स्थिर ठेवायची असेल तर सामाजिक लोकशाहीचे मूल्य समाजात स्थिर व्हायला पाहिजे. जातिभेद कायमचा मिटवणे किंवा त्यातील तणाव, तीव्रता कमी करणे अत्यावश्यक आहे म्हणूनच सार्वजनिक क्षेत्रांत शुद्र–अतिशुद्रांना वाव मिळावा म्हणून त्यांनी कार्य करायला सुरवात केली. त्यांच्या कार्याचा पाया मानवतावादी धर्माचा होता.

यारे या सगळे, करू दर्शन देवाचे । दिवस सुखाचे स्वातंत्र्याचे
यारे हरिजन । या मंदिर उघडे करू या; नंदादीप उजळू मानवधर्माचा
दिसती विहिरी पाणी भरु हर्षाने, दिधला हुकूम असा अपुल्या सरकारनें
स्पृशास्पृश अता सरले जातियतेचे, दिवस सुखाचे स्वातंत्र्याचें [१]

प्रत्येक खेडचाखेडचात जाऊन सार्वजनिक स्थळे शुद्र–अति–शुद्रासाठी मुक्त करण्याचे कार्य त्यांनी केले. गुरूदेव प्रचारकाकडून प्रत्येक गाव सामाजिक दृष्टिकोनातून सुधरविण्यांचा चंग त्यांनी बांधला होता. साने गुरूजींनी पंढरपूरच्या देवळांत हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून आमरण उपोषण सुरू केले त्यावेळी राष्ट्रसंतांनी त्यांना सक्रिय मदत केली व स्वतः पंढरपूरला गेलेत–अखिल भारतातील पंडयांना, देवधर्माच्या दलालांना समजावून सांगतांना राष्ट्रसंत म्हणतात.

हरिजन है तेरे भाई । धर्म कर्म के साथी
करते है तेरी सेवा, पितृ मातृ की भ्रान्ती
जो कुछ हुआ, सो जाने दे । अब साथ हुशारी; बाजू हो पुजारी [२]

---

१. समाज संजीवनी पृ. २३ २. राष्ट्रीय भजनावली (हिन्दी) १६/२५

परमेश्वराला जात प्रिय नाही. तो गुणांचा भोक्ता आहे असे नसते तर त्यांनी चोखामेळा, कर्ममेळा व बंका यांना त्यांनी जवळ केले नसते. नाथ महारा घरी जेवल्यावर परमेश्वराने जातीच्या आधारावर भ्रष्ट झालेला ब्राम्हण म्हणून बाजूला सारले असते.

जा पुछले 'भगवान तुम्हे प्रीय कौन है'
गुणधर्म है की जात कहो, काहे मौन है ?
आ करके बता दे, न लगा अब देरी । बाजू हो पुजारी

राष्ट्रसंताचा अत्यंत महत्वपूर्ण व नव्या समाजाला नवी दिशा दाखविणारा ओवीबध्द ग्रंथ म्हणजे 'ग्रामगीता' होय ! त्या ग्रंथात 'दलित सेवा' हा स्वतंत्र अध्याय त्यांनी लिहिलेला आहे.

दलित सेवा ह्या अध्यायामध्ये अत्यंत सुलभतेने मानवी जीवनाच्या तत्वज्ञानाचा उकल केला आहे. धर्म–जात–पात आदी सर्व भेद भावावर त्यांनी प्रकाश टाकलेला आहे स्वधर्माबद्दल राष्ट्रसंतांनी जे उद्‌गार काढले आहेत त्यांत सर्व धर्मांचा सन्मान करून सर्व धर्म समन्वयाची बैठक उत्तमरितीने बसवली आहे. स्वधर्म म्हणजे आत्मधर्म मग आत्म्याचा स्वभाव सत्य, ज्ञान, प्रेम असून मानवी जीवनाच्या होमकुंडात त्यांची पूर्तता करणे हे मानवी कर्म होय !

सत्याचे ज्ञान म्हणजे समग्रतेचे ज्ञान. समग्रतेशिवाय सौंदर्य नाही. 'सौंदर्य रमो घर–घरांत स्वर्गीयापरी' ही भावना फलस्वरूप करायची असेल तर प्रेमाची वृद्धी व्हायला पाहिजे. प्रत्येकाने प्रत्येकाबरोबर वागतांना मानवतेची; प्रेमाची जोपासना करावी. कोणी कोणावर अन्याय करणार नाही. न्यायवृत्ती समाजात सर्वत्र रहावी. यासाठीप्रत्येकांचे ठायी न्यायसिद्धता असायला पाहिजे. तोच त्याचा खऱ्या अर्थाने स्वधर्म होय ! विकरांधता म्हणजे परधर्म होय. असे विचार राष्ट्रसंतांनी मांडले आहे.

धर्माचा अभिमान बाळगणाऱ्या कट्टर अभिमानी मंडळींना राष्ट्रसंतांनी विचाराची नवी दिशा दर्शविली आहे. धर्म जर सर्वांचा एक असेल तर त्या धर्मातील अनुयायांनी आपसांत मतभेद निर्माण करणे, मानव मानवांत श्रेष्ठ–कनिष्ठता निर्माण करणे म्हणजे धर्म तत्वाच्या मूळ सिद्धांताशी फारकत करून घेणे होय ! धर्माच्या दांभिक अनुयायांनी श्रेष्ठ–कनिष्ठतेचा भाग निर्माण केला. तो केवळ अहिंसेच्या स्वार्थासाठी : धर्माची खरी शिकवण समानतेच्या, सहकार्याच्या, दिव्यतेच्या, उदारतेच्या, त्यागाच्या आणि बंधुत्वाच्या पायावर झाली आहे.

धर्माबद्दल अभूतपूर्व आदर दर्शविणाऱ्या शंकराचार्यांना चार्तुवर्णाची चौकट मोडून ज्या धर्मबांधवांना कुत्र्या–मांजराइतकांही मान मिळत नाही. कर्म, अर्चा,

पूजेचा अधिकार लाभत नाही किंवा खऱ्या धर्माची शिकवण मिळत नाही. अशां-साठी मानवधर्माप्रमाणे कांही करावं असा साधा प्रश्न कां उभा राहत नाही' हाच खरा प्रश्न आहे. धर्माभिमान बाळगून वरीलप्रमाणे वागणाऱ्या लोकांना राष्ट्रसंत धर्मलंड म्हणतात.

धर्मांचा बाळगतो अभिमान । परि धर्म बांधवा नाही स्थान
कुत्र्या मांजरा इतकाहि मान । न देती धर्मलंड [१]

आज अपारतेची संपत्ती या धर्मबांधवांजवळ आहे. भारतातील अनेक देवस्थानाजवळ इतकी संपत्ती आहे की त्यांचे मोजमाप करता येत नाही. अर्धपोटी राहणाऱ्या, अन्नासाठी मोताद झालेल्या बांधवांना मदत मानवतेच्या धर्माप्रमाणे करावी. असे करणे म्हणजे स्वतःचा अंगिकार करणे होय !

पण आज खऱ्या धर्माची मूळ तत्वे लयास गेली. सांप्रदायिकता, बुवाबाजी आदीचे स्तोम माजल्यामुळे अनेक भेदभाव; जाती, व धर्म निर्माण झाले. मत-मतांतरे निर्माण झाले आहे. 'मत-मताचा गलबला । कोणी न पुसे कवणाला । जो ज्या मती सापडला । तोचि भला' या समर्थ रामदासाच्या मताचा प्रत्यय यायला लागला आहे. म्हणूनच राष्ट्रसंत काळ आणि परिस्थितीचे यथा योग्य भान ठेवून लोकांना उपदेश करताना म्हणतात.

बदलो बदलना चायिऐ । जैसी बखत आजाएगी
आगेही बढ़ना चाहिये । तब जिंदगी सध जायेगी
पिछली सब बाते हमेशा । चल नही सकती कही
ना हम चले वैसे अभी । यह समय देता यादहि [२]

– दीन – दलितासाठी –

आजच्या प्रचलित समाजात दीन-दलिताकडे दुर्लक्ष करण्यांची स्वधर्मातील लोकांची प्रवृत्ती आहे. त्यांच्या मूर्खपणाविषयी ते नाखूष आहे.

दीन-दलितांची तहानभूक । दीन-दलितांचे सुख दुःख
काहीच नेणती अभिमानी मुर्ख । स्वधर्म लोक चालविती [३]

दीन-दलिताकडे लक्ष वळविणे, त्यांचा उत्कर्ष करणे हे आजच्या प्रगतशील समाजाला अत्यावश्यक आहे. दलित हा शब्द राष्ट्रसंतांना सामाजिक व आर्थिक दृष्टीने मागासलेले असा अभिप्रेत आहे म्हणून 'दलित सेवा' या अध्यायात त्यांनी दोन्ही प्रकारच्या लोकांचा विचार केला आहे. 'दलित' व व्यक्ति सुखासाठी मानवात अंतर पाडणाऱ्या लोकांमधील अज्ञान नष्ट करून मानवी जीवन जगण्यांचे

---

१. मेरी जीवन यात्रा पृ. ७१/१३ २. ग्रामगीता अ. २९ ओवी ६३
३. ग्रामगीता अ. २९ ओवी ६७

खरे सामर्थ्य त्यांच्यांत निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच दलितांची अस्मिता जागविण्याचे कार्य सामाजिक कार्यकर्त्यांचे आहे. त्यासाठी त्यांनी स्वत:ला बांधून घ्यावे.

आज सुधारणेचा आवाज केवळ शहरांत किंवा ग्रामीण विभागात लिघतांना दिसून येतो. पण खरी दलित सेवा करायची असेल तर आचार्य भिसे व गोदूताई परुळेकराचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून रानातील आदिवासी जमात; जी अनेक शतकापासून अन्यायाला, अत्याचाराला बळी पडत आहे. त्यांच्यासाठी कार्य करावे. आदिवासी लोकांची सुधारणा करणे हे समाज कार्यकर्त्यांचे कार्य होय !

त्यांच्या जीवनाचे मूलभूत प्रश्न सोडविणे व मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक विकास घडवून आणणे इतकेच नाही तर त्यांना आपणासारखे बनविणे आवश्यक आहे.

त्यासि बोलणे, चालणे समजेना । भिवोनि पळती बघताचि आपणा
प्रेम लावोनि त्या कुटुंबांना । करावे आपण आपलेसे
त्यांना औषधपाणी पुरवावे । लिहणे, वाचणेहि शिकवावे
उत्सवी, भोजनी, मंदिरी । अस्पृश्यतेचीहि न धरावी उरी
स्थान मान सर्वतोपरी । एक करावे सर्वांचे
स्वच्छ राहणी निर्व्यसनी । शिकवावी स्वये त्यात मिसळोनि
तुच्छ न मानावे दुरोनि । उणीव दावोनि परभारे
दूर कराव्या अडी-अडचणी । सुविचारांची करावी पेरणी
सर्वच समाज समानगुणी । करावा नाना प्रयत्ने [१]

त्याचसोबत दु:खी, कष्टी असलेल्या बांधवात श्रमप्रतिष्ठा निर्माण करांवी. शिक्षणाच्या, आरोग्यांच्या सोयी निर्माण करून सार्वजनिक कार्यक्रमांत त्यांना सहभागी करावे. त्यामुळे आपण वेगळे किंवा कमी प्रतिचे आहोत ही भावना नष्ट होईल. त्यांच्यात मिसळून त्यांच्यात परिवर्तन घडवून आणणें आवश्यक आहे. त्यांची उन्नती कशी होईल हे काळाच्या गरजेनुसार ठरवावे. जे जीवनांत बरबाद झाले आहे. रोगांनी पिडलेले आहेत. त्यांच्या जीवनाचा प्रश्न महत्वाचा आहे. माननीय बाबा आमटे व श्री शिवराज पटवर्धन यांनी आनंदवन व तपोवन येथे कुष्ठ रोग्यासाठी कार्य चालविले आहे व रोग्यांच्या जीवनांत त्यांनी हिरवेपण भरले आहे. त्यांना स्वावलंबी बनविले आहे. ते त्यांचे कार्य राष्ट्रसंतानी आपल्या कार्यकर्त्याकडून अपेक्षित केले आहे.

---

१. ग्रामगीता अ. २९ ओवी ७२-७६

क्षय अथवा कुष्ठ रोग । हे न मानिता दैवाचे भोग
त्यांच्या निवारण्यांचे प्रयोग । केले पाहिजे गावो–गावी
भंगलेल्या मानवी मूर्ति । त्यांच्या सेवेतची ईश्वरभक्ती
आर्तासि दिल्या वाचून शांति । मागता मुक्ती मिळे कैसी ?
जीवनातून जे जें उठले । त्यांसी सहृदयपणे पाहिजे भेटले
अनार्थाचिया सुखास्तव झटले । तेचि आवडले देव, धर्म [१]

हेच भारतातील संस्कृतिच्या मोठेपणाचे विशेष होय कारण गौतम बुद्धाने जातियभेद नष्ट केले होते तर पैगंबराने विधवा अनाथ, अपंगाची सेवा केली होती. प्रभू रामचंद्राने शबरीचा आदर राखतांना शुद्र हा भाव अंतरी ठेवला नव्हता तर स्त्री; शुद्राचा कैवारी श्रीकृष्ण झाला होता. इतकेच नव्हे तर सर्वत्र समानतेचा आदर्श घडविला होता. भीष्माचार्याच्या वडिलांनी कोळ्यांच्या मुलीशी विवाह केला होता. हा सर्व इतिहास काय सांगतो ?

'अस्पृश्यतेला बाजूला सारून संत ज्ञानेश्वर व संत नामदेव पुढे आले व त्यांनी वारकरी संप्रदायात मानव धर्म प्रस्थापित केला. दलित समाजातून पुढे आलेले सजन कसाई, रविदास चांभार, दादू पिंजारी, गोरा कुंभार, चोखामेळा, जनी, बंका महार असे कितीतरी नावे सहजतेने सांगता येतील. या सर्वांना वारकरी पंथात मानाचे स्थान आहे.

विचारवंत केवळ विशिष्ट समाजात जन्मास येत नाही तर ते प्रत्येक समाजात निर्माण होत असतात. त्यासाठी समाजातील जो घटक मागासलेला असेल त्यांना उचलून धरणे आवश्यक आहे. हाच खरा धर्म आहे. हीच खरी देवपूजा आहे,

सामान्य सेवकांने किमान आपल्या गावाची सेवा करावी. प्रत्येकाला स्वतत्व कळेल असे ज्ञान त्याला शिकवावे, असा उपदेश राष्ट्रसंत सेवकांना करतात.

आपुल्या गावाचा कोणी प्राणी । मुळीच न ठेवता अज्ञानी
हीच खरी गावाची वाणी । पुरवा झटूनि सेवकांनो [२]

अनेक कार्यक्रमातून (सामाजिक, आर्थिक व धार्मिक) वरील कार्य पूर्ण करावे.

मानवता व मानव धर्म जागला, व तो प्रत्येकांच्या अंतरी स्थिरावला व समाजातील अज्ञान नष्ट झाले की मानवा-मानवातील भेदभाव, स्पृश्य–अस्पृश्यतेचे भाव नष्ट होईल. सर्व समाज विकसित होईल. मग दलित किंवा दलितोत्तर ब्राह्मण–ब्राह्मणोत्तर राहणार नाही. सर्वांमध्ये मानव व मानवता दिसायला लागेल असा राष्ट्रसंतांना विश्वास आहे. 卐卐卐

१. ग्रा. गी. अ. १२ ओवी ११२ . २. ग्रा. गी. अ. २९ ओवी ७९–८१

महिलोन्नती

भारताचा इतिहास डोळ्यासमोर ठेवला की उपनिषदाच्या काळांत स्त्रियांनी रचलेली कांही सूक्ते आपणांस पाहावयांस मिळतात. हा कालखंड डोळ्यासमोरून बाजूला सारला की त्यानंतर खाजगी मालमत्तेच्या प्रश्नाच्या उदयाबरोबर पुरुष प्रधान कुटुंब व्यवस्था पुढे आली आणि पिता-पती आणि पुत्र यांचे संरक्षण स्वीकारणे हे तिच्या नशिबी आले अन याचबरोबर गुलामगिरीने आपली पकड मजबूत केली.

चार्तुवर्ण्य आणि जन्मजात जातियवादाच्या चौकटीच्या उदयाबरोबरच स्त्रियांची गुलामगिरी अधिकच पक्की व्हायला लागली. भारत हा संत-महंताचा देश म्हणून गौरविला जातो. अनेक धर्म-पंथ निर्माण झाली. पण निर्माण झालेल्या वैष्णव, भागवत, नानक आदी पंथानी स्त्रियांच्या समानतेचा विचार केला नाही. उलट 'स्त्री ही कार्यातील धोंड, 'स्त्री म्हणजे नरकद्वार' असे विशेषणे त्यांनी तिच्या पदरी टाकल्यावर त्यांच्याकडून स्त्रियांना साध्या हक्काची व ती मिळविण्यांची अपेक्षा तरी कशी करावी ? दोन हजार वर्षापूर्वीचा इतिहास पाहिल्यावर स्त्रियांच्या समानतेचा किंवा हक्कांचां प्रश्न कोणी उपस्थित केला नाही.

भव्य-दिव्य, उच्चत्तम संस्कृती असलेल्यां देशांत परकीयांनी येऊन स्त्रियांच्या जीवनाचा विचार करावा, ही आमच्या इतिहासातील दुर्दैवी बाब आहे.

स्त्री मुक्ती इतिहासाचीं सुरवात व स्त्रियांचे समाजातील स्थान व महत्व

स्त्री मुक्ती आंदोलनाचा इतिहास अकबराच्या काळापासून सुरू होतो. सती जाण्याची प्रथा कायद्याने बंद केली म्हणून लॉर्ड बेंटिगचे नांव निघते पण त्या अगोदर इतिहास वेडचा महंमद तघलघाचे नांव पुढे करतो पण वेडचा महंमदाच्या वेडचाप्रमाणे हे ही एक वेड मुल्ला, मौलवी, शास्त्री, पंडित व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्याने ठरविले ही बाब वेगळी ! बदनाम म्हणून इतिहास अल्लाउद्दिन खिलजीला पुढे करतो पण त्यांचे नांवे स्त्री-विषयक जी एक सुधारणा आहे त्यावर इतिहास काळा पडदा टाकू शकत नाही. ती म्हणजे वेश्या व्यवसायाला बंदी. वेश्यांनी विवाह करावे असा हुकूम त्याने काढला होता. अकबर हा सर्वापेक्षा

श्रेष्ठ ठरतो. त्याने केलेल्या सुधारणा अत्यंत व्यापक आहे. भारतीय स्त्रियांची पहिली सनद त्याने केली असे म्हणता येईल. अकबरप्रणीत सुधारणा खालील प्रकारे असल्याचे दिसून येतात.

१) हिन्दु स्त्रीने सती जाण्यास प्रतिबंध २) हिन्दू स्त्रियांच्या पुनर्विवाहास मान्यता ३) बालविवाहास बंदी, विवाहपूर्वी मुलीचे वय किमान चौदा तर मुलाचे वय सोळा असावे, या संबंधी कोतवालाचा शिफारस वजा दाखला मिळायला पाहिजे. ४) विषम विवाह बंदी, वर आणि वधू यांच्या वयांत १२ वर्षापेक्षा अधिक अंतर असू नये ५) वेश्या व्यवसायावर प्रतिबंध, त्यासंबंधी खास नियम, परवाना पद्धती–वेगळी वस्ती इत्यादी सुधारणा दिसतात. हिन्दु व मुस्लिम स्त्रियांना कधी नव्हते इतके अधिकार व हक्क प्रथमच मिळाले पण हिन्दु व मुस्लिम सनातन्यांनी; हिन्दू शास्त्री–पंडितांनी आणि मुस्लिमानी गजहब केला. अकबराच्या मृत्युनंतर सनातन्यांचा जोर सतत वाढत गेला व पुन्हा स्त्रियांच्या नशिबी पूर्वीची कर्म कहाणी आली [१] पण मुस्लिमांच्या अनेक पत्नी संबंधी अकबर काही करू शकला नाही. ही वस्तुस्थिती आहे.

अकबरानंतर हिन्दु आणि मुसलमान दोघांचाही पराभव झाला. इंग्रजी शासनाचा अमल सुरू झाला. त्याच काळांत स्त्री विषयक सुधारणेला उचल मिळाली. महात्मा ज्योतिबांनी शुद्र–अतिशुद्राच्या प्रश्नाबरोबर स्त्रियांचा प्रश्न तेवढ्याच पातळीवरून उचललेला आपणांस दिसून येतो. आयुष्यभर त्यांनी त्या प्रश्नाला उचलून धरले हे विसरता येत नाही.

कुटुंब प्रमुखाची हुकूमशाही आणि स्त्रियांची गुलामगिरी हा खरोखरच विषमतेच्या गुलामगिरीचा पाया आहे–हे ज्योतिबांनी चांगले ओळखले होते. तो तोडल्याखेरीज स्त्री पुरुषांत समानता येणे शक्य नाही. ही समानता आल्याशिवाय समाजात समानतेच्या गोष्टी बोलण्यांत कांही अर्थ नाही. अशी शास्त्रशुध्द भूमिका त्यांनी स्वीकारली. त्यासाठी वाटेल तो त्याग–वेदनाही त्यांनी सहन केल्यांत. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे कार्य थंडावले. त्यानंतर कर्वे आले पण त्यांचे कार्य एकमार्गी व ब्राम्हण वर्गापुरते, उच्चवर्गीय स्त्रियांपुरतेच मर्यादित राहिले. लो. टिळकांच्या काळांतील स्त्रियांच्या चळवळीचा विचार केल्यावर एक गोष्ट नजरेत भरते–ती मिशनरी लोकांच्या कार्याची ! मिशनऱ्यांनी आदिवासी समाजात जाऊन खूप मोठ्या प्रमाणांत कार्य करावयास सुरवात केली. जंगल, दऱ्याखोऱ्यांत; डोंगर कपारीत जाऊन कार्य केले. त्यांच्या कार्याचा व्याप मोठा होता. सर्व सामान्य नव्हे तर अस्पृश्य, आदिवासी, मागास स्त्रिया व त्यांची मुलें यांची सतत सेवा

---

१. युगांतर (मासिक) वर्ष २० अंक २१–२२ संपादक–श्रीकांत लाड.

केली. साथीच्या रोगांतून, संसर्गजन्य रोगातून त्यांची सुटका केली. 'सर्वहारा वर्गाला मदत करायच कार्य हे मिशनऱ्यांचे आहे असा समज पांढरपेशा वर्गाचा त्याकाळी झाला होता नंतर म. गांधीचा काळ समोर आला. त्या काळात जी राजकीय व अराजकीय आंदोलने झालीत त्यांत टिळकांच्या काळापेक्षाही व्यापकता, जागृतता, सर्वसामान्यांची लढाऊ वृत्ती अधिक प्रमाणांत होती. महात्माजींच्या चळवळीत अनेक स्त्रियांनी भाग घेतला म. गांधीजींच्या अभूतपर्व आंदोलनाने स्त्रियांची मने जिंकल्या गेली. त्या घराबाहेर पडून पुरुषांच्या बरोबर; कांही प्रसंगी अधिक प्रमाणांत कार्य करायला सिद्ध झाल्यात. भारतीय स्त्रियांनी घेतलेली झेप ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्वाची मानावी लागेल. हा एक नवीन बदल असला तरी तो गुणात्मक होता हे विसरता येणार नाही. पंडित नेहरुच्या प्रेरणेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या हिन्दू कोड विधेयकाने महिलांना प्रतिष्ठा मिळवून दिली. भारतीय संसद व कायदे मंडळे यांत स्त्रियांना मंत्रीपदें मिळण्यासाठी केलेला प्रयत्न गौरवपूर्ण आहे. म. गांधीं आणि पं. नेहरूंच्या काळांत खूप मोठ्या प्रमाणांत स्त्रिया समाजकारणांत व राजकारणांत आल्यात. परंतु त्यावरून सर्वसाधारणत: प्रगतीची उंची मोजता येणार नाही. याशिवाय डाव्या व श्रमिक आंदोलनांतील संघटनेतील महिलांचा स्वतंत्र विचार करणे आवश्यक ठरते.

महिला संघटन व महिला शक्ती

स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य आंदोलनापासून तर आज पर्यन्तच्या सर्व आंदोलनाचा इतिहास पाहिल्यावर स्त्री शक्तीचं महत्व पटायला लागते. स्वातंत्र्य-पूर्व काळांतील इतिहास अत्यंत बोलका आहे. सन् १९५२–५३ पासून आजपर्यन्त महागाई–टंचाई विरूद्ध सतत आक्रमण, लढाऊ आंदोलनात हिरीरीने भाग घेतलेला आपणांस दिसून येतो. मध्यमवर्गीय महिलाप्रमाणे श्रमिक महिलांचाही फार मोठा सहभाग आहे. बिडी, गिरणी, औषधी कारखाने, ग्रामीण भागातील आंदोलने यांत त्यांचा सहभाग खूप मोठ्या प्रमाणात होता. आंदोलन चळवळीत भाग घेण्यात आदिवासी, अस्पृश्य महिलाही मागे राहिल्या नाहीत. आज मध्यमवर्गीय सुशिक्षित समजल्या जाणारी स्त्री, हरिजन, गिरिजन–झोपडपट्टीतील स्त्रियांना संघटित करून त्यांची अस्मिता जागृत करायला पुढे निघाली आहे. मध्यम वर्गातील स्त्रियांमध्ये नवीन बदल झालेले आपणांस दिसून येतात. शिक्षिका, परिचारिका, कर्मचारी, ग्रामसेविका इत्यादी मध्ये स्त्रियांनी खूप मोठ्या प्रमाणात भाग घेतला आहे. लढाऊ ट्रेड युनियनमध्ये त्यांचा सहभाग वर्णन करण्याइतका महत्वपूर्ण आहे. कनिष्ठ स्त्रिया कारखान्यात काम करतांना आढळून येतात. एकंदरीत स्त्रियांचा दृष्टिकोन समाजाभिमुख झाला असून श्रमिक वर्गाला अत्यंत जवळचा

होत आहे. आजची स्त्री गृहिणी, माता, कामकरी, हरिजन–गिरिजन–दलित या वेगवेगळचा नात्याने जागृत व संघटित होत आहे. प्रत्यक्ष लढचात, आंदोलनात हिरीरीने उतरत आहे. भाग घेत आहे.

– स्त्रियांची विटंबना –

स्त्री पूर्वीपेक्षा संघटित झाली आहे. अनेक आंदोलनात तिने आपले पाऊल पुढे टाकले आहे. पुरुष शक्ती बरोबर त्यांनी टाकलेले पाऊल; त्यांनी दर्शविलेले–दाखविलेले कार्य पाहून समाजात स्त्रियांना प्रतिष्ठा; समानता प्राप्त झाली असं वाटणे साहजिक आहे पण वर वर पाहता हे खरे असले तरी अद्यापही स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदललेला नाही.

' हिन–दुबळे केले स्त्री समजा । तैसीच पुढे वाढली प्रजा
म्हणती स्त्री जात तेवढी पशू समजा । पाशवी झाले जग सारे [१]

समाजाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन भोगप्रवृत्तीचा, वासनिक आहे. स्त्री ही भोगाची वस्तु असून अबला आहे. याच एकमेव धारणेतून, समाजाच्या क्रुर तावडीतून अद्यापही त्या मुक्त झाल्या नाहीत.

कोणी भोगवस्तु समजोनि भली । सजवोनि ठेवली नुसती बाहुली
त्यानेच घरोघरी शिरला कली । अबला बनली मायभूमी [२]

स्त्रियांचा छळ, त्यांच्यावरील अत्याचार अनेक कारणातून या प्रगतशील समाजात होत असतात. त्यांच्याविपयी आवाज उठवायला सुशिक्षित तरूणांची; लोकांची जमात पुढे येत नाही. स्त्री–जातीवरील अन्यायासाठी स्त्रियांनी संघटित व्हावे असा विचार राष्ट्रसंतांनी मांडला आहे. ' ग्रामगीतेतील २० व्या अध्यायात ' महिलोन्नती ' हा स्वतंत्र अध्याय लिहिलेला आहे.

स्त्री व तिचे महत्व

आजपर्यन्त स्त्रियांचे महत्व अनेक प्रकारे वर्णन केलेले आहे. आधी स्त्री व नंतर माता म्हणून तिच्यावर अनेक जबाबदारी येते. भारतीय मातांचा इतिहास पाहिल्यावर अनेक नररत्नें तिने जन्मास घातली आहे. आपल्या कर्तृत्व शक्तीतून केवळ आपल्या मुलाचा माथाच तिने बचावला असे नाही तर राष्ट्रही तिने बलदंड करून ठेवले आहे. स्त्रीशक्ती अभूतपूर्व, अद्वितीय व असामान्य स्वरुपाची आहे. तिच्या अफाट शक्तीमुळे वेदाने तिचा गौरव करून तिला प्रथम स्थान दिले आहे. ' मातृदेव भव : ' मुलाचा प्रथम गुरू कोण असेल तर ती माता आहे.

---

१. ग्रामगीता अ. २० ओ. ४३ २. ग्रामगीता अ. २० ओ. ४५

आदर्श मातेच्या पोटी आलेल्या मुलांनी मातेच्या दूधातून आदर्शत्वाचे गुण घेऊन राष्ट्राच्या उन्नतीसाठी आपले देह कष्टविले आहे. या थोर परंपरेचा वारसा जितक्या मोठ्या प्रमाणांत भारतीय संस्कृतीला आणि समाजाला मिळाला त्याच आधारावर राष्ट्र–समाज आजही जिवंत व प्रगत असून आपल्या संस्कृतीला चिकटून आहे. राष्ट्रसंत मातेच्या श्रेष्ठत्वाबद्दल बोलतांना म्हणतात–

'मातेच्या स्वभावे पुत्राची घडण । त्यास उत्तम ठेवी तिचे वर्तन
स्त्रीच्या तेजावरी पुरुषाचे मोठेपण । ऐसे आहे. [१]

भारतीय इतिहास मातृत्वाबद्दल अत्यंत बोलका आहे. भारत हे नांव ज्या महापुरुषामुळे लाभले त्या भरताला जन्म देणारी व घडविणारी माता शकुंतला होय !

'याच गुणे 'मातृदेवी भव' । वेदाने आरंभीच केला गौरव
नररत्नाची खाण अपूर्व । मातृजाति म्हणोनिया
प्रल्हादाची कयाधू आई । छत्रपतीची जिजाबाई
कौसल्या, देवकी आदि सर्वहि । वंदिल्या ग्रंथी [२]

प्रभू रामाची आई कौसल्या व श्रीकृष्णाची आई देवकी या मातामुळे हे महान पुरुष या देशाला लाभले. मोगलांची सत्ता महाराष्ट्रातून नष्ट करून हिन्दूंच राज्य छत्रपतीच्या हस्ते घडवून आणण्यांचं, प्रसंगी शिवाजीला उत्तेजन देण्यांचे कार्य दादा कोंडदेवाच्या अगोदर व शेवटपर्यंत जर कोणी पार पाडलं असेल तर शिवाजी महाराजांची मातोश्री जिजाबाईनेच !

कांही पुराणी सांगितली दिक्षा । करावी स्त्री जातीची उपेक्षा
ती होती साधाची शिक्षा । सर्वतोपरी [३]

विषयवासनेपासून जे दूर गेले नाही, इंद्रिय सुखापासून ज्यांना स्वतःला सोडविता आले नाही. अशाच लोकांनी स्त्री जातीची उपेक्षा केली आहे. इंद्रियावर ताबा मिळविण्यासाठी मनाला लहान मुलाप्रमाणे समजावून सांगण्यांचा प्रयत्न करावा व ते संयमी करावे' हे श्रेयस्कर आहेत.

राष्ट्रसंत म्हणतात वैराग्यांनी मनावर, इंद्रियावर ताबा मिळविण्यासाठी स्त्रीला बाजूला सारणे इष्ट आहे. पण संपूर्णतः बाजूला सारणे, कनिष्ठ लेखणे हे उचित नव्हे. ज्यां वैराग्यवाद्यांनी स्त्रियांना कनिष्ठ लेखले त्यांनी अप्रत्यक्षपणे आपल्या मातेवर, तिच्या अमर कतृत्वावर काळी रेष फाडली आहे.

केवळ आपल्या वृत्तीकरिता । केली स्त्री निंदा तत्वता
तेथे माऊलीपणाचिया माथा । दोष देता पाप लागे [४]

---

१. ग्रा. गी. अ. २० ओ. ५
२. ग्रा. गी. अ. २० ओ. ८–९
३. ग्रा. गी. अ. २० ओ. १०
४. ग्रा. गी. अ. २० ओ. ४१

– आदर्श महिला व विशेष –

मुलांच्या बालपणापासून त्यांचे पालण–पोषण करण्यांची जबाबदारी मातेवर असते. त्यांच्यावर उचित संस्कार करणे, आदर्श आचार–विचाराचे वळण लावणे, हे सर्व कार्य पुरुषापेक्षाही कितीतरी उत्तम रीतीने त्यांनी स्वीकारले आहे. घराला घरपणही मातेमुळे लाभते. मुलांचे संगोपन करणे, पतीच्या कार्याची व उन्नतीची काळजी वाहणे व घरी येणाऱ्या अतिथीचा सत्कार करणे त्याचबरोबर घर आदर्श ठेवणे, हे कार्य तिला अविरत करावे लागते. त्यातही सर्वांना प्रेमळपणाने साभाळत राहणे, हे तिचे कर्तव्य ठरते. श्रमाचा भार उचलतांना ती कंटाळत नाही. येणाऱ्या अडचणीवर मात करते. प्रसंगी पतीला हिंमत देत राहते. तेच तिचे कर्तव्य होय असे राष्ट्रसंत म्हणतात–

मातेच्या स्वभावे पुत्राची घडण । त्यास उज्वल ठेवी तिचे वर्तन
स्त्रीच्या तेजावरीच पुरूषाचे मोठेपण । ऐसे आहे [१]

घरचा उत्तम कामधंदा । हे महिलेचे लक्षण सदा
आलिया गेलियासि आपदा । महिला असता न वाटे
खस्ता सोसूनि परिचर्या । प्रेमळपणे बारीक कार्या
करू जाणती उत्तम भार्या । न कंटाळता काळजीने [२]

प्रत्येक गोष्ट अत्यंत शांततेने, प्रेमळपणाने उत्तम स्त्री करतांना आढळते. जे कार्य त्यांनी हाती घेतले असेल त्यांत पूर्ण लक्ष घालून तन्मयतेने, एकाग्रतेने ती पूर्ण करतांना आढळते. अविरत एकाग्रतेने श्रम करण्याची प्रवृत्ती स्त्रियांमध्ये जन्मजात असते. स्त्रीकडे बघण्याचा राष्ट्रसंताचा दृष्टिकोन शास्त्रीय, अभ्यासात्मक असून स्त्रियांच्या जीवनांतून त्यांनी बारीक–सारीक बारकावे अलगद टिपले आहेत. त्यांच निरीक्षण अत्यंत सूक्ष्मतेचं आहे.

उत्तम महिलांचे खरे लक्षण सांगतांना राष्ट्रसंत म्हणतात–ज्या आदर्श महिला असतात त्या आपल्या घराण्याचे ब्रीद सांभाळत राहतात. आपली मुलें आदर्श कसे होतील, याचा प्रयत्न करतात. प्रेमाने सर्व जग जिंकता येते म्हणून प्रेमळपणाचा अंगिकार त्यांनी आपल्या अंतरी केलेला असतो. माऊलीसारखा मायाळूपणा मात्र जगात असलेल्या कोणत्याही प्राणीमात्रांत आढळणार नाही.

जगात असती नाना जीव । सगळांस जाहीर त्यांचा भाव
परि मायाळूपणाचा गौरव । माऊली सरिखा नाही [३]

---

१. ग्रामगीता अ. २० ओ. ४ २. ग्रामगीता अ. २० ओ. १८–१९
३. ग्रामगीता अ. २० ओवी २२

राष्ट्रसतांनी केलेले वर्णन अत्यंत सत्य आहे. 'पुत्र भले ही कुपुत्र हो लेकिन माता कुमाता नही होती' असे हिन्दीत सुभाषित आहे. मुलगा किती वाईट असो दूर्व्यसनी असो. पण मातेचं प्रेम मात्र सज्जनांवर जितकं असेल तितकचं त्याच्या-वरही निर्विवाद राहते. समानतेचा भाव हे तिचे वैशिष्ट मानवधर्माला धरून आहे

माऊलीचे स्वभावकर्म । तोचि जगी म्हणविला मानव धर्म
माऊलीचे उत्कृट प्रेम । म्हणोनीच देवप्रिय लोका [१]

स्वत:च्या मुलाबद्दल जी प्रिती तिच्या अंतरी असेल तितकीच तिला इतरांच्या मुलाबद्दलही असते. साने गुरूजींच्या आईने आपल्या नंदेच्या किरकिऱ्या मुलाला स्वत:च्या मुलासारखे स्तनपान दिल्याचे सर्वश्रृत आहे. सर्वावर सारखे प्रेम करणारी माऊली ती सद्वर्तनाची जोपासना करणारी असते. गुणवानाची चाहती असते सर्वाच्या हिताची काळजी वाहणारी असते. तिथे आपपरभाव हे शब्द नसतात. खऱ्या मानवधर्माचं दर्शन घडते प्रसंगी आपल्या पतीला उचित सल्ला देणे, घराची आदर्शता राखणे, संसार उत्तम सावरणे, मानवी स्वभावाचे अचूक अनुमान करणे, प्रसंग पाहून योग्य ते वागणे त्याचबरोबर संसाराचे चक्र सुव्यवस्थित चालवितांना भक्ती–ज्ञान–संयम व शहाणपण आदिचा योग्यतेने उपयोग करणे हे तिचे वैशिष्ठयें होय !

जेव्हा पुरुष होय चिंतातुर । तेव्हा घरची लक्ष्मी सांगे विचार
हे मी पाहिले घरी अपार । प्रसंग येता जाण्याचे
निरोक्षोनि जी जी घरे पाहिली । तेथे सरसता अनुभवा आली
चातुर्य–लक्षणे अधिक दिसली । महिलांमाजी
मानवी स्वभावाचे अनुमान । प्रसंग पाहोनि अवधान
पुढील काळाचे अनुसंधान । स्त्रीयांचे ठायी
स्त्रीलाच भक्ती, स्त्रीलाच ज्ञान । तिलाच संयम, शहाणपण
तिच्यानेच हालती वाटे संपूर्ण । संसार चक्रे

– स्त्री निषेधाचे कारण व खंडन –

राष्ट्रसंताचे निरीक्षण अत्यंत सूक्ष्म आहे. परंपरेप्रमाणे राष्ट्रसंताचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन नाही. तो श्रेष्ठ स्वरूपातील आहे. स्त्रियांच्या स्वाभाविक गुणाचा आदर त्यांच्यात असल्याते स्त्री मुक्ती व महिलोन्नतीसाठी भरीव कार्य महिलामंडळा मार्फत केले. पुरूषांनी स्त्री विकासाकडे आपले लक्ष

---

१. ग्रामगीता अ. २० ओवी २४

वळविले पाहिजे. कारण आदर्श संसार व्हायचा असेल तर स्त्री-पुरूष सुशिक्षित व आदर्शवादी असायला पाहिजे.

'उत्तम पुरूषासवे उत्तम नारी । तरि त्यांचा संसार स्वर्गापरी'
पुरूषाहुनि कांकणभरी । महिला वरीच राहतसे [१]

दोन्ही जर उत्तम असेल तर त्यांची संतान देखील उत्तम राहिल. खरे सांगायचे तर महिला ही अत्यंत विचारी-संयमशील, कर्तव्यनिष्ठ असल्याने ती पुरूषापेक्षा श्रेष्ठ ठरते. ज्यांना स्त्रीचं श्रेष्ठत्व मान्य नाही किंवा पुढे ती उन्नतीच्या मार्गातून पुरूषापेक्षा श्रेष्ठ होऊ नये हे जाणणाऱ्यांनी स्त्रियांची प्रगती रोखून धरली आहे.

कांही विद्वान स्त्रियांना भोग वस्तु समजतात व तिला घरी दाबून ठेवण्यांचा व गुलामाप्रमाणे वागविण्यांचा प्रयत्न करतात. स्त्रियांना स्वतःचा उद्धार करण्याचा अधिकार नाही. पुरूषाच्या उत्कर्षात; वैभवात तिने आपला उत्कर्ष पाहावा-वैभव पाहावे. असले विचार स्वार्थांधतेचे आहे.

'स्त्री विषयक हीन विचार ज्यांनी समाजात पेरले ते व जे त्यांच्या विचाराला चिकटून राहिले आहे त्यांचा राष्ट्रसंतांनी समाचार घेतला असून अज्ञानाचे काजळ त्यांच्या डोळ्यातून बाजूला सारले आहे.

– स्त्रीचे विशेष गुण व महत्व –

आजचा प्रगत समाज इतर समाजाच्या तुलनेत जो पुढे गेला आहे त्याचे मूळ कारण स्त्री-शिक्षण होय. त्यांनीच आदर्शाची जोपासना केली. संसार हा केवळ पुरूषाचा नाही, तो स्त्री-पुरुष दोघांचाही आहे. पुरुष हा आदर्श असेल; सुशिक्षित असेल व स्त्री नसेल तर संसाराची गाडी सुव्यवस्थित चालणार नाही, हे गमक राष्ट्रसंतांनी जाणले होते. स्त्री पुरुषांना समानतेची; उन्नतीची संधी मिळणे अत्यावश्यक आहे. तो त्यांचा अधिकार आहे. हक्क आहे.

वेदात आणि उपनिषदांत अनेक सूक्ते स्त्रियांनी लिहिलेली आहेत. त्याकाळांत स्त्रियांना 'स्वातंत्र्य' होते. समाजात समानतेचा दर्जा होता. वेदान्त त्यांचा समावेश व्हावा यावरून त्यांच्या बुध्दिमत्तेची कल्पना सहज करता येते. आजही स्त्रियांची लेखन-शैली उत्तम आहे. अकादमीचं पारितोषक विजेत्या गोदूताई परूळेकर, इंद्रावती कर्वे, रमाबाई फुले, लक्ष्मीबाई टिळक, त्यापूर्वीच्या बहिणाबाई चौधरी व आताच्या श्रीमती शांता शेळके, पद्मा, गोळे, कुसुमावती देशपांडे, श्रीमती शेवडे, अहिल्याबाई रांगणेकर, मृणाल गोरे यांची साहित्य-विषयक व सामाजिक कामगिरी अत्यंत उल्लेखनीय व मोलाचीं ठरली आहे.

---

१. ग्रा. गी. अ. २० ओवी २९

इतिहासाचा अभ्यास केल्यावर राजकारणांत तसेच युद्धात स्त्रियांनी अमोल कामगिरी केल्याचे आपणांस दिसून येईल. कैकयीसारखी स्त्री दशरथाबरोबर युद्धात भाग घेतांना दिसून येते. तर महाभारतात पती पुत्राला प्रोत्साहन देणारी द्रौपदी, सुभद्रा आपणांस दिसून येतात, स्वतःच्या हातात नग्न तलवार घेऊन इंग्रजाविरूद्ध लढा देणारी रणचंडिका राणी लक्ष्मीबाई, मोंगलाबरोबर लढणारी राणी दुर्गावती, योग्यतेने शासन चालविणारी अहिल्याबाई होळकर असे कितीतरी उदाहरणे आपणांस सहज सापडतील. स्वतःच्या ब्रीदासाठी रजपूताच्या नाजूक कोमल स्त्रियांनी केलेले जोहार; भारतीय स्त्रियांची निग्रही वृत्ती व नैतिकता काय दर्शविते ? स्वतःच्या प्राणापेक्षा स्वतःच्या इज्जतीला जपणारी भारतीय स्त्री आहे.

स्त्रियेसारखी मोहिनी नाही । स्त्रियेसारिखी वैरागिणी नाही
स्त्रियेसारखी मुलायम नाही । आणि कठोर रणचंडिका [१]

स्त्री प्रसंगी अत्यंत कडक आहे. रणचंडिकेचं रूप धारण करणारी आहे. सर्व सुखाचा परित्याग करून जगणारी आहे. रामकृष्ण परमहंसाची धर्मपत्नी, योगी अरविन्द घोषांची मातोश्री यांचे उदाहरणे आपणांस देता येईल. संत तुलसीदासाला उचित मार्गदर्शन करून, संत मालिकेत उच्चत्तम स्थान ज्यांना प्राप्त झालं व भक्तीरसाने परिपूर्ण असं रामायण ज्यांनी लिहिलं आहे त्याच्या पाठीमागील प्रेरणा त्यांच्या पत्नीची होती, हे विसरता येणार नाही. भक्ती मार्गातहि स्त्री श्रेष्ठ ठरली आहे. परमेश्वराच्या भक्तीत स्वतःला विसरलेली व अनेकांना भक्तीची गोडी लावणारी संत मीराबाई, संत जनाबाई तर संत ज्ञानेश्वराची बहिण मुक्ता अशा अनेक दिसून येतात. त्यांची भक्ती-गीत परमेश्वरावरील उत्कृष्ट भक्तीचीं साक्ष पुरविते.

संसाराच्या चक्रात स्त्री पुरूषापेक्षा एक पाऊल पुढे आहे. घर आणि घराची जबाबदारी स्त्रीने आपल्या खांद्यावर घेतली आहे.

पुरुष सर्व कांही करी । परि बांधला राहे घराबाहेरी
सर्व विचार घेवोनि आचरी । तरीच शांति तयासहि लाभे [२]

उत्तम महिला व उत्तम पुरुषाचा संसार हा आदर्श संसार ठरत असला तरी तिच्या अंगभूत गुणांमुळे ती पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे असे राष्ट्रसंत म्हणतात पण त्यामुळे त्यांनी पुरुषांना कमी लेखले आहे असे नाही- 'व्यवहार दृष्टीने समजून काय । पाहिजे ते बोललो' असे स्पष्टतेचे उद्‌गार ते काढतात. आणि म्हणूनच ते स्त्री शिक्षणाकडे वळले आहे.

---

१. ग्रामगीता अ. २० ओवी ५३ २. ग्रा. गी. अ. २० ओ. ६

– स्त्री शिक्षणाची आवश्यकता –

'समाजी जो पुरुषाचा आदर । तैसाचि महिलांसि असावा व्यवहार
किंबहुना अधिक त्याचा विचार । झाला पाहिजे समाजी [१]

समाज व्यवस्था निश्चित स्वरुपांत सुव्यवस्थित होऊन पुढे चालावी असे वाटत असेल तर मुलाप्रमाणे मुलींनाही उत्तम शिक्षण लाभणे आवश्यक आहे. आजपर्यंत समाजाने पुरुषांचा विचार केला पण स्त्रियांच्या शिक्षणाचा विचार केला नाही. त्यामुळे समाज विस्कळीत झाला आहे.

राष्ट्रसंतांचा मुख्य हेतू ग्रामराज्य असल्याने, ग्रामराज्य यशस्वीतेसाठी मुला-मुलींचे जीवन जागविणारे शिक्षण त्यांना मिळाले पाहिजे. पण आज रूढी परंपरेच्या चक्रात राहणारे लोक मुलींना कोंडून ठेवतात. दुसऱ्याबरोबर बोलण्याचा अधिकार त्यांना नसतो. चुकून बोलतांना सांपडली तर ते लोक त्यांना बदडून काढतात पण तेच मुलाकडे दुर्लक्ष करतात. मुलींना दाबून ठेवणाऱ्या प्रथेला-रिवाजाला कालबाह्य केले आहे. त्या प्रवृत्तीच्या लोकांचाही त्यांनी निषेध केला आहे.

सुशिक्षित पुढारलेल्या लोकांनी समोर येऊन स्त्री शिक्षणाचे महत्व आम जनतेत निर्माण करावे; समजून सांगावे व त्याचबरोबर मुलींना देण्यांत येणारे शिक्षण त्यांच्या अंगी असलेल्या आंतरिक गुणाचा विकास करणारे असावेत. महिलांना उच्चत्तम शिक्षण लाभावे व ते कसे असावे ते सांगतांना राष्ट्रसंत म्हणतात-

महिलांचे उच्चत्तम शिक्षण । शिक्षणांत असावे जीवनाचे स्थान
जीवनांत असावे स्वास्थ्यपूर्ण । शांति, दयादि भावनांची
तैसीच शिकवावी टापटीप । गाणे, बोलणे, वागणे अनुरूप
घर पाहताची कळावे आपोआप । कैसी येथील महिला [२]

राष्ट्रसंततांनी, आदर्श महिला ज्यातून निर्माण होतील अशाच शिक्षणांचा पाठपुरवठा केला आहे. कला-संगीत व गृह-विज्ञान या विषयाचे शिक्षण सुरवाती-पासूनच मुलींना लाभावे. त्यासाठी आवश्यक असलेली साहित्य सामुग्री निर्माण करण्यांत यावी. आज स्त्री शिक्षणाचा अद्याप 'स्वतंत्र' विचार झाला नाही, भारताला स्वातंत्र्य लाभून ३५ वर्षे पूर्ण झाली पण स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने स्वतंत्र विचार होऊ नये हेच दुर्दैव आहे. राष्ट्रसंतांनी स्त्रियांच्या शिक्षणाचा स्वतंत्र विचार केला आहे.

---

१. ग्रा. गी. अ. २० ओ. ७ २. ग्रा. गी. अ. २० ओ. ८५-८७

रशियांत सुधारलेल्या अभ्यासक्रमांत स्त्रियांच्या स्वतंत्र शिक्षणाचा विचार करण्यांत आला आहे. राष्ट्रसंतानी दर्शविलेले सर्व प्रकारचे शिक्षण मुलींना प्रथम पुरविल्या जाते कारण भावी जीवनांत प्रथम ती गृहिणी आहे गृहिणीला शोभेल असे शिक्षण तिला मिळाले तर ते तिच्या अंगवळणी पडेल. परिणामत: त्यांचे चांगले पडसाद त्यांच्या संपूर्ण जीवनांत उमटतील. तसा उल्लेख श्री कामत यांच्या रशियातील 'नवे–शिक्षण' या पुस्तकांत आला आहे. समाजवादी विचाराने पुढे जाणाऱ्या रशियात मुला–मुलींना आज एकत्रित शिक्षण दिले जात नाही. मुला–मुलींना दिले जाणारे प्रथम चरणी शिक्षण स्वतंत्र स्वरूपांतील असून अभ्यासक्रम भिन्न स्वरूपांतील आहे. शाळे–बाहेरील कार्यक्रमांत अनेक संस्थांच्या माध्यमातून मुली–मुले एकत्रित येतात पण त्यांचे संबंध निगडीत होत नाही.

परि स्वतंत्र असावे मुलींचे शिक्षण । स्त्री–पुरुषाचे उद्योगहि भिन्न
जेथे होते दोघाचे मिलन । प्रसंग कठिण ओढवती [१]

मानसशास्त्राप्रमाणे किशोर अवस्थेत मुलामुलींच्या जीवनाला काळजीपुर्वक जपणे आवश्यक आहे. अंग–प्रत्यंगामध्ये होणारे बदल परस्परांत आकर्षण निर्माण करतात व यांच मुळे त्यांच्या जीवनावर वाईट पडसाद उमटण्यांची दाट शक्यता असते. त्यानंतर वयोपरत्वे त्यांच्यात येणाऱ्या समजदारीमुळे ती भिती नष्ट होते. तेव्हा सह–शिक्षणात नैतीकतेचे पाठ शिकविल्यावर अनुचित प्रकार घडत नाही. मुलांप्रमाणे मुलींना उच्च शिक्षण द्यावे असे राष्ट्रसंत म्हणतात–

सर्व तऱ्हेचे ज्ञान प्राप्त झाल्यावर त्यांच्या सहजप्रवृत्तीला दाबून न ठेवता परस्परांच्या स्वभावाची ओळख, विचाराची देवाण–घेवाण होण्याच्या दृष्टीने मतऐक्य व मनमोकळेपणा परस्परातील भेदभाव मिटविण्यासाठी त्यांना एकत्रित येऊ देणे हे आवश्यक ठरते, तेव्हा आई–वडिलांनी मनाचा मोठेपणा स्वीकारला पाहिजे.

'शिक्षण सांभाळोनि तनु–मन । करावे मुलीबाळीस विद्वान
अंगी असावे शौर्यपूर्ण । ब्रीद अपुले रक्षावया [२]

मानसिक व शारीरिक दृष्टीने आपले ब्रीद राखावयाचे शौर्य त्यांच्यात निर्माण झाले पाहिजे. असे शौर्य असल्यास समाजकंटक मुलींच्या अंगाला हात लावायला घाबरतील. शिक्षणातून ती अबला न राहता सबळ व्हावी ही राष्ट्रसंतांची अपेक्षा आहे, म्हणजे शारिरिक व बौध्दिक शिक्षण त्यांना लाभणे अत्यावश्यक आहे. आज बौध्दिक व शारीरिक शिक्षणांत मुली अग्रसर झाल्या आहेत तर तितक्याच त्या संघटित झाल्या आहेत हे विसरता येणार नाही.

---

१. ग्रा. गी. अ. २० ओ. १०१ २. ग्रा. गी. अ. २० ओ. ९२.

वरील प्रकारचे शिक्षण सर्वांतोपरी प्राप्त झाल्यावर ती आदर्श महिला होऊन मुलांना आदर्श करू शकेल. गृहकार्यात त्यांना गृह-उद्योग, कुटिर उद्योग, शिवणकाम, विणकाम, हस्त-व्यवसाय तसेच यंत्र व्यवसायाचे देखील शिक्षण मिळावे व हे शिक्षण तिला प्राथमिक शिक्षणापासूनच मिळायला सुरवात व्हावी त्यामुळे जीवनांत उद्‌भवणाऱ्या कठीण प्रसंगाचाही सामना ती चांगल्या रीतीने करू शकेल नाहीतर आज विधवेच्या जीवनाचा जो प्रश्न अर्थात उदर-निर्वाहाचा जो बिकट प्रश्न आहे तो पुढेही सतत राहू शकेल.

– विधवेचा प्रश्न –

आज भारताच्या १९७१ च्या शिरगीणतीनुसार ग्रामीण व शहरी या दोन्ही विभागात विधवेची टक्केवारी जवळ जवळ ९% अशी आहे व त्या सर्व स्त्रियांना अत्यंत बिकट परिस्थितीतून जीवन जगावे लागत आहे. वरून समाजाची क्रूर थट्टा असते. ती निराळीच !

२० व्या शतकांपूर्वी विधवेचा प्रश्न अत्यंत बिकट होता. विधवेच्या डोक्या-वरील केश काढण्याची प्रथा रूढ होती, ती विद्रुप झाल्यावर तिच्यावर वाईट नजर राहणार नाही अशी पारंपारिक समजूत । वारे संस्कृती, पुरुषाची नजर वाईट होवू नये म्हणून विधवेला विद्रूप करायचं त्यापेक्षा विधवेच्या दृष्टीने पुरुषाने स्वतःच्या मनावर कां ताबा मिळवू नये ?

हा समाजाचा दृष्टिकोन बदलविणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण विभागातील अनेक विधवेवर मग ती मध्यमवर्गीय असो अथवा कनिष्ठ वर्गातील असो, उपासमारीची पाळी आली आहे. त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न आजच्या वाढत्या महागाईच्या परिस्थितीत अत्यंत बिकट झाला आहे परंपरागत जुन्या दृष्टिकोनामुळे समाजोपयोगी कार्य करून घेण्यांत आले नाही. स्वाभाविकच ती परावलंबी झाली आहे. सामाजिक कार्यातील बहिष्कारामुळे तिला सहभाग कुठल्याही कार्यात घेता येत नाही.

विधवेकरता असलेल्या सरकारी सवलती त्यांना माहित करून देऊन समाजाने सुद्धा विधवेबाबतचें आपले सामाजिक कर्तव्य ओळखून त्यांचे पुनर्वसन करण्यांचा प्रयत्न केला पाहिजे व त्यांच्या उजाड जीवनाचे नंदनवन करावे. ग्रामपंचायतीने त्यांच्यासाठी उद्योग निर्माण करावे.

गृह-उद्योग, कुटिर-उद्योग त्यांना शिकवावे ज्यातून त्यांचा उदरनिर्वाह होऊ शकेल व शिक्षणही लाभेल अशी योजना आखावी व कार्यान्वित करावी.

– स्त्री संघटन व महत्व –

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अत्यंत परखड विचार स्त्री संघटनेबाबत मांडले आहेत. स्त्रियांवरील अन्याय व अत्याचार एकसारखे वाढत असून

पुरुष शक्ती त्यांच्या रक्षणासाठी अपूरी पडते आहे. आता स्त्रियांनी स्वत: संघटित होऊन समाजात विविध कार्यक्रमाद्वारे पुढे यावे व आपल्या अस्मितेला जपावे. यासाठी त्यांनी महिला मंडळें गावोगावी निर्माण केली. स्त्री शक्ती एकवटल्यावर ती पुरुष शक्तीवर मात करू शकते हे नव्याने सांगण्यासारखी गोष्ट नाही. स्त्री शक्तीने अफाट कार्य केले असले तरी ते मर्यादित स्वरूपांत आहे. अजून सर्वोंतोपरी ग्रामीण भागातील महिला संघटित नाही. अन्यायाच्या प्रतिकारासाठी ती समाजासमोर उभी झाली नाही. जातीय भाव बाजूला सारावे. महिलांचे समुदाय एकत्रित करून त्यांच्यात जागृती करावी. त्यांनी आपले पक्के संघटन तयार करावे असे झाल्यास समाजकंटक वळणावर येतील, सुधारतील.

जेव्हा पुरुष पावतो पतना । त्यास स्त्री प्रकृति सहन होईना
तेव्हा महिलांत असावी संघटना । त्यांची सुधारणा करावया
जैसी मुलांची संघटित सेना । तैसी स्त्रियांची असावी संघटना
आपल्या सुख-दुःखाच्या भावना । प्रकटवाव्या सभा सभेतूनी [१]

प्रत्येक गावात महिला मंडळे असावी. महिलांचे उन्नतीभवत असावे. सभा, कीर्तन, कथा, प्रार्थना, तिळगुळ, हळदी कुंकू, शारदोत्सव, सहभोजन व जयंति-पुण्यतिथी आदी कार्यक्रमातून त्यांनी एकत्रित यावे.

पुरुषांचे जेसे स्फूर्तिस्थान । तेसेचि महिलांचे असावे उन्नतिभुवन
त्यात सभा, प्रार्थना, कथा, कीर्तन । उपक्रमपूर्ण महिलांचे
दूर सारोनी जातीय आदि भाव । जमवोनि महिला समुदाय सर्व
तिळगुळ, हळदीकुंकु शारदोत्सव । सहभोजनादि करावे
उत्सव साध्वी प्रतिव्रतांचे । जयंति-पुण्यतिथी सर्व तयांचे
वाचनालयादिक महिला विभागाचे । जेथे तेथे आवश्यक [१]

वरील सर्व कार्यक्रमातून प्रत्येक महिलेच्या उन्नतीचा विचार करावा. इतकेच नाही तर एखाद्या महिलेवर अन्याय झाला तर सर्व महिलांनी संघटित स्वरूपांत त्या अन्यायाविरूद्ध प्रतिकार करावा, आवाज उठवावा, त्यामुळे अन्यायाचे प्रकार घडणार नाही, त्याला अंकुश लागेल.

स्त्रियांचे स्वतंत्र मेळ समुदाय । त्यांच्या उन्नतीचा कसा गौरव
प्रतिकाराचीही त्यांना जाणीव । अवश्य असावी [२]

- राष्ट्राची मूलभूत शक्ती व केन्द्रवर्ती मूर्ती 'स्त्री'

आज जागतिक इतिहासाकडे नजर वळविली तर स्त्रियांच्या अद्वितीय कामगिरीचं महत्व आपणांस पटायला लागते. स्त्रियांची सामाजिक व राष्ट्रीय चेतना

---

१. ग्रा. गी. अ. २० ओ. १०१-१०२
१. ग्रा. गी. अ. २० ओ. १०३, १०४, १०५ २. ग्रा. गी. अ. २० ओ. १०६

प्रत्येक मानवात नव चैतन्य निर्माण करणारी आहे. स्वत:च राष्ट्र प्रत्येक स्त्रियांना नेहमीच घरकुलासारखं वाटलं आहे. जेव्हा राष्ट्रावर संकट कोसळले त्या त्या वेळी प्रत्येक देशातील स्त्री शक्ती पुढे आली. हा इतिहास विसरता येत नाही. राष्ट्रीय भावना म्हणजे परंपरेचा अभिमान व परकीय शत्रूचा कड़वा विरोध, या राष्ट्रीय वृत्तीची जोपासना स्त्रियांनी आपल्या प्राणप्रतिष्ठेने केलेली आपणांस दिसून येते. प्रसंगी रंणागणांत उतरायला तीने कमी केले नाही. राष्ट्रीय भावना आपल्या मुलांत; आपल्या पतीत निर्माण करून स्वत:च्या स्वार्थालाही तिने बाजूला सारले आहे. राणी दुर्गावती, राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर आदी राजकीय कारकीर्द पुरूषांना लाजविणारी ठरली आहे.

स्वत:च्या मुलाच्या हातात राष्ट्र आणि धर्मांसाठी तलवार देणारी केवळ जिजाबाईच झाल्या नाहीत तर महाराष्ट्रातील प्रत्येक स्त्री जिने शिवाजीच्या सैन्यात आपल्या मुलाला भरती केले व परवानगी दिली. त्या संपूर्ण मातेचा त्यांत समावेश होतो. तसाच पत्नीचाही.

वीर भगतसिंगची माता भगतसिंगाला फासावर चढतांना रडली नाही, विव्हळली नाही 'मेरा बेटा भारत माताके काम मे आया है' असे म्हणून सद्गदित झाली.

चीन पाकीस्तानच्या युद्धांत स्त्रियांनी स्वत:च्या अंगावरचे दागिणे काढून, मंगळसूत्र काढून देऊन देशाला आर्थिक मदत केली आहे. गोवा–संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी स्त्रियांनी फार मोठ्या प्रमाणांत भाग घेतला. चळवळ ओसरली व समितीचे विघटन झाले तरी स्त्रियांमधली जागृती बऱ्याच प्रमाणांत टिकून होती. त्यानंतर उपासमार, महागाई विरुद्ध लढा, भूमि मुक्ती आंदोलन; वेगवेगळे महाराष्ट्रव्यापी आंदोलन, बंद, संप–शिक्षकापासून तर बँकापर्यंत प्रत्येक उठावात 'स्त्री' पुरुषाच्या बरोबर होती. मोर्चे, घेराव, गोळीबार आणि लाठीमार यांत स्त्रियांची भागीदारी किमान पुरुषाच्या बरोबर आहे.

राष्ट्रीय कार्यात जशी स्त्रियांनी आपली कामगिरी बजावली तशीच राजकीय चढाओढीतही. समाजकारणापासून तर राजकारणापर्यंत सतत प्रगतीचे मार्ग ती गाठते आहे. आपल्या 'स्त्री शक्तीचं' दर्शन घडविते आहे.

स्त्री म्हणजे राष्ट्राची मूलभूत शक्ती आहे व केन्द्रमूर्ती आहे. तिच्या विकासाचा–उन्नतीचा टप्पा उंचावणे हे आजच्या समाजाचे आद्य कर्तव्य आहे. स्त्री–पुरुष आदर्श असल्यावर भारताचे भवितव्य काय राहिल हे सांगतांना राष्ट्रसंत म्हणतात–

आदर्श ऐसे मातापिता । जन्म देतील आदर्श सुता
ते वैकुंठ बनवितील भारता । तुकड्या म्हणे [१]

०—०

१. ग्रा. गी. अ. २० ओ. १११

राजकीय विचार

भारतीय इतिहासात १९ वे शतक स्वातंत्र्य चळवळीचे शतक म्हणून ओळखल्या जाते. या शतकांची सुरवात पारतंत्र्याच्या गर्तेत कोसळली. ध्येय, सत्य-निष्ठेचा लोप होऊन क्षुद्रवृत्तीचे प्राबल्य माजायला लागले होते. राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेली जमात इंग्रजाच्या जुलमी अत्याचाराविरूद्ध चवताळून उठली होती. एकीकडे पायदळी तुडविल्या जात होते तर दुसरीकडे मानवतेच्या मुक्तीसाठी प्राण तळहातावर घेऊन जुलमी राज्यसत्तेला सुरूंग लावण्यासाठी क्रान्तिकारकांचा जन्म होत होता. चवताळलेल्या जुलमी वृत्तीच्या इंग्रजांनी क्रान्तिकारकाना टिपून मारण्याचा व आंदोलनाचा बिमोड करण्यांचा चंग बांधला होता.

अगदी या प्रक्षोभक राजकीय परिस्थितीत विदर्भातील यावली सारख्या खेड्यांत जन्मास आलेली तुकडयादास नावाची व्यक्ती राष्ट्रीय भावनेने जागृत होऊन खंजिरीच्या तालावर इंग्रजाविरूध्द लोकांची मने पेटवायला निघाली होती. 'काहे को धुम मचाते हो। दुःखवाकर भारत सारे। अरे आते है नाथ हमारे' [१]

उघड उघड जनभावनेला धरून राष्ट्रसंतांनी इंग्रजी शासनाला सुरूंग लावायला सुरवात केली. त्यांची क्रान्तिकारक वृत्ती पाहून विदर्भाच्या क्रांन्ति-कारकांचा उत्साह वाढायला लागला. इंग्रजी शासनाविरूध्द लोकांनी दंड थोपटले. क्रान्तीची नांदी वाजली. लोकांचे सहकार्य राष्ट्रसंताच्या कार्याला पुरक ठरले. इंग्रजावर मात करायला लोकांची मने जागवायची होती. त्यावेळी जागत्या लोकभावनेला धरून राष्ट्रसंत म्हणतात-

'पत्थर सारे बॉम बनेगे। भक्त बनेगी सेना' [२]

लोकांचा विश्वास जागृत झाला. मरण आले तरी चालेल. अशा मनोवृत्तीने भारत मातेचा एक-एक क्रान्तिकारक पुढे सरकत होता. क्रान्तीचा वणवा पेटायला लागला. इंग्रजांच्या बंदूकी निष्प्रभ व्हायला लागल्या. याचवेळी म. गांधींजींच्या राजकीय चळवळीने संपूर्ण भारतात जोर धरला होता. इंग्रजाविरूध्द लोखंडाप्रमाणें गरम झालेल्या जनतेला पाहून राष्ट्रसंत म्हणतात-

---

१. राष्ट्रीय भजनावली पृ. क्र.

२. राष्ट्रीय भजनावली पृ. क्र.

कधी येशील मन-मोहना । पाहण्या भारत अपुला पुन्हा
भारता ग्रहण लागले । अति गुलाम जन जन्हले
तोडण्यांस येई बंधना । पाहण्यां भारत अपुला पुन्हा [१]

इ. स. १९४२ मध्ये वरील गीतावर इंग्रजांनी बंदी घालून राष्ट्रसंतांना जबलपूर व नागपूरच्या जेलमध्ये कैद करून ठेवले. त्याच वर्षी मोठ-मोठ्या राजकीय पुढाऱ्यांची धरपकड सुरू झाली तेव्हा राजकीय चळवळ थंड होते की काय ? अशी भीती वाटताच 'अब जाग उठो बालवीरों । अब तुम्हारी बारी है । असे आव्हान करते झाले. चिमूर-आष्टी व यावली हत्याकांड राष्ट्रसंतांच्या जन जागृतीचे प्रतिक ठरलेत. राष्ट्रसंताची राष्ट्रभक्ती त्यांच्या रोमरोमांत भरली होती. परंपरेचा अभिमान आणि दुसरे तितकेच महत्वाचे म्हणजे परकीयांचा; देशाच्या शत्रूचा, आक्रमकांचा द्वेष-या दोन्ही राष्ट्रभक्तीच्या अंगाचा परिपोष पूर्णपणें राष्ट्रसंतात झालेला होता. दुर्दम्य आशावाद, देशाबद्दल प्रिती, जिद्द आणि चिकाटी, संकटावर मात करण्याची शक्ती, दूरदृष्टी आदी अनेक गुणांचा त्यांच्यात समाजवेश होता.

- पराधिनतेच खरं दुःख -

राष्ट्रसंतांना खरं दुःख पराधिनतेचं होतं. इंग्रजांच्या पाशवी अत्याचारामुळे भारत हतबल झाला होता. त्यांची झालेली हीन-दीन स्थिती राष्ट्रसंतानी मोठ्या मार्मिकतेने अनेक गीतातून मांडली आहे.

'भारत ओस झाला असून असुराने करी धरला' (अनुभवसागर भजनावली) 'असुरी राज्य गिळले' (अ. सा. भ. पृ. १५) भारताला पारतंत्र्याने गाठले (अ. सा. भ पृ. १५२) भरतभू दास्यांत पडली' 'परवशता पुरी उलटी 'गुलामगिरीच्या कर्कश वेडचा पायी पडल्या' आणि परवशतेच्या भरी भारत भू दुःखी जाहली'

कोणत्याही मुलाला आपल्या आईची हीन-दीन अवस्था पाहिल्यावर असह्य दुःख होते ते दुःख राष्ट्रसंताना झालेलं आहे. परवशतेबरोबर असूरी प्रवृत्तीच्या व देश आणि राष्ट्राला घातक ठरलेल्या परकीय तथा अंतर्गत हितशत्रूचाही योग्यरीतीने समाचार घेतला आहे. 'बघवेल कशी ही भारत भू-परकेजन हे द्विविधा घुसले' अर्थात दोन्हीकडून भारत नागविला जात असल्याचे त्यांनी 'द्विविधा' या शब्दातूत स्पष्ट केले आहे. इंग्रजांना त्यांनी 'रावण' म्हटले आहे. भारत भू ची सुटका करून घेण्यासाठी रामाच्या वंशातील लोकांनी या इंग्रजरूपी

---

१. राष्ट्रीय भजनावली पृ. क्र. ९ गीत १४.

रावणाला मारले पाहिजे कारण तेच आपले परम् कर्तव्य होय. 'गुलामी सान थोराला, तयाचा धाक बहू मोठा, गांजिती फार जनतेशी'.

पारतंत्र्याबद्दलची जशी ज्वलंत चीड तशीच स्वातंत्र्याची आशा त्यांच्या अंत:करणांत होती. पारतंत्र्याच्या सुखापेक्षा स्वातंत्र्यातील दुःख त्यांना हवं होतं.

– परमेश्वरला प्रार्थना–वीर पुरुषाला प्रार्थना –

राष्ट्रसंतांनी प्रभू रामचंद्राला पुन्हा अवतार घेऊन हातात बाण घेण्याला तर श्री कृष्णला सुदर्शन चक्र घेण्याला विणविले झाले. 'चितातूर भारता' पाहून चरचरत्या काळजाने परमेश्वराला पुनरपि स्वातंत्र्य मिळावे म्हणून प्रार्थना करते झाले. 'मिळो स्वातंत्र्य पुन: जगदिशा' त्यासाठी भगवान श्रीकृष्णाला म्हणतात' 'वंसीका बजाना छोड दे, बन चक्र सुदर्शनधारी' कारण काळाचो अचूक नाडी ओळखून वागण्यांचे बळ एका श्रीकृष्णांत असल्याने त्यांच्या आयुष्यातील अगदी वेचक स्फूर्तिदायक भाग त्यांनी वेचून जनतेसमोर ठेवला.

– स्वातंत्र्यासाठी लोकांची मने जागविणारा –

स्वातंत्र्यासाठी लोकांची मने जागृत करतांना राष्ट्रसंत ज्वालेसारखे भासायला लागतात–

परकीय सत्ता नष्ट होवो झळको स्वातंत्र्याचाचा दिवा [1]

यांतच त्यांच्या पूर्व परंपरेचा अभिमान ज्वलंत रीतीने दिसून येतो. आपल्या अपूर्व पराक्रमाने पांडवाला यश मिळवून दिले, त्या अर्जूनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवायला राष्ट्रसंत सांगतात, 'अर्जूनासम वीर व्हा'

'भारताचे ग्रहण नेत्री पाहू नका' (अ. सा. २१८) 'समरी प्राण देऊन स्वातंत्र्य मिळवा' (अ.सा. २१९) 'उठा रे आर्यपूत्रांनो' अशी ललकारी करतात.

गर्जू द्या–वीर गर्जना । चमकूद्या-रक्त वीरांचे
उघडू द्या–कर्ण शूरांचे । फोडू द्या–भंड क्रूराचे
रणी द्या प्राण खोवूनी । हात का जोडता [2]

भारत माता गुलामगिरीत असतांना गनिमांचे गुलाम होण्यापेक्षा तिला दास्यातून मुक्त करणे हे भारतीयांचे कर्तव्य आहे. तोच खरा राष्ट्रधर्म आहे. राष्ट्रधर्माला स्मरून उद्याच्या राष्ट्राची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्या उसळत्या रक्ताला आव्हान करतांना राष्ट्रसंत म्हणतात–

राष्ट्र जागवा–जागवा । जागृत व्हा तरूणांनो
वीर वृत्तीचा दिवा उजळवा [3]

---

१. अनुभव सागर १५१ २. अनुभव सागर, १४७
३. राष्ट्रीय भजनावली (मराठी पृ. क्र. ५५)

वीर वृत्तीचा दिवा उजळायचा नसेल तर त्यापेक्षा मरणे बरे ! कारण इंग्रजी सत्तेने या देशांत काय साधले ते अत्यंत सुंदरतेने खालील ओवीत मांडले आहे.

जागो भारतवासी घरमे । आ गयी अंगार
चारो कोने शिलगे क्यों । बैठे हो ठंडगार
तोडो पंथनको नाना । सब संध बनालो अपना [१]

'संध बनालो अपना' यातून ते एकतेचा संदेश देतांना दिसून येतात. अनेक संघटनेमुळे खऱ्या कार्यशक्तिची माती होते. याची जाणीव राष्ट्रसंतांना झाली होती राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने धर्म–पक्ष–संप्रदाय आदी भेदाला त्यांनी महत्व दिले नाही. कुठलाही धर्म, पंथ महत्वाचा नाही ज्यावेळी राष्ट्र गुलामगिरीत असते. त्यावेळी धर्म ही बाब महत्वाची नसते म्हणून राष्ट्रसंत म्हणतात–

पहले देश को अपना लो । फिर धर्म का जपना [२]

राष्ट्रसंतांच राजकारण विशुध्द होतं. ते मानव धर्मापासून; समाजापासून वेगळं नव्हतं. शुध्दता, शुचिता आणि पवित्रता हे त्यांच्या राजकारणाचे वैशिष्ट्यें होय ! शुध्द राजकारणाची शिकवण देतांना राष्ट्रसंत म्हणतात–

'माफी मागण्या आला खळ तरी । अविचाराने देऊ नको
वीर वृत्ती ही सदा असो पण हीन–दीनावर हल्ला नको
स्वतंत्रतेचा बैल खरा पण गुलामगिरीचा थोर नको
कर्तव्यांच्या घरी मरो पण दुर्बलतनें जगू नको
मरणाची आली वेळ तरी तू च्या–च्या म्या–म्या करू नको' [३]

अस्सल राजनीती तंज्ञाला शोभतील अशा गोष्टी राष्ट्रसतांनी शिकवल्या आहेत. आपल्या जहाल क्रान्तिकारक वृत्तीतून जनतेच्या भावना पेटवित व स्वातंत्र्यासाठी मरण पत्करण्यांची जनतेची तयारी ते करते झाले. स्वातंत्र्याचा सूर्योदय त्यांना पाहता आला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही ते चूप बसले नाहीत. आदर्श राष्ट्र घडविण्याचे स्वप्न त्यांनी उरी कवटाळले. भारतीय घटनेने लोकशाहीचा पुरस्कार केला. राष्ट्रसंतांना अभिप्रेत असलेली लोकशाही घटनाकाराच्या लेखणीतून उतरली.

– लोकशाही पुरस्कार –

जन सामान्याच्या हितासाठीं स्वतःला वाहून घेणाऱ्या व लोकसेवेत धन्यता मानणाऱ्या राष्ट्रसंतांनी लोकशाही प्रधान असलेल्या भारतीय घटनेचा मनःपूर्वक स्वीकार केला. अब्राहम लिंकन लोकशाहीचा जनक. त्याने लोकशाहीची जी व्याख्या

---

१. अनुभव सागर २३४ २. अनुभव प्रसाद भाग २ पृ. १६२
३. अनुभव सागर १३८

केली आहे. 'अर्थात लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले सरकार म्हणजे लोकशाही' लोकशाहीचा प्रमुख दृष्टिकोण म्हणजे लोककल्याण होय.'

निरपेक्ष वृत्ती, निस्वार्थ बुध्दिने, परिश्रमपूर्वक लोक कार्याला; लोकहितासाठी स्वतःच्या आयुष्याची फूले वेचणारी, जनककळकळीची मंडळी लोकशाही शासनाचे नेतृत्व करणारी ठरावी, व लोकशाहीला प्रामाणिक राहून लोकहितदर्शक कार्य करावे' ही खरी लोकशाहीकडून केली जाणारी अपेक्षा घटनाकारांना मान्य होती.

राष्ट्रसंतानी ग्रामराज्याच्या रचनेच्या कल्पनेत लोकशाही पध्दतीचा अंगिकार केला आहे.

लोकशाही म्हणजे लोकांचे हित । लोकांकडून व्हावे हातो हात
सर्व मालक म्हणोनि सत्य । जबाबदारी ओळखावी [१]

लोकशाहीत लोकांचे हित लोकांकडून व्हावे. लोकशक्तीला राष्ट्रसंतानी महत्व दिलेले आहे. लोकांकडून लोकांचे हित साध्य करायचे असेल तर लोकांच्या आशा-आकांक्षेला डावलून चालता येणार नाही. त्यांचा शारिरीक, मानसिक आर्थिक, बौध्दिक आणि सामाजिक आदींचा सात्तत्याने विकास जनभावनेला धरून होणे आवश्यक आहे.

त्याच बरोबर लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी व्यक्तीमध्ये श्रेष्ठनीति आवश्यक असते. जिथे श्रेष्ठ नीति; राष्ट्रानिष्ठा, विवेक निष्ठा नसते तिथे लोकशाही दीर्घकाळ टिकू शकत नाही. परस्परांत प्रेम भावना निर्माण करून सत्यासाठी, स्वदेशासाठी वाटेल तो त्याग करण्याची, समानतेच्या व मानवतेच्या धर्माने वागण्याची, अन्यायाचा प्रतिकार करण्यांची व श्रमनिष्ठा अंगी बांधण्याची वृत्ती लोकांत निर्माण व्हावी.

साधनशुद्धि और सत्याग्रह, स्वदेश प्रीती फुले फले
श्रमनिष्ठा, समुदाय-प्रार्थना, व्यसनमुक्ति की गुंज चले
एक सुखी और एक दुःखी, यह दोष देशका दूर भगे
क्यों मानव में उंच नीचता ? समता तद्‌गुण सदा जगे
सुसंस्कार अबालवृद्धसे, भ्रटाचार न कही रहे [२]

असे होण्यासाठी प्रजा ही संस्कारित व्हायला हवी, चारित्रवान व्हायला हवी. सर्वांकडे समतेने बघणारी हवी.

झालो आम्ही मानवजातीचे
देशसेवेच्या पंक्तीचे । शिपाई लोक रक्षणाचे रे - जो

---

१. ग्रा. गी. अ. ३९ ओ. १०४ २. गीतांजली पान १०३

चारित्र्य अंगी बाणवा, नीतिचा दिवा
उजळूनी प्रेमदृष्टि सम ती । बघु नका कोणाला कमती
नागरिक व्हा उत्तम रीती रे जी–झी [१]

याच व्यक्तिस्वातंत्र्याबरोबर व सामाजिक समतेबरोबर राष्ट्रनिष्ठा जागृत करणे आवश्यक आहे.

'करि स्वतंत्र अपुल्या देहा । करि स्वतंत्र गावा अपुल्या
करि स्वतंत्र राष्ट्रा अपुल्या । करि स्वतंत्र देशा अपुल्या
हा धर्म मानशिल जेव्हा । नरजन्म सफल हा तेव्हा
तो पुरुष धन्य मनाचा । करि कृतार्थता मातेची
पर्वा न ठेवी मरणाची [२]

'स्वातंत्र्य' हा शब्द लोकशाहीत प्रत्येक व्यक्ती–व्यक्तीला लागू पडतो. आपण आपल्या स्वातंत्र्याचा इतकाच उपयोग घ्यावा जेणे करून दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर आघात होणार नाही. खरे म्हणजे मनुष्याने स्वत: होऊन स्वत:वर बंधने घालणे म्हणजे 'स्वातंत्र्य' असे म्हणता येईल. दुसऱ्याने बधने घालणे हे पारतंत्र्य पण बंधनेच नसणे म्हणजे स्वातंत्र्य अशा विपरीत कल्पना समाजात शिरल्या म्हणजे समाजाचा नाश होतो. समाजांत अनीती, भ्रष्टता, दहशत, अरेरावी, चोरी–चपाटी सर्व स्तरांत नांदायला लागते. माणसे भ्रष्ट, उद्यम, उन्मार्गी झाल्यावर लोकशाही किती तग धरणार ?

जो खुद नही अपने उपर शासन चलाता नेमका
वह हो नही सकता है, आजादी के कोई काम का
आजादीका मतलब नही, जो मनमे आवे सो करे
चोरी करे और घर भरे, व्यभिचार करके जा भरे ?

वरील प्रकारचे विचार अमेरिकेच्या क्लाईड बेडेल या लेखकाने 'लुक, ब्रदर, युअर हाऊस इज ऑन फायर' या पुस्तकांत 'आपली लोकशाही रसातळाला चालली आहे' असा इशारा दिला आहे. 'अमेरिकन जीवनाचा धागानधागा अनीती–भ्रष्टता, दहशत, अरेरावी यांनी कुजून गेला आहे. असे वर्णन करून सरते शेवटी शील, चारित्र्य, न्याय, स्वार्थत्याग, नीतिनिष्ठा व विवेकनिष्ठा हे लोकशाहीचे मूलाधार होय ? असे तो म्हणतो.

क्लाईड बेडेलने अमेरिकन लोकशाहीतील समाज जीवनाकडे पाहून जो इशारा दिला व लोकशाहीचे मूलाधार जे सांगितले आहे तेच राष्ट्रसंतांनी भारतीय जनतेला लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सांगितलेले आपणांस दिसून येतात.

---

१. लोकशाहीचे पोवाडे पृ. क्र. ६ २. अनुभव सागर पृ. क्र. ५३/६०

खरे तर विवेकाशिवाय व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे गुंडांना व्यक्तिस्वातंत्र्य, त्यांनाच सर्वाधिकार असतो. भारताची हीच स्थिती आहे. पंतप्रधान, न्यायधिश आणि राजकीय पुढारी आदीवर कोणीही टीका करू शकते पण डोळ्यादेखत येथे अन्याय, दरोडेखोरी, उपहार, लूटमार चालू असतांना कोणी टीका करू शकत नाही. त्यापाठीमागे स्वार्थ, भीती; हितसंबंध किंवा औदासिनता असेल परंतु यामुळे भारताच्या श्रेष्ठ संस्कृतीला दौर्बल्य आणणाऱ्या मूल्यांचा स्वीकार भारतीयांनी केला आहे. खरी संस्कृती तिच की, जी विवेकानिष्ठा, धर्मश्रद्धा, नीतिमत्ता; समाजाहित बुद्धी आदी मूल्यांचा स्वीकार करते, त्यांच संस्कृतीने बांधलेला समाज लोकशाहीची यशस्वीता संपादन करू शकतो. तिच स्वातंत्र्य; समता आणि बंधूत्वाची भावना समाजात निर्माण करू शकते.

वरील तत्वाचा स्वीकार केल्यावर श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेद उरणार नाही. कोणीही कुणावर अन्याय करणार नाही. मानवतेचा–समतेचा धर्म सर्वत्र दिसायला लागेल. मानवतेचा उत्कर्ष ही संपत्ती सर्वांच्या अंतकरणांत सतत वास करीत राहिल. न्याय–नीती–शुद्ध चारित्र्य व प्रेमभावाची जोपासना समाजाच्या सर्व घटकांतून सतत होत राहिल. या मानवी उज्वल संस्कृतीबरोबर त्यांनी जनतेत श्रमप्रतिष्ठेचे महत्व अंगी बांधले आहे. राष्ट्रसंतांनी निष्क्रियतेचा कडवा विरोध केला आहे. श्रमाशिवाय जीवन जगणे हे मानवाला लाजिरवाणे आहे. असे स्पष्टतेचे विचार मांडून ते थांबले नाही तर असल्या लोकाना खायला पण देऊ नये, या विचाराचे राष्ट्रसत होते.

लोकशाहीच्या हितासाठी, तिच्या यशस्वीतेसाठी निस्वार्थ बुद्धिने, सामुदायिक कार्याची जबाबदारी पाळून लोकहित बुद्धिने कार्य करणे हेच खरे लोकशाहीचे गमक राष्ट्रसंतांनी सांगितले आहे. लोकशाही कशाला म्हणावी याचे स्पष्टीकरण करतांना राष्ट्रसंत म्हणतात–

तीच म्हणावी लोकशाही । जिथे काम चुकार कुणि नाही
सेवा तत्पर उत्साही । त्यागी जग [१]

नेहमी कार्यात मग्न असलेली सेवाभावी जनता लोकशाही चांगल्या रीतीने टिकविण्याचे कार्य निश्चित स्वरुपांत पार पाडू शकते. त्यामुळे कार्यक्षमता, दूरदृष्टी, जागृतता, प्रामाणिकता, कार्याविरील निष्ठा, सतत परिश्रमाची चिकाटी व जिद्द आदी गुणांचा समावेश सहजतेने मानवांत व्हायला लागतो. राष्ट्रीय सामर्थ्य वाढवायचे असेल तर धर्म, नीती, सद्भावना आदीचा कार्यक्षमतेबरोबर विकास व्हायला पाहिजे.

---

१. ग्रा. ग्री. अ. ३९ अंवी १०४

ज्या राष्ट्राजवळ 'चरित्र–नीती नाही' ते राष्ट्र अद्योगतीला सहजतेने जाते. हाच प्रत्यय राष्ट्रसंतांना आला म्हणून ते म्हणतात–

जबसे चरित्र–नीति छूटी । तबसे बिगडा देश हमारा
जबसे बन्धूभावना टूटी । तबसे बिगडा देश हमारा [१]

खरे म्हणजे कोणत्याही गोष्टीचे यश समाजाच्या किंवा राष्ट्राच्या अंगच्या सत्वावर अवलंबून असते. अल्बर्ट आईनस्टाईनने म्हटले आहे की 'इतिहासाच्या प्रगतीला समाजातील (राष्ट्रातील) कर्त्या पुरुषाच्या बुद्धिमत्तेपेक्षा चारित्र्यांचे महत्व जास्त आहे आणि बौध्दिक क्षेत्रातील कृर्तृत्व चारित्र्यावर अवलंबून असते.' यावर भाष्य करतांना सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ क्रोथर यांनी 'चारित्र' याचा अर्थ स्पष्ट केला आहे. ध्येयनिष्ठा, दृढनिश्चय, असीम सत्यनिष्ठा, सत्याच्या रक्षणासाठी आवश्यक ती निर्भय वृत्ति, समाजहित बुध्दि, अंतिम उद्दिष्ठासाठी बलिदान करण्यांची सिद्धता' या गुणसंपदेला क्रोथर चारित्र्य असे म्हणतात' राष्ट्रसंतांनी वरील प्रकारचे विचार 'ग्रामगीतेत' मांडले आहे.

सर्वाविषयी समभाव । सर्वाभूती वासुदेव
हे जाणे तोचि खरा मानव । सत्यधर्म हाचि त्यांचा [२]

सत्यासाठी प्राण प्रतिष्ठेने पुढे यायला पाहिजे. समाजाच्या उत्कर्षात व्यक्ति विकास अवलंबून आहे समाजाचा विकास घडवून आणायचा असेल तर व्यक्ती जीवनापेक्षा समाज जीवन महत्वाचे आहे. आपले जीवन व्यक्तीशः उपभोगार्थं नसून ते सर्वासाठी आहे ही विवेक निष्ठा समाजनिष्ठेला धरून आहे. ज्यांना हे कळत नाही त्यांच्या गळी उतरविणे आवश्यक आहे

आम्ही सकळांसाठी जन्मलो । सर्वा मिळोन राहाया आलो
परस्पराशी पाहिजे पुरक झालो । हे न कळे तया [३]

सामाजिक हितबुद्धी प्रत्येकांत निर्माण झाली आणि कार्यक्षमता; चारित्र्यता यांचा समाजांत विकास व्हायला लागला की लोकशाही अतिशय उंच शिखरावर विराजमान होते. आजचा काळ हा जनतंत्राचा काळ आहे. लोकांच्या अंगात सर्व प्रकारचं सामर्थ्य निश्चित स्वरूपांत आहे. हे राष्ट्रसंत ओळखून होते. त्यांचा योग्य वापर झाला तर ते साम्राज्यालाही नमवू शकते. त्यासाठी प्रत्यक्ष समाजात कार्य करणाऱ्या कार्यकत्यांची आवश्यकता आहे. लोकशाहीचे केवळ मुखाने गोडवे गाऊन व समाज आणि राष्ट्रभक्तीच्या गप्पा मारून होणार नाही.

'लाख बोलक्यांहुनी थोर । एकचि माझा कर्तबगार
हे वचन पाळोनि सुंदर । गाव सुधारावे कार्याने [४]

---

१. ग्रा. गी. अ. ७ ओ. १०७ — २. राष्ट्रीय भजनावली (हिन्दी) पृ. १०८
३. ग्रा. गी. अ. ३८ ओ. ३४ — ४. ग्रा. गी. अ. ७ ओ. १०७

तसेच देशभक्तीविषयी विचार मांडतांना ते म्हणतात–

'देशभक्ती उन्ही की है, जो त्यागे मोहनिज घरका
बनाये देश अपना घर, छोड पाश जर डर का
हो जिसका संयमी जीवन । वही सेवा करे सब की
वो तुकडयादास कहता है । वही पात्र आदर का [१]

कोणतेही कार्य यशस्वी व्हायचे असेल तर त्या कार्यविषयी कार्य कर्त्याला फार मोठी तळमळ–कळकळ असणे आवश्यक आहे. त्या कार्याचे महत्व त्याला इतके वाटावे की त्याने आपले सर्व तन, मन, धन अर्पण करावे. आपली नियोजने इतकी व्यापक प्रचंड आहेत की त्याचा राष्ट्रव्यापी पसारा, त्यांत गुंतलेले धन, त्यावर अवलंबून असलेले आपले भवितव्य यांची प्रमाणे, मापणे इतकी अजस्त्र आहे की 'देह जावो अथवा राहो' वृत्तीचे लक्षावधी कार्यकर्ते असणे हीं खरी गरज आहे, पण देशभक्तांमध्ये किंवा पुढाऱ्यांमध्ये जे मानवधन पाहिजे त्यांचा अभाव आहे. आमचे देशभक्त किंवा पुढारी पदे भूषविण्यापलीकडे दुसरे कांही करीत नाही. याची कल्पना राष्ट्रसंतांना होती.

हाथी मिला तो मैं चढूं । सत्ता मिली तो मैं बढू
ये क्यों नही कहता कि देश के खातिर मैं लढूं
जाऊ गरीबोंके घर, उनकी सेवा के लिये [२]

केवळ योजना आखणे हे आपले काम व राबविणे हे सरकारचे काम असे ते समजतात. पंचवार्षिक योजनेतही ते रस घेत नाहीत. योजना तयार झाली की ते गाढ झोपेतच राहतात. योजनेचे काय होते ? यंत्रणेच्या जीवंतपणावर, तिच्या कार्यक्षमतेवर लक्ष नसते. चीनमध्ये योजनेची आखणी होताच हजारो कार्यकर्ते पुढारी जनतेकडे धाव घेतात. त्यांना योजनेचे महत्व, तिची आखणी सर्व तपशिलवार समजावून त्या योजनेसाठी जनतेचे सहकार्य मिळवितात पण भारतात उलट आहे. आमच्या देशातील नेते केवळ निवडणूकीच्या वेळी जनसंपर्कात येतात. सत्ता लाभतांच सत्तेचा उपयोग स्वत:च्या स्वार्थासाठी, उपभोगासाठी लाभलेल्या ५ वर्षात एकसारखे करतांना दिसून येतात. असे पुढारी जनतेचे शत्रू होय ! खऱ्या पुढाऱ्यांविषयी उद्‌गार काढतांना राष्ट्रसंत म्हणतात–

देशकी सेवा जीवन सदा । कष्ट करे तन–मन से
गर्व नही हो अपने तनका । बात करे संयमसे [३]

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रसंतांनी दर्शविलेली दिशा सुयोग्य वाटते.

---

१. राष्ट्रीय भजनावली (हिन्दी) भजन १०८
२. लहरकी वरखा २ पान ११ ओ. ४५ ३. भजन कुंज गीत १० वे

– समतावादाकडे जगाची वाटचाल –

अठराव्या शतकांच्या अखेरीस समाजव्यवस्था आणि राजकीय संघटना यांना जबरदस्त तडाखा बसला. कालमान्य पण मोडकळीस आलेली मंदिरे क्रान्तीच्या युगांत कोलमडून पडली शतकानुशतके मानवी चैतन्य आणि मानवी इच्छाशक्ती जी एकसारखी धुमसत होती त्यांचा स्फोट झाला. एकीकडे स्वातंत्र्य–समता आणि बंधुत्वाची उपासना केली जात होती तर दुसरीकडे वरील तत्वाची विटंबना करण्यात येत होती. तरी राजकीय सत्तेला अधिष्ठान कोणते ? हा युरोप क्रान्तीचा मूलभूत प्रश्न होता. लोकांच्या सार्वभौमत्वाचे तत्व राज्याच्या इश्वरदत्त हक्काच्या पोथीत तत्वाविरूध्द उभे ठाकले. रिनेसन्सचे देवाविरुद्ध मानवाच्या बंडाचे पर्यवसान म्हणजे ही महान क्रान्ती ठरली होती. पक्षपाती आणि पोथीनिष्ठ म्हणून ज्यांना म्हणता येणार नाही असा सुप्रसिद्ध (लोऊईस) मेडेलोन म्हणतो की 'क्रान्ती अटळ आणि अत्यावश्यक होती. मानवाच्या उदात्तम भावनाचा स्फोट होता तसा सूड ही होता' [88]

भांडवलदारांना बंड करण्यांची आवश्यकता नव्हती कारण १४ व्या लुईच्या कारकीर्दीपासून त्यांना सत्ता प्राप्त झाली होती. संघर्षात किंवा क्रान्तीत उतरलेली जनता सर्वसामान्य – सर्वहारा वर्गातील होती. पिन्ट अठराव्या शतकांतील तत्वज्ञानाविषयी आपल्या पुस्तकांत लिहितांना म्हणतो की 'रूढ प्रामाण्ये झुगारुन देण्यांत, बुद्धिशिवाय दुसरे कोणतेही प्रामाण्य न मानण्यांत आणि बुद्धिच्या समीक्षेतून न वगळण्यांत अधिक ठाम आणि संमार्जनी होती. प्राचीन परंपरा, सर्वाजनिक संपत्ती,, चर्चप्रणीत धर्म, धर्म ग्रंथ हे सर्व बुद्धिशी जुळत नसतील तर ती कुचकामी समजली जात. त्यातही दोन वर्ग होती. एकाने आस्तिकवादाची तत्वे बुद्धीप्रमाण स्वीकारली होती. तरी त्या बरोबरीच्या दुसऱ्या वर्गाने धार्मिक श्रद्धांवर भ्रांमक म्हणून हल्ले चढवली होतीं. नवे तत्वज्ञान प्रामुख्याने बुध्दिवादी होते पण बुध्दिवाद थंड आणि सौम्य नव्हता तर तीव्र आणि भावनोत्कट होता.

बुध्दिप्रामाण्ये स्वीकारुन राष्ट्रसंतानी धर्मनीतिचे श्रेष्ठत्व बुध्दिवरच प्रमाण मानले आहेत.

> अंध दुबळा भाविकपणा, तो कधीहि न रुचे माझ्या मना
> संतदेवाची निष्क्रीय गर्जना । करील तो आस्तिक नव्हे[1]

समाजातील घडी नियंत्रित, सुव्यवस्थित करून प्रत्येक व्यक्तिला समाधान प्राप्त व्हावे हाच धर्माचा दृष्टिकोन असतो.

---

[88] बुध्दी–प्रेरणा आणि क्रान्ती (प्रकरण महान क्रान्ती २)

१. ग्राम गीता अ. १ ओ.१०५

'आपणा ऐसे सर्वांचे सुखदुःख । जाणोनि वागावे उपकारक
सर्व धर्मी हाचि आदेश एक । दुमदुमताहे[1]

स्वार्थी लोकांनीं स्वतःच्या स्वार्थासाठी; धर्मभ्रष्टतेची कल्पना मांडली आहे तसे पाहिले तर जगातील जे धर्म आहेत त्यांची निर्मिती मूळांत लोककल्याण सुव्यवस्था; नियंत्रण, समानता आणि बंधुत्व या तत्त्वावर झाली आहे. थोडक्यात हिंदुधर्म ग्रंथातील अर्थात गीतेतील मानवतावाद व रिनेसन्सचा मानवतावाद अगदी समानता दर्शवितो. हिंन्दुचा वेदाकडे तर रिनेसन्सचा पेगनवादाकडे वाटचाल करतो. शेवटी या दोन्हीचा उत्कर्ष आजच्या युगात समतावादाकडे झालेला आहे.

समाजवादी चळवळीला १९ व्या शतकात खूप मोठया प्रमाणात महत्व प्राप्त झाले. रुसोच्या सामाजिक करारा अगोदर 'आबेमॉरेली' चे निसर्ग धर्मावरील पुस्तक 'कॉ द ला नात्येव' प्रकाशित झाले. 'लोभ किंवा स्वार्थ हाच केवळ या जगात दूर्गुण आहे. मानवजातीला लागलेली ती सार्वजनिक कीड आहे. तो समाजाचा क्षयरोग आहे. हाच विचार राष्ट्रसंतांनी पदोपदी मांडला आहे.

रुसोच्या सामाजिक पुर्नरचनेत संपत्तीची मालकी ज्या दिवशी सामुदायिक होईल त्या दिवशीच आदर्श लोक प्रत्यक्षांत येतील.

मॅब्ली हा कॅनोलिक पंडित असून क्रान्तीचा आणखी एक सिध्दांतवादी होता. तो देववादी असून चांगल्या देवावर आणि नैतिक कायद्यावर श्रध्दा ठेवणारा होता. त्याने सुध्दा सामाजिक विषमतेचे मूळ खाजगी संपन्नीत सांगितले आहे. मॅब्लीने भविष्यकालीन आदर्श समाजाची तिच वैशिष्ठ्ये राहतील असे जाहीर करुन मार्क्सचा शास्त्रीय समाजवाद पूर्व सूचित केला.

राष्ट्रसंतांनी स्वातंत्र्य–बंधूत्व तसेच समतेचा पुरस्कार केला. संपतीच्या सामुहिकतेवर भर दिलेला आपणांस (युरोपातील पंडिताप्रमाणे) दिसून येतो. राष्ट्रसंत मॅब्ली प्रमाणे असले तरी मार्क्सचा समतावाद त्यांना मान्य होता. त्यांनी जे जे मानवी जीवनाला उपकारक असेल त्यांचा पुरस्कार केला आहे.[⊠]

'वैकुंठाचा प्रेमानंद । सत्ययुगाचा समतावाद
अपुल्या गावी करावा सिद्ध । हेचि कर्तव्य सर्वांचे [2]

राष्ट्रसंतांनी समतावादाच्या दृष्टीने मार्क्सपेक्षा दोन पाऊल पुढे टाकली आहे. मार्क्सने संपत्ती आणि संतती ही राष्ट्राची ठरविलीं पण राष्ट्रसंत म्हणतात.

आमची संपन्ति नसे आमची । आमची संतती नसे आमची
कर्तव्य शक्तीहि नसे आमची ।व्यक्तिशःउपभोगार्थ

---

१. ग्राम गीता अ. २८ ओ. २३
२. ग्राम गीता अ. ३९ ओ. ७

⊠ बुध्दी–प्रेरणा आणि क्रान्ती पृ. क्र. २५९

हे सारे गावचे धन । असो काया, वाचा, बुद्धी; प्राण
असे असेल जयाचे धोरण । तो नास्तिकहि प्रिय आम्हा [१]

मार्क्स राज्यविहित विचाराचे होते तर राष्ट्रसंत राष्ट्रवादी होते. राष्ट्रभावना प्रत्येक नागरिकात असायला पाहिजे. त्या शिवाय राष्ट्र तग धरू शकत नाही. हे स्टॉलीनला जाणवले परंपरेचा अभिमान निर्माण करण्यासाठी त्याने अलेक्जेंडर, पिटर, नेपोलियन यांच्या पराक्रमाचे वर्णन देशभर पसरविले व रशियाला युध्दा पासून वाचविले. हा इतिहास फार लांबचा नाही.

– सामाजिक लोकशाही –

भारतीय राज्यघटनेने लोकशाहीचा अंगिकार 'केला. एका व्यक्तिला एका मताचा अधिकार घटनेने मान्य केला परंतु भारतातील लोकशाही यशस्वी करायची असेल तर सामाजिक लोकशाही पूर्णपणे यशस्वी होणे अत्यावश्यक आहे. इथे प्रश्न उभा राहतो की सामाजिक लोकशाही म्हणजे काय ? प्रत्येक व्यक्तिला स्वातंत्र्य– समता आणि बंधूत्व अर्पण करणारी लोकशाही म्हणजे सामाजिक लोकशाही असे म्हणता येईल. घटनात्मक दृष्टीने प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र आहे. कायद्याच्या दृष्टीने सर्व समान असून प्रत्येक भारतीय नागरिक हा भारत मातेचा सुपुत्र आंहे. त्यांचे परस्परांचे नाते बंधू भावाचे असावेत.ही सामाजिक लोकशाहीतील खऱ्या स्वरुपातील बांधिलकी आहे. हा त्रिवेणी संगम आहे त्यात एकाची जरी उणीव निर्माण झाली तरी सामाजिक लोकशाही अस्तित्वात राहू शकणार नाही. समाजाला सुव्यवस्थित व सुरक्षित ठेवायचे असेल तर समाज रचना समानतेच्या पायावर व्हायला हवी पण समाजाची समानतेच्या पायावर रचना करतांना राष्ट्रीय दृष्टिकोन नष्ट होणार नाही याची जाणीव प्रत्येक व्यक्तीने आपल्या अंतरी ठेवावी. अज्ञ–जनास समजावून सांगण्याची जबाबदारी अंतःकरणातील जिव्हाळ्याने स्वीकारावी हे राष्ट्र माझे आहे. आपल्या राष्ट्रावर प्रत्येक व्यक्तिची परिपक्व निष्ठा असायला पाहिजे. राष्ट्रनिष्ठा ही महान शक्ती आहे.राष्ट्रीय एकता नष्ट न करता ज्या राष्ट्रांत समानता नसेल,जिथे विषमतेचे प्रमाण जास्त असते. ते राष्ट्र उन्नतीच्या शिखरावर पोहचण्यापेक्षा अधोगतीच्या खोल खंदकात कोसळल्याशिवाय रहाणार नाही. म्हणूनच समाजातील विषमता नष्ट करून समानतेच्या आधारावर राष्ट्रीय दृष्टिकोन लक्षांत घेऊन समाजाची रचना मानवतेच्या उन्नतीसाठी करणे हे प्रमुख कार्य ठरते.

मानवतेला जागवून समानतेच्या पायावर समाजाची रचना व्हावी 'मानवताही धर्म का बाना' हे तत्व समाजात पूर्णपणे रुजावे कारण समाजातील लोकप्रवृत्ती कनिष्ठ जातीकडे तुच्छतेने बघण्याची व द्वेषाची असलेली आढळून येते. हे नष्ट

---

१. ग्राम गीता अ. १ ओ. ११०,

होऊन मानव धर्माचा उद्य समाजात व्हावा. तेव्हाच भारतीय समाज उन्नतीकडे वळेल, याचबरोबर समाजातील आर्थिक विषमता खूप मोठ्या प्रमाणांत शिगेला पोहचली आहे. श्रीमंत–गरीब, भांडवलदार–श्रमिक असे दोन वर्ग समाजात निर्माण झाले आहेत. या वर्गातील विषमता जवळच्या भविष्यांत वर्ग कलहांला, क्रान्तीला आव्हान देणारी ठरेल म्हणूनच ग्रामरचनेचा विचार करतांना राष्ट्रसंतांनी वरील प्रश्न हाताळला आहे. 'धन हे गरीबांचे रक्त व श्रम ही गावाची दौलत' असे उद्गार काढले आहेत. तर पुढे 'गावी जे श्रीमंत असती। त्यांचे धन गावाची संपत्ती' असेही ते म्हणतात. आजच्या भांडवलदारी समाज व्यवस्थेत जरी भांडवलदारांना तथा श्रीमंतांना श्रमिकांच्या किंवा गरीबांच्या रक्तावर जगता येणे शक्य असले तरी पुढच्या नजिकच्या काळांत ते अशक्य आहे कारण जगाचा प्रवास समाजवादी समाजरचनेकडे होत आहे. श्रीमंतशाहीला व भांडवलशाहीला सुरुंग लावले जातील कारण आजचे युग कामगार–श्रमिकांचे युग आहे. अर्थशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणे श्रम हे संपत्तीचे प्रमुख अंग आहे. जगातील संपूर्ण संपत्ती ही श्रमिक–कामगाराच्या कष्टाची आहे असा मार्क्सवादी इशारा त्यांनी दिला आहे.

आज सतत वाढत जाणारी भांडवलशाही भ्रष्टाचार; दुराचार, व्यभिचार, लाचलुचपत, नफेखोरी आदी अनेक गोष्टीला खूप मोठ्या प्रमाणांत जन्मास घालते आहे. समाजातील जास्तीत जास्त पैसा स्वतःच्या हातात ठेऊन सामान्य जनतेचे जीवनमान अत्यंत महागडे करुन सोडले आहे. सर्वहारा वर्गाना आर्थिकतेने कमजोर करुन आर्थिकतेने गुलाम बनविण्याचा हा प्रयत्न आहे. शेवटी स्वतःच्या जीवनाच्या प्रश्नासाठी सर्वहारा वर्ग क्रान्तीच्या मार्गाने वाटचाल करतो हा इतिहास आहे. इतिहासाला बगल द्यायची असेल व क्रान्तीचा धोका टाळायचा असेल तर सामाजिक लोकशाही खऱ्या स्वरूपात समाजात निर्माण करणे अत्यावश्यक आहे. तसे न झाल्यास सर्वहारा वर्ग, खेड्यातील गरीब मजूर वर्ग पोटाच्या प्रश्नासाठी चवताळून उठतील. आजच्या बंद व आंदोलनाचे परिवर्तन क्रान्तीत निश्चित स्वरुपांत होईल असा इशारा राष्ट्रसंतांनी दिलेला आहे.

भांडवलशाहीला विरोध आणि खंडन

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भांडवलदारी व भांडवलवादी प्रवृत्तीतील शोषण आणि गुलामी प्रवृत्तीच्या अंतर्गत सांप्रदायिक स्वरुपात विघटित होऊन भारतातील श्रमिक मजूरांचे शोषित आर्थिक आणि सामाजिक जीवन संकुचित व्हायला लागले. एका बाजूने श्रमिक व मजूरांच्या शोषणातून भांडवलवादी वर्गाचे अस्तित्व मजबूत आणि सदृढ व्हायला लागले तर दुसऱ्या बाजूने भारतातील मेहनत करणारा शोषित वर्ग, मजूर, भूमिहिन, गरीब व अल्पभूधारक वर्ग त्याचबरोबर

सर्व साधारण मध्यमवर्ग यांच्या समस्याचे निवारण होणे अवघड झाले आहे. त्यांची तीव्रता अधिक व्यापकतेने वाढायला लागली. भांडवली प्रवृत्तीच्या जटिल परिणामामुळे भारतातील शोषित, पीडित जनतेचा मुख्य आर्थिक व सामाजिक आधार शोषण, लुट, बेकारी, भूकबळी हाच वास्तविक स्वरूपात ठरायला लागला आहे.

समाजवादी संघटनेच्या व्यापकतेच्या अभावामुळे भांडवलदाराच्या जुलमी, भ्रष्टाचारी, अतिरिक्त नफेखोरी, वेठबिगारी आदी विरुद्ध मनात ज्वलंत चीड असूनही संघर्षाचे पाऊल उचलता आले नाही. भारतातील उदयन्मुख होणाऱ्या व जनतेत कार्य करणाऱ्या प्रत्येक पक्षाने व पुढाऱ्याने वरपंखी कनवाळूपणा दाखविण्याचा व राजकीय अस्तित्वासाठी कष्टकरी लोकांच्या बाजूने उभे राहून भांडवलदाराच्या विरोधात नारेबाजी लावण्याचा व आपला स्वार्थ बळकावण्याचा सुंदर प्रयत्न करून सर्वहारा वर्गाची सर्वानी दिशाभूल केली. खरे म्हणजे भांडवलशाहीच्या नीतिवर राज्यशासन जिथे पक्षाना चालवावे लागते तेथे भांडवलदाराच्या विरोधांत त्यांना उभे कसे राहता येईल ? भांडवलदाराच्या विरोधात जावून कार्य करायचे म्हणजे सत्तला पारखे व्हायचे, स्वार्थाला दूर लोटायचे हे अंतरी नव्हते.

मानव समाजाच्या इतिहासाच्या वैज्ञानिक विश्लेषणावरुन स्पष्ट होते की वर्ग समाजाच्या निर्माण काळापासून शांती आणि व्यवस्थेच्या आधारावर सामाजिक उत्पादनाचे निर्माणकर्ते (शासकगण) साधारण जनतेवर अत्याचारच करीत आले आहे. जोपर्यंत शांतता व व्यवस्था स्थिर राहत नाही तोपर्यंत मनुष्याकडून मनुष्याच्या रक्तशोषणावर आधारित वर्ग समाजाची आर्थिक व सामाजिक व्यवस्था टिकू शकत नाही. वर्ग समाजाचा इतिहास सांगतो की, सर्वदा आणि सर्वथा राज्य हे एका विशेषांचे राहत असते. हाच वर्ग; विशेष समाज स्वत:च्या आर्थिक-सामाजिक व्यवस्थेकरीता दुसऱ्या वर्गावर हत्यारासारखा उपयोग करण्यासाठी राज्याचा (शासन आणि सरकार) उपयोग करुन घेत असतो. आजच्या भांडवलदारी यंत्रणेत शासन व भांडवलदार या दोघांकडून होणाऱ्या पिळवणूकीला सामान्यजनतेला बळी पडावे लागते. भांडवलदाराच्या हातात सर्व सार्वजनिक उत्पादनाची साधने आहेत व त्यावर किंवा उत्पादित वस्तुवर सर्वहारा वर्गाचा अधिकार नाही. श्रम हे संपत्तीचे प्रमुख अंग असल्यामुळे उत्पादित वस्तुवर श्रमिकांचा समान नव्हे तर अधिकांश अधिकार आहे पण विषम परिस्थितीत अधिकार तर सोडाच उलट उत्पादनाची गती व वेग कमी करून श्रमिकांवर बेकारीची पाळी आंणणे व वस्तुचे भाव वाढविणे ही भांडवली प्रवृत्ती असते. तसेच जमीनदार मजूरांकडून जास्तीत जास्त काम करुन घेऊन त्यांच्या जीवनांच्या आवश्यक गरजा पुरविल्या जाऊ शकतील इतकी मजूरी देत नाही उलट अत्याचारी, व्यभिचारी प्रवृत्तीनें; हलकट; तच्छतेने मजरांकडे ते बघतांना दिसून येतात.

राष्ट्रसंतांना भांडवलदार व जमीनदारांची अत्यंत चीड येत होती.

ऐ चढ मिजाओ । नोकरों को, क्यों घृणासे देखते ?
धन है तुम्हारे पास करके, नीच उसको लेखते
ना याद तुमको है यही, धन रक्तपर किसके बढा
अजि ! पेट पर ये खून देते, करके सरपर छत चढा ?

'अजि ! पेटपर ये खून देते, करके सरपर छत चढा' असा अत्यंत स्पष्टतेचा इशारा त्यांनी दिलेला आपणांस दिसून येतो, श्रीमंत लोक मजूरांना, नोकरांना घृणास्पद बोलतांना दिसून आल्यावर त्याचा अत्यंत कडवा विरोध त्यांनी पत्करला आहे. श्रम ही संपत्ती असल्याने श्रमिकांना श्रमिक न म्हणता उत्पादित वस्तुमधील प्रमुख सहकारी म्हणावे असे क्रान्तिकारी मत मार्क्स प्रमाणे राष्ट्रसंतांनी मांडले आहे.

'मजदूर ना कहना उसे, है मददगर सहकार का
अच्छी जबांसे बोल, मुंह खोलकर भी प्यार का [२]

आज श्रमिक अत्यंत जागृत झाला आहे. मग तो शहरी जीवनांतील असो अथवा ग्रामीण जीवनांतील असो. त्याला त्याच्या परिस्थितीचं मूळ कारण समजलं आहे. आपले हक्क; अधिकार मिळविण्यासाठी, आपल्या जीवनाची पिळवणूक थांबविण्यासाठी धनिक व भांडवलदाराच्या विरोधात तो चवताळून उठल्याशिवाय राहणार नाही. हे सत्य आहे. सर्वहारा वर्ग जितक्या अधिक प्रमाणांत संघटित होईल तितक्या लवकर क्रान्तीची नांदी वाजल्याशिवाय राहणार नाही. ती क्रान्ती टाळायची असेल तर प्रचलित असलेली भांडवलदारी अर्थव्यवस्था बदलविणे अत्यावश्यक आहे. समाज जीवनांत सर्वांना समानतेचे स्थान व मान मिळतील अशी समाजरचना समानतेच्या व श्रमप्रतिष्ठेच्या आधारावर न झाल्यास क्रान्ती अटळ आहे.

हो देश मे भूखा न कोई, प्रथम यही ख्याल दो
चाहे उसे काम दो, बेकार कोई न डाल दो
है दुसरी बाते यही, शिक्षा मिले कपडा मिले
है जिन्दगी अच्छी तभी यह राज्य फिर फुले फले [३]

वरील प्रकारचा उपाय शासन वर्गाला; भांडवलदारांना सूचवितांना राष्ट्रसंत दिसून येतात भांडवली प्रवृत्ती श्रमिकांच्या – मजूरांच्या अज्ञानाचं प्रतिक आहे. श्रमिकांना योग्य शिक्षण व आवश्यक गरजा पूर्ण होतील एवढे मिळाल्यास व त्यांच आधारावर श्रमाची प्रतिष्ठा जितक्या अधिक प्रमाणांत होईल तितक्या अधिक प्रमाणांत उत्पादनाची साधने भांडवलदाराच्या हातातून निघून जाऊन श्रमिकांच्या

---

१ लहरकी बरखा २ पृ. क्र. ५३–५४. २. लहरकी बरखा २ पृ. क्र. ५३.
३. मेरी जीवन यात्रा पृ. क्र. १२६/८.

मालकीची होतील व उत्पादित मालांवर श्रमिकांचा अधिकार निर्माण व्हायला एक अवसर प्राप्त होईल आणि भांडवलशाही हळूवारपणे नष्ट होऊन 'दुनिया आहे कष्टीकांची' असा प्रत्यय सहजतेने घडून येईल. असा राष्ट्रसंतांचा विश्वास आहे. व तो जागतिक इतिहासाकडे पाहिल्यावर खरा वाटतो–सत्य वाटतो.

– पक्षिय धोरणाचा विरोध व ढळलेली राष्ट्रनिष्ठा –

भारतीय स्वातंत्र्याच्या उद्याबरोबरच पक्षिय राजकारणांची सुरवातही खूप मोठ्या प्रमाणांत व्हायला लागली. स्वातंत्र्यपूर्व काळांत 'काँग्रेस' हाच एक संघटित पक्ष होता–पण स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर स्वार्थ, सत्तालोभ; धनलोभ जातियता या दूर्धर रोगांनी काँग्रेसला ग्रासले, त्यामुळे राष्ट्रीय सेवा करण्याचे सामर्थ्य तिच्या ठायी ऱ्हास होत गेले. आमच्या कार्यक्षमतेचा हिशोब आम्हाला लाभत नाही. आजपर्यंत रेल्वे, कारखाने, शेती आणि रूग्नालये या विषयी सरकारने नेमलेल्या समित्यांचे अहवाल पाहिले की उधळपट्टी, विध्वंस, कतृत्वशून्यता, भ्रष्टाचार आदी सर्व विशेषत्वाने पाहायला मिळतात. या अराजक परिस्थितीच्या आधारावर जनकल्याणाचा धागा पकडून वेगवेगळे पक्ष फुटीरतेच्या किंवा सत्ताभोग न मिळाल्यामुळे निर्माण झाले आहे. आज लोकसत्ताक राज्यांत नसतील तितक्या अधिक प्रमाणांत विरोधी पक्ष भारतात आहेत. १९७५ ला सर्व पक्षांनी ऐक्याची भावना निर्माण करून सत्तारूढ पक्षांच्या विरोधात उभे राहिले. त्यांचे प्रमुख कारण इंदिरा काँग्रेसने दीर्घकाळ लावलेली आणिबाणी. त्यांत नष्ट होत असलेले राजकीय विरोधी पक्षाचे अस्तित्व व पुढाऱ्यांना मिळालेली जेलची हवा. पण ही जरी खरी सूरता असली तरी संघटित झालेल्या सर्व विरोधी पक्षाला 'जनता पक्ष' हे नामाभिधान प्राप्त झाले. स्व जयप्रकाश नारायण'याचे आशिर्वाद लाभले. सामान्यांचा पक्ष म्हणून सत्तारूढ पक्षाच्या विरोधात सर्वांत अधिक प्रमाणांत जनतेने निवडून दिले. त्यांचा सन्मान केला पण तो सन्मान टिकविता आला नाही. एकत्रित पक्षांतील मूळ स्वरुपांत असलेला स्वार्थ, सत्तालोभ, धनलोभ आणि जातियतेने पुन्हा डोके वर काढून आपसातील गोंधळ व फुटीरतेने पुन्हा जनता पक्षाचे विलगीकरण झाले आणि इंदिरा काँग्रेस पुन्हा सत्तारूढ झाला.

थोडक्यांत सांगायचे की स्वार्थ सत्तालोभ, धनलोभ, जातियता, गोंधळ आणि फुटीरता हे भारतीय राजकारणांच्या पाचवीला पुजले आहे. त्याचा परिणाम राजकारणाचे स्वरुप, त्यांचे नेते व सामान्यतः सर्वच अधिकारी व कार्यकर्ते हे चरित्रहीन, धर्महीन व ध्येयहीन झाले आहे. भ्रष्ट झाले आहे.

आमच्या बाजूच्या देशाकडे पाहिल्यावर असे दिसून येईल की, १९४९ ला चीनला स्वातंत्र्य मिळाले पण केवळ १०-१५ वर्षांत भारतासारख्या मोठ्या राष्ट्राला शह देण्यांचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण व्हावे. हे चीनच्या दृष्टिने आश्चर्य असले तरी

भारताच्या दृष्टिने लज्जास्पद आहे. आज ३५ वर्षात आमचे सामर्थ्य किती वाढले याचा विचार केला तर आम्हाला दिसून येईल की पाकिस्तानकडून आम्हाला आमचे कर्ज वसूल करून घेता आले नाही तर चीनने घेतलेला आमचा भूप्रदेश परत मिळविता आला नाही. इतक्यांतच आक्रमणामुळे निर्माण होणारा संघर्ष आपण ओढवून घेतला तर खूप मोठे रणकंदन होईल अशी चीनला भीती वाटली नाही. चीन व पाकिस्तान यांच्या दृष्टिने भारत अत्यंत प्रतिकारशून्य वाटतो. चीन आणि पाकिस्तानने भारतावर आक्रमन करावेत व भारतीयांनी पक्षिय स्वार्थी राजकारणांत राहून आत्मसरक्षण तत्व दुबळे व फुटीर ठेवावे. ही राष्ट्रप्रेमी व्यक्तीला न सहन होणारी बाब आहे. या धोरणावर चिडून जाऊन राष्ट्रसंत म्हणतात–

हे यार ! छोडो पक्षबाजी, देशवासी एक हो !
शत्रू खडा है द्वार पर, अपने लिए तो नेक हो
वह तो गनीमी चालसे, है मारने को आरहा
तुम होश मे हो या नही ? फिर क्यो तमासा हो रहा ? [१]

स्वार्थ आणि सत्ता आदीने अंध झालेल्या पक्षासमोर अखिल जनतेच्या हिताचा प्रश्न नसतो, पक्ष धोरणाचा प्रसार करून व सत्ता पटकविण्यांचा प्रसंगी त्यासाठी वाटेल ती किंमत देण्यांला तयार असतात. पक्षाचे राजकारण लोकसेवा किंवा लोककल्याणाच्या आधारावर चालत नाही. केवळ पैशाच्या व सत्तेच्या आधारावर चालते स्वत:चे ऐश्वर्य वाढविण्यासाठी सत्तेचा उपयोग केल्या जातो. भारतीय लोकशाहीतोल निवडणूका पाहिल्यावर राष्ट्रसंत चितातूर झालेत. लोककल्याणाची भावना पायदळी तुडविणारे हे लोकप्रतिनिधी या देशाचं भवितव्य उज्वल करतील काय ? हा सज्जनासमोरील प्रश्न राष्ट्रसंतांना भेडसावित होता.

'बस हद्द है इस कलहकी नही सभ्यता बाकी रहे
सत्ताधिकारी देशके लडते है कुर्सी के लिए
धन को गमाकर मान पाते 'वोट' खुद को मांगते
क्या देश का होगा भला ? सज्जन नही यह जानते [२]

हे केवळ सत्तेसाठी, राज्यशासन यंत्रणा स्वत:च्या हातात ठेवण्यांसाठी एकसारखे धडपडत असतात. लोकसेवेची भावना, लोकांच्या सुख दु:खाची दखल तीळमात्रही घेतल्या जात नाही. नेते व पुढाऱ्यांना त्याचे भान देखील राहिलेले नाही. देशाची उन्नती किंवा अद्योगती झाली तरी चालेल पण सत्तास्पर्धेत सर्वात पुढे राहण्यांची पैज देशातील नेत्यांमध्ये वृद्धिगत होते आहे.

---

१. लहरकी बरखा २–३१६ ओवी. २. लहरकी बरखा २ ओ. ३१६

'धुमधाम है चारोंतरफ, इस राज्यशासन के लिए
नहि भान लोगोंके सुख दुःख का, क्षण के लिए
इस देश का होवे बुरा, चाहे भला जो भी बने
पर ये नही पीछे रहे, हर दम हि रहते सामने [१]

राष्ट्रीय नेत्यांच्या मनोभावनेचा विचार केल्यास ते स्वार्थ भावनेने व सत्ता लालसेने वेडे झाले आहे. सत्ता, प्रतिष्ठा आणि पैसा हेच त्यांच्या जीवनांचं उद्दिष्ट आहे. त्यासमोर न्याय–नीति–बुध्दि यांचा विनाश झाला आहे. अशा भ्रष्ट झालेल्या नेत्यांच्या वृत्तीचं प्रगट दर्शन राष्ट्रसंत घडवितांना आपणांस दिसून येतात.

'हाथी मिला तो मै चढूं, सत्ता मिली तो मै बढूं
यह क्यों नही कहता की देश के खातीर मै लढूं
जाऊ गरीबोंके घरोंपर, उनकी सेवा के लिये [२]

राजकीय क्षेत्रातील परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. या देशाच्या बर्बादीचे सर्वात मोठे कारण राजकीय, राजनैतिक भ्रष्टाचारांत आहे. जोपर्यन्त देशातील नागरिक चारित्र्यवान बनणार नाही तोपर्यन्त या देशाची उन्नती होणे शक्य नाही.

भांडवलदाराची भांडवली वृत्ती नेहमी भ्रष्टाचाऱ्याच्या प्रवृत्तीला उत्तेजन देत असते. आर्थिक संकटाने डबघाईस आलेल्या सामान्य जनतेच्या असंतोषापासून स्वतःला वाचविण्यांसाठी पोलिस वर्ग, अधिकारी वर्ग, इतकेच नाही तर शासन वर्गातील राजनैतिक दलालही खरेदी करून ठेवतात.

आजपर्यंत देशांत जे कांड झालेत. उदा. गुलाबी चना कांड, टाटापट्टी कांड, पांडेचरी लायसेन्स कांड, बाजार कांड, बिजली कांड, चोरक तसेच सीता कांड आदीचा इतिहास कार्य दर्शवितो ? यांत हात असलेल्या व्यक्तीचं कांही होऊ शकलं नाही शासन कमजोर ठरलं आहे. किंबहूना शासनाचे हात त्यांत फसले असावेत. शासनाच्या या कमजोर वृत्तीला पाहून राष्ट्रसंत गंभीरतेचा इशारा देतांना दिसून येतात.

'बेछूट आया है जमाना : शासकोंका पाप है
ये तो भले मर जायेंगे, दुनिया को संताप है
लोहा अगर तप जाये तो जल्दी न ठंडा होगा
वैसीहि दुनिया बदल जाये तो पता लग जायेगा [३]

---

१. लहरकी बरखा ओ. २. लहरकी बरखा २ ओ.
३. लहरकी बरखा २ ओ. २४३

– राजकारण व लोकजीवन –

आजच्या अर्थव्यवस्थेत; सबळ नसलेल्या शासन व्यवस्थेत लोकजीवन फार विस्कळीत झाले आहे. चोरी–चपाटी, घूसखोरी यांचे थैमान सतत वृद्धिगत होत आहे. भांडवली प्रवृत्तीने प्रत्येकांत शिरकाव केला आहे. अशा परिस्थितीतील शासन यंत्रणेत शीस्त आणि शिक्षा यांची तीव्रता अत्यंत कमी केल्या जाते, आरोपीला शिक्षेबद्दल भीती वाटत नाही. संपत्ती मिळविणे हा जीवनाचा एकमेव उद्देश असतो. त्या गोष्टीला पाहून राष्ट्रसंत म्हणतात–

'जो लाच लेगा, घूस लेगा, भाग उसके जग गये
पकडा गया तो क्या हुआ ? इज्जत तो बेचे गये
लाखो कमाओ, जेल जाओ, एक या दो बार ही
दिलपर असर कुछ भी नही, अजि फांसी तो मिलती नही [१]

असल्या प्रकारचा भ्रष्टाचार समाजाच्या अत्यंत खालच्या वर्गापर्यंत पोहचलेला आहे. श्रमिक आणि मजूरांचे शोषण सर्रास होत आहे. श्रमिक व मजूराचे वेतन त्यांच्या आवश्यक गरजापूर्ण करू शकत नाही. त्यांत दुष्काळ, भूकंप, बंद, संप आदीचे वाईट परिणाम सर्वहारा वर्गावर उमटतात. त्यांची अन्नान्न दशा झाली आहे. श्रमिकांना काम नाही त्यामूळे उपासमारीला त्यांना बळी पडावे लागते. ही श्रमिकांची; मजूरांची परिस्थिती असतांना शासनाचा थंडपणा पाहून राष्ट्रसंत म्हणतात–

मुरदा पडा है सामने, रोटी किसे अच्छी लगे
दुनिया यह जलती जा रही, हम राज्य क्या करने लगे
निष्पाप भूके मर रहे, हम सोचते कुछ कर रहे
देरी हुयी तो क्या हुआ ? फिर मरके आवोंना नये [२]

'टाईम्स ऑफ इंडिया' ३ ऑक्टोबर १९७४ च्या अंकात पश्चिम बंगालच्या जिल्हा काँग्रेसच्या जगदानंद रायने सांगितले की जलपाई गुडी मध्ये ४०० लोक भूकबळीने मरण पावले. मध्यंतरी १९८० एप्रिल मध्ये मध्यप्रदेशातील लोक (आदिवासी) गवत खात असल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून प्रकाशित झाल्या होत्या.

'भूकबळी' ही या देशातील सर्वहारा वर्गावर कुठे ना कुठे तरी दरवर्षी कोसळणारी बाब आहे. जे शासन जनतेच्या अन्न–वस्त्रादी गरजा भागवू शकत नाही अशा शासनाला बदलविणे योग्य आहे. असा रास्त सल्ला राष्ट्रसंत देतांना दिसून येतात.

---

१. लहरकी बरखा २ ओ. २४२ १, लहरकी बरखा २ ओ.

'इस देशमे बसते है जो, उनकी सदा सेवामें बने
इसही लिये तो राज्यशासक, 'वोट' से जाते चुने
गर वे कदर नही करते; जनता भली भुखी मरे
शासन बदलने की भी फिर, वह क्यों नही हिंमत करें [१]

त्याच बरोबर शासनाला योग्यतेने समजावितांना राष्ट्रसंत दिसून येतात –

ऐ शासको। तुम काम दे दो, पर न भुखों मारना
यह तुम्हारा फर्ज, सबको तारना और सुधारना
गर राज मे हो भुखमरी तो, खुद को दोषी मानलो
सेवा करोंगे सत्यसे, तब शुभ हुआ पहिचान लो [२]

एकंदरीत आज धर्म; पंथ, जातियता, प्रान्तीयता, ग्रामीणता आदींमुळे मानवाची परस्पराविषयीची प्रेमाची भावना नष्ट व्हायला लागली आहे. अनेक प्रकारचे भेदा–भेद सर्वत्र दिसून येतात. राजकीय, सामाजिक अराजकतेला, भांडवली भ्रष्टाचारी प्रवृत्तीला उत आला आहे. संप – बंद, उपोषण घेराव आदी गोष्टी उगवत्या दिवसांबरोबर वाढत आहे. त्याला दाबण्यांसाठी अश्रूधूर–गोळीबार सतत देशांत कुठे ना कुठे तरी घडत असतात.

छडीमार किंवा लाठी हल्ला या देशांत नवीन प्रकार नाही. सन् १९८० मध्ये दिल्लीला अंधांनी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी लाठीहल्ला करावा यापेक्षा अमानवी कृत्य कोणते असेल ? स्त्रियांची इज्जत बाजारात विकल्या जाते. ज्या स्त्रियांना पोलिसांनी संरक्षण द्यावे तेथे पोलिसाकडून बलात्कार घडतो. (चंद्रपूर जिल्ह्यातील मथूरा प्रकरण) भ्रष्टाचार निर्मूलन खात्याकडून भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळावे म्हणजे कुंपणाने शेत खाण्यासारखे नाही कां ? आजची अशी स्थिती पाहिल्यावर, हे राज्याच्या अयशस्वीतेचे लक्षण आहे असे राष्ट्रसंतांनी स्पष्ट म्हटले आहे.

'चारो तरफ हलचल मची, क्या यह अपेशी राज है
किसिको भी सुख पाता नही, सब दुःखमे मुहताज है
खाना नही; पिना नही-कलह है हर जगह
कहते बुरा भी कर लिया, फिर भी रहे अपनी जगह [३]

जनता पेटलेल्या अराजकतेविरूद्ध आपला आवाज उंच करीत नाही. स्वतःच्या प्राणाला; प्रतिष्ठेला सांभाळण्याच्या प्रयत्नांत ती दिसून येते. प्रतिष्ठावादाच्या भवऱ्यांत सापडलेली जनता मुक्त करायची असेल व नवे जीवन त्यांना प्राप्त करून द्यायचे असेल तर क्रान्तीशिवाय दुसरा पर्याय नाही. असे राष्ट्रसंत म्हणतात –

---

१. लहरकी बरखा ओ. २१५ २. लहरकी बरखा ओवी ९०६
३. लहरकी बरखा २ ओवी ७५८

जनता भी अपने बल को, ऊँचा न करे आवाज को
डरती सदा वह जान को, कुलकी प्रतिष्ठा मान को

पुढे सत्य सांगतांना ते म्हणतात –

नहि दूसरा साधन कोई, क्रान्ती बिना अब सामने [२]

– आदर्श राजकारण आणि आदर्श जीवन –

आदर्श राजकारण जेथे मानवा मानवांत प्रेमाची भावना दृढमूल होते, आम्ही सर्व भारत मातेचे सुपुत्र आहोत ही भावना अंतरी असते. धर्म न्याय–नीती, चारित्र्य, प्रेमभावना सतत राजकारणांत दिसायला लागते, त्याला आदर्श राजकारण म्हणता येईल.

होता प्रभाव न व्यक्तीका, बल्के पडे चारित्र्य का
विद्वान पूजा जायेगा, कोईभी देश विदेश का
जिसकी तपस्या मानवोंकी, पूर्ण सेवामें लगे
उसके लिये भगवान भी, मंदिर में रहते जगे [१]

चारित्र्य; सेवाभाव; वाईटाचा निषेध व उत्तमाचा संग्रह या गोष्टींना राजकारणांत निश्चित परिपूर्णपणे महत्व राहिल्यास धर्म न्याय–नीतीला उचित स्थान प्राप्त होते. धर्म मानवतेवर तर मानवतेची खरी कसोटी न्यायावर होत असते. व न्याय सर्वासाठी समान राहतो. तिथे चाचा–भतिजावाद निर्माण होत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजाच्या राज्यात न्यायदृष्टीने नीतिभ्रष्ट व्यक्तीला अत्यंत कठोर शिक्षा देण्याची प्रथा होती. त्याचं न्यायासनासमोर त्यांचे सुपुत्र संभाजी महाराज नीतिभ्रष्ट आरोपाखाली उभे राहिल्यावर शिवाजी महाराजांनी त्यांनाही कैदेत टाकले. न्यायप्रियता तिच, की तिच्या समोर सगळे सारखे असतात.

भारतीय तत्वज्ञानात श्रेष्ठ असलेल्या गीतेने राजकीय दृष्टीने हेच तत्वज्ञान मांडले आहे. जातीपेक्षा धर्म व धर्मापेक्षा देश श्रेष्ठ आहे. देश आणि धर्माबरोबर जे गद्दारी करतात त्यांची पर्वा करणे हाच अधर्म व देशद्रोह आहे. [१] आचार्य पितामह भिष्म हे जरी श्रेष्ठ व जेष्ठ होते तरी कौरवाच्या अर्थात अधर्मियांच्या बाजूला असल्याने त्यांना मारण्यांचा सल्ला राजनीतितज्ञ असलेल्या श्रीकृष्णाने दिला होता. त्या गोष्टीची आठवण राष्ट्रसंत लहरकी बरखा २ मध्ये असलेल्या ३७७–३७८ या श्लोकांत करून देतात व पुढे त्या राजनीतीचं शिक्षण देतांना म्हणतात –

---

२. लहरकी बरखा २ ओवी ७५९ १. लहरकी बरखा ओ. ३४१.

'चुनलो यहाँ पर कौन है, बेमान जो तुममें घुसे ?
पकडो, करो साबीत और बचने न देना जानसे
उनकी प्रतिष्ठाही अगर तुममेसे बनकर करो
फिर तो मरो तुम भी यहाँ और देश को लेकर मरो [२]

भारतासारख्या देशांत आज गटबाजीच्या राजकारणाला बराच उत आला आहे. दुसरांचा शहाणा आम्हाला चालत नाही पण आमच्यातील मूर्ख चालतो. अशा स्वरुपातील राजकारण देशाला अधोगतीच्या उंच शिखरावर नेऊन देशाचे नैतिक बळ व चरित्र्य ढासळीत असते. देशाला मातीमोल करित असते. देशाला वाचवायचे असेल व देशाचे चरित्र्य उच्चत्तम करायचे असेल तर योग्य व्यक्तींच्या सद्‌गुणांचा योग्य तो आदर व सन्मान होणे आवश्यक आहे. त्याशिवाय राष्ट्र प्रगतीच्या मार्गावर जाऊ शकत नाही. भारतीय विद्वानांच्या चिंतेचा प्रश्न महाराजांनी सहजतेने उचललेला आहे. ते म्हणतात -

'चिंतीत हूं मैं इस बात पर, आगे जमाने के लिये
अच्छा बुरा नही सोचते, यह सोचते गटके लिये
मेरा गधा भी ठीक है, घोडा किसका ना चले
यह तो जमाना जायगा, यह सोचते नहि ये भले [२]

गटबाजीचे राजकारण लोकांच्या सज्ञानाबरोबर नष्ट होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. गट किंवा पक्षापेक्षा तो नेता श्रेष्ठ जो प्रामाणिकणे जनतेची सेवा करतो व हेच तत्व जनतेने पाळावे असे राष्ट्रसंत म्हणतात –

पुढारीपण सेवेनेच मिळे । हेच बोलावे मिळून सगळे
तेथे पक्षबाजीचे चाळे । वाढोचि न द्यावे [३]

– राजकारण–ग्रामाकडून देशाकडे –

राष्ट्रसंत ग्रामराज्याच्या कल्पनेतून देशाच्या राजकारणाकडे वळले आहेत. गाव सुधारले की राष्ट्र सुधारायला वेळ लागत नाही. जे गल्लीत तेच दिल्लीत दिसायला लागते. दिल्लीतले आजचे चित्र बदलावयाचे असेल तर गावा–गावातील गल्ली सुधरायला पाहिजे. नागरिकांनी जागरुक राहून खऱ्या समाजसेवकाला, ग्रामसेवकाला त्यांच्या सेवेच्या पात्रतेवरुन 'पुढारी' ही उपाधि द्यायला पाहिजे. नागरीकांनी जागृतता कशी ठेवावी, याविषयी विचार मांडतांना राष्ट्रसंत म्हणतात -

कोण गावासाठी झटे ? कोण उठतो रोज पहाटे
घेऊनि हातामाजी खराटे । झाडतो कोण ?

---

१. लहरकी बरखा २ ओ. ६०७ २. लहरकी बरखा २ ओ. ६२५
३. ग्राम गीता अ. १० ओ. ९३

साध्या राहणीनें दिवसभरी । कोण गरीबांचे कामे करी
कोण गावी फिरोन करी वारी । गावाची अपुल्या ?
कोण नीतीने असे चांगला ? पक्षपात न आवडे कोणाला ?
छदामासि नव्हे लाजिम झाला । गाव-निधीच्या
कोण सर्वांचे पाहतो सुख-दुःख, कोणाचे दिसे सेवेसाठी मुख
हीच त्यांची जाणीव ओळख । निवडावया [१]

अर्थात सेवाभावी, आदर्शवादी, धर्म-नीती प्रेम यांची उपासना करणारा, सर्वांच्या जीवनी सहभागी होऊन सतत कष्ट करणारा, निस्वार्थ वृत्तीचा, कर्मनिष्ठ कार्यनिष्ठ असणारा, असाच पुढारी ग्रामराजासाठी गावकऱ्यांनी निवडावा. ज्याला गावाविषयी जिव्हाळा आहे. ग्रामजनतेविषयी कळकळ आहे. असा सद्‌गुणी ग्रामाचे भाग्य व भवितव्य उज्वल ठेवण्यांचा अहोरात्र प्रयत्य करील. असा विश्वास राष्ट्रसंतांना आहे.

'ज्यासि गावाचा जिव्हाळा । जो कार्यज्ञानाचा पुतळा
तोचि सुखी करील गाव सगळा । निवडोनी [२]

असे उद्‌गार त्यांनी काढले आहे. त्याचबरोबर उपदेश प्रवृत्तीला किंवा भाषणबाजीला राष्ट्रसंतांनी रामदासी 'आधी केले मग सांगितले' या तत्वाप्रमाणे मान्यता दिली आहे.

'ज्याने केले असेल उन्नत ग्राम । अथवा समुदायाचे आदर्श काम
तोचि बोलण्यांचा अधिकारी उत्तम । समजतो आम्ही [३]

काम न करता, समाज किंवा ग्रामसेवा न करता उपदेश करणाऱ्याचा राष्ट्र-संतांनी निषेध केला आहे. चांगल्या लोकांचे एक मंडळ निर्माण करुन त्यांनी ग्राम-राज्यांचा सर्व कारभार त्यांच्यावर सोपविला असला तरी आदर्श ग्राम निर्माण करण्यांची जबाबदारी त्यांच्यावर टाकली आहे.

ग्रामराज्याचा दृष्टिकोन (समुदायांतून साम्यवादाकडे)

राष्ट्रसंतांचा ग्रामराज्यांचा दृष्टिकोन अत्यंत उदात्त विचारशिलतेतून, भावी सुराज्याच्या कल्पनेतून व अत्यंत व्यवहारवादी दृष्टी ठेऊनच मांडलेला आपणांस दिसून येतो. खेडे समृद्ध झाले. उद्योगी झाले तर भारत देश जो खेड्यामध्ये वसलेला आहे. तो पुन्हा उन्नतीच्या उंच शिखरावर विराजमान सहज होवू शकेल आणि शहरी जीवनावरील येणारा सगळा भार कमी होईल. शहरी जीवनाकडे किंवा शहराकडे वळणारी प्रवृत्ती नष्ट होईल. 'खेड्याकडे चला' अशी

---

१. ग्राम गीता अ. १० ओवी ७०-७३ २. ग्राम गीता अ. १० आ. ७९
३. ग्राम गीता अ. १० ओ. ८५

विनंती वजा सूचना करण्याची आवश्यकता राहणार नाही. ग्रामराज्याच्या सुव्यवस्थेचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे कारण–

गाव हा विश्वाचा नकाशा । गावावरून देशाची परीक्षा
गावचि भंगता अवदशा । येईल देशा [१]

आज हीच परिस्थिती भारताला प्राप्त झाली आहे कारण ग्रामात पूर्णत: उदासिनता, उद्योगहिनता व त्याचवरोबर अमानवी वृत्तीचा जबरदस्त तडाखा बसलेला आहे. व्यक्ती–व्यक्तीत निष्क्रीयता, अप्रामाणिकता निर्माण झाली आहे. ग्रामविकासाच्या योजना राष्ट्रीय पातळीवरून तयार होत असल्याने त्या योजनेविषयीची असलेली आत्मियता ग्रामजनतेत निर्माण होणे अत्यंत कठीण आहे. तेव्हा ग्रामजीवनाला काय आवश्यकता आहे. त्यावरून ग्रामयोजना ग्रामातच तयार करण्यांत आली व ग्रामजनतेला विश्वासांत घेण्यांत आले तर सहज योजना यशस्वी होवू शकते असे राष्ट्रसंतांना वाटते आहे.

वरील दृष्टिकोन यशस्वी करायचा असेल तर 'मानवी वृत्ती' गावात निर्माण करणे अत्यावश्यक आहे. मनुष्य निरोगी–सात्विक बनावा, तो व्यसनाधिन नसावा. प्रत्येक व्यक्तिचा व्यवहार कुणासही त्रासदायी न होता परस्परांना पुरक व्हावा' अशा प्रकारचे शिक्षण त्यांना देणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचवरोबर समाजरचना बदलविणे आवश्यक आहे. व्यक्ती समाजाभिमुख व्हावी. समाज राष्ट्राला सहायक व्हावा, असे आग्रहपूर्वक प्रतिपादन राष्ट्रसंतानी केले आहे.

व्यक्ती व्हावी कुटूंब पुरक । कुटूंब व्हावे समाज पोषक
तसेचि व्हावे राष्ट्र सहाय्यक । राष्ट्र विश्वा शांतीदायी [२]

याचे कारण 'आम्ही सगळ्यांसाठी जन्मलो । सर्वां मिळोनि राहावया आलो, परस्पराशी पाहिजे पुरक झालो' ही सामुदायिक वृत्ती प्रत्येकांत निर्माण व्हावी व त्याचबरोबर नागरिकांने 'सामुदायिक जबाबदारी, जी–जी असेल नागरिकावरी । न चुकता काढावी निर्धारी । स्वार्थ करी न ठेवता ।।

त्याचबरोबर निष्क्रीयतेचा विरोध करून समाज किंवा गावहिताला व्यक्तित्वापेक्षा अधिक महत्व दिले आहे. सगळ्यांचे हित ज्यांत आहे त्यालाच ते महत्व देतात.

'करावे सर्वाच्या हिताचे । तेथे व्यक्तित्व नको आपुले' असा उपदेश करतांना दिसून येतात. त्याचबरोबर ग्रामराच्यांचे स्वरूप अत्यंत साधे, सरळ भेदरहित असावे, जातियता, उच्चनिचता आणि वर्गभेद आदी ग्रामराज्यांत राहू नये.

---

१. ग्रा. ग्री. अ. १ ओ. ४९ १. ग्रा. गी. अ. २ ओ. १७

ग्रामराज्याविषयी 'पंचायत राज' यांत त्यांनी आपले विचार अत्यंत स्पष्टतेने मांडले आहेत. त्यांतच त्यांच्या आदर्श ग्रामराज्यांच स्वप्न पूर्णपणे साकार झाल आहे.

पंचायत का राज चलेगा, गुंड गांव मे नहि होना
सात्विक जनता काम करेगी, तभी मिलेगा सुख अपना
सभी नागरिक मिलके बोले, काम गावका क्या करना
वही चलेगा कदम सभीका, निर्भय होके सब रहना
हर धन्देकी पडे जरूरी, सबने सबकी कदर करो
नीच-उंच का काम नही है । भाई चारा नहि बिसरो
एक बात की पथ्य रहेगी, चोरी चारी दूर करना
सात्विक जनता काम करेगी, तभी मिलेगा सुख अपना
एकही मतसे चुनाव होगा, पंच जो मुखिया हो सच्चा
जिसे देखकर उन गांवोका, सुखी रहे बच्चा-बच्चा
त्याग उसीमे सबसे ज्यादा, स्वारथ उसको जरा नही
जब तक वह सरपंच रहेगा, अपना परका स्मरा नही
सबने जो की नियम बनाया, ठीक वही पूरा करना
सात्विक जनता काम करेगी, तभी मिलेगा सुख अपना
भंगी, ब्राम्हण, किसान, धोबी, सभी रहेंगे परिवारी
मगर वहाँ वो नही रहेंगे, जिनकी चलती घुसखोरी
कालापैसा, लुचपतबाजी और शराबी नही होगी
भजन-पुजन, मंदीर, प्रार्थना, ठीक समय शोभा देगी
सब मिलके श्रमदान चलेगा, कुंए सडके बनवाना
सात्विक जनता काम करेगी, तभी मिलेगा सुख अपना
लबाड, झुंटे, निंदक कोक्षी, इनपर तो निगरानी हो
गडबड करते देखा तब तो, निकालनेकी बानी हो
शिक्षण देकर धर्म-कर्म का, चरित्र उंचा बन जावे
आपसमेही मेल जोल हो, प्रजातंत्र यदि कहलावे
तुकड्यादास कहे, संतसेही झण्डा उँचा रहे बना
सात्विक जनता काम करेगी, तभी मिलेगा सुख अपना [१]

०—०

---

१. भजन कुंज गीत २१ वे

समारोप

वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाच्या संपूर्ण साहित्याचा, कार्याचा विचार केल्यावर असामान्य बुध्दिमत्ता व असाधारण जीवनानुभव यांच्या एका एका धेंवात अनेकांना जीवनदान देण्याच सामर्थ्य त्यांच्या वाङमयात व कार्यात आहे.

विदर्भाच्या मातीत अमरावती जिल्हयातील यावली सारख्या चिमुकल्या खेडयांत कै. बंडोपंत ब्रह्मभाटाच्या घरी जन्मास आलेला हा महापुरुष, आपल्या कार्याने जनमाणसांत मान्य पावला.

अखिल भारतीयांच्या ओळखीचे सर्व श्रेष्ठ संत 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' एक महान युगप्रवर्तक, जहाल क्रान्तिकारक असल्याचे त्यांच वाङमय आजही साक्ष पटविते. आपल्या विचारातून व कार्यातून समाजवादाची बांधिलकी अत्यंत जिव्हाळयातून–निष्ठेने सांभाळून राजकारण (नव्हेची हीन) व तत्वज्ञान या दोन्ही आघाडीवर खरा खुरा समाजवाद त्यांनी प्रस्थापित केला. समाजवादाच्या अंतर्स्थ तत्वाला उचलून धरून आदिभौतिकाचा कस लाऊन समाजाला उचलून धरणारा एक महान संत, समाजोद्धारक म्हणून राष्ट्रसंताच दर्शन त्यांच्या वाङमयातून–ग्रामगीतेतून आपणांस दिसून आलेत. त्यांच्या वाङमयातून समाजवादावरील अव्यभिचारी निष्ठा, विचारातील सुस्पष्टता व प्रतिपादनातील बिनतोडपणा या त्रिविध वैशिष्टयातून त्यांच व्यक्तिमत्व भरीव प्रमाणांत आकारास आले आहे. त्यांच्या समाजवादावर संपूर्ण विश्वास ठेवल्यास देश व्यापक कार्य नव्हे तर विश्व व्यापक कार्य एका सरळ रेषेत होऊ शकते. ही विचारधारा सप्रमाण सिद्ध होते.

त्यांचे वाङमय मनामध्ये झुंजार आशावादाचा, दुर्दम्य चिकाटीचा व सहृदय माणूसकीचा ओघ मनात आणून सोडून कर्तव्याची चाड पायी आणते.

१९ व्या शतकांची सुरवात सामाजिक व राजकीय दृष्टीने भारतीय इतिहासांत अत्यंत महत्वपूर्ण अशी ठरते सामाजिक तसेच राजकीय चळवळीने खूप मोठया प्रमाणांत वेग घेतला होता. परिस्थितीची अचूक नाडी पकडून समाजाला दिशा दाखविण्यांचे महान कार्य विदर्भाच्या व पुढे जगाच्या पार्श्वभूमीकेवर राष्ट्रसंतानाही केले. विश्वधर्म परिषद; अखिल भारतीय साधु समाज संमेलन ही त्यांची त्या क्षेत्रातील भरीव कामगिरी होय ! रूढी आणि परंपरेने बांधलेल्या, दिशाहीन झालेल्या समाजाला समाजवादाची दिशा दाखविणारे व बदलत्या

काळानुसार–परिस्थीनुसार समाजात योग्य परिवर्तन वैचारिक पातळीवरून घडविणारे ते महाभाग होते. त्यांनी आदर्श समाज रचना तयार केली. ज्यात वर्ग नाही, वर्ण नाही; कोणत्याही प्रकारचे भेदभाव नाही. माणूस ही एक जात आणि मानवता हा धर्म त्यांच्या लेखी आहे. व्यक्तिनिष्ठतेकडे वळणारा नाही. समाजाभिमुखता व समाजनिष्ठा ही खऱ्या स्वरूपातील त्यांच्या धर्माची शिकवण आहे. मानवाच्या आध्यात्मिक विकासाबरोबरच त्यांचा आर्थिक विकास अ यंत महत्वाचा आहे. आध्यात्मिक विकासासाठी ध्यान, योग, सामुदायिक प्रार्थना, प्रेम–न्याय, नीती, सदाचार व चारित्र्यता आदी साधने त्यांनी दर्शविली आहे. आर्थिक विकास हा सामुदायिकतेच्या तत्वावर आधारित आहे. ग्रामराज्य हे त्यांच स्वप्न आहे. ग्रामराज्यातील मुख्य शेती–उद्योग, त्यावर आधारित कुटिर व लघु उद्योग सामुदायिकतेच्या तत्वार चालावी. व्यक्ती तथा ग्राम समाजाच जीवन सामुदायिक पद्धतीच असाव. 'अमुच्या गावीचे सर्व धंन । ग्रामवासियाचे सुखस्थान' 'संपत्ती आणि संतती । ही गावाची ठेव निश्चिती' किंवा करावे सर्वांच्या हिताचे । तेथे व्यक्तित्व नको अमुचे, 'अधिकार समानचि जीवनांचा' यावर त्यांच ग्रामराज्य उभे आहे. श्रमकरी; कष्टकरी जनतेच साम्राज्य त्या ग्रामराज्यांत निर्माण झाल आहे. उत्पादनाची प्रक्रिया ज्यामूळे गतिमान होते त्याला ते श्रम असे म्हणतात. आणि म्हणून निकष्टिकाला त्यांच्या साम्राज्यांत किंवा ग्रामराज्यात स्थान नाही. गावबुडवे, व्यसनाधिन अशा लोकांना त्यांचे साहित्य न देता गावातून हाकलू द्यावे. असे विचार त्यांनी मांडले आहे. कारण 'असे बळकटयण जोवर नाही तोवर आदर्श ग्राम एक तमाशाराही'

प्रत्येक व्यक्तीने सामुदायिक जबाबदारी सांभाळावी, आपल्याकडे सोपविलेले कार्य–काम करावे याशिवाय उरलेल्या कार्यशक्तीला दुसरे उद्योग, जोडधंदा पुरविण्यांत यावेत. शेती व उद्योग धंदे यांतून प्राप्त होणारे उत्पादन ग्रामविकास, उद्योग–शेती विकास, संशोधन, यंत्रसामुग्री, शिक्षण आदीसाठी योग्यनिधी काढून टाकल्यावर उरलेला नफा श्रमाच्यां आकारमानानुसार, गरजेनुसार वाटण्यांत येईल. सामाजिक समानतेंबरोबर आर्थिक समानता ही प्रत्येकांत निर्माण करता येईल. 'वेगळा नफा, वेगळी संपत्ती' ही त्याच्या ग्रामराज्यांत राहणार नाही. प्रत्येक दिवसांची सुरूवात सामुदायिक ध्यानातून होत असली तरी त्याचा शेवट सामुदायिक स्वरूपातून म्हंटल्या जाणाऱ्या राष्ट्रवंदनेतून होईल. व यादिवसांतील सामुदायिक श्रम सामुहिक भोजन आदीमुळे सहकार्याची बांधिलकी चांगल्याप्रकारे प्रत्येकात रूजायला लागेल. सामाजिक तथा व्यावसायिक दृष्टीने स्त्री ही समान राहिल. स्त्री व पुरुष याच्यात भेद राहणार नाही.

भौतिक संपन्नता निर्माण झाली की गाव आदर्श झाले असे म्हणता येणार नाही. प्रत्येक व्यक्ती – व्यक्तीमध्ये असलेले भेद नष्ट होऊन सुख – शांती त्यांना लाभावी. ग्रामातील सर्वांचे जीवनमान समान राहिल. त्यांचे राहणीमान देखील समान राहिल. शिक्षणाच्या आणि आरोग्यांच्या सर्व सोयी गावात राहतील. शिशु-केन्द्रापासून तर विश्वविद्यालयापर्यंत शिक्षणाच्या सर्व सोयी गावात निर्माण कराव्यात. जीवन–शिक्षण, जीवन–कला व त्यातूनच औद्योगिक विकास साध्य करण्यात येईल. व्यायामाचे शिक्षण, शारीरिक शिक्षण विद्यार्थ्यांना लाभेल त्यामुळे स्वसंरक्षणा-बरोबर ते ग्रामसंरक्षण करतील 'माझे गावचि माझे शरीर' असे असल्याने समयदानातून – सामुदायिक श्रमदानातून ग्राम आध्यात्मिक व आर्थिक दृष्टीने प्रगत केल्या जाईल. कार्य निष्ठा प्रामाणिकता व सदाचार हाच जीवनाचा पाया राहिल.

नेहमी कार्यात मग्न असलेली, सेवाभावी जनता ग्रामराज्याच, लोकराज्याच स्वप्न साकार करू शकते असा त्यांना विश्वास आहे. ग्रामराज्याच्या किंवा लोक-राज्याच्या यशस्वीतेसाठी कार्यक्षमता, सावधानता, दूरदृष्टी व जागरूकता आदीचा लोकांमध्ये अंतर्भाव असावा. कार्यमग्नतेत कार्याबरोबची प्रामाणिकता, कार्याविरील निष्ठा हे गुण असावेत. आपले जीवन व्यक्तीशः उपभोगार्थ नसून ते सर्वांसाठी आहे. ही विवेकनिष्ठा समाजनिष्ठेला धरून आहे. समाजहित बुद्धी निर्माण झाली की लोकशाही उंच शिखरावर विराजमान होते.

आदर्श समाज निर्माण करायचा असेल तर प्रत्येक मानवाचा आध्यात्मिक व आर्थिक विकास साध्य करणे हे जसे अगत्यांचे आहे. तसेच समाजातील वर्ग–वर्ण भेद नष्ट कसे होतील त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. भावी संतान चांगली व्हावी ही अपेक्षा असेल तर 'उत्तम पुरूषासवे उत्तम नारी' असे होणे अगत्याचे आहे. हाच विचार महाराष्ट्रातील पुरोगामी साहित्यिक डॉ. रू. पां. पांजणकर यांनी आपल्या निबंधाद्वारे महाराष्ट्रासमोर मांडला होता. त्यावर भाष्य करताना ते म्हणाले होते की, यामुळे बलशाली उत्तम रत्न प्राप्त होतील. जातिभेद नष्ट होतील. समाज आणि राष्ट्रविकास सहज घडून येईल. आज अमेरिकेत याच गोष्टीला समाज–जीवनांत महत्व प्राप्त झाले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाच्या विचारसरणीतून निश्चित स्वरूपांत कांही निष्कर्ष काढता येतात ते असे –

– निस्कर्ष –

१) जात, धर्म, पंथ, संप्रदाय निरपेक्ष समाज समानतेच्या तत्वावर तयार करून समानतेची योजना त्यांनी आखली आहे, जी श्रमप्रतिष्ठा व उद्योगप्रियतेवर आधारित आहे. वर्ग व वर्ण विहित समाज हे त्यांच्या समाजाचे वैशिष्टयें आहेत.

व्यक्ती सुखापेक्षा समाज सुखाला महत्व आहे. त्यावर आधारित आदर्श समाजाचे त्यांचे कथन वास्तविक स्वरुपाचे आहे. भांडवलदारांना, निष्क्रीय लोकांना, वाईट प्रवृत्तीच्या लोकांना त्यांच्या समाजात स्थान नाही.

२) 'श्रम ही संपत्ती' यावर आधारित ग्रामीण अर्थव्यवस्था त्यांनी सांगितली आहे. ती समाजवादी स्वरुपातील आहे. कष्टकरी जनतेला जवळची आहे. व यंत्र-युगाला पुरक आणि पोषक आहे.

३) सहकार्य तथा सामुदायिक शेतीचा पुरस्कार राष्ट्रसंतांनी केला. सोविएत खेड्याप्रमाणे ग्राम व्हावे असे त्यांना वाटते. आर्थिक मानवी प्रगतीबरोबर आध्यात्मिक प्रगतीचे महत्व त्यांनी कथन केले आहे.

४) ग्रामनिष्ठेला आवश्यक अशी शिक्षण पद्धती त्यांनी मांडली आहे., जीवन आणि शिक्षण यांची योग्य सांगड त्यांनी घातली असून सहकार्याची भावना त्यातून निर्माण होईल असे ते असावे. शिक्षणातच श्रमाची प्रतिष्ठा त्याच्यात निर्माण व्हावी. ग्रामाचा मुख्य व्यवसाय शेती असल्याने शेतकी व औद्योगिक शिक्षण त्यांना मिळावे. त्यासाठी ग्रामाने संपत्ती पुरवावी. विविध शिक्षणांचे क्षेत्र गावात निर्माण करावे.

५) राष्ट्रसंतांच्यामते मुलीचे शिक्षण प्रथम चरणी स्वतंत्र असावे. त्याचा अभ्यास स्वतंत्र असावा. त्यांत कुटिर उद्योग, गृह उद्योग, संगीत, हस्तकला आदींचा समावेश असावा, किशोर वयानंतर सहशिक्षण असले तरी चालेल. मुलाप्रमाणे मुलींना सर्वप्रकारचे शिक्षण देण्यात यावे, महिला संघटनेचे महत्व त्यांनी प्रभावी रीतीने कथन केले आहे.

दलितोन्नतीसाठी त्यांनी कार्य करून 'अस्पृश्यता क्रियेवर मानावी' हे तत्व-प्रतिपादिले आहे. मानवे, मानवाचा वाढवावा गौरव या तत्वाला उचलून धरले आहे.

६) मॅब्ली व मार्क्स प्रमाणे भांडवलशाहीचे खंडन करून मार्क्सच्या समाजवादातील धोके टाळून; शुद्ध समाजवाद सांगितला आहे. त्यातही राष्ट्रनिष्ठा हे महत्वाचे तत्व आहे. मार्क्सच्या अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत राष्ट्रसंतांनी सांगितला आहे.

राज्याच्या सुव्यवस्थेसाठी अलबट् स्टाईन प्रमाणे आपले विचार मांडले आहेत. चारित्र्यावर अधिक भर बुद्धीपेक्षा ते देतांना दिसून येतात. तर कोथरची चारित्र्याची व्याख्या राष्ट्रसंताना अभिप्रेत आहे.

राष्ट्रसंताचे विचार आजच्यासमाजवादी तत्वाकडे जाणाऱ्या युगाला पोषक आहे. उपकारक आहे. व योग्य दिशा दाखविणारे आहे. श्रमिकांचे, कष्टकरी जनतेचे युग त्यातून निर्माण होऊ शकेल अशा स्वरूपातील आशावाद त्यात आहे.

राष्ट्रसंतांनी ग्रामोन्नतीतून आपले विचार जरी मांडले असले तरी राष्ट्रोन्नतीला ते उपकारक आहे.

मार्च ११५६ च्या दुसऱ्या-आठवडयांत दिल्ली येथील लोकसभेत अंदाजपत्रकावर झालेल्या सर्वसाधारण चर्चेला उत्तर देतांना केलेल्या भाषणात तत्कालीन अर्थमंत्री व जगद्विख्यात अर्थशास्त्रज्ञ श्री. सी. डी. देशमुख म्हणाले –

" भारतातील शहरी व ग्रामीण विकासाचे महत्व, समाजवादी समाजरचनेची निर्मिती इत्यादी आवश्यक विषयांची चर्चा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखडयाचा विचार करतांना सभागृहात केल्या जाईल. हल्ली ग्रामसुधारणा बाबत सरकार अधिकाधिक लक्ष घालीत असून त्यासाठी बराच पैसा खर्च केला जात आहे. हेच कार्य बिनसरकारीरीत्या श्री संत तुकडोजी महाराजांनी मध्यप्रदेशांत व हैद्राबाद राज्यांत चालविले असून, त्यांचे प्रयत्न गौरवार्ह आहे. लोकांच्या हृदयांत आत्मोद्धाराची प्रेरणा निर्माण करून, संघटितपणे त्यांना ग्रामसुधारणेच्या कार्यास लावणे हे कार्य खरोखरच राष्ट्रोन्नतीच्या दृष्टीने अत्यंत हिताचे व महत्वाचे आहे.



अभ्यासलेले पुस्तके

१) भारत का राष्ट्रीय आंदोलन और कम्युनिस्ट } क्रान्ति प्रकाशन गृह
२) भारतीय क्रान्तिकारी आंदोलन के तीन सोपान } ११३ पानदरीवा,
३) विप्पवी मार्क्सवाद–लेनिनवाद–समाजवाद } इलाहाबाद.
४) मानव समाजका ऐतिहासिक विकास
५) भूमी मुक्ती आंदोलन आणि प्रमुख पक्षांच्या भूमिका
६) १९४२ की घटनाएँ और हिन्दूस्थान की कम्युनिस्ट पार्टी – अयोध्यासिंह
७) साम्राज्यवाद का उदय और अस्त
८) भारत का मुक्ती संग्राम
९) राष्ट्रीय आंदोलन का संक्षिप्त इतिहास
१०) भूदान – चळवळ (ले. विनोबा भावे)
११) सोविएत समीक्षा (१९७९)
१२) अर्थ नीती आणि आर्थिक नियोजन (मंगेश प्रकाशन नागतूर)
१३) परिव्यय लेखाकर्मा (ले. ए. एस. उखळकर)
१४) प्रतिभाविलास (ना. सी. फडके)
१५) महात्मा गांधी वाङ्मय (संचालक, प्रसिध्दी विभाग महाराष्ट्र राज्य–मुंबई)
१६) गरम बर्फ (यूरी बोंदारेव–प्रगती प्रकाशन–मास्को
१७) राष्ट्रसंताची भाषणे (बाबा मोहड)
१८) प्रेमयोग का सच्चा पुजारी (डॉ. नारायण महेन्देकर)
१९) लोकसत्तेला दण्डसत्तेचे आव्हान(डॉ. पु. ग. सहस्त्रबुध्दे)
२०) The American Society.
(Edited by Kenneth S. Lynn)
२१) सोविएत सामुदायिक शेती– (सोविएत देश, पुस्तिका १९७५)
२२) स्वतंत्रता—संग्रामका इतिहास (सव्यासाची) युगान्तर प्रकाशन मथूरा)
२३) बुध्दी—प्रेरणा व क्रांन्ती (भाग–१) श्री मानवेंद्रनाथ रॉय
२४) गांधीवाद (पुरोगामी विचारमाला न्युइतवारी रोड नागपूर)
२५) भारतकी कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवांदी) राजनैतिक प्रस्ताव,
२६) राजनीती ज्ञान के बुनियादी सिध्दान्त (बी.ए. लापशोव
२७) मार्क्सवादी तत्वज्ञान खंड १ व २ (पी. पी. एच बुकस्टॉल
२८) अर्थशास्त्राची मूलतत्वे खंड १ व २ (१९० बी, खेतवाडी, मुंडई
२९) तेंलगणाका संग्राम
३०) दस दिन यह दुनिया लुटी

३१) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
३२) युगांतर मासिक (संपादक–श्रीकांत लाड)
३३) टिळक आणि आगरकर (श्री. ना. बनहट्टी) सुविचार प्रकाशन, नागपूर.
३४) मार्क्सवादी समाजशास्त्र (निकोलाई बुखारिन, कानपूर.)
३५) पाश्चिमात्य राजकीय विचार (प्रा. अरविंद शृंगारपूरे)
३६) धर्म (इरावती कर्वे)
३७) मानव समाजका ऐतिहासिक विकास (केशवप्रसाद शर्मा, बिहार)
३८) शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र (म. बा. कुंडले)
३९) इन साईट रशिया टुडे (जॉन गुंथूर)
४०) साहित्याची कामगिरी (द. बा. कालेलकर)
४१) 'नवे शिक्षण' (श्री कामत)
४२) 'राष्ट्रसंत' (प्रा. पी. एस. काणे)
४३) शिक्षण विचार (विनोबा भावे)
४४) धर्म–शिक्षण (शं. वा. दांडेकर)
४५) संत वाङ्मयाची फलश्रुती (गं. बा. सरदार)
४६) संत आणि समाज (काका कारखानीस)
४७) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चरित्र (सुदाम सावरकर)
४८) राष्ट्रसंत तुकडोजी आणि स्वातंत्र्याची चळवळ
४९) राष्ट्रसंत श्री तुकडोजी व्यक्तित्व आणि कर्तृत्व

– वं. राष्ट्रसंतांची प्रकाशित पुस्तके –

मराठी

१) ग्रामगीता
२) अनुभव सागर भजनावली भाग १-२
३) जीवन जागृती भजनावली
४) लोकशाहीचे पोवाडे
५) समाज–संजीवनी भजनावली
६) दिव्यदर्शन भजनावली
७) क्रान्तिविणा भजनावली
८) नव–जागृती भजनावली
९) विवेक–माधुरी, भजनावली
१०) राष्ट्रीय भजनावली
११) अरूणोदय भजनावली
१२) आदेश रचना
१३) आत्मविकास अभंगावली
१४) माझी आत्मकथा अभंगावली
१५) स्फूर्ति नरंग
१६) सुविचार–स्मरणी
१७) आनंदामृत
१८) गीताप्रसाद
१९) युगप्रभात
२०) विश्वशांतियोग
२१) राष्ट्रसंताची प्रवचने
२२) राष्ट्रसंतांची पत्रे
२३) हितबोध
२४) राष्ट्रसंतांच्या सहवासात.

हिन्दी


१) अनुभव प्रकाश भजनावली १ क २
२) अनुभव प्रसाद भजनावली
३) लहरकी बरखा भाग १ व २
४) गांधी गीतांजली
५) विवेक सरिता भजनावली
६) जीवन ज्योति भजनावली
७) राष्ट्रीय भजनावली
८) क्रांति-दीप भजनवली
९) सुधासिंधू भजनावली
१०) ज्ञान-दीप भजनावली
११) राष्ट्र-नौका भजनावली
१२) आत्मप्रभा भजनावली
१३) वाचा-वल्ली भजनावली
१४) भजन-कुंज भजनावली
१५) सद्विचार प्रवाह
१६) विद्या-पुष्प
१७) नवप्रकाश


इंग्रजी


१) ए वण्डर मॅन ऑफ इण्डिया
२) ग्लीम्स ऑफ न्यूज
३) स्पार्क्स ऑफ थॉटस्
४) सिलेस्टिअल

- शुद्धिपत्र -

पृष्ट क्र.	ओळ	मुद्रण दोष	दुरुस्ती
१	ओळ १	गीते	गीतं
६	खालून ३ ओळ	पर्ण	पूर्ण
१७	ओवी २	किसान की	किसानों की
२०	ओवी ३	ग्रथामाजी	ग्रंथामाजी
३७	१४ ओळ	बांधीलकी	बांधिलकी
४१	२ ओळ	पाहतो	पाहती
४८	खालून २ ओळ	समुदायिक	सामुदायिक
७९	खालून ९ ओळ	सर्वोतोपरी	सर्वोतोपरी
८७	वरुन १२ ओळ	सपुष्टात	संपुष्टात
९१	खालून ८ ओळ	स्वयपूर्ण	स्वयंपूर्ण
९९	खालून ९ ओळ	नागपूर	(नागपूर)
११६	वरून १५ ओळ	स्तरावर	स्तरांत
११८	१ ओळ	भोवता	भोक्ता
१२६	ओवी ३	कांहो	काही
१३१	खालून ७ ओळ	राष्ट्रसंततांनी	राष्ट्रसंतांनी
१४६	खालून १२ ओळ	संपन्तीत	संपत्तीत




REFBK-0024535


3023
25439
10/3/24



डॉ. बाळ पद्वाड

एम.ए, बी.एड, पी.एच.डी.
जन्म - २१ - नोव्हे. १९४७
गुरुकुंज मोझरी
जि. अमरावती.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल. कवी, लेखक, दिग्दर्शक व गौरीशंकर फिल्मस् निर्मित "राष्ट्रसंत" या हिन्दी चित्रपटाचे पटकथा लेखक म्हणून विदर्भात प्रसिध्द आहे.

प्रकाशित पुस्तके

- संत नामदेवबाबा विजय ग्रंथ (महात्म्य)
- राष्ट्रसंत: वैचारिक क्रान्ती

अगामी प्रकाशन

- कर्मयोगी तुकारामदादा गीताचार्य
- समाजवादी संत गणपती महाराज
- कालपात्र (काव्यसंग्रह)

विजया प्रकाशन, २३, रेशीमबाग, नागपूर.

मुद्रण: मधुकर आर्टस्, धंतोली, नागपूर.